# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2015-2017

YEAR : 40) 30th December 2015 ( No. of Pages 52 ) ( No : 12


# केळकरी कारस्थान विशेषांक


*लेखन*

**प्रा.बी.टी.देशमुख**

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*


## अनुक्रमणिका


**प्रस्तावना :** अंधश्रद्धा व चमत्कार यातून सिंचनक्षेत्राने केव्हा तरी एकदा बाहेर पडले पाहिजे ! सिंचन अनुशेष निर्मूलनातील ढोंगी बुवाबाजी आणखी किती दिवस चालणार ?.....**१५८**

**(१)** सिंचनक्षेत्रात तालुकानिहाय अनुशेष काढण्याचे कारस्थान केळकरांनी पार पाडले.....**१६२**

**(२)** घटनेच्या तरतुदींचा व कायद्यातील तरतुदींचा भंग करून केळकरांनी दिलेला अहवाल.....**१६४**

**(३)** कोणाला संरक्षण द्यायचे ? व कोणापासून संरक्षण द्यायचे ? याबाबत डॉ. केळकरांचा अलौकिक कल्पनाविलास.....**१६६**

**(४)** हांजीखोरपणा व लांगुलचालनाच्या पोटी कलम ३७१ (२) वर नवीन अर्थ लादण्याचा केळकरांचा प्रयत्न.....**१६८**

**(५)** समतोल विकासाच्या नावाखाली असमतोल शिफारशी.....**१७१**

**(६)** अनुशेष दूर करण्यासाठी त्या प्रदेशांनाच केवळ संपूर्ण वित्तीय निधीचे वाटप करणे व इतर प्रदेशांना त्यापासून वंचित ठेवणे हे दूरदर्शीपणाचे व उचित ठरणार नाही केळकरांनी लावलेला अजब शोध.....**१७२**

**(७)** असलेल्या अनुशेषावर माती लोटा व नव्याने समतोल विकासाला सुरुवात करा पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांनी हुकूम दिला व केळकर लागले कामाला.....**१७४**

**(८)** जंगल न्यायाने निधी वाटप, समान वाटप व समन्यायी वाटप यापैकी केळकरांनी जंगल न्यायाने निधी वाटपाची निवड केली.....**१७६**

**(९)** थेट निधीप्रदानाची व्यवस्था नसणाऱ्या पण अहवालाच्या सजावटीला सुंदर रितीने सुशोभित करणाऱ्या अतिसुंदर सुविचारांचा फार मोठ्या प्रमाणात विदर्भ व मराठवाड्यावर वर्षाव.....**१७८**

**(१०)** बळीराजाच्या ऐका हाका ! जाळुनी किंवा पुरूनी टाका.....**१८१**

**(११)** माजी मालगुजारी तलाव, खारपाणपट्टा व दुष्काळी तालुके.....**१८३**

**(१२)** माजी मालगुजारी तलाव, खारपाणपट्टा व दुष्काळी तालुके : २.....**१८५**

**(१३)** केळकरी कपटाच्या कथनोत्तर उपाययोजनांचा विचार करावाच लागेल.....**१८७**

**(१४)** अनुशेष निर्मूलनार्थ निधी वाटपाचे स्थायी सूत्र.....**१८९**

**(१५)** विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला.....**१९१**

**(१६)** विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला : २.....**१९३**

**(१७)** विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला : ३.....**१९५**

**(१८)** विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला : ४.....**१९८**

**(१९)** विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला : ५.....**२००**

**(२०)** सिंचन अनुशेष निर्मूलनार्थ निधी वाटपाच्या सूत्रातून 'अनुशेषाचे वेटेज' हद्दपार करण्याचे अपकृत्य.....**२०३**

**(२१)** सिंचन अनुशेष निर्मूलनार्थ निधी वाटपाच्या सूत्रातून 'अनुशेषाचे वेटेज' हद्दपार करण्याचे अपकृत्य : २.....**२०६**

प्रस्तावना

# अंधश्रद्धा व चमत्कार यातून सिंचनक्षेत्राने केव्हा तरी एकदा बाहेर पडले पाहिजे !

## सिंचन अनुशेष निर्मूलनातील ढोंगी बुवाबाजी आणखी किती दिवस चालणार ?

**१. सिंचन अनुशेष निर्मूलनाच्या प्रश्नात गेल्या अनेक वर्षांमध्ये अंधश्रद्धा व चमत्कार यांनी जो धुमाकूळ घातला आहे तो लक्षात घेतला म्हणजे अनुशेष निर्मूलनाच्या प्रक्रियेतील ही ढोंगी बुवाबाजी आणखी किती दिवस चालू राहणार? हा प्रश्न अनुशेषग्रस्त भागांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा व कळीचा प्रश्न ठरतो.** "सर्व जिल्ह्यांच्या तौलनिक परिस्थितीचा आढावा पुन्हा घ्यावा आणि राज्याच्या नवीन सरासरीच्या संदर्भात नवीन अनुशेष काढावे आणि ते पुरे करण्याकरिता हीच प्रक्रिया योजनेच्या काळात पुढे चालू ठेवावी" *(सत्यशोधन समिती अहवाल परिच्छेद १७.२१)* दरवर्षीच्या राज्यसरासरीच्या संदर्भात नव्याने अनुशेष काढावे हे एक व दुसरे म्हणजे योजनेच्या प्रत्येक वर्षात हीच प्रक्रिया पुढे सुरू ठेवावी, अशी स्पष्ट शिफारस सत्यशोधन समितीने केलेली आहे, याचे स्पष्ट दर्शन त्या शब्दरचनेतून होते.

२. सत्यशोधन समितीची याबाबतची शिफारस अतिशय स्पष्ट असतांना त्या समितीच्या नावावर अनेक अंधश्रद्धा गेली अनेक वर्षे पसरविण्यात आल्या. **"सत्यशोधन समितीने १९८२ च्या राज्यसरासरीवर निश्चित केलेला अनुशेष दूर करणे म्हणजेच अनुशेष दूर करणे होय" ही त्यातील एक प्रमुख अंधश्रद्धा होय.** विधानमंडळाच्या उभय सभागृहामध्ये ही अंधश्रद्धा वर्षानुवर्षे पेरली गेली व जोपासली गेली. उदाहरण द्यायचे झाल्यास पाटबंधारे मंत्र्यांनी दिनांक २० जुलै, १९९४ रोजी काढलेले पुढील उद्‌गार पहा :- "परंतु अशा सतत वाढणाऱ्या सिंचन सरासरीच्या आधारे अनुशेष किती हे ठरविणे किंवा दूर करणे व्यवहार्य होत नाही व तसे सत्यशोधन समितीस अभिप्रेतही नव्हते. यामुळे जून १९९० च्या राज्य सरासरीवर अमरावतीचा अनुशेष वाढल्याचा उल्लेख नियोजनात विचारात घेणे शक्य होणार नाही." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २० जुलै १९९४ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १०२, क्रमांक ८, पृष्ठ ५४)*

**३. विदर्भ-मराठवाड्याचे दुर्दैव असे की उपरोक्त अंधश्रद्धा सभागृहामार्फतच पसरविण्याचा प्रयत्न करणारे पाटबंधारे मंत्री हे खुद्द मराठवाड्यातीलच होते. अशा भाकडकथाधारित अंधश्रद्धा पसरविण्यात मराठवाड्यातील मंत्री आघाडी घेतो ही गोष्ट विदर्भाला कशी सहन होणार? ही रोगट अंधश्रद्धा पसरविण्याच्या बाबतीत "अत्यंत निरोगी स्पर्धा" करण्याचे नव्याने आलेल्या विदर्भातील पाटबंधारे मंत्र्यांनी ठरविले.** त्यांनी सभागृहातच दिनांक २६ जुलै, १९९५ रोजी "त्यामुळे शासनाच्या नियोजनात सत्यशोधन समितीच्या अहवालात दर्शविलेला अनुशेष दूर करण्यापुरतेच नियोजन अपेक्षित आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २६ जुलै १९९५ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १०५, क्रमांक १६, पृष्ठ ६९)* असे जाहीर केले. एवढ्यावरच थांबले तर विदर्भातील पाटबंधारे मंत्र्यांचे मोठेपण ते काय? ही अंधश्रद्धा जोरात ठासून पसरावी यासाठी त्यांनी आणखी तपशीलवार खुलासा पुढीलप्रमाणे केला :- "सिंचन क्षमता निर्मितीच्या सततच्या प्रक्रियेमुळे राज्य सरासरी उत्तरोत्तर वाढत जाणार आहे. ती अनुशेष निर्मूलनाच्या प्रयत्नामुळेही वाढत आहे. त्याचप्रमाणे अनुशेष नसलेल्या भागात अपरिहार्यपणे निर्माण होणाऱ्या सिंचन क्षमतेमुळे ही वाढत जाणार आहे. अशा सतत वाढत जाणाऱ्या राज्य सरासरीशी तुलना करून अनुशेष निर्मूलनाचा कार्यक्रम आखणे व राबविणे अव्यवहार्य आहे." "त्यामुळे शासनाच्या नियोजनात सत्यशोधन समितीच्या अहवालात दर्शविलेला अनुशेष दूर करण्यापुरतेच नियोजन अपेक्षित आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २६ जुलै १९९५ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १०५, क्रमांक १६, पृष्ठ ६९)*

४. त्याच मंत्र्यांनी त्याच दिवशी सभागृहात आणखी असाही खुलासा केला की :- "अनुशेष निर्मूलन कार्यक्रम ७ व्या योजनेच्या सुरुवातीपासून हाती घेताना प्रामुख्याने १९८२ च्या सरासरीवर निदर्शनास आलेला अनुशेष दूर करण्याचे उद्दिष्ट नियोजनात ठेवण्यात आलेले आहे." अशा रीतीने १९८२ च्या सरासरीवरील अनुशेष दूर करण्याचा उद्योग २००१ पर्यंत चालू राहिला. मात्र प्रत्यक्षात १९९४ च्या सरासरीवर तो अनुशेष दुप्पटीहून जास्त वाढलेला होता. आता २००१ पासून १९९४ च्या सरासरीवरील अनुशेष दूर करणे सुरू झाले आहे. प्रत्यक्षात २०१४ च्या सरासरीवर तो अनुशेष चौपटीहून जास्त झालेला आहे. **दरवर्षीच्या सरासरीवर अनुशेष अद्यावत न करण्याची ही पद्धती अशीच चालू राहिली तर घटनेमध्ये कलम ३७१(२) हे अनुशेष निर्मूलनासाठी समाविष्ट करण्यात आले होते की अनुशेष वाढविण्यासाठी ते कलम दाखल करण्यात आले होते? याचाच शोध घ्यावा लागेल.**

**५. "महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले कृष्णा खोऱ्यातील पाणी सन २००० पर्यंत वापरले नाही तर त्या पाण्यावरील महाराष्ट्राचा हक्क गमावला जाईल" अशा एका जबरदस्त अफवेने व अंधश्रद्धेने अनुशेषग्रस्त भागाला जबर जखमी केले.** वस्तुतः कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत लवादाने जो निर्णय दिलेला आहे त्याच्या आठव्या प्रकरणात असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की :- "Failure of any state to make use of any portion of the water allocated to it during any water year shall not constitute forfeiture or abandonment of its share of water in any subsequent water year nor shall it increase the share of any other state in any subsequent water year even if such state may have used such water" Clause VIII(B) of chapter 7. इतकेच नव्हे तर इ.स.२००० नंतर पुनर्विलोकनाची तरतूदसुद्धा या निर्णयात पुढील शब्दात नमूद आहे :- "At any time after the 31st May 2000 this order may be reviewed or revised by a competent authority or Tribunal" - Clause XIV (A) of chapter 7. असत्य प्रचाराच्या व उपरोक्त अफवांच्या आधारावरसुद्धा राजकीय लूटमारीचे स्वरूप यावे एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी पळविण्याच्या या उद्योगाला पुढच्या काळात भरभराटीचे दिवस आलेत. मी स्वतः ज्यावेळी लवादाच्या उपरोक्त तरतुदी सभागृहामध्ये वाचून दाखविल्या तेव्हा तत्कालीन पाटबंधारे मंत्र्यांनीसुद्धा महाराष्ट्राचा हक्क जाईल असे म्हटले नाही तर "**त्याचा पुनर्विचार केला तर काही तरी अडचणी येऊ शकतात**" असे उत्तर दिले.

६. "दिनांक ३० सप्टेंबर १९९३ रोजी मराठवाड्यात झालेल्या भूकंपामुळे पुनर्वसन कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने विविध विकास क्षेत्रांच्या १९९३-९४ च्या तरतुदींना कपात लावली आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ मार्च १९९४ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ५, पृष्ठ १०)* अशी कबुली मा.पाटबंधारे मंत्र्यांनी स्पष्टपणे सभागृहात लेखी उत्तरामध्येच दिलेली होती. **भूकंपग्रस्तांसाठी इतर बाजूंनी फार मोठा निधी आल्यामुळे मग ही सारी रक्कम कृष्णा खोऱ्यामध्ये वळविण्यात आली. खरे म्हणजे भूकंपग्रस्तांसाठी कापलेला निधी त्या त्या प्रकल्पाकडे पुन्हा वळवायला पाहिजे होता.** ज्येष्ठ सदस्य श्री.सुधीर जोशी यांनी तसा प्रयत्नही करून पाहिला. तो पुढीलप्रमाणे :- "**श्री.सुधीर जोशी :** सुरुवातीला भूकंपग्रस्तांच्या नावावर त्यांना मदत करण्यासाठी कपात लावल्याचे सांगितले. आता सांगितले जाते की, ती कपात भूकंपग्रस्तांसाठी लावली नसून प्रगतावस्थेतील प्रकल्प पूर्ण होण्यासाठी लावली, तर मग ही रक्कम त्याच भागातील प्रगतावस्थेतील प्रकल्पांसाठी का लावली नाही, याउलट अप्पर वर्धा हे पूर्णावस्थेत असलेले धरण आहे. त्यासाठी जास्तीची तरतूद करून ते धरण पूर्ण करण्याऐवजी त्या धरणासाठी असलेल्या तरतुदीवर कपात लावली. ज्या भागात अनुशेष आहे तो भरून काढण्यासाठी त्या भागातील प्रगतावस्थेतील प्रकल्प पूर्ण करण्यावर खर्च न करता ते पैसे इतरत्र वापरले जाणार, हा त्या भागावर अन्याय आहे, हे आम्हाला मुळीच मान्य होणार नाही. तेव्हा आपण ताबडतोब सांगितले पाहिजे की, हे पैसे त्याच भागात वळविले जातील." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ मार्च १९९४ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ५, पृष्ठ १०)* मात्र पाटबंधारे मंत्र्यांनी कोणतीही अनुकूलता याबाबतीत दाखविली नाही. "अध्यक्ष महोदय, पाटबंधाऱ्याची निरनिराळी जी कामे सुरू आहेत त्या सर्व प्रकल्पाचा अनुशेष त्या ठिकाणी आहे. त्या ठिकाणी कपात लावून सगळे पैसे कृष्णाखोऱ्याकडे वळविले आहेत." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ मार्च १९९४ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ५, पृष्ठ १०)* असे श्री.दि.बा.पाटील या ज्येष्ठ सदस्यांनी सांगितले, पण लूटमारच करावयाचे ठरविल्यावर ऐकणार कोण?

**७. अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील प्रकल्पांच्या खर्चात भूकंपाच्या नावाखाली कपात केली व मग तो सारा निधी कृष्णा खोऱ्यात वळविला** ही गोष्ट सर्वांच्याच लक्षात आलेली होती. खुद्द मा.सभापतींनी याबाबत केलेल्या प्रयत्नालासुद्धा यश आले नाही. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**सभापती :** मा.सदस्यांचे म्हणणे असे की, आपण प्रकल्पावर कपात लावून ती रक्कम इतर भागातील प्रगत कामे पूर्ण करण्यासाठी वापरण्याऐवजी त्याच विभागातील प्रगतीपथावर असलेली कामे पूर्ण करण्यासाठी वापरावी.

**डॉ.पद्मसिंह पाटील :** यापुढे तसा जरूर प्रयत्न केला जाईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ मार्च १९९४ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक ५, पृष्ठ १०)*

८. अनुशेष दूर करण्यासाठी राज्यस्तरीय निधीचे वाटप करण्यासाठीची एक निश्चित पद्धती सत्यशोधन समितीने सुचविली होती. "आमच्या या पद्धतीमध्ये प्रत्येक वार्षिक योजनेमध्ये विवक्षित क्षेत्र, योजना, उपक्षेत्र, कार्यक्रम यांच्यासाठी तरतूद किती आहे हे पाहणे, यापैकी १५ टक्के रक्कम ही अनुशेषाशी संबंधित

नसलेली चालू कामे पूर्ण करण्याकरिता व नैसर्गिक वाढविस्ताराच्या सर्व जिल्ह्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता राखून ठेवणे, आणि उरलेल्या ८५ टक्के निधीचे वाटप अनुशेष असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये त्यांच्या आजच्या राज्यसरासरीपासून काढलेल्या अनुशेषाच्या प्रमाणात वाटून देणे या तीन गोष्टींचा समावेश आहे" अशा प्रकारची शिफारस समितीने परिच्छेद १७.३३ मध्ये केलेली होती. **१५/८५ ची ही तरतूद अंमलात आणताच येत नाही/येणार नाही असे सतत प्रतिपादन करीत जाणे हा या ढोंगी बुवाबाजीचा अंधश्रद्धा पसरवणारा आणखी एक नमूना म्हणून सांगता येईल.**

**९.** बिगर अनुशेष जिल्ह्यांना १५ टक्के तरतूद व अनुशेष जिल्ह्यांना ८५ टक्के तरतूद का देता येत नाही या ढोंगीपणाचे मराठवाड्यातील मंत्र्यांनी पुढीलप्रमाणे कारण सांगितले :- "राज्यातील सिंचन क्षमता वाढविण्यासाठी प्रगतीपथावरील जे प्रकल्प आहेत त्यांना अग्रक्रम द्यावा लागेल. जागतिक बँकेच्या वतीने प्रकल्प घेतलेले आहेत त्यांना डावलून चालणार नाही. त्याचबरोबर कृष्णा खोऱ्यातील प्रकल्प आहे. श्री.बी.टी.देशमुखसाहेबांनी म्हटले, की... कृष्णा खोऱ्यातील आपल्या वाट्याला आलेले जे पाणी आहे ते कोणत्याही परिस्थितीत २ हजार सालापर्यंत अडवावे लागेल. **त्याचा पुनर्विचार केला तर काही तरी अडचणी येऊ शकतात.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २८ एप्रिल १९९४ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १०१, क्रमांक २५, पृष्ठ ८१-८५)*

**१०.** पुढे मराठवाड्यातील मंत्री गेले व विदर्भातील पाटबंधारे मंत्री आले. त्यांना मी स्वतः दिनांक २४ एप्रिल, १९९५ रोजी पत्र (*P106 NB96*) लिहून १५:८५ ची तरतूद अंमलात आणावी अशी विनंती केली. माझ्या या पत्राला १६ महिन्यांनी दिनांक १२ ऑगस्ट, १९९६ रोजी उत्तर (*P95 NB96*) देऊन त्यांनी असे कळविले की :- "वार्षिक योजनेतून पाटबंधारे प्रकल्पांना तरतुदी वितरित करतांना प्रगतावस्थेतील व सिंचनक्षम प्रकल्पांना केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्राधान्य द्यावे लागते. बाह्य सहाय्यित प्रकल्पांच्या बाबतीत कर्जसहाय्य देणाऱ्या संस्थेबरोबर झालेल्या करारातील तरतुदीनुसार निधी उपलब्ध करून द्यावा लागतो. पाणी वाटप लवाद निर्णयातील तरतुदीनुसार राज्याच्या वाट्याला आलेल्या अनुज्ञेय पाणीवापराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संबंधित पाटबंधारे प्रकल्पांचा प्राधान्याने विचार करावा लागतो. प्राधान्यक्रमात सिंचन विकासात अनुशेष दूर करण्याच्या मुद्याबरोबरच उपरोक्त अन्य घटकांचा विचार होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे **आपण आपल्या निवेदनात सुचविल्यानुसार अनुशेष जिल्ह्यांसाठी ८५ टक्के व इतर जिल्ह्यांसाठी १५ टक्के याप्रमाणे अर्थसंकल्पात तरतुदी करणे शक्य होत नाही.**" (मा.पाटबंधारे मंत्री यांचे प्रा.बी.टी.देशमुख, वि.प.स. यांना दिनांक १२ ऑगस्ट, १९९६ रोजीचे पत्र क्र.पीएलएन-१४९५/२८९/९५ निवसं-१, सन १९९६ च्या नुटा बुलेटीनचे पृष्ठ ९५ पहा) **सत्तेच्या पिंजऱ्यातील सारेच पोपट एकसारखे बोलत होते. प्रगतावस्थेतील व सिंचनक्षम प्रकल्प विदर्भ-मराठवाड्यात का नाहीत? कर्जसहाय्य देणाऱ्या संस्थेबरोबर झालेल्या करारांनी बांधील बाह्य सहाय्यित प्रकल्प विदर्भ-मराठवाड्यात का नाहीत? लवादाने न दिलेला निर्णय पुन्हा-पुन्हा का सांगितला जातो? याबाबत कोणताच पोपट बोलत नव्हता, अशी स्थिती होती.**

**११.** ढोंगी बुवाबाजीमध्ये 'चमत्कार' या प्रकाराचे स्थान बरेच वरचे असते. सिंचन अनुशेष निर्मूलनाच्या कामासाठी अंधश्रद्धा निर्मूलनाचे मुख्य कार्यालय उघडावे किंवा काय? असे वाटण्याइतका धुमाकूळ चमत्कार या प्रकाराने सिंचन अनुशेष निर्मूलनाच्या कामात घातला आहे, असे दिसून येते. लहान-मोठे अनेक चमत्कार असून त्यांची संख्याही बरीच मोठी आहे. त्या सर्वांचे तपशील पाहणे हा तपशिलाचा विषय आहे. मात्र 'चमत्कार शिरोमणी' असे ज्याचे वर्णन करता येईल असा एक चमत्कार सांगण्यासारखा आहे. सन २००९ च्या अंदाजपत्रकीय अधिवेशनामध्ये जलसिंचनाचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आला आहे, अशी हाकाटी शासनातर्फे जोरात सुरू करण्यात आली. खुद्द राज्याच्या मा.अर्थमंत्री महोदयांनी त्यांच्या दिनांक ४ जून २००९ रोजी अर्थसंकल्प सादर करतांना केलेल्या भाषणाच्या पुस्तकातील भाग एक मध्ये पृष्ठ ३ वर परिच्छेद आठ मध्ये असे म्हटलेले होते की, **"त्याचप्रमाणे सिंचनक्षेत्राचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यात मला आनंद होत आहे" विदर्भ व मराठवाड्याचा भौतिक अनुशेष जवळ-जवळ दुप्पट वाढलेला असतांना व आर्थिक अनुशेष वीसपटीहून जास्त झालेला असतांना जलसिंचन अनुशेष संपुष्टात आल्याचे जोरजोरांत सांगितले जायला लागले. हा एक मोठा चमत्कारच होता.**

**१२. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या क्षेत्रात काही चमत्कारापोटी व काही चमत्कारासाठी नरबळी दिले जातात. अनुशेष निर्मूलनाच्या क्षेत्रातील चमत्कारसुद्धा निर्हेतुक नसतात.** सन २००१ मध्ये मा. राज्यपालांच्या निदेशामध्ये चौथ्या वर्षी व त्यानंतर पुढे दरवर्षी २५ टक्के निधी पेरणीखालील क्षेत्राच्या प्रमाणात उपलब्ध करून द्यावा. लोकसंख्येच्या प्रमाणात १० व अनुशेषाच्या प्रमाणात ६५ टक्के अशा प्रमाणात सिंचनासाठी उपलब्ध निधीचे वाटप करावे असे या निधी वाटपाच्या स्थायी सूत्राचे स्वरूप होते. "अनुशेष दूर झाल्याच्या या चमत्कारामुळे" महत्प्रयासाने मिळविलेल्या निधी वाटपाच्या सूत्राचे उगमस्थान असलेल्या मा.राज्यपालांच्या निदेशातून २०१० व त्यानंतर आजपर्यंत "अनुशेषाला देण्यात आलेल्या वेटेज"ची हकालपट्टी करण्यात आली. **"अनुशेष दूर झाल्याच्या या चमत्काराने" अनुशेषग्रस्त भागाच्या निधी उपलब्धीचा गळा आवळला गेला व शेतकरी आत्महत्यांच्या मार्गाने नरबळी घेण्याच्या "अगोदरच अस्तित्वात असलेल्या राज्यमहामार्गाचे" अत्यंत दुर्दैवी अशा "राष्ट्रीय महामार्गामध्ये" रुपांतर झाले.**

**१३.** अशा या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर विजयबुवा केळकर यांचे अवतार कार्य धरतीवर अवतरले. सन २००१ च्या मा.राज्यपालांच्या निदेशाच्या परिच्छेद ७.१२ मध्ये "यापुढे अनुशेष काढतांना तालुका किंवा जिल्हा घटक न धरता प्रदेश (Region) हाच घटक धरावा" असे स्पष्ट निदेश असतांना व ते निदेश बंधनकारक आहेत हे माहीत असतांना विजयबुवा केळकरांनी सिंचन अनुशेष निर्मूलनार्थ तालुका घटक धरण्याचे ठरविले व आपले हे कार्य अवतार स्वरूप (in a mission mode) असल्याचे त्यांनीच जाहीर केले. बुवाबाजी ती वेगळी काय असते? तालुका घटक म्हणून धरण्याचे हे काम आपल्याकडे शासननिर्णयाने सोपविलेले नाही याची जाणीव असतांना याबाबतीत "आम्हीच आमची कार्यकक्षा वाढवून घेण्याचे ठरविले" असे त्यांनी स्पष्टपणे कबूल केले. बुवाबाजीला 'शोभिवंत' करणारा ढोंगीपणा तो यापेक्षा वेगळा काय असतो? **भारताच्या घटनेतील तरतुदीनुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र असे तीनच प्रदेश घटनामान्य असतांना त्यामध्ये विजयबुवा केळकरांनी चार काल्पनिक प्रदेशांची भर टाकली, हा एक खरोखरी मोठा चमत्कारच म्हणावा लागेल.**

**१४.** केळकर समितीचा अहवाल हे विदर्भ व मराठवाड्यावर आलेले एक फार मोठे संकट होय. हा अहवाल उपलब्ध झाल्यानंतर १८ जानेवारी, २०१५ पासून तर २ जून, २०१५ पर्यंत मी शब्दबद्ध केलेल्या लेखांची एक मालिका अमरावतीच्या दैनिक 'हिंदुस्थान'ने प्रकाशित केली होती. ३२० परिच्छेद समाविष्ट असलेले एकूण २१ लेख दर रविवारी त्याकाळात प्रकाशित करण्यात आले. कोणत्या तारखेला कोणता लेख प्रकाशित झाला होता हे प्रत्येक लेखाच्या शिरोभागी नमूद केलेले आहे. महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाजपत्रकी अधिवेशनात विदर्भ-मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनी केळकर अहवालाला चांगलेच 'नागवे' केले. केळकर अहवालाचे संकट अजून संपुष्टात आलेले नाही, हे लक्षात घेता उपरोक्त २१ लेख बुलेटीनच्या विशेषांकामध्ये एकत्र छापून प्रकाशित केल्यास लोकांना व लोकप्रतिनिधींना तो विशेषांक उपयुक्त असे संदर्भ पुस्तक म्हणून वापरता येईल, अशी अनेक सहकाऱ्यांनी इच्छा व्यक्त केल्यामुळे यासंदर्भात नुटा बुलेटीनचा एक विशेषांक काढण्याचे आमच्या संघटनेने ठरविले. या संकलनातील एक महत्त्वाचे वैगुण्य मला नमूद केले पाहिजे. प्रत्येक लेख हा दर रविवारी स्वतंत्रपणे प्रकाशित झाल्यामुळे तो स्वयंस्पष्ट व्हावा म्हणून काही महत्त्वाच्या मुद्यांची पुनरावृत्ती झाली आहे. त्या दिवशीचा विषय स्पष्ट होण्यासाठी ही पुनरावृत्ती टाळता येण्यासारखी नव्हती, हे समजून घेतल्यास वाचकांना त्या वैगुण्याचे उगमस्थान लक्षात येईल अशी खात्री आहे.

**१५.** या विशेषांकाच्या प्रकाशनासाठी अनुशेष निर्मूलनाच्या चळवळीतील एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून पुढे आलेल्या श्री.सोमेश्वर पुसदकर यांनी या कामी चांगलीच मेहनत घेतली हे नमूद केले पाहिजे. विधानसभा सदस्य डॉ.सुनिल देशमुख व प्रा.विरेंद्र जगताप यांनी अशा संकलनाच्या प्रकाशनासाठी आग्रही प्रतिपादन केले. मी तशी परवानगी घेतलेली नसल्याने नामोल्लेख करणे उचित होणार नाही, मात्र अनुशेष निर्मूलनाबाबत तळमळ असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या व विरोधी पक्षाच्या काही ज्येष्ठ नेत्यांनी या लेखांचे संकलन मा.राज्यपालांना सादर करून सन २०१६ मध्ये त्यांनी यथोचित निदेश निर्गमित करण्याची त्यांना विनंती करावी असे मला सुचविले. अगत्यपूर्वक उल्लेख केला पाहिजे तो वैधानिक विकास मंडळाचे तज्ज्ञ सदस्य ॲड.श्री.मधुकरराव किंमतकर यांचा. केळकर समितीच्या अहवालाबाबत वैधानिक विकास मंडळाच्या सदस्यांची मते मागविण्यात आली, त्यावेळी ॲड.श्री.मधुकरराव किंमतकर यांनी मा.राज्यपालांना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१५ रोजी एक निवेदन पाठवून आपली मते कळविली आहेत. १५ परिच्छेदांच्या या निवेदनाच्या पहिल्याच परिच्छेदात "वरील अहवालाचे मी सविस्तर वाचन केले. या अहवालावर विदर्भ विकास मंडळाच्या कार्यालयात दिनांक १३.०८.२०१५ ला केळकर समितीच्या दोन सदस्यांनी (डॉ.अभय बंग व डॉ.विनायक देशपांडे) सादरीकरण केले. त्या सादरीकरणाचे वेळी झालेली चर्चा व संपूर्ण अहवालाचा अभ्यास केल्यावर याबाबत माझी मते खालील प्रमाणे आहेत." असे त्यांनी नमूद केलेले असून पुढच्याच वाक्यात **"प्रा.बी.टी.देशमुख, अमरावती यांनी डॉ.केळकर यांच्या अहवालाचा अभ्यास करून सविस्तर विवेचन आपल्या २१ लेखातून केले. हे लेख दर रविवारी अमरावती येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक हिंदुस्थान या वर्तमानपत्रात दिनांक १८.०१.२०१५ ते ०७.०६.२०१५ या काळात प्रसिद्ध झाले. या सर्व लेखातील मतांशी व त्यात विदर्भ व मराठवाड्यावर केळकर समितीच्या अहवालात जो अन्याय स्पष्ट केला त्या मतांशी मी पूर्णपणे सहमत आहे."** असे कळविले आहे. या पत्राची प्रत ॲड.किंमतकर यांनी माहितीसाठी मला पाठविली असून या लेखांचे एकत्र संकलन म्हणून प्रकाशन करावे असे त्यांनीही मला वेळोवेळी अगत्यपूर्वक व आग्रहपूर्वक सुचविले. 'नुटा'चे अध्यक्ष डॉ.प्रवीण रघुवंशी व सहसचिव प्रा.सतेश्वर मोरे यांनी हा विशेषांक प्रकाशित व्हावा म्हणून निर्णय झाल्यावर तत्परतेने सर्व कार्यवाही पार पाडली. आपल्या नशिबी आलेल्या या अनुशेषाच्या कंबरेवर लाथा घालण्याचा प्रयत्न अशा कमनशिबी वर्गात समाविष्ट असलेले सर्वच लोक व लोकप्रतिनिधी आपापल्या शक्तीनुसार करीत असतात. हे प्रयत्न सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरही सतत चालू असतात, असले पाहिजेत. केळकरी कारस्थानाची सर्वांगाने केलेली चिकित्सा या २१ लेखांमध्ये समाविष्ट असून ते लेख एका पुस्तिकेच्या रुपाने या विशेषांकामुळे उपलब्ध होतील.

**१६.** डॉ.विजय केळकर यांचे निमित्त झालेले आहे. मात्र भारतीय संविधानाच्या कलम ३७१(२) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करून भारताच्या मा.राष्ट्रपतींनी १९९४ मध्ये जे आदेश निर्गमित केले, तेंव्हापासून तर २०१५ पर्यंतचा गेल्या २० वर्षांचा इतिहास पाहिला तर भारतीय संविधानामध्ये हे कलम महाराष्ट्रातील संभाव्य प्रादेशिक असमतोलाला आवर घालण्यासाठी समाविष्ट करण्यात आलेले होते, की बलदंड राज्यकर्त्यांच्या हातात असा प्रादेशिक असमतोल बेसुमार वाढविण्याचे एक शस्त्र म्हणून वापर करण्यासाठी समाविष्ट करण्यात आलेले होते, याविषयीची शंका निर्माण व्हावी अशी ही सारी परिस्थिती आहे. **उपरोक्त सर्व परिस्थिती लक्षात घेता सन २०१६ चे मा.राज्यपालांचे निदेश निर्गमित होत असतांना मा.राज्यपालांनी पुढील बाबी विचारात घ्याव्यात अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे :-**

**(१) 'प्रदेश' हाच घटनात्मक व्यवस्थेचा आधार :-** भारतीय संविधानाच्या खंड ३७१(२) मधल्या तरतुदी, भारताच्या मा.राष्ट्रपतींनी ९ मार्च १९९४ रोजी काढलेले आदेश व खुद्द मा.राज्यपालांचे दिनांक ३० एप्रिल, १९९४ चे आदेश लक्षात घेता प्रादेशिक असमतोलाचा विचार करतांना विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र हे तीन प्रदेश समोर ठेवूनच तो करण्यात यावा अशीच ही कायदेशीर व्यवस्था आहे.

**(२) अनुशेष निश्चितीसाठी 'प्रदेश' हाच घटक धरण्याबाबतचे मा.राज्यपालांचे निदेश :-** या घटनात्मक स्थितीची जाणीव असल्यामुळेच तत्कालीन मा.राज्यपालांनी सिंचनविषयक निदेश सर्वप्रथम दिनांक १५ डिसेंबर, २००१ रोजी निर्गमित करतांना त्या निदेशाच्या परिच्छेद ७.१२ च्या शेवटी सिंचन अनुशेष यापुढे प्रदेशनिहायच काढावा असे स्पष्ट निदेश पुढील शब्दात दिलेले होते :- "At the time of fresh assessment of backlog after 4 years, if necessary, **region rather than District or Taluka should be the basis which will also** address the problem of irremovability of backlog in certain districts." ही गोष्ट मा.विद्यमान राज्यपाल महोदयांच्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

**(३) निधी वाटपासाठी 'प्रदेश' हाच घटक धरण्याचे मा.राज्यपालांचे निदेश :-** घटनात्मक व्यवस्थेचा आधार 'प्रदेश' हाच आहे याची पूर्ण जाणीव असल्यानेच तत्कालीन मा.राज्यपालांनी दिनांक १५ डिसेंबर, २००१ च्या निदेशातील परिच्छेद ७.२ मध्ये सुरुवातीलाच पुढीलप्रमाणे मत नमूद केले होतेः- **"7.2 Backlog :** The backwardness of the **regions** in development of Irrigation facilities must be one of the important factors **in deciding the distribution of allocation.** The backlog in Irrigation Sector can be taken as a fair measure of backwardness in Irrigation." ही बाबसुद्धा मा.विद्यमान राज्यपाल महोदयांच्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

**(४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या अद्यावत अहवालाच्या आधारे :-** जलसिंचन या एका विकासक्षेत्रामध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यापैकी कोणता प्रदेश राज्यसरासरीच्यावर व कोणता प्रदेश राज्यसरासरीच्या खाली आहे हे पाहून जलसिंचन या विकासक्षेत्रातील अनुशेष निश्चित करून निश्चित झालेला अनुशेष संपुष्टात आणण्याच्या प्रयोजनार्थ निदान आता तरी २०१६ च्या निदेशापासून सुरुवात करण्यात यावी.

**(५) प्रदेश म्हणून निश्चित झालेल्या निधी वाटपाच्या वितरणाबाबत मा.राज्यपालांचे निदेश :-** एकदा प्रदेशनिहाय अनुशेष निश्चित झाला की त्या त्या प्रदेशामध्ये जे जिल्हे अनुशेषग्रस्त आहेत, त्या जिल्ह्यांना त्यांच्या अनुशेषाच्या प्रमाणात निधी वितरित करून जिल्हानिहाय अनुशेष संपुष्टात आल्यामुळे प्रादेशिक असमतोल कमी होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू होईल. तत्कालीन मा.राज्यपालांनी दिनांक १५ डिसेंबर, २००१ रोजी दिलेल्या निदेशाच्या परिच्छेद ७.१२ मध्ये स्पष्टपणे पुढीलप्रमाणे निदेश नमूद आहेत :- "Therefore, It is necessary for the Irrigation Department that the outlays corresponding to the weightage for backlog are spent in backlog districts on priority so that the physical backlog will be fully liquidated in those districts at the end of 4 years." ही गोष्ट मा.विद्यमान राज्यपाल महोदयांच्या लक्षात आणून देणे आवश्यक वाटते.

**(६) निधी वाटपाचे स्थायी सूत्र (६५:३५, ७५:२५ ते ८५:१५):-** जलसिंचन या विकास क्षेत्रासाठी असणाऱ्या वार्षिक तरतुदीतून बिगर अनुशेष जिल्ह्यासाठी १५ टक्के रक्कम राखून ठेवावी व उरलेली ८५ टक्के अनुशेष जिल्ह्यांना अनुशेषाच्या प्रमाणात वाटून देण्याची सत्यशोधन समितीची एक शिफारस जरी अंमलात आणली असती तरी अनुशेषाचा डोंगर एवढा वाढला नसता. खुद्द मा.राज्यपालांनी १५ डिसेंबर, २००१ च्या निदेशामध्ये चौथ्या वर्षापासून ६५/३५ चे सूत्र अंमलात आणावे असे निदेश दिले होते. त्यामुळे आतातरी निदान सन २०१६ च्या निदेशापासून ६५/३५ च्या सूत्राने सुरुवात करून पुढच्या वर्षापासून ७५/२५ व त्या पुढच्या वर्षी व त्या वर्षापासून पुढे दरवर्षी ८५/१५ चे निधीवाटपाचे स्थायी सूत्र मा.राज्यपालांनी निदेशीत करावे.

**(७) दरवर्षीच्या राज्यसरासरीवर भौतिक अनुशेष अद्यावत करण्याचे धोरण स्वीकारण्याची आवश्यकता :-** अनुशेष निर्मूलनाच्या एकंदर धोरणामध्ये, एक म्हणजे आर्थिक अनुशेष (रुपयातील) दूर करण्याचे धोरण स्वीकारणे व दुसरे म्हणजे एका विशिष्ट वर्षाच्या सरासरीवर काढलेला अनुशेष, (पुढच्या पुढच्या प्रत्येक वर्षी अद्यावत न करता) दूर करण्याचे धोरण स्वीकारणे हे दोन मोठे दोष आजपावेतोच्या धोरणात राहिले आहेत असे स्पष्टपणे दिसून येते. जून १९८२ च्या राज्य सरासरीवरील सत्यशोधन समितीचा अहवाल हाती आल्यानंतर जलसिंचन या विकास क्षेत्रात जो अनुशेष निर्धारित झाला तो दरवर्षीच्या राज्य सरासरीवर वाढला किती? किंवा कमी किती झाला? हे न पहाता २००० पर्यंत म्हणजे १८ वर्षे आम्ही जून १९८२ च्या राज्यसरासरीवर काढलेला अनुशेष दूर करीत राहिलो. जून १९९४ च्या राज्यसरासरीवर अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालातून जी माहिती हाती आली, त्यातून असे लक्षात आले की, जून १९८२ चा विदर्भ व मराठवाड्याचा आर्थिक अनुशेष एका रुपयाने कमी झाला नसून तो विदर्भात आठ पटीने (५२७ कोटी रुपयावरून ४२६५ कोटी रुपये) व मराठवाड्यात तो दहा पटीने (२६० कोटी रुपयावरून २७७० कोटी रुपये) वाढला होता. पुढे आम्ही जून १९९४ च्या राज्यसरासरीवरील अनुशेष २०१४ पर्यंत दूर करीत बसलो आहोत. "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अहवाल २०१२-१३" या अहवालाचे अवलोकन केले तर आमच्या असे लक्षात आले की, एका हेक्टरने सुद्धा **१९९४ चा तर सोडाच पण १९८२ चा अनुशेष कमी झालेला नाही, तो दूर होणे किंवा संपुष्टात येणे हे तर दूरच राहिले.** आर्थिक अनुशेष हा काल्पनिक किंवा परिकल्पित असल्यामुळे वस्तुस्थितीवर आधारित भौतिक अनुशेष निर्मूलनाचे धोरण स्वीकारले जावे व दरवर्षीच्या राज्यसरासरीवर प्राधिकरणाच्या कायद्यातील कलम २० मध्ये प्रतिबिंबित होणारा अनुशेष दरवर्षी अद्यावत केला जावा.

**(८) दरवर्षी अनुशेष अद्यावत करण्याचे मा.राज्यपालांचे निदेशः-** तत्कालीन मा.राज्यपालांनी दिनांक १५ डिसेंबर, २००१ च्या निदेशाच्या परिच्छेद ७.२ मध्ये केलेल्या सूचनांकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले, ही गोष्ट विद्यमान मा.राज्यपालांच्या लक्षात आणून देण्यात येत आहे. त्या सूचना पुढीलप्रमाणेः- "At present, the backlog identified by the Indicators and Backlog Committee as on 1 April 1994 is being considered for allocations under backlog removal. However, **the latest revised quantum of physical and financial backlog should be taken into account when the allocations are made on an annual basis. This concept of rolling backlog will reflect the realistic picture of backlog in the Irrigation Sector.** This will also ensure that corrective measures are automatically taken into account to address the shortfalls in expenditure in previous years or for any freshly created backlog."

**(९) अनुशेष अद्यावत करण्यासाठी २००५ च्या अधिनियमाने अधिकृत व विधिमय यंत्रणा स्थापीत केलेली आहे :-** वेगळी कोणतीही यंत्रणा स्थापन न करता **सन २००५ च्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण** अधिनियमाच्या कलम २० अन्वये प्राधिकरणासारख्या या विधिमय यंत्रणेकडे दरवर्षीच्या जूनच्या सरासरीवरील अनुशेष दाखविण्याचे हे जे काम आता कायद्याने सोपविलेले आहे त्याचा उपयोग दरवर्षीच्या राज्य सरासरीवरील अनुशेष अद्यावत करण्यासाठी होवू शकतो. प्रत्येक वर्षी करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीतून प्रत्येक जिल्ह्याचा भौतिक अनुशेष किती हेक्टरने कमी झाला व त्या वर्षात राज्य सरासरी वाढल्यामुळे तो किती हेक्टरने वाढला म्हणजे एकूण किती कमी झाला किंवा वाढला याचे दरवर्षीचे चित्र प्राधिकरणाच्या अधिकृत व विधिमय यंत्रणेच्या माध्यमातून अद्यावत करता येईल. अशा रीतीने **दरवर्षीच्या भौतिक प्रगतीच्या व वाढलेल्या राज्य सरासरीच्या आधारावर दरवर्षीचे प्रत्येक जिल्ह्याचे जलसिंचन अनुशेषाचे चित्र अद्यावत करणे हा मा.राज्यपालांच्या निदेशांचा अपरिहार्य भाग असावा असे आम्हाला वाटते.**

**(१०) जलसिंचन अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील सिंचनजल बिगर सिंचनिय प्रयोजनासाठी कोणत्याही परिस्थितीत वळविता कामा नये :-** महाराष्ट्रात जलसिंचन या विकास क्षेत्रात अनुशेषात असलेल्या जिल्ह्यातील सिंचनजल बिगर सिंचनीय प्रयोजनासाठी वळविल्यामुळे सिंचन अनुशेष आणखी वाढतो म्हणून तसे करता कामा नये याबाबतचे सक्त निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करावेत. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक अठरा) या कायद्याच्या कलम २१ मधील तरतुदींची माहिती घेतल्यास सिंचन जलाची बिगर सिंचनीय प्रयोजनासाठी पळवापळवी ही गोष्ट पूर्णपणे बेकायदेशीर ठरते ही बाबसुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. **अशा बेकायदेशीर कृत्यांना मागाहून कायदेशीरपणाचे पांघरूण चढविणे निषिद्ध समजले पाहिजे व अपकृत्य समजले गेले पाहिजे. अशा अपकृत्याला आळा घालण्यासाठी मा.राज्यपालांच्या निदेशामध्ये या बाबींचा समावेश असणे**

**आवश्यक आहे.**

**(११) मालगुजारी तलावाबाबत वस्तुस्थिती :-** खाजगी श्रमातून व खाजगी धनातून बांधण्यात आलेल्या विदर्भाच्या चार जिल्ह्यातील मालगुजारी तलावांच्या बाबतीत निर्माण झालेली सिंचनक्षमता ही राज्यनिर्मित सिंचनक्षमता म्हणून दांडेकर समितीने मोजल्यामुळे त्या जिल्ह्यांची सिंचनक्षमता अकारण जादा धरली गेली. हा एक फार मोठा अन्याय होता. हा अन्याय अनुशेष व निर्देशांक समितीने दूर केला व १९९४ च्या किंमतीला ११७ कोटी रुपयाचा मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठीचा अनुशेष काढून दिला. **अनुशेष व निर्देशांक समितीने या माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे ही अनुशेषाची कामे समजून त्यासाठी ठरावीक रक्कम अनुशेषात जोडण्याची डोळस शिफारस परिच्छेद ३.२४ मध्ये केली आहे, ती पुढील शब्दात :-**

"३.२४. तथापि मालगुजारी तलावांमधील काही प्रमाणात पाणी कमी होणे ही एक प्रतिकूल घटना आहे. म्हणून आम्ही अशी शिफारस करीत आहोत की, **त्या बाबतीत करावयाची दुरुस्तीची कामे ही अनुशेष दूर करण्याची योजना म्हणून समजण्यात यावीत.** जरी आम्हाला या तलावांचे आकारमान कसे आहे आणि ते पूर्वस्थितीत आणण्याकरिता आवश्यक दुरुस्तीच्या कामांची व्याप्ती कितपत आहे याची सखोल माहिती नसली तरीही आम्ही या प्रकारची पाटबंधाऱ्याची कामे करावयाच्या प्रत्येक राज्यातील तलावांखाली येणाऱ्या **एकूण सिंचन क्षेत्राची प्रति हेक्टरी रु. दहा हजार इतक्या किंमतीच्या विशेष अनुशेषाची त्यात भर घालत आहोत.**"

यामध्ये महत्त्वाची बाब कोणती असेल तर ती अशी की अनुशेष व निर्देशांक समितीने या ज्या धोरणात्मक शिफारशी आपल्या अहवालामध्ये केल्या त्यामुळे विदर्भ प्रदेशातील ११७ कोटी रुपयांने अनुशेषात भर पडली व तसे त्या अहवालाच्या तक्ता ३.३ च्या स्तंभ ८ मध्ये विदर्भप्रदेशाच्या चार जिल्ह्यांसमोर दर्शविण्यात आले आहे. वस्तुतः अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल मंत्रिमंडळाने व मा.राज्यपालांनी मान्य केलेला असूनसुद्धा माजी मालगुजारी तलावांच्या विशेष दुरुस्तीचा समग्र कार्यक्रम हाती घेण्यात आला नाही. **१९९४ च्या दरसूचीनुसार त्यावेळी निर्धारित केलेला ११७ कोटी रुपयाचा अनुशेष आजच्या दरसूचीप्रमाणे अद्यावत करून तो तातडीने भरून काढण्याची तरतूद २०१६ च्या निदेशात असणे आवश्यक आहे.**

**(१२) खारपाणपट्ट्याबाबत वस्तुस्थिती :-** अमरावती, अकोला व बुलढाणा या तीन जिल्ह्यामध्ये मुख्यत्वे खारपाणपट्टा असलेले १५ तालुके समाविष्ट आहे. हे तीनही जिल्हे अनुशेष बहुल जिल्हे आहेत. त्या जिल्ह्यांचा सिंचनाचा अनुशेष भरून काढतांना खारपाणपट्ट्यासाठी निश्चित कार्यक्रम राबविण्याचे मा.राज्यपालांनी निदेशीत करावे. महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाचा जून १९९९ मध्ये सादर केलेला अहवाल निरनिराळ्या पाच खंडामध्ये उपलब्ध असून या अहवालाच्या खंड २ मध्ये परिच्छेद १२.९ पुढीलप्रमाणे आहे :-

"**१२.९ खाऱ्या पाण्याच्या पट्ट्याच्या विकासाबाबत :** पूर्णा नदीच्या उपखोऱ्यात भूजल खारे असण्याची मूळ कारणे भूस्तरीय असोत वा जलवैज्ञानिक असोत, क्षारतेची तीव्रता हळू हळू कमी करून संपू शकते. त्यातील क्षाराचे प्रमाण उपयोगालायक मर्यादेपर्यंत कमी करण्यासाठी पाण्याचा दीर्घ उपसा (पंपिंग) व भूजल पुनर्भरण (ग्राऊंड वॉटर रिचार्ज) यांचा एकत्रित उपयोग केल्यास परिस्थिती सुधारणे शक्य आहे, असे दापूरा, काटी, जिल्हा अकोला या गावात झालेल्या प्रयोगावरून निदर्शनास आले आहे. शिवाय **क्षारयुक्त मातीतून सचैल स्थितीत पाण्यावाटे क्षार निघून जातील व कालांतराने ती क्षारविरहीत होऊ शकते असेही प्रयोगामधे दिसून आले आहे. पावसाचे क्षाररहित पाणी जमिनीत जास्त झिरपून त्याच प्रमाणात खाऱ्या पाण्याचा उपसा पावसाळ्यात करून नैसर्गिक नाल्यात सोडल्यास क्षाराचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होऊ शकेल.**"

या संदर्भात काही उपाययोजना नमूद करण्यासारख्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे:- खोदलेल्या बोअरवेल मधील खारेपाणी उपसून व त्याला नैसर्गिक किंवा अन्य प्रयत्नांची जोड देऊन गोड पाण्याचे पुनर्भरण करणे, पूर्णा नदीच्या पात्रात व उपनद्यांवरही सुयोग्य ठिकाणी प्रभावशाली व टिकावू बंधारे बांधण्यासाठी कार्यप्रणाली व कार्यक्रम राबविणे, ठिबक सिंचन, तुषार सिंचन अशाप्रकारच्या आधुनिक सिंचन पद्धतीचा यथायोग्य प्रमाणावर सुयोग्य वापर करून किमान खरीप-रब्बी दुहंगामी पीक पद्धती बसविण्यासाठी शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देणे.

**(१३) दुष्काळी तालुक्यांबाबतची वस्तुस्थिती :-** पुणे, सातारा, सांगली, सोलापूर या चार जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांचा जरी विचार केला तरी जून १९८२ च्या स्तरावर दांडेकर समितीने त्या तालुक्यांचा २३८.६४ हजार हेक्टरचा अनुशेष काढला होता. जून १९९४ पर्यंत १९१२.०७ हजार हेक्टरची म्हणजे आठ पटीहून जास्त व जून २०१२ पावेतो २७९६.७० हजार हेक्टरची म्हणजे जवळजवळ बारापट सिंचनक्षमता या चार जिल्ह्यांच्या पदरात पडली तरी त्या जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त तालुक्यांचे दैन्य अजून संपलेले नाही असे दिसून येते, हे लक्षात घेता उर्वरित महाराष्ट्राला लोकसंख्या व वाहितीखालील क्षेत्राच्या प्रमाणात उपलब्ध होणारा निधी हा मुख्यत्वे दुष्काळी तालुक्यांना व उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेष असलेल्या जिल्ह्यांना प्राधान्याने देण्यात यावा यासाठी निदेशात तरतूद असणे आवश्यक वाटते.

**(१४) अनुशेषग्रस्त जिल्ह्यांमध्ये शंभर हेक्टरची क्षमता निर्माण होणे व शंभर हेक्टरचा अनुशेष दूर होणे या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत :-** सर्वात जास्त अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्याचे उदाहरण घेऊन ही गोष्ट स्पष्ट करू. सत्यशोधन समितीने जून १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीवर या जिल्ह्याचा १३४ हजार हेक्टरचा अनुशेष निर्धारित केला. १९८२ नंतर १९९४ पर्यंतच्या काळात 'चंद्रभागा' नावाचा एक प्रकल्प या जिल्ह्यात पूर्ण झाला व त्या प्रकल्पाची सिंचनक्षमता ८ हजार हेक्टर आहे असे आपण गृहित धरू. तेव्हा या जिल्ह्यामध्ये ८ हजार हेक्टरची सिंचनक्षमता निर्माण झाली किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर '**होय**'. ८ हजार हेक्टरची सिंचनक्षमता या जिल्ह्यात निर्माण झाली असेच द्यावे लागेल. मात्र सन १९८२ ते १९९४ या काळात ८ हजार हेक्टरचा अनुशेष दूर झाला काय? या प्रश्नाचे उत्तर ठामपणे '**नाही**' असेच द्यावे लागेल. कारण अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे राज्यसरासरी ३७.२४ टक्के झाली असून अमरावती जिल्ह्याचा अनुशेष २१९ हजार हेक्टर झाला. म्हणजे १९९४ पर्यंत चंद्रभागा प्रकल्पाची सिंचनक्षमता पदरात पडूनसुद्धा १९८२ चा १३४ हजार हेक्टरचा या जिल्ह्याचा अनुशेष एका हेक्टरनेसुद्धा कमी तर झाला नाहीच उलट तो मोठ्या प्रमाणात वाढून २१९ हजार हेक्टर झाला. **अनुशेष निर्मूलनाचा थेट संबंध राज्यसरासरी गाठण्याशी आहे. तेव्हा सिंचनक्षमता निर्माण होणे व अनुशेष दूर होणे या वेगवेगळ्या संकल्पना आहेत व त्यांचे योग्य स्थान नियोजनात असावे असे निदेश नियोजन व पाटबंधारे विभागाला देण्याची आवश्यकता आहे.**

**(१५) अनुशेष निर्मूलनार्थ अनुशेष व निर्देशांक समितीने सुचविलेला उपाय :-** निधी वाटपाबाबतच्या "६५:३५, ७५:२५ किंवा ८५:१५" च्या स्थायी सूत्राला पर्यायी व्यवस्था म्हणून अनुशेष व निर्देशांक समितीने सुचविलेली व्यवस्थासुद्धा मा.राज्यपालांनी विचारात घ्यावी असे सुचवावेसे वाटते. अनुशेष व निर्देशांक समितीने याबाबतीत "**अनुशेष दूर करण्याच्या प्रक्रियेला अधिक चालना देण्याकरिता शिफारशी**" या मथळ्याखाली आपल्या अहवालाच्या पृष्ठ २४३ वर परिच्छेद १२.१५ मध्ये पुढील प्रमाणे शिफारस केलेली आहे :- "१२.१५ अनुशेष दूर करण्यासाठी देण्यात येणाऱ्या योजनांतर्गत निधीचे वाटप व वितरण यांकरिता समिती खालील तत्त्वांची शिफारस करत आहे. **(एक)** राज्याच्या ३ प्रदेशांमधील व ३० जिल्ह्यांमधील अनुशेषाच्या तरतुदींचे वाटप हे एकूण अनुशेषातील त्यांच्या हिश्शाच्या आधारे केलेले असावे. **(दोन)** अनुशेष दूर करण्यासाठी असलेल्या वार्षिक तरतुदींचे वाटप पुढील पद्धतीने एकूण अनुशेष संपूर्णपणे दूर करता येईल असे करण्यात यावे." असे नमूद करून पुढे पाटबंधारे विभागाच्या अनुशेषाविषयी समितीने "पाटबंधारे व रस्ते या क्षेत्रांतील अनुशेष सात वर्षांच्या आत संपूर्णपणे दूर करावा." अशी शिफारस केलेली आहे. या समितीच्या शिफारशी मा.राज्यपालांनी व मंत्रिमंडळाने मान्य केलेल्या असल्या तरी त्यातील "**पाटबंधारे या क्षेत्रांतील अनुशेष सात वर्षांच्या आत संपूर्णपणे दूर करावा.**" या शिफारशीची अंमलबजावणी करण्याची कृती गेल्या २०-२५ वर्षांत पार पडली नाही. सिंचनक्षेत्रातील अनुशेष वाढविण्याचा सपाटा मात्र सुरुच राहिला.

**प्रचंड प्रमाणावर होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या मुळाशी सिंचन सुविधांचा अभाव हे प्रमुख कारण असल्याचे आता सर्वमान्य झालेले आहे. या आत्महत्त्या म्हणजे सिंचनक्षेत्रातील प्रचंड असमतोलाच्या विषारी वृक्षाला आलेली अत्यंत कटू अशी फळे आहेत, हे लक्षात घेतले तर ५ ते ७ वर्षांचा एक निश्चित कार्यक्रम आखून हा कलंक कायमचा पुसून टाकण्याच्या या कामी मा.राज्यपालांनी त्यांना देण्यात आलेल्या विशेष अधिकारांचा वापर करावा** तसे करतांना (१) राज्याजवळ उपलब्ध असलेली सर्व साधनसामुग्री पुढील ५ ते ७ वर्षांत या कामी लावावी लागेल. (२) देशाच्या पंतप्रधानांनी यापूर्वी आत्महत्त्याग्रस्त जिल्ह्यांना सिंचन सुविधेसाठी विशेष निधी उपलब्ध करून दिला होता, मा.पंतप्रधानांनी दिलेल्या त्या निधीतून पूर्ण केलेल्या प्रकल्पांचे सिंचनजलसुद्धा तत्कालीन राज्यकर्त्यांनी औण्गिक प्रकल्पांना विकून टाकले होते हा इतिहास लक्षात घेता आणखी एक वेळची उपाययोजना म्हणून मा.विद्यमान पंतप्रधानांकडून व केंद्र शासनाकडून विशेष निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करावा लागेल व (३) तिसरे म्हणजे आपल्या हिमतीवर आत्महत्त्यांचा हा कलंक कायमचा पुसून टाकण्यासाठी बाजारातून रोख्यांच्या रुपाने राज्यशासनाला निधी उभा करावा लागेल. (४) एका वेळचा कार्यक्रम म्हणून विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या विकसित भागातूनसुद्धा या कामासाठी स्वेच्छेने मोठा निधी उभा होऊ शकेल.

अनुशेषात असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये राज्यसरासरीवर येण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी व ते सर्व प्रकल्प ५ ते ७ वर्षांत पूर्ण करावे व हा सिंचन अनुशेषाचा कलंक कायमचा पुसून टाकण्याच्या कामाला उशिरा का होईना सुरुवात केली जावी असे सुचवावेसे वाटते.

**३०.१२.२०१५** **प्रा. बी. टी. देशमुख**

(१) १८ जानेवारी २०१५

# सिंचनक्षेत्रात तालुकानिहाय अनुशेष काढण्याचे कारस्थान केळकरांनी पार पाडले

**१.** पश्चिम महाराष्ट्रातील काही सत्ताधारक बलवान नेत्यांच्या (मुख्यत्वे तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या) दबावाखाली सिंचन अनुशेषाच्या बाबतीत तालुका धरून अनुशेष काढण्याचे कार्य पार पाडून विदर्भ मराठवाड्याच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम डॉ. विजय केळकर यांनी यशस्वीपणे पार पाडले आहे. यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी त्यावेळी तालुकानिहाय अनुशेष काढण्यासाठी दांडेकर समितीवर दबाव आणला होता. त्या समितीने **फक्त तालुक्यांचा** अनुशेष काढण्यास नकार देऊन जिल्ह्याचा अनुशेष **प्रथम काढला कारण त्यांच्याकडे शासननिर्णयाने तेवढेच काम सोपविले होते. पण आपल्या अहवालाच्या तक्ता ७.५ मध्ये जिल्हानिहाय अनुशेष काढून दिल्यानंतर दबावाखाली तक्ता ७.७ मध्ये काही तालुक्यांना सुद्धा अनुशेष काढून दिला होता.**

**२.** दांडेकर समितीच्या अहवालातील तक्ता ७.५ चे अवलोकन केल्यास महाराष्ट्र राज्यामध्ये वाहितीखालील जमीन १८२४१.७० हजार हेक्टर असून त्यापैकी सरकारी खर्चाने सिंचनाखाली आलेली जमीन ४११४.२८ हजार हेक्टर आहे. म्हणजे हे प्रमाण २२.५५ टक्के एवढे पडले. अशा रीतीने राज्य सरासरी २२.५५ टक्के असतांना **प्रादेशिक असमतोल प्रदेशाच्या स्तरावर निश्चित करावयाचे समितीने ठरविले असते** (तसे त्या समितीने ठरविले नाही) तर या तीनही प्रदेशांचा जलसिंचन या विकासक्षेत्रातील अनुशेष **पुढीलप्रमाणे निश्चित झाला असता. :-**

**प्रदेशनिहाय अनुशेष :** (अ) राज्याची सरासरी टक्केवारी २२.५५ टक्के असल्याने व विदर्भाची ही टक्केवारी १४.२२ या राज्याच्या सरासरी टक्केवारीपेक्षा कमी असल्याने **विदर्भाचा प्रदेश या नात्याने अनुशेष ५२७.३१ हजार हेक्टरचा निघतो. (ब)** मराठवाड्याची २०.६ ही टक्केवारी, २२.५५ या राज्याच्या सरासरी टक्केवारीपेक्षा कमी असल्याने **मराठवाड्याचा अनुशेष २६०.६७ हजार हेक्टरचा निघतो. (क)** उर्वरित महाराष्ट्राची टक्केवारी ३१.३५ येते. **उर्वरित महाराष्ट्राची ही टक्केवारी २२.५५ या राज्याच्या सरासरी टक्केवारीपेक्षा जास्त असल्याने उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष 'काही नाही' म्हणजे शून्य किंवा 'निरंक' निघतो.**

**३. जिल्हानिहाय अनुशेष :** राज्य सरासरी २२.५५ टक्के असतांना **असमतोल जिल्हा घटक धरून निश्चित करावयाचे दांडेकर समितीने ठरविले त्याप्रमाणे तक्ता ७.५ मध्ये या तीनही प्रदेशाचा जलसिंचन या विकासक्षेत्रातील जिल्हानिहाय अनुशेष पुढीलप्रमाणे निश्चित झाला. :-** (अ) विदर्भात सरासरी टक्केवारी १४.२२ टक्के होती. विदर्भातील एकटा भंडारा जिल्हा त्यावेळी बिगर अनुशेष जिल्हा होता. तेथे ही टक्केवारी ४७.५० टक्के होती. ती जमेस धरून सुद्धा विदर्भ प्रदेशाची प्रदेश म्हणून व जिल्हानिहाय टक्केवारी ही १४.२२ टक्केच आहे. म्हणून येथे **जिल्हानिहाय अनुशेष प्रदेश म्हणून असलेल्या अनुशेषा इतकाच निघाला म्हणजे अनुशेष ५२७.३१ हजार हेक्टरचा निघाला. (ब)** मराठवाड्यात सरासरी टक्केवारी २०.०६ टक्के होती. मराठवाड्यात नांदेड व परभणी हे दोन बिगर अनुशेष जिल्हे असले तरी मराठवाड्याची स्थिती वर सांगितल्याप्रमाणे विदर्भासारखीच राहिली व प्रदेशनिहाय अनुशेष व जिल्हा निहाय अनुशेष सारखाच निघाला. मराठवाड्याची ही टक्केवारी २२.५५ या राज्याच्या सरासरी टक्केवारीपेक्षा कमी असल्याने **मराठवाड्याचा जिल्हानिहाय अनुशेष सुद्धा २६०.६७ हजार हेक्टरचा निघाला. (क)** उर्वरित महाराष्ट्रात वाहितीखालील जमिनीची टक्केवारी ३१.३५ येते. **उर्वरित महाराष्ट्राची ही टक्केवारी २२.५५ या राज्याच्या सरासरी टक्केवारीपेक्षा जास्त असल्याने उर्वरित महाराष्ट्रात प्रदेश म्हणून अनुशेष निरंक येतो.** उर्वरित महाराष्ट्रात कोकणातील ठाणे जिल्ह्यात ४१.०८ हजार हेक्टरचा, रायगड जिल्ह्यात ६४.५० हजार हेक्टरचा व इकडे धुळे जिल्ह्यात २९.९६ हजार हेक्टरचा व नाशिक जिल्ह्यात ०.७७ हजार हेक्टरचा अनुशेष असल्याने जिल्हा घटक धरून अनुशेष काढल्यास **या चार जिल्ह्यांचा मिळून उर्वरित महाराष्ट्राचा १३६.३१ हजार हेक्टरचा अनुशेष दांडेकर समितीच्या अहवालाच्या तक्ता ७.५ मध्ये दाखविला आहे.**

**४. काही ठिकाणी तालुकावार अनुशेष :** दुष्काळी तालुक्याच्या नावाखाली अजिबात अनुशेष नसलेल्या उर्वरित महाराष्ट्रातील जिल्ह्यांना दांडेकर समितीने कसा अनुशेष काढून दिला हे पहाण्यासारखे आहे. **प्रदेश म्हणून "उर्वरित महाराष्ट्र" हा राज्य सरासरीच्या वर असल्यामुळे अनुशेष 'शून्य' आहे, जिल्हा घटक धरून अनुशेष काढला तर उर्वरित महाराष्ट्रात ठाणे, रायगड, नाशिक, धुळे या चार जिल्ह्यात थोडा थोडा अनुशेष असल्यामुळे उर्वरित महाराष्ट्राचा १३६.३१ हजार हेक्टरचा अनुशेष निघाला.** तो तक्ता ७.५ मध्ये दाखविला आहे. घटनेत नसतांना, शासननिर्णयात नसतांना, दांडेकर समितीने तालुका घटक धरून ४०५.५९ हजार हेक्टरचा जादाचा अनुशेष उर्वरित महाराष्ट्राला काढून दिला. जिल्हा निहाय काढलेला १३६.३१ हजार हेक्टर व तालुक्याचा ४०५.५९ हजार हेक्टर असा मिळून उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष, **दांडेकर समितीच्या अहवालात तक्ता ७.७ मध्ये ५४१.९० हजार हेक्टरचा म्हणजे विदर्भापेक्षा जास्त दाखविण्यात आला आहे. विदर्भाचा अनुशेष मात्र ५२७.३१ हजार हेक्टर एवढाच राहिला.**

**५. सर्वात जास्त अनुशेष असलेल्या विदर्भाचा अनुशेष तक्ता क्रमांक ७.७ मध्ये दांडेकर समितीने ५२७.३१ हजार हेक्टरचा निश्चित केला व प्रदेश या नात्याने अजिबात अनुशेष नसलेल्या उर्वरित महाराष्ट्राचा ५४१.९० हजार हेक्टरचा अनुशेष त्याच तक्त्यात दाखविला.** तालुक्याच्या नावाखाली अनुशेष काढण्याची ही 'जादू' करण्यात दांडेकर समिती बहुमताने यशस्वी झाली. उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष तालुक्यांच्या नावाखाली ५४१.९० हजार हेक्टरचा निश्चित करुन दाखवून **आपल्या "बुद्धिचातुर्याचे ऐतिहासिक प्रदर्शन" या अहवालाच्या निमित्ताने त्या समितीने अजरामर करुन ठेवले.**

**६.** दांडेकर समितीने ही जादू कशी केली हे पहाण्यासारखे आहे. उदाहरण म्हणून पुणे जिल्ह्याचे घेऊ. तक्ता ७.५ प्रमाणे या जिल्ह्यात सिंचनक्षमतेची टक्केवारी ३०.१८ आहे. म्हणजे हा जिल्हा २२.५५ टक्के या राज्यसरासरीच्या वर असल्याने तेथे अनुशेष शुन्य आहे. **पण दांडेकर समितीने पुणे जिल्ह्यातील हवेली, जुन्नर, खेड, आंबेगाव, शिरूर व पुरंदर हे सहा तालुके अवर्षण प्रवण व दुष्काळग्रस्त आहेत व राज्यसरारीच्या खाली आहेत. तेव्हा त्या तालुक्यांना राज्यसरासरीवर आणण्यासाठी ५६.३९ हजार हेक्टरचा कृत्रिम अनुशेष काढून दिला. अशा रीतीने उर्वरित महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांना मिळून ४०५.५९ हजार हेक्टरचा अनुशेष काढून दिला.** मुळातील उर्वरित महाराष्ट्राचा जिल्हास्तरिय अनुशेष १३६.३१ हजार हेक्टरचा होता, त्यामुळे **उर्वरित महाराष्ट्राचा एकूण अनुशेष ५४१.९० हजार हेक्टरचा झाला.**

**७. प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणामध्ये वाढविण्यास कारणीभूत ठरत असल्यामुळे मा. राज्यपालांनी नेमलेल्या अनुशेष व निर्देशांक समितीने तालुकानिहाय अनुशेष काढण्याची कल्पना संपूर्णपणे फेटाळून लावली.** पुढे पूनर्रचित अनुशेष व निर्देशांक समितीने व त्यानंतर मा. राज्यपालांनी सुद्धा ती कल्पना फेटाळून लावली. सन २००१ ते २०१० या काळात अनुशेष व निर्देशांक समितीने काढलेला अनुशेष भरुन तर निघाला नाहीच पण मा. राज्यपालांचे निदेश सतत डावलून निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळविल्यामुळे हा अनुशेष वाढत गेला. **सिंचनाचा हा अनुशेष, असला तरी तो प्रत्यक्षात दिसू नये, यासाठी एकमेव उपाय म्हणून तालुकानिहाय अनुशेष काढणे हे नजरेसमोर ठेवून केळकर समितीचे कारस्थान रचण्यात आले.** दिनांक ३१ मे २०११ च्या शासन निर्णयान्वये डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली.

**८.** आपल्या अहवालात एकदा जिल्हास्तरीय अनुशेष काढून झाल्यावर अहवालाच्या परिच्छेद ७.१३ मध्ये सुरुवातीलाच **"आम्ही जिल्हानिहाय आकडेवारी पाहिली कारण तसे आम्हाला सांगितलेले आहे. दुसरे म्हणजे तालुका पातळीवरील आकडेवारी सहज उपलब्ध नाही"** असे नमूद करून त्याच परिच्छेदात दांडेकरांनी पलटी मारली व **"सुदैवाने राज्यातील दुष्काळी भागासाठी तालुकावार आकडेवारी उपलब्ध आहे"** असे प्रतिपादन केले. खरी गोष्ट अशी आहे की तालुकावार आकडेवारी तयार नव्हती ही गोष्ट दांडेकरांना पुढील शब्दात त्याच अहवालात कबूल करावी लागली "या तालुक्यातील राज्यस्तरीय प्रकल्पाच्या रूपांतरित सिंचन क्षमतेच्या अंदाजात ३० टक्क्यांनी वाढ करून अशा रीतीने दुरुस्त करून घेतलेल्या जलसिंचन क्षमतेच्या अंदाजाच्या आधारे आम्ही या तालुक्यांचा अनुशेष ठरवू." असे परिच्छेद ७.१८ मध्ये नमूद करण्यापूर्वीच "जिल्ह्याच्या जलसिंचन क्षमतेविषयी आम्ही बांधलेले अंदाज आणि दुष्काळी तालुक्याच्या जलसिंचन क्षमते विषयी वरील माहितीनुसार हाती येणारे अंदाज हे एकाच मापात नाही" असेही

दांडेकरांनी परिच्छेद ७.१५ मध्ये नमूद केले आहे."

**९.** दांडेकरांनी जिल्हानिहाय अनुशेष काढून मग तालुकानिहाय काढला. केळकरांनी सिंचनाच्या बाबतीत जिल्ह्याचा विचार न करता सरळ तालुके धरण्याला प्राधान्य दिले. दांडेकर समितीसारखीच अपराधीचीपणाची भावना केळकरांच्या मनामध्ये सुद्धा होतीच कारण एका बाजूला जिल्हा घटक धरण्याला त्यांनी पसंती दर्शविली ती पुढील शब्दात : "प्रथमतः वाजवी दर्जाची अधिकृत आधार माहिती आणि एकत्रित निम्न पातळीवरील **सुसंगती जिल्ह्याची होती.** दुसरे असे की, विद्यमान शासकीय संरचनेची आणि प्रशासनाची जागा ही, **जिल्हा पातळीवर स्थित आहे.** फलवाद तसेच अहवालात आमच्या शिफारशींच्या मूळ गोष्टी असे सुचवितात की, **आम्ही आमच्या दृष्टीकोनात विश्लेषणाचे प्राथमिक युनिट म्हणून जिल्ह्याला पसंती दर्शविलेली आहे.**"[१] (१. परिच्छेद ४.६.२ पृष्ठ-११९) ("Firstly, official data of reasonable quality and consistency at the lowest level of aggregation was **the district.** Secondly the seat of extant government structure and administration is located **at the level of district.** Pragmatism as well as substantive points relating to what we recommend in our report thus suggested that **we opt for district as the primary unit of analysis in our approach.**" ) मात्र पुढच्याच परिच्छेदात त्यांनी सिंचनाच्या बाबतीत पलटी मारली आहे व पुढील शब्दात विषवमन केले आहे : "विशेष बार्बीशी संबंधित उपचारांच्या (अभियान पद्धतीत) बाबतीत, **गट/तालुक्यांचा विचार करण्यात आला आहे. या विशेष बाबींना वास्तविक किंवा काल्पनिक म्हणून ओळखण्यात आले.**"[२] (२. परिच्छेद ४.६.३ पृष्ठ-११९) ("The blocks/**talukas are considered** in case of treatment (in a mission mode) pertaining to special issues. **These special issues identified as virtual or imagined regions.**" )

**१०.** दुष्काळी तालुक्यांचा एक वेगळाच प्रदेश मानण्याचे आपले प्रतिपादन हे काल्पनिक आहे हे उघडपणाने मान्य केल्याबद्दल केळकरांना खरोखर धन्यवाद दिले पाहिजेत. पण त्याचबरोबर "**दुष्काळी तालुक्याचा एक वेगळा प्रदेश**" काल्पनिकरित्या उभा करा असा सल्ला आपल्याला ( पश्चिम महाराष्ट्रातून ? ) देण्यात आला होता. असेही केळकरांनी 'चांगल्या प्रकारे' नमूद करून ठेवले आहे व त्याचबरोबर आम्ही **अशा रितीने काल्पनिक प्रदेशाची रचना करणे हे प्रदेशाच्या नेहमीच्या संकल्पनेशी जुळत नाही** असेही स्पष्ट शब्दात सांगितले आहे. दुष्काळी तालुक्याबाबतची आमची काल्पनिक योजना निश्चितच स्वीकार्य असेल असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांचा उपरोक्त कल्पनाविलास मी वर माझ्या शब्दात मांडला. पण हे 'ज्ञान' अहवालातील ज्या मजकुरावरून प्राप्त झाले आहे. तो अहवालातील मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"हे फारच महत्त्वाचे व संवेदनक्षम प्रश्न आहेत आणि या काल्पनिक प्रदेशांबाबत **आमच्याकडे विशेष प्रतिवेदन लेख आहेत** जे, प्रदेशांच्या **नेहमीच्या संकल्पनेशी जुळत नाहीत.** आमचा असा विश्वास आहे की, (विश्लेषणाच्या युनिटशी संबंधित) समस्येबाबतचे आमचे उत्तर हे (विशेषतः अवर्षणग्रस्त क्षेत्र कार्यक्रम यांसारख्या) **काल्पनिक / वास्तविक प्रदेशांच्या परामर्शाला देण्यात आल्यास स्वीकार्य असेल.**"[३] (३. परिच्छेद ४.६.३ पृष्ठ-११९) ("These are very important and sensitive issues and as such **we have special write ups about these imagined regions which do not match with the usual conception of regions.** We believe that our solution to the conundrum (related to unit of analysis) will be acceptable to all given our treatment of imagined/virtual regions (especially DPA-like)." )

**११.** दुष्काळग्रस्त तालुक्यांचा वेगळा "काल्पनिक प्रदेश" उभा करतांना केळकरांनी एक चलाखी (खरे म्हणजे दांडेकरांनी केलेल्या चलाखीची ही पुनरावृत्ती आहे) अशी केलेली आहे की विदर्भ व मराठवाड्यातील सुद्धा काही तालुके आहेत हे अतिशय भारदस्त शब्दात सांगून त्यातील विष कमी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. अहवालातील मुळ शब्द पुढीलप्रमाणे :-

"विदर्भ, मराठवाडा आणि महाराष्ट्राचा उर्वरित भाग सर्वसाधारणतः याचा उल्लेख 'उर्वरित महाराष्ट्र' असा केला जातो, ही नागपूर कराराअन्वये निर्धारित केलेली क्षेत्रे भौगोलिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या एकमेकांच्या समीप आहेत. तथापि, या क्षेत्रांमध्ये लक्षात घेण्याजोगी विविधता आहे. **या सर्वामध्ये बहुधा कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त क्षेत्रे म्हणून ओळखले जाणारे अनेक तालुके आहेत.**"[४] (४. परिच्छेद ४.१.१ पृष्ठ-१०५) ( "The regions, as defined by **Nagpur agreement**, are geographically and historically contiguous namely: Vidarbha, Marathwada and the remaining parts of Maharashtra; usually referred to as "Rest of Maharashtra (RoM)". However, there is a considerable variability within these regions. All of them have number of talukas which are almost permanently drought prone regions." )

ज्याला आपण "काल्पनिक प्रदेश" म्हणून समोर उभा करीत आहोत त्या कल्पित क्षेत्राची, काल्पनिक प्रदेशाची, आभासी क्षेत्राची व्याख्या सुद्धा केळकरांनी आपल्या अहवालात नमुद केलेली आहे. ती जशीच्या तशी त्यांच्या शब्दात पुढीलप्रमाणे :-

"ज्या ठिकाणी त्यांच्या भौगोलिक सीमा या अनिश्चित नाहीत व व्यवस्थित निर्धारित केल्या आहेत, आणि त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्यास आम्हाला बाध्य करण्याईतपत महत्त्वाच्या आहेत **तेथे 'आम्ही त्यांचा समावेश आभासी किंवा कल्पित क्षेत्रे म्हणून केला आहे'.** (एका अर्थाने, अशाप्रकारे आम्ही आमच्या विचारार्थ विषयाच्या अर्थाची व्याप्ती विस्तारली आहे.)"[५] (५. परिच्छेद ४.१.१ पृष्ठ-१०५) ("We have included them as the "virtual or **imagined regions** ", where their geographic boundaries are not crisp and well defined, but they are important enough to warrant us to specially look at them (in some sense, thus extending the interpretation of our Tems of Reference." )

**१२.** केळकरांच्या योजनेप्रमाणे एखाद्या प्रदेशाला 'काल्पनिक प्रदेश' किंवा 'आभासी क्षेत्र' किंवा 'कल्पीत प्रदेश' म्हणून पात्र ठरवावयाचे असेल तर त्या प्रदेशाने पुढील अटी पूर्ण केल्या पाहिजेत :- **(१)** अशा ठिकाणी त्या प्रदेशाच्या भौगोलिक सीमा या अनिश्चित नाहीत म्हणजेच भौगोलिक सिमा निश्चित आहेत. जसे तालुका **(२)** या भौगोलिक सिमा व्यवस्थित निर्धारित केल्या असल्या पाहिजेत. **(३)** त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्यास केळकरांना बाध्य करण्याईतपत काहीतरी तेथे महत्त्वाचे असले पाहिजे जसे, पाण्याचे दुर्भिक्ष. या तीन अटी पूर्ण झाल्यास **तेथे 'आम्ही त्यांचा समावेश आभासी किंवा कल्पित क्षेत्रे म्हणून केला आहे'.**

**१३.** अशा रितीने "सिंचनाचा अनुशेष" दूर करण्याच्या प्रयोजनासाठी केळकरांनी १२९ तालुके दुष्काळी तालुके म्हणून धरले आहेत. एकत्र एकदम १२९ तालुके धरले तर मोठीच बोंबाबोंब होईल हे लक्षात आल्याने त्यांनी त्याचे दोन भाग केलेत. एक म्हणजे "**पाण्याचे दुर्भिक्ष असलेले ४४ तालुके** " यांचा एक "**काल्पनिक प्रदेश**" त्यांनी घोषित केला व दुसरे म्हणजे "**भुस्तर प्रतिकुल तालुके**" असा ८५ तालुक्यांचा दुसरा एक "**काल्पनिक प्रदेश**" जाहीर केला. हे सर्व एकट्या पश्चिम महाराष्ट्राच्याच घशात आपण ओतत आहोत याचा संकोच वाटल्याने १५ तालुक्यांचा एक "**खारपाणपट्टा प्रदेश**" असा तिसरा काल्पनिक प्रदेश त्यांनी जाहीर केला. काल्पनिक प्रदेश जाहीर करण्याच्या त्यांच्या व्याख्येमध्ये बसत नसल्यामुळे "**मालगुजारी तलाव**" असा चौथा काल्पनिक प्रदेश त्यांना घोषित करता आला नाही पण काल्पनिक प्रदेश समजून मालगुजारी तलावांना तत्सम वागणूक देण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला.

**१४.** महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतरच्या ४०-५० वर्षामध्ये 'मालगुजारी तलाव' व 'खारपाणपट्टा' यांना अत्यंत दुय्यम दर्जाची वागणूक देण्यात आली हे सर्वविदित आहे व त्यामुळेच विदर्भाचा वाढलेला अनुशेष दूर करतांना जो फार मोठा निधी उपलब्ध होईल (जर झाला तर) त्यातून सर्वात जास्त प्राधान्य "**मालगुजारी तलाव**" व "**खारपाणपट्टा**" यांना दिले पाहिजे याबाबत दुमत होऊ शकत नाही. मात्र फार मोठा निधी दुष्काळी तालुक्यांच्या नावाखाली पश्चिम महाराष्ट्राच्या घशात ओतण्याचा हातखंडा प्रयोग पार पाडतांना तोंडी लावण्यापुरता मालगुजारी तलाव व खारपाणपट्ट्याचा वापर करण्याच्या केळकरी प्रयत्नांचा एकमुखाने निषेधच केला पाहिजे.

**१५.** केळकरांचे लक्ष वेधून घेण्यास लायक असलेला कोणताही काल्पनिक प्रदेश केळकरांना मराठवाड्यात आढळून आला नाही. नाही म्हणायला पहिल्या व दुसऱ्या काल्पनिक प्रदेशात मराठवाड्याचे काही तालुके त्यांनी समाविष्ट केलेले आहेत. अगदीच गेला बाजार ? पहिल्या काल्पनिक प्रदेशाच्या ४४ मध्ये ३ तालुके व दुसऱ्या काल्पनिक प्रदेशाच्या ८५ मध्ये १२ तालुके विदर्भाचे सुद्धा आहेत.

**"At the time of fresh assessment of backlog after 4 years, if necessary, region rather than District or Taluka should be the basis"**

(मा.राज्यपालांचे १५.१२.२००१ चे निदेश परिच्छेद ७.१२ पहा) (प्रस्तावना परिच्छेद १६ (२) पहा)

(२) २५ जानेवारी २०१५

# घटनेच्या तरतुदींचा व कायद्यातील तरतुदींचा भंग करून केळकरांनी दिलेला अहवाल

**१६.** विदर्भ मराठवाड्यामध्ये जलसिंचन या विकासक्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात अनुशेष असला तरी चालतो पण तो प्रत्यक्षात दिसू नये यासाठी पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांनी ज्या धोरणात्मक विविध उपाययोजना अमलात आणल्या **त्या शृंखलेतील आजवरची शेवटची उपाययोजना म्हणजे केळकर समिती होय.**

**१७.** या धोरणात्मक उपाययोजनांचे यापूर्वीचे महत्त्वाचे टप्पे पुढीलप्रमाणे सांगता येतील :- (१) दांडेकर समितीला शासननिर्णयाने जिल्हावार अनुशेष काढायला सांगीतले असतांना त्या समितीकडून काही तालुक्यांच्या नावाखाली **तालुक्यांचा अनुशेष** काढण्याचा पहिला टप्पा म्हणून सांगता येईल. या टप्प्यात सर्वात जास्त अनुशेष असलेल्या विदर्भापेक्षा प्रदेश म्हणून अजिबात अनुशेष नसलेल्या उर्वरित महाराष्ट्रात जास्त अनुशेष दाखविण्यात या 'योजना'कारांनी यश मिळविले. (२) दुसऱ्या टप्प्यामध्ये राजकीयय लुटमारीचे स्वरुप यावे एवढ्या प्रचंड प्रमाणात राज्यसंपदेला **एकाच भागातील जलसंपदेस संपन्न करण्याच्या कामी लावण्यात आले.** "कृष्णा खोऱ्यातील पाण्यावरचा आपला हक्क जाईल" या अफवेचा फार मोठा लाभ या कामी करून घेण्यात आला. (३) जून १९८२ च्या राज्यसरासरीवर काढण्यात आलेल्या अनुशेषाला गोठवून ठेवण्यात आले. "**विदर्भ-मराठवाड्याचा अनुशेष दूर करणे**" म्हणजे "**१९८२ चा अनुशेष दूर करणे**" अशी व्याख्या करण्यात आली व ते धोरण जवळजवळ सन २००१ पर्यंत चालू ठेवण्यात आले परिणामी तो अनुशेष कमी तर झाला नाहीच उलट वेगाने वाढत गेला. (४) पुढच्या टप्प्यात जून १९९४ च्या राज्यसरासरीवर काढण्यात आलेल्या अनुशेषाला पुन्हा गोठविण्यात आले व २००१ नंतर "**१९९४ चा अनुशेष दूर करणे**" म्हणजे "**अनुशेष दूर करणे**" अशी व्याख्या करण्यात आली. परिणामी आजही तेच काम चालू असून तो अनुशेष अनेक पटींनी वाढला आहे. (५) यापुढचा टप्पा म्हणजे घटनात्मकरित्या, कायदेशीररित्या राज्यपालांच्या निदेशानुसार ठरवून दिलेल्या **निधी वाटपाचे सातत्त्याने उल्लंघन करणे** व विदर्भ-मराठवाड्याला देण्यात आलेला निधी त्यांना मिळू न देणे. हे अत्यंत ऐतिहासिक असे बेकायदेशीरपणाचे कृत्य होते. (६) "**आर्थिक अनुशेष दूर झाला असे एक सोंग**" २००९ च्या दरम्यान व त्यानंतर उभे करण्यात आले. अर्थमंत्र्यांच्या भाषणातून, राज्यपालांच्या अभिभाषणातून त्याचा मोठा गाजावाजा करण्यात आला. "सन १९९४ मध्ये अनुशेष भरून काढण्याची अंदाजे जी किंमत धरण्यात आली होती ती म्हणजे आर्थिक अनुशेष" (ती मुद्दामच कमी धरण्यात आली होती) अशी व्याख्या करण्यात आली. तेवढे रुपये खर्च झाल्याबरोबर अनुशेष भरून निघाल्याचा कोलाहल सुरु करण्यात आला.

**१८.** या सर्व उपाययोजनांचा परिणाम असा झाला की विदर्भ मराठवाड्याचा अनुशेष दूर तर झालाच नाही पण तो अनेक पटींनी वाढला. या कार्यक्रमाचा वेग असाच सुरू ठेवण्याचा निर्धार पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी केला असून त्यासाठी केळकर समितीची योजना करण्यात आली. योगायोगाने त्यावेळी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री हे दोघेही पश्चिम महाराष्ट्रातील असल्याने या 'समितीची निवड' करतांना 'केळकरांसारख्या तज्ज्ञ' व्यक्तीची मदत घेण्याचे ठरले. अनुशेष व निर्देशांक समिती ही तत्कालीन राज्यपालांनी नेमली होती. त्यात तीनही वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष पदसिद्ध सदस्य होते. त्यामुळे 'पाहिजे तशी मनमानी' करता आली नाही. किंबहुना मनमानी करताच आली नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.

**१९.** केळकरांच्या अहवालाकडे काळजीपूर्वक पाहिले तर असे दिसून येते की विदर्भ मराठवाड्याचा सिंचन या क्षेत्रातील अनुशेष प्रचंड प्रमाणात वाढलेला आहे ही गोष्ट कोठेही दिसता कामा नये याची कसून काळजी घेण्यात आली आहे. एवढी प्रचंड सिंचन क्षमता पश्चिम महाराष्ट्राने पदरात पाडून घेतली असतांना, विदर्भात आणि मराठवाड्यात तो अनुशेष अनेक पटींनी वाढलेला असतांना, **कोणत्याही परिस्थितीत उर्वरित महाराष्ट्र या प्रदेशाला जलसिंचन या क्षेत्रामध्ये विदर्भापेक्षा जास्त निधी मिळाला पाहिजे (मराठवाड्यापेक्षा तर तो निश्चितच जास्त असेल) हे उद्दिष्ट समोर ठेवून केळकरांनी आपल्या अहवालाची मांडणी केली आहे.**

**२०.** हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केळकरांनी सर्व अपमार्गाचा, वाममार्गाचा, बेकायदेशीर व घटनाबाह्य मार्गाचा वापर केला आहे. त्यातील काही नमुने पुढीलप्रमाणे :- (१) दांडेकरांनी १९८४ मध्ये काही जिल्ह्यात दुष्काळी तालुक्यांच्या नावाखाली जेवढा अनुशेष काढून दिला होता त्यापेक्षा कितीतरी जास्त सिंचन क्षमता त्या जिल्ह्यात गेल्या ३०-४० वर्षात निर्माण झालेली असतांना त्या तालुक्यांचा अनुशेष अजनूही शिल्लकच आहे असे गृहित धरून पुन्हा 'तालुक्याचे सोंग' वेगळ्या रुपात केळकरांनी उभे केले आहे. (२) घटनाभंगाचा अपराध सुध्दा यामध्ये समाविष्ट आहे. घटनेच्या कलम ३७१(२) चा अंमल चालू असतांना व त्या कलमात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र असे तीनच प्रदेश असतांना केळकरांनी त्यामध्ये सरळसरळ तीन 'कल्पित प्रदेश' व एक 'कल्पित सदृश प्रदेश' अशी सात प्रदेशांची कल्पना मांडली आहे. (३) केवळ घटनाभंग करूनच केळकर थांबले नाहीत तर उचललेली 'सुपारी' पार पाडण्यासाठी कायद्यातील तरतुदी भंगाचे पापसुध्दा त्यांनी आनंदाने आपल्या पदरात पाडून घेतले आहे. 'प्रमाण रब्बी समतुल्य' ची कायदेशीर तरतूद, सिंचनाचा अनुशेष मोजण्याचे कायदेशीर मापदंड, पायदळी तुडविण्याचा अपराध त्यांनी केला आहे. (४) विकसित जिल्ह्यामध्ये एखाद्या 'अ' प्रकल्पातून एक हजार हेक्टरची "**बारमाही सिंचन क्षमता**" पदरी पडत असेल व त्याच वेळी अविकसित जिल्ह्याच्या दुसऱ्या एका 'ब' प्रकल्पाची क्षमता एक हजार "**हेक्टरच्या खरीप पिकाला एका पाण्याचे संरक्षित सिंचन**" देण्याची असेल तर 'अ' आणि 'ब' प्रकल्पामुळे या दोन जिल्ह्यांचा सारखा विकास झाला असे म्हणता येणार नाही एवढे ज्ञान केळकरांना असूनही त्यांनी "प्रमाण रब्बी समतुल्य सिंचन क्षमतेचे तत्त्व" झिडकारून अप्रमाणित "सिंचन क्षमतेचे तत्त्व" उराशी कवटाळण्याच्या वाममार्गाचा स्वीकार केला.

**२१.** तालुका धरून अनुशेष काढण्याबाबतचे केळकरी प्रताप यापूर्वी परिच्छेद ९ ते १५ मध्ये प्रतिपादन केलेले आहेत. जिल्हा धरून अनुशेषग्रस्त विभागांना त्यांनी जे घायाळ केलेले आहे त्याबाबतची माहिती आज नमुद करीत आहे. अनुशेषाच्या मोजमापाची अधिकृत सुरुवात महाराष्ट्रामध्ये सत्यशोधन समितीपासून झाली हे सर्वांनाच माहित आहे. त्या वेळी ३७१(२) कलमाचा अंमल सुरु झालेला नव्हता. कोणत्या जिल्ह्याचा कोणत्या विकास क्षेत्रामध्ये किती विकास झालेला आहे याचे मोजमाप करण्याचे मापदंड (Indicaters) त्या समितीला ठरवावयाचे होते. त्या मापदंडाच्या आधारे राज्याचा त्या विकास क्षेत्रातील सरासरी विकास किती झाला हे व कोणते जिल्हे सरासरीच्यावर आहेत व कोणते खाली आहेत हे ठरविणे हे त्या समितीचे प्रमुख काम होते.

**२२.** "**त्या जिल्ह्यामध्ये वाहितीखाली जमीन किती आहे व प्रमाण रब्बी समतुल्य मध्ये किती टक्के जमीन सिंचनाखाली आली आहे**" असा मापदंड सिंचन या विकास क्षेत्रामध्ये विकासाच्या मोजमापासाठी सत्यशोधन समितीने ठरविला. या टक्केवारीच्या आधारे राज्यसरासरी (२२.५५) निश्चित करण्यात आली व त्या राज्य सरासरीच्या वर असलेले बिगर अनुशेष जिल्हे व सरासरीच्या खाली असलेले ते अनुशेष जिल्हे निश्चित झाले.

**२३.** जिल्हा घटक धरून हे मोजमाप करण्यात आले. घटनेच्या कलम ३७१(२) मध्ये तीनच प्रदेश असतांना त्यावेळी व त्या नंतरसुध्दा आजपावेतो जिल्हा घटक का म्हणून धरण्यात आला याची कारणे ढोबळमानाने पुढीलप्रमाणे दिसून येतात. :- (१) कलम ३७१(२) चा अंमल त्यावेळी सुरु झालेला नव्हता. (२) आधारभूत सर्व माहिती ही जिल्हा स्तरावरच उपलब्ध होती. प्रदेश घटक धरावयाचे ठरविले तरी जिल्हानिहाय माहितीचा आधार घेतल्या शिवाय पुढे जाता येत नव्हते. (३) सर्वात महत्त्वाचे कारण असे होते की उर्वरित महाराष्ट्रामध्ये पश्चिम महाराष्ट्राच्या आक्रमक धोरणामुळे कोकण व उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांची गळचेपी होत होती. कोकणातील जिल्ह्यात त्यावेळी मोठा अनुशेष होता व आजही आहे. अत्यंत शास्त्रशुध्द रितीने ठरविण्यात आलेला हा मापदंड पुढे अनुशेष व निर्देशांक समितीने जसाच्या तसा स्वीकारला. **कलम ३७१ चा अंमल सुरु झाल्यानंतर सुध्दा दुसऱ्या व तिसऱ्या कारणामुळे जिल्हा घटक धरणेच सुरु राहीले आणि आज तर ती तरतूद महाराष्ट्र विधानमंडळाने एकमताने केलेल्या कायद्याचा भाग बनलेली आहे.**

**२४.** जिल्हा घटक धरतांना केळकरांनी जो उपद्रव करून ठेवलेला आहे तो लक्षात येण्यासाठी ''**सिंचन क्षमता**" व "**प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये सिंचन क्षमता**'' या कल्पना सुध्दा समजून घेतल्या पाहिजेत. "वेगवेगळ्या पिकांची पाण्याची गरज वेगवेगळी असल्याकारणाने पिकातील हा फरक लक्षात न घेता सर्व पिकाखालील क्षेत्र एकाच मापाने मोजून ठरविलेली जलसिंचन क्षमता एकजिनसी राहत नाही. **सामान्यतः जलसिंचन क्षमता खरीप, रब्बी, उन्हाळी, दोन हंगामी (खरीप अधिक रब्बी) बारमाही अशी हंगामवार दाखवितात.** जलसिंचन क्षमतेची हंगामवार विभागणी वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये पुष्कळ भिन्न असल्यामुळे वेगवेगळ्या हंगामातील पाण्याची गरज भिन्नभिन्न असते. आणि त्यामुळे वेगवेगळ्या जिल्ह्यामधील जलसिंचन क्षमतेची तुलना करण्याकरीता वेगवेगळ्या हंगामातील जलसिंचन क्षमतेचे रूपांतर एखाद्या "प्रमाण पीक क्षेत्रामध्ये करून घेण्याची आवश्यकता आहे." असे परिच्छेद ७.९ मध्ये नमूद करून सत्यशोधन समितीने असे म्हटले आहे की, "जलसिंचन क्षमतेचे अंदाज खरीप, रब्बी, उन्हाळी, दोन हंगामी, बारमाही या वर्गीकरणामध्ये उपलब्ध आहेत. खरीप, रब्बी, उन्हाळी, दोन हंगामी आणि बारमाही अशी फोड दाखविलेली जलसिंचनक्षमता रब्बी प्रमाण क्षेत्रामध्ये कशी रूपांतरित करता येईल

याविषयी पाटबंधारे विभागाचा सल्ला घेऊन समितीने असे ठरविले की, **ज्या रब्बी पिकाला तीन वेळा पाणी द्यावे लागते असे रब्बीचे पीक प्रमाण धरून इतर पिकांचे रूपांतरित क्षेत्र म्हणजे रब्बी प्रमाण क्षेत्र**" (परिच्छेद ७.१०) असे म्हणता येईल.

जलसिंचन क्षमतेच्या हंगामवार विभागणीचे रूपांतर प्रमाण रब्बी क्षेत्रामध्ये करण्यासाठीचा "फॉर्म्यूला" (रूपांतर गुणक) समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद ७.९ व ७.१० मध्ये नमूद केला असून "वेगवेगळ्या हंगामातील जलसिंचन क्षमतेचे रूपांतर रब्बी प्रमाण क्षेत्रामध्ये करण्यासाठी हा फॉर्म्यूला आम्ही वापरणार आहोत." असे समितीने म्हटले आहे. "**अप्रमाणित (अनस्टॅन्डर्डाईज्ड) अशा जलसिंचन विकासाची चिकित्सा व तुलना करण्यापेक्षा या फॉर्म्यूल्याचा वापर करून रब्बी प्रमाणक्षेत्रात रूपांतर करून घेतलेल्या क्षमतेच्या आधारे चिकित्सा व तुलना करणे अधिक उचित व शास्त्रशुद्ध होईल असे आम्हास वाटते**", असे समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद ७.१० मध्ये नमूद केलेले आहे.

**२५.** मी सुरुवातीलाच नमूद केल्याप्रमाणे याबाबतचे मापदंड सत्यशोधन समितीने तयार केले व अनुशेष व निर्देशांक समितीने त्याचा पुन्हा वापर केला. त्यामुळेच जलसिंचन या क्षेत्रातील विकासाचे मोजमाप करण्याचे मापदंड व त्याबाबतची कार्यरिती स्थिर झाली. **या मापदडांना पुढे कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले. "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम" हा महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये दिनांक ४ मे २००५ रोजी प्रसिध्द झाला.** या कायद्याच्या कलम २० (१) मध्ये असलेली तरतूद शब्दशः पुढील प्रमाणे :-

प्राधिकरणाच्या "अशा वार्षिक अहवालामध्ये जिल्हा घटक धरून प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये निश्चित झालेल्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये **प्रत्येक जिल्ह्याचा मोजण्यात आलेला अनुशेष,** जिल्हा पेरणीखालील क्षेत्र, प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये राज्यस्तरीय व स्थानिक प्रकल्पातून निर्माण झालेली एकूण सिंचन क्षमता, पेरणीखालील क्षेत्राशी सिंचन क्षमतेची टक्केवारी, राज्य सरासरीपेक्षा कमी असलेली टक्केवारी, हेक्टरात अनुशेष, या सूत्राप्रमाणे व पद्धतीने अद्यावत माहिती उपलब्ध असलेला अलीकडील वर्षाच्या व त्यानंतर दरवर्षीच्या महाराष्ट्राच्या **राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये निश्चित झालेला हेक्टरात (भौतिक) व अद्यावत दरसूचीप्रमाणे रुपयात (आर्थिक) दाखविलेला अनुशेष नमूद असलेले एक परिशिष्ट विहित केल्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल."**

हे प्राधिकरण कायद्याने निर्माण केलेले आहे. शिवाय ते प्राधिकरण खुद्द राज्यपालांनी नेमलेले आहे. त्यामुळे त्याला विधिमय अधिकृतता आहे. आणखी असे की दरवर्षी असा अहवाल तयार करून तो शासनाला सादर करणे हे प्राधिकरणावर कायद्याने बंधनकारक असून सादर झाल्यापासून सहा महिन्याच्या आत विधानमंडळाला सादर करणे शासनावर बंधनकारक आहे. **"महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण : वार्षिक अहवाल २०१२-१३" हा आता डिसेंबर २०१४ च्या नागपूर अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे. त्याच्या जोडपत्र ५ (३) मध्ये महाराष्ट्रामध्ये अद्यावत निर्मित सिंचनक्षमतेवर (प्रमाण रब्बी समतुल्य मध्ये) आधारित जलसिंचन अनुशेषाची आकडेवारी उपलब्ध झाली आहे.**

**२६.** प्राधिकरणाच्या अहवालामध्ये हेक्टरी अनुशेष भरून काढण्यासाठीची किंमत पाटबंधारे विभागाने जशी कळविली असते तशी ती असते. हा अनुशेष डोळ्यात भरू नये यासाठी ती हेक्टरी किंमत फारच कमी दाखवली जाते. ती ५० हजार रुपये प्रति हेक्टर सतत दोन तीन वर्षे दाखविली जात होती. त्यानंतर ८० हजार रुपये व आता उपलब्ध झालेल्या अहवालामध्ये ती १,०७,०४६ दाखविलेली आहे. एवढ्या रकमेत एक हेक्टरचा अनुशेष दूर होऊ शकत नाही हे सर्वांना ठाऊक आहे. प्रत्यक्ष बांधकामाधीन असलेल्या प्रकल्पांच्या किंमती व त्यातुन निर्माण होणारी सिंचन क्षमता यावरून गणित काढले तर ती रक्कम १० लाखापेक्षा जास्तच येते. केळकरांनी आपल्या अहवालात ती ३ लक्ष रुपये धरलेली आहे.

**२७.** आता एका बाजूला प्राधिकरणाने डिसेंबर २०१४ च्या नागपूर अधिवेशनात सादर केलेला अहवाल आहे. त्या अहवालाच्या **पृष्ठ ३८ वर जोडपत्र ५ (३)** मध्ये अनुशेषाची अद्यावत आकडेवारी दिलेली आहे. इकडे त्याच अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या केळकरांच्या अहवालामध्ये **पृष्ठ ५०४ वर जोडपत्र १०.१८** मध्ये जिल्हानिहाय अनुशेष दाखविला आहे. केळकरांनी ३ लक्ष रुपये प्रति हेक्टरी अनुशेष निर्मूलनाची किंमत धरलेली आहे. तेवढीच किंमत धरून कायद्यातील (as per section 20 (1) of MWRRA Act) तरतुदीनुसार जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने काढलेला भौतिक (हेक्टरातील) अनुशेष दुर करण्यासाठीची किंमत किती होते हे पाहिले म्हणजे केळकरांनी केलेली किमया लक्षात यायला वेळ लागत नाही. ती किमया पुढीलप्रमाणे :-

(१) **विदर्भाची स्थिती :-** केळकरांनी अनुशेष दुर करण्यासाठी हेक्टरी ३ लक्ष रूपये किंमत धरली आहे. तेवढीच किंमत धरतो म्हटले तर **कायद्यातील तरतुदीनुसार जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने काढलेला भौतिक (हेक्टरातील) अनुशेष** दुर करण्याचा विदर्भासाठीचा खर्च ३५५४४ कोटी रूपये होतो तो केळकरांनी त्यांच्या अहवालात १०५३४ कोटी रुपये दाखविला आहे. **अमरावती** जिल्ह्याचा ८०८३.२० कोटी रूपये होतो तो २०४२ कोटी रूपये दाखविला आहे. **अकोला** जिल्ह्याचा ४७२३.८० कोटी रूपये होतो तो १४१९ कोटी रूपये दाखविला आहे. **यवतमाळ** जिल्ह्याचा ५८७८.२० कोटी रूपये होतो तो १५१८ कोटी रूपये दाखविला आहे. **बुलढाणा** जिल्ह्याचा ७१५३.८० कोटी रूपये होतो तो २१५४ कोटी रूपये दाखविला आहे. **वाशिम** जिल्ह्याचा ४०८३.३० कोटी रूपये होतो तो १३१५ कोटी रूपये दाखविला आहे. **वर्धा** जिल्ह्याचा १९२९.० कोटी रूपये होतो तो ८३ कोटी रूपये दाखविला आहे. **नागपूर** जिल्ह्याचा १७७९.३० कोटी रूपये होतो तो १६५५ कोटी रूपये दाखविला आहे. **चंद्रपूर** जिल्ह्याचा १६२६.९० कोटी रूपये होतो तो शून्य (निरंक) दाखविला आहे. **गडचिरोली** जिल्ह्याचा २८५.९० कोटी रूपये होतो तो शून्य (निरंक) दाखविला आहे.

(२) **मराठवाड्याची स्थिती :-** केळकरांनी अनुशेष दूर करण्यासाठी हेक्टरी ३ लक्ष रूपये किंमत धरली आहे. तेवढीच किंमत धरतो म्हटले तर कायद्यातील तरतुदीनुसार जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने काढलेला भौतिक (हेक्टरातील) अनुशेष दूर करण्याचा मराठवाड्यासाठीचा खर्च १६८६८.४० कोटी रूपये होतो तो केळकरांनी त्यांच्या अहवालात ८०१० कोटी रुपये दाखविला आहे. **औरंगाबाद** जिल्ह्याचा ३२५९.८० कोटी रूपये होतो तो १४४१ कोटी रूपये दाखविला आहे. **जालना** जिल्ह्याचा ३८६०.१० कोटी रूपये होतो तो १९६६ कोटी रूपये दाखविला आहे. **हिंगोली** जिल्ह्याचा ३०७७.१० कोटी रूपये होतो तो १६८३ कोटी रूपये दाखविला आहे. **बीड** जिल्ह्याचा २६२२.९० कोटी रूपये होतो तो ९०४ कोटी रूपये दाखविला आहे. **नांदेड** जिल्ह्याचा ७७९.४० कोटी रूपये होतो तो शून्य (निरंक) दाखविला आहे. **उस्मानाबाद** जिल्ह्याचा १८३६.० कोटी रूपये होतो तो ११३९ कोटी रूपये दाखविला आहे. **लातूर** जिल्ह्याचा १४३३.१० कोटी रूपये होतो तो ८७७ कोटी रूपये दाखविला आहे.

**२८. कल्पित प्रदेशांची बांधणी केली, 'प्रमाण रब्बी समतुल्य सिंचन क्षमता' या कायदेमान्य मापदंडाला मुठमाती देऊन 'सिंचन क्षमता' हा भंगारात पडलेला मापदंड पुढे आणला. एवढ्यावरच केळकर थांबले नाहीत 'जलसिंचन' व 'अनुशेष' हे शब्दसुध्दा त्यांनी हद्दपार केले.** स्वतंत्रपणे 'जलसिंचन' हे विकासाचे क्षेत्र म्हणून मान्य केले तर एकदम नागवे होण्याची पाळी येते हे ओळखून केवळ लाज झाकण्यासाठी त्यांनी 'जलक्षेत्र' ही नवी संज्ञा शोधून काढली. "(१) कल्पित क्षेत्रे (२) जलस्त्रोत (भुपृष्ठावरील व भुपृष्ठाखालील) (३) लाभक्षेत्र विकास, (४) जलसंधारण आणि (५) पेयजल व स्वच्छता" **या सर्वांचा गोपाळकाला एकत्र करून त्याला जलक्षेत्र असे संबोधिले आहे.** अनुशेष असला तरी तो शब्द वापरण्याचा संकोच वाटत असल्यामुळे (कारण एकदा तो शब्द वापरला तर तो आहे हे मान्य करावे लागते) 'विकासातील तुट' असा सुंदर व सुसंस्कृत शब्द केळकरांनी वापरला आहे. प्रादेशिक असमतोलाने होरपळून निघालेल्या लोकांना आपला शब्द कदाचित समजणार नाही असे वाटल्यामुळे त्यांनी "विकासात्मक तुट याचा अर्थ, काही कारणामुळे विकास मागे पडतो अशा बाबी" असा अर्थही 'कठीण' शब्दाचे अर्थ सांगणाऱ्या एका जोडपत्रात नमूद केला आहे. (जोडपत्र १०.१९ पृष्ठ ५०५)

**२९.** पुढच्या आठ वर्षांचे निधीचे वाटप कसे करावे याबाबतच्या केळकरांनी काटेकोर शिफारशी केल्या आहेत व त्या त्यांनी घेतलेल्या 'सुपारी'शी सुसंगत आहेत.

**(अ)** कल्पित प्रदेशांना ६५९२ कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा यापैकी (१) दुष्काळी तालुक्यांना (दोनही प्रकारच्या कल्पित प्रदेशांना मिळून पाण्याची गंभीर समस्या असलेले व भूस्तर प्रतिकूल असलेले) ३५३० कोटी रुपये म्हणजे ५३.६ टक्के (२) खारपाणपट्टा या कल्पित प्रदेशाला ५४२ कोटी रुपये म्हणजे ८.२ टक्के (३) मालगुजारी तलाव या कल्पित सदृश प्रदेशाला २५२० कोटी रुपये म्हणजे ३८.२ टक्के निधी द्यावा अशी ही शिफारस आहे. (परिच्छेद ६.३ व ६.४ पृष्ठ ७)

**(ब)** कल्पित प्रदेशाच्या "नियतवाटपाला प्राधान्य देण्यात यावे" (पृष्ठ ७) असे स्पष्टपणे नमूद केल्यानंतर या क्षेत्रांना नियतवाटप केल्यानंतर उर्वरित जलक्षेत्राचे नियतवाटप कसे करावे याची टक्केवारी समितीने ठरवून दिली आहे. त्याप्रमाणे ४३.१५ टक्के उर्वरित महाराष्ट्राला, ३५.२६ टक्के विदर्भाला व २१.५९ टक्के मराठवाड्याला देण्यात यावे अशी ही शिफारस आहे. (परिच्छेद ५ व ६ पृष्ठ ७)

**"The backwardness of the regions in development of Irrigation facilities must be one of the important factors in deciding the distribution of allocation."**

(मा.राज्यपालांचे १५.१२.२००१ चे निदेश परिच्छेद ७.२ पहा) (प्रस्तावना परिच्छेद १६ (३) पहा)

## (३) १ फेब्रुवारी २०१५

# कोणाला संरक्षण द्यायचे ? व कोणापासून संरक्षण द्यायचे ? याबाबत डॉ. केळकरांचा अलौकिक कल्पनाविलास

**३०.** अजिबात अनुशेष नसलेल्या "उर्वरित महाराष्ट्र" या प्रदेशामध्ये दांडेकर समितीप्रमाणे "सर्वात जास्त अनुशेष असलेल्या विदर्भ" प्रदेशापेक्षाही जास्त अनुशेष काढून दाखविण्यासाठी केळकर समिती नेमली आहे की अनुशेष असलेल्या प्रदेशांना न्याय देण्यासाठी या समितीची योजना करण्यात आलेली आहे. याचा विदर्भातील लोकप्रतिनिधींना थांगपत्तासुद्धा लागलेला नसतांना पश्चिम महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी तालुकानिहाय अनुशेष काढण्यासाठी जोरदार तयारी सुरु केली होती. मंगळवार, दिनांक १ नोव्हेंबर २०११ च्या 'लोकसत्ता'मध्ये चौथ्या पृष्ठावर एक वृत्त (यापुढे उल्लेख 'वृत्त' असा) प्रसिद्ध झाले असून त्यात असे नमूद आहे की, :- "**सांगली जिल्ह्यातील सहा दुष्काळी तालुक्यांची समस्या सोडविण्यासाठी 'दुष्काळ निर्मूलन फोरम' स्थापन केला आहे. माजी राज्यमंत्री अजित घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेला हा फोरम राज्य शासनाविरोधात लढा देणार आहे**.........या फोरमच्या माध्यमातून राजकीय हालचाल करण्याचा प्रयत्न अजित घोरपडे, आमदार संजय पाटील, राज्य सहकारी बँक माजी संचालक विलासराव जगताप, माजी आमदार राजेंद्र अण्णा देशमुख, पृथ्वीराज देशमुख व अनिल बाबर या दुष्काळी तालुक्यातील नेत्यांनी सुरु केला आहे." या वृत्तात पुढे असेही नमूद करण्यात आलेले आहे की, "सांगली जिल्हा हा राजकीय नेतृत्वात प्रगल्भ जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यातील काही भाग अत्यंत सधन आहे, तर उर्वरित तालुके कायम दुष्काळी म्हणून ओळखले जातात. शिराळा, वाळवा, पलूस, कडेगाव व मिरज तालुक्यातील काही भाग हा सधन, तर जत, कवठेमहांकाळ, खानापूर, आटपाडी, तासगाव व मिरज तालुका पूर्व भाग सध्या दुष्काळाच्या समस्येने ग्रासला आहे."

**३१.** 'लोकसत्ता'मध्ये आलेल्या या खूपच तपशीलवार वृत्तामध्ये या स्थापित फोरमच्या माध्यमातून पुढे काय कार्य केले जाणार आहे? याबाबतचा पुढील उल्लेख आहे. "**सध्या राज्यातील आघाडी सरकारात जे नेते आपला आवाज उंचावतात. त्यांच्याच भागाला लवकर न्याय मिळतो.** परंतु राज्यातील सर्वाधिक भीषण दुष्काळी, परिस्थिती असलेल्या सांगली जिल्ह्यातील या सहा तालुक्यांना न्याय मिळत नाही. या दुष्काळी तालुक्यात किमान सुविधा देण्यात राज्य शासन अपयशी ठरल्याचे त्यांच्याच अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. **शेतीसाठी पाणी नाही. त्यामुळे या भागातील शेती जिरायती म्हणून ओळखली जाते. पिण्याच्या पाण्यासाठी किमान चार ते पाच महिने सर्वसामान्यांना वणवण भटकंती करावी लागते.** पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व शेतीच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून सांगली जिल्ह्यातील राज्य पातळीवरील नेते कुचकामी ठरल्याने राज्यातील वरिष्ठ नेत्यांचे लक्ष वेधण्यासाठी या दुष्काळी तालुक्यातील सर्वसामान्यांचा प्रश्न या फोरमच्या माध्यमातून राज्य प्रशासनाच्या नजरेस आणून देण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाहीही या नेत्यांनी दिली." या वृत्तामध्ये पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, "**जिल्ह्यातील दुष्काळी प्रश्न सोडविण्यासाठी आता आम्ही अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली या प्रश्नाची तड लावण्याचा प्रयत्न करणार आहोत.**"

**३२.** उर्वरित महाराष्ट्राचा अनुशेष तालुक्यांच्या नावाखाली ५४१.९० हजार हेक्टरचा निश्चित करुन तो विदर्भापेक्षा जास्त दाखविण्याच्या दांडेकर समितीने बहुमताने घेतलेल्या त्या पक्षपाती भूमिकेची प्रतिक्रिया विदर्भ व मराठवाड्यातील समितीत काम करणाऱ्या सदस्यांच्या मनावर उमटणे हे स्वाभाविक होते. सुधारित अनुशेष काढण्यासाठी समितीने काहीच जिल्ह्यात तालुका हा घटक मानण्याच्या या पध्दतीवर अत्यंत प्रखर टीका मराठवाडा विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख आणि त्या समितीचे सदस्य डॉ. व्ही.व्ही. बोरकर यांनी केलेली दिसून येते. दांडेकर समितीच्या अहवालाच्या परिशिष्ट ब मध्ये डॉ.श्री.व्ही.व्ही.बोरकर यांची भिन्न मतपत्रिका समाविष्ट करण्यात आली असून आपल्या भिन्न मतपत्रिकेच्या परिच्छेद ५ मध्ये डॉ. व्ही.व्ही.बोरकर यांनी पुढील प्रमाणे मत मांडले आहे. "प्रदेशाची वेगळी अस्मिता टिकवून धरण्याच्या एका उद्देशापोटी केवळ नाही **तर विकासाचे तौलनिक मान व अनुशेष ठरवून देण्यासाठी प्रदेश हाच पायाभूत घटक मानला जावा असे मराठवाडा व विदर्भ या प्रदेशातील जाणकारांचे मत असताना आणि समितीकडे सोपविलेल्या विचारार्थ विषयानुसार "प्रदेश" व "जिल्हा" पायाभूत घटक मानले जावे असे सूचित असतानाही समितीने आपला मार्ग सोडून तालुका हा पायाभूत घटक मानला आहे**.(उदाहरणादाखल सिंचन व उद्योगधंदे या क्षेत्रामध्ये) विश्लेषणाच्या दृष्टीने तालुका हा घटक पायाभूत व मध्यवर्ती मानून आपण केलेल्या संपूर्ण अभ्यासाची सुधारित पुनरावृत्ती करावी अशी शिफारस समितीने केली आहे. ही शिफारस करण्याचे कोणतेही सबळ कारण नव्हते. ही शिफारस अनिष्ट आहे. **विकासातील असमानता मोजण्याच्या दृष्टीने पायाभूत घटक म्हणून आपण प्रदेशाकडून जिल्ह्याकडे, तालुक्याकडे व गावाकडे क्रमशः जसजसे सरकत जातो तसतसे मागास प्रदेश व जिल्हे यांच्या अनुशेषाचे मान घटत जाते. तसेच या प्रदेशांना वर आणण्यासाठी उपलब्ध निधीचे मानही कमी होत जाते ही गोष्ट लक्षात घ्यावयास हवी.** तालुकावार मागासलेपण जर आपण निश्चित केले तर मागास तालुक्यांच्या नावाने अत्यंत विकसित जिल्हेही जादा विकासनिधी आपल्याकडे खेचून घेण्यात यशस्वी होतील. कारण त्यांच्या क्षेत्रात विकास समान स्वरूपात झालेला नसतो. यापद्धतीने आंतर जिल्हा व आंतर प्रदेश विषमता तीव्रतर होत जातील."

**३३. प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणामध्ये वाढविण्यास कारणीभूत ठरत असल्यामुळे मा. राज्यपालांनी नेमलेल्या अनुशेष व निर्देशांक समितीने तालुकानिहाय अनुशेष काढण्याची कल्पना संपूर्णपणे फेटाळून लावली.** पुढे पूनर्रचित अनुशेष व निर्देशांक समितीने व त्यानंतर मा.राज्यपालांनी सुद्धा ती कल्पना फेटाळून लावली. सन २००१ ते २०१० या काळात अनुशेष व निर्देशांक समितीने काढलेला अनुशेष भरुन तर निघाला नाहीच पण मा.राज्यपालांचे निदेश सतत डावलून निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळविल्यामुळे हा अनुशेष वाढत गेला. **सिंचनाचा हा अनुशेष असला, तरी तो प्रत्यक्षात दिसू नये यासाठी एकमेव उपाय म्हणून तालुकानिहाय अनुशेष काढणे हे ओळखून केळकर समितीचे कारस्थान रचण्यात आले.** दिनांक ३१ मे २०११ च्या शासन निर्णयान्वये डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली.

**३४.** सन २०१३ च्या ऑक्टोबर महिन्यात केळकर समितीने आपला अहवाल मुख्यमंत्र्यांना सादर केल्याच्या बातम्या वृत्तपत्रात येऊन गेल्या. विधानमंडळाच्या २०१३ च्या डिसेंबर अधिवेशनात तो सभागृहाला सादर झाला नाही. सन २०१४ च्या मार्च अधिवेशनातही सादर झाला नाही व पावसाळी अधिवेशनात सुद्धा सादर झाला नाही. मी अनेक विधानमंडळ सदस्यांना फोनवरुन विनंती केली, तेंव्हा "**तो अजून पटलावर ठेवण्यातच आला नाही**" असे कळले. ८-१० महिने तो अहवाल लपवून ठेवण्यात आला. बराच प्रयत्न करूनही त्या अहवालाबाबत 'समरी' सुद्धा हाती लागत नव्हती. अहवालातील बाकी मजकुरांची अंदाजाने कल्पना करता येत होती. **पण "जलसिंचनाचा अनुशेष मोजण्यासाठी तालुका घटक धरण्याचे कुकर्म" समितीने पार पाडले किंवा नाही एवढीच एक बाब महत्वाची होती. त्याबाबत काहीच कळत नव्हते.**

**३५.** केळकर समितीने सिंचन या क्षेत्रात तालुका घटक धरण्याबाबत आपल्या अहवालात काय उजेड पाडला आहे, याची उत्सुकता होती. पण ती पूर्ण होत नव्हती. केळकर समितीचा अहवाल ऑक्टोबर २०१३ मध्ये शासनाला सादर झाला होता, म्हणून नोव्हेंबर २०१३ पासून पुढचे 'लोकराज्य' या राज्यशासनाच्या मुखपत्राचे अंक पाहिले, तर पुढच्याच म्हणजे डिसेंबर २०१३ च्या 'लोकराज्य' च्या अंकात राज्याचे तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचा "**समतोल विकासाला प्राधान्य**" या मथळ्याचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री.सतीश लळीत यांनी या लेखाचे शब्दांकन केले असून तो त्या अंकाच्या पृष्ठ ६ ते ८ वर प्रसिद्ध झाला आहे.

**३६.** मा.मुख्यमंत्र्यांच्या या लेखात "**विकासासाठी तालुका हा घटक नवे सूत्र**" या मथळ्याखालील पुढील लहानसा परिच्छेद पहा :-

"विदर्भासह राज्यातील मागास भागांच्या विकासाचा नेमका अनुशेष किती आहे आणि तो दूर करण्याचे उपाय कोणते असावेत, हे सुचवण्यासाठी डॉ.विजय केळकर समिती आम्ही नेमली. समितीने आपला अहवाल सादर केला आहे. **या अहवालात समतोल विकासासाठी तालुका घटक या नव्या सूत्राची शिफारस करण्यात आली आहे.**"

अनुशेषाच्या मोजमापासाठी 'तालुका घटक' धरण्याचे समितीने ठरविले आहे एवढेच सांगून मुख्यमंत्री थांबले नाहीत तर त्यांनी याबाबत महाराष्ट्र शासनाने काय निर्णय घेतला आहे हे सुद्धा सांगून टाकले आहे. या लेखातील "**समतोल विकासाचे ध्येय**" या मथळ्याखालील लहानसा परिच्छेद पुढीलप्रमाणे.:-

"राज्यातील विविध प्रादेशिक विभागांचा असमतोल विकास हा एक मोठा

प्रश्न आहे. विदर्भाचा अनुशेष संपवून राज्याचा समतोल विकास करण्यावर आमचा भर राहणार आहे. **यापुढे विकासाचे नियोजन करतांना तालुका हा घटक म्हणून धरण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.**"

आम्ही निर्णय घेतला आहे म्हणजे? शासनाने निर्णय घेतला आहे व शासनाने निर्णय घेतला आहे म्हणजे मंत्रीमंडळाने निर्णय घेतला आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो की, **त्यावेळी मंत्रीमंडळाने जर निर्णय घेतला असेल तर 'सर्वात जास्त अनुशेष असलेल्या प्रदेशापेक्षा' 'अजिबात अनुशेष नसलेल्या उर्वरित महाराष्ट्राचा जास्त अनुशेष' काढून दाखविण्याची जादू तालुका घटक धरुन करता येते हे विदर्भातील मंत्र्यांना ठावूक नव्हते की मंत्रीमंडळापुढे तो अहवाल न ठेवताच हा निर्णय घेण्यात आला, याबाबत विदर्भातील त्यावेळचे मंत्रीच खुलासा करू शकतील.**

**३७.** या समितीचे कामकाज सुरु होण्यापूर्वी समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची एक बैठक 'सह्याद्री' अतिथी गृहावर मुख्यमंत्र्यांनी मुंबई येथे बोलाविली होती व त्या समितीने सिंचन क्षेत्रात तालुका घटक धरुन अनुशेष काढावा असे मुख्यमंत्र्यांनी समितीला सांगितले. अशा बातम्या त्यावेळी वृत्तपत्रात येऊन गेल्या होत्या. समितीवर अशा रितीने मुख्यमंत्री दबाव टाकत आहेत याचा पुरावा म्हणून वृत्तपत्रातील बातम्या समोर करता येत नाहीत. मात्र समितीवर असा दबाव टाकण्यात आला होता, याचा कबूलीजबाबच या लेखामध्ये मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. तो पुढील शब्दात :-

"यापूर्वी नेमलेल्या डॉ. दांडेकर समितीने १९८४-१९८५ साली राज्यातील असमतोल विकासावर प्रकाश टाकणारा अहवाल सादर केला होता. त्यावेळी विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनुशेषाची आकडेवारी सादर केली होती. **मात्र, डॉ. केळकर यांना अनुशेष नव्हे तर राज्याच्या समतोल विकासावर अहवाल देण्यास सांगण्यात आले.**"

**३८.** राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांचाच आदेश तो. डॉ. केळकरांनी शिरसावंद्य मानला व किती इमानेइतबारे अमलात आणला हे पाहण्यासारखे आहे. हे एक अवतार कार्य समजून किंवा प्रेषिताचे कार्य (in a mission mode) समजून आम्ही खास बाबतीत (अर्वषणप्रवण तालुके) तालुका घटक धरण्याचे ठरविले आहे. त्यासाठी 'कल्पित प्रदेश' उभे करण्याचे धोरणसुध्दा आम्ही स्वीकारले आहे. केळकरांच्या अहवालातील त्यांनी मांडलेला हा विचार मुळातूनच समजून घेतला पाहिजे तो पुढील प्रमाणे :-

"The blocks/**talukas are considered** in case of treatment (in a mission mode) pertaining to special issues. **These special issues were identified as virtual or imagined regions.**" (Para 4.6.3 P119)

**३९.** सिंचन या क्षेत्रात प्रदेश किंवा जिल्हा पातळीवर मांडणी केली तर अति मागासलेल्या जिल्ह्याच्या वतीने राज्याच्या त्या निधीवर कब्जा करण्याचा काही खास वर्ग प्रयत्न करतात ही भीतीसुध्दा आमच्या तालुका घटक धरून निधीवाटपाच्या योजनेमुळे संपुष्टात येईल अशी अत्यंत कोडगेपणाची योजना केळकरांनी सुचविली आहे. त्यांच्याच शब्दात पुढील प्रमाणे :-

"आमचा असा विश्वास आहे की, (विश्लेषणाच्या युनिटशी संबंधित) समस्येबाबतचे आमचे उत्तर हे (विशेषतः अवर्षणग्रस्त क्षेत्र कार्यक्रम यांसारख्या) काल्पनिक / वास्तविक प्रदेशांच्या परामर्शाला देण्यात आल्यास स्वीकार्य असेल. आणखी असे की, आमचा असा विश्वास आहे की, **ही योजना निधींची प्रक्रांति जी प्रादेशिक / जिल्हा पातळीवर लोकांच्या खास वर्गाद्वारे कब्जा केला जाण्याची भीती नाकारण्यास सहाय्य करील**". (परिच्छेद ४.६.३ पृ.११९)

**४०.** कोणापासून संरक्षण द्यावयाचे आहे? व कोणाला संरक्षण द्यावयाचे आहे? याबाबत केळकरांचा अभ्यास एकतर कमी पडला आहे किंवा ते वेड घेऊन पेडगावला तरी चालले आहेत. गेल्या १०-१२ वर्षात विदर्भ व मराठवाड्यातील जिल्ह्यांचा करोडो रुपयांचा निधी पश्चिम महाराष्ट्रात पळविल्याच्या घटनांनी महाराष्ट्राच्या इतिहासाची पाने व मा. राज्यपालांच्या निदेशांचे परिच्छेद खचाखच भरलेले असतांना अनुशेषग्रस्त जिल्हे किंवा त्यातील खास वर्गाद्वारे राज्यनिधीवर कब्जा केला जाईल व त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण तालुक्यांचे मोठेच नुकसान होईल अशी काल्पनिक भिती मनाशी बाळगून दुष्काळी तालुक्यांच्या कल्पित प्रदेशाच्या बांधणीची कृती म्हणजे बुध्दिचातुर्याचा अलौकिक आविष्कार होय असेच कोणीही म्हणेल. तेही कमी पडत असेल तर कोणाला संरक्षण द्यायचे? व कोणापासून संरक्षण द्यायचे याबाबत डॉ. केळकरांचा अलौकिक कल्पनाविलास असेही त्या कृतीचे वर्णन करता येईल.

**४१.** मुळात मंत्रीमंडळाने या समितीला जी कार्यकक्षा ठरवून दिली व त्याप्रमाणे जो शासननिर्णय निघाला त्यामध्ये स्पष्टपणे "**महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भात असमतोल (अनुशेष) निश्चित करणे**" हे काम समितीकडे सोपविले (शासन निर्णयाचा परिच्छेद ३/२) असतांना व शासन निर्णयात कुठेही तालुका घटक धरण्याचे समितीला सांगण्यात आलेले नसतांना "कसा अहवाल द्यायचा" हे मुख्यमंत्र्यांनी समितीला सांगितले. समितीने आनंदाने तालुका घटक धरुन अनुशेष काढला व **यापुढे विकासाचे नियोजन करतांना तालुका हा घटक म्हणून धरण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.** हे सर्व मंत्री मंडळाच्या मान्यतेने झाले? की अशा मान्यतेशिवाय झाले हे अजूनही लोकांना समजलेले नाही. निवडणूकीच्या वेळी दूरचित्रवाणीवर केलेल्या जाहिरातीमध्ये 'स्वच्छ' या शब्दावर जोर देऊन ठसक्यात जेव्हा मुख्यमंत्री "**स्वच्छ कारभार, कुठेही लपवाछपवी नाही, सगळं तुमच्या डोळ्यासमोर**" असे शब्द वापरत होते. ते शब्द जर खरे असतील तर मग केळकर समितीचा अहवाल का लपविल्या गेला? हे जाणून घेण्याचा लोकांना अधिकार आहे.

**४२.** देशाच्या मा. पंतप्रधानांनी या भागाला प्रत्यक्ष भेट दिली, दिल्लीच्या लाल किल्ल्यावरुन केलेल्या भाषणात या दुर्देवी व दुःखद संदर्भात फक्त विदर्भाचा उल्लेख केला. याचे कारण आत्महत्त्यांची ही संख्या हृदय पिळवटून टाकणारी आहे. त्यावेळी श्री. पृथ्वीराज चव्हाण हे मा. पंतप्रधानाच्या कार्यालयात राज्यमंत्री होते. त्यामुळे आपल्याला हे ठाऊक नाही असे ते म्हणू शकत नाहीत. दिनांक १ जानेवारी २००१ ते ३१ जानेवारी २०१० या काळात विदर्भाच्या या जिल्ह्यात आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या हजारोंच्या घरात आहे हे अधिकृत शासकीय कागदपत्रात नमूद आहे. **एवढ्या मोठ्या संख्येने झालेल्या व होत असलेल्या या आत्महत्त्या म्हणजे सातत्त्याने फोफावत गेलेल्या प्रादेशिक असमतोलाच्या अत्यंत जहरी वृक्षावर अतिविपूल प्रमाणात पैदा झालेली विषारी व कटू फळे आहेत.** आचार संहिता लागू होण्यापूर्वी दूरचित्रवाणीवर सरकारी जाहिरातीमध्ये एकएक बाब सांगून "सर्वात पुढे आहे, हा महाराष्ट्र माझा" हा मुखडा म्हटला जात असे. तेव्हा विदर्भाच्या भरवशावर याबाबतीत **सुद्धा विदर्भातील आत्महत्त्यांचे आकडे सांगून "सर्वात पुढे आहे, हा महाराष्ट्र माझा" हा मुखडा वापरला असता तर तालुका घटक धरुन अनुशेष काढण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या कामगिरीचा फार मोठा गौरव झाला असता व या अद्वितीय कामगिरीबद्दल केळकरांचा सुध्दा एखादा 'पुरस्कार' मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला असता.**

**४३.** तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी निदान अहवाल सादर झाल्यानंतर 'पेपर' फोडला. पण सह्याद्री अतिगृहावर झालेल्या बैठकीनंतर स्वतः डॉ. केळकर हे तर अहवाल तयार होण्यापूर्वीच हातात ढाल व कमरेला तलवार लावून आत्महत्त्यांनी ग्रस्त व अनुशेषाने त्रस्त अशा भागाच्या निर्मूलनासाठी दांडपट्टा फिरवित निघाले होते. गुरुवार, दिनांक १५ डिसेंबर २०११ च्या 'लोकसत्ता'मध्ये समितीच्या अध्यक्षांची काही कुतूहलजनक व घटनात्मक तरतुदींचा अधिक्षेप करणारी मते प्रसिद्ध झालेली आहेत. "या चर्चेचा समारोप करतांना डॉ. केळकर यांनी केवळ **राहून गेलेल्या अनुशेषाबाबत कंठशोष करीत राहणे आणि तो भरून काढून असमतोल दूर करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा, राज्याच्या समग्र आणि संतुलित विकासावर भर देणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रादेशिक असमतोलाचे 'राजकीय अर्थशास्त्र' समजावून घेतांना, आपण आजवर विविध प्रदेशातील लोकांची गाऱ्हाणी आणि आकांक्षांना विस्तृतपणे जाणून घेतले आहे. त्याचा सार म्हणून सादर करण्यात येणारा समितीचा अंतिम अहवाल हा राज्याच्या एकंदर विकासाच्या दृष्टीने समज आणि चर्चा पुढे नेणारे महत्वाचे पाऊल ठरेल. असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.**" सिंचन अनुशेषाने त्रस्त व आत्महत्त्यांनी ग्रस्त असा महाराष्ट्रातील भाग बाजूला काढला तर विकसित महाराष्ट्राच्या आणखी समग्र विकासासाठी केळकर समितीची आवश्यकता नाही. तो विकास झपाट्याने झालेला आहे, तो होतच आहे व होतच राहणार. अनुशेषग्रस्त भागावर मोठा मार पडत असल्याने ३७१(२) ची यंत्रणा अस्तित्वात आली. **अनुशेषाने होरपळणाऱ्या महाराष्ट्रातील या भागांना कंठशोष करण्याचा सुद्धा अधिकार नाही या डॉ.केळकर यांच्या मताविषयी आम्ही आदर व्यक्त करु शकत नाही.**

**४४.** याच वार्तापत्रात पुढे असेही नमूद करण्यात आले होते की "**अनुशेष दूर करा या एकाच मागणीभोवती फेर धरुन राहिलेल्या जनमानसाला सबंध महाराष्ट्राच्या संतुलित विकासाबाबत विचार करण्याच्या पातळीवर नेण्याचा आपला प्रयत्न राहील,** असे प्रतिपादन महाराष्ट्रातील प्रादेशिक आर्थिक असमतोलाबाबत विचार करण्यासाठी **राज्य शासनाने स्थापलेल्या उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष आणि १३ व्या वित्त आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.विजय केळकर यांनी केले.**" ज्या भागात अजून १९८४ मध्ये काढलेला एक हेक्टरचा सुद्धा अनुशेष दूर झालेला नाही, ज्या भागामध्ये सिंचनाचा अनुशेष दूर करण्याची प्रक्रिया अजून सुरुसुद्धा झालेली नाही, त्या भागातील "**अनुशेष दूर करा या एकाच मागणीभोवती फेर धरुन राहिलेल्या जनमानसाला सबंध महाराष्ट्राच्या संतुलित विकासाबाबत विचार करण्याच्या पातळीवर नेणारे मांत्रिक**" होण्याची जबाबदारी किंवा 'सुपारी' डॉ. केळकर यांनी स्वीकारली असली तरी या मंत्रविद्येच्या प्रयोगाबाबत इतरांनी आदर बाळगण्याचे कोणतेही कारण नाही. शिवाय ज्या "सबंध महाराष्ट्राच्या संतुलित विकासाची गोष्ट" डॉ. केळकर बोलत आहेत त्या सबंध महाराष्ट्राचा विदर्भ व मराठवाडा हे अविभाज्य भाग आहेत याचा विसर खुद्द डॉ. केळकरांनीसुद्धा पडू द्यायला नको होता. उद्यापासून समतोल किंवा संतुलित विकास करण्याच्या गोष्टी बोलणारे तज्ज्ञ कालपर्यंत साचलेल्या अनुशेषाच्या डोंगराविषयी एक शब्द बोलत नाहीत तेंव्हा त्यांचा तो विचार आत्महत्त्याग्रस्त भागासाठी आदरणीय विचार नसतो. असे करतांना नागपूर करार व त्यातून पुढे भारताच्या घटनेत आलेले **कलम ३७१(२) व त्या अंतर्गत स्थापित झालेल्या यंत्रणा याकडेसुद्धा दुर्लक्ष करायला हे तज्ज्ञ मागेपुढे पहात नाहीत. तेंव्हा त्यांची कृती अनुशेषाने होरपळून निघालेल्या त्या भागात त्यांच्या विषयी तीव्र असा तिरस्कार निर्माण करणारी कृती ठरते.**

(४) ८ फेब्रुवारी २०१५

# हांजीखोरपणा व लांगुलचालनाच्या पोटी कलम ३७१ (२) वर नवीन अर्थ लादण्याचा केळकरांचा प्रयत्न

**४५.** राज्यसरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांना आम्ही कमी निधी देऊ, अजिबात अनुशेष नसलेल्या आमच्या जिल्ह्यांना आम्ही जास्त निधी देऊ, राज्यातील अनुशेष वाढविण्याचे काम आम्ही करू, तो कमी करण्याचे काम केंद्र शासनाने करावे अशी एक 'लाईन' प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे पश्चिम महाराष्ट्राच्या काही नेत्यांनी गेल्या १०-१२ वर्षांमध्ये धरलेली आहे. प्रातिनिधीक उदाहरण नमूद करण्यासारखे आहे. मा. पंतप्रधानांनी नेमलेल्या सत्यशोधन पथकाने मे २००६ मध्ये मंत्रालयात शासनाशी चर्चा केली. त्यावेळी पश्चिम महाराष्ट्रातील वित्तमंत्र्यांनी त्यांना काय सांगितले? हे त्या समितीच्या अहवालात नमूद आहे. "the Finance Minister felt that the needs of Vidarbha area can be met only by augmenting the flow of funds through Central grants. They felt that the State Government is handicapped by the need to create capacity to absorb the award for Krishna waters." (Page 9 of the Report of the FFT Appointed by the Prime Minister) लवादाने दिलेल्या निवाड्याप्रमाणे सिंचनक्षमता त्यांनी केंव्हाच पदरात पाडून घेतलेली आहे याचा साधा उल्लेखसुद्धा हे राजकीय पुढारी करीत नाहीत. सध्या आणखी जास्त पाणी पदरात पाडून घेण्यात ते गुंतलेले आहेत, ही बाब या अहवालात पुढील शब्दात मांडलेली आहे. :- "The Fact that the capacity has already been created to absorb the Bachawat Award is not mentioned by the senior politicians of the State. Their desire is to expand the capacity in Western Maharashtra. Currently they are busy with all last mile projects where 75% expenditure has already been made in Western Maharashtra." (Page 9 of the Report of the FFT Appointed by the Prime Minister) ७५ **टक्के काम झालेले प्रकल्प प्राथम्म्याने पूर्ण करण्याचा सिध्दांत हा अतिशय दुष्टपणाचा असून जिथे अनुशेष भरून काढण्याइतक्या प्रकल्पांची यादी सुध्दा तयार नाही, अशा अनुशेषग्रस्त भागावर अन्याय करणारा आहे. हे पंतप्रधानांनी नेमलेल्या समितीला समजले पण ते केळकरांना नाही समजले.**

**४६.** मा. पंतप्रधानाच्या निदेशावरुन नियोजन आयोगाच्या सदस्यांचे हे जे पथक महाराष्ट्रात पाठविले होते, या पथकासमोर ५ मे २००६ रोजी मंत्रालयातील समिती दालनांत 'हेल्पलाईन'ला पथकाने वेळ दिलेली होती. आम्ही आमचे म्हणणे मांडत होतो. हेल्पलाईनच्या वतीने सरचिटणीस श्री. प्रभाकरराव वैद्य, तत्कालीन राज्यसभा सदस्य श्री. रा.सु.गवई, लोकसभा सदस्य श्री. राठोड, वैधानिक विकास मंडळाचे तज्ज्ञ सदस्य श्री. मधुकरराव किंमतकर, प्रा. बी.टी. देशमुख यांना समितीच्या अध्यक्षा श्रीमती आदर्श मिश्रा यांनी असा प्रश्न विचारला की, **"प्रकल्पाचे बांधकाम, निधी उपलब्ध होणे या नंतरच्या गोष्टी आहेत. अनुशेष दूर करण्याचा तुमचा बृहत आराखडा तयार आहे काय? निदान अशा प्रकल्पांची यादी तरी तयार आहे का?"** त्यावर आम्हाला काही उत्तर देता आले नाही. खरे म्हणजे 'नाही' असे उत्तर देता आले असते. त्या समितीला ही गोष्ट किती महत्त्वाची वाटत होती, हे त्या समितीचा रिपोर्ट वाचल्यानंतर लक्षात येते. अहवालात समितीने असे नमूद केले आहे की :- "**The crying need of the area is for water, while it is true that the area is awaiting a favorable allocation under the Governor's directives,** the real ailment is also appropriate planning of projects which would benefit the most people......The list of projects to be taken up for Vidarbha should be reviewed urgently and **a time bound programme for the implementation of the full backlog should be designed and put into implementation mode within the next six months,** that is right after the monsoons......The intention should be to reduce the backlog of development of this component within the foreseeable future, in any case the projects should be sanctioned and work should be started no later than the current financial year." (Page 19 of the Report of the FFT Appointed by the Prime Minister) **पूर्ण अनुशेष भरून निघेल एवढ्या प्रकल्पांची यादी तयार करावी लागेल व पुढच्या सहा महिन्यात ती कामे सुरु करावी लागतील हे त्या समितीला कळले पण केळकरांना मात्र कळले नाही.**

**४७.** पथकाने आपल्या अहवालात विदर्भातील प्रकल्प पूर्ण न करण्यामागे असलेल्या घमेंडखोर वृत्तीवर व वित्त विभागावर पुढील प्रमाणे आरोप केला आहे :- "The Team felt there was inadequate explanation for this lackadaisical attitude in implementation of projects for Vidarbha and that there was ample reason to suspect collusion and connivance in not sanctioning the funds for the region and later to move for supplementary budgets, mostly for irrigation in Western Maharashtra." (Page 10 of the Report of the FFT Appointed by the Prime Minister) **विदर्भातील अनुशेष कोणत्या घमेंडखोर वृत्तीमुळे वाढत आहे हे त्या पथकाला समजले पण केळकरांना मात्र नाही समजले.**

**४८.** पथकाने सातत्त्याने होणाऱ्या आत्महत्त्यांबाबत आपल्या अहवालात जे नमूद करून ठेवले आहे ते लक्षात घेण्यासारखे आहे :- "ix) **Suicides and action by the State** :- Suicide, an extreme expression of distress, has raised grave questions regarding not only the historical neglect of the region but also a philosophical question about the capacity of Governments to be of immediate service to people in such acute distress." (Page 14 of the Report of the FFT Appointed by the Prime Minister) **आत्महत्त्यांच्या मुळाशी असलेल्या कारणांचा शोध या समितीला लागला पण केळकरांना मात्र तो लागला नाही.**

**४९.** पंतप्रधानांनी नेमलेल्या या सत्यशोधन पथकाचा (FFT) अहवाल केळकरांनी निश्चितपणे पाहिला आहे. त्यांच्या अहवालामध्ये तसे ठिकठिकाणी नमूद आहे. त्या अहवालातील विदर्भाच्या दुराव्यवस्थेला व आत्महत्त्यांना जबाबदार राज्यशासनाच्या वृत्तीवर प्रहार करणारे परिच्छेदामागून परिच्छेद केळकरांना दिसले नाहीत. मात्र ३७१(२) या कलमाचा अंमल सुरु असल्याने केंद्र शासनाने अनुशेष दूर करण्यासाठी निधी द्यावा हे स्वनिर्मित सूत्र केळकरांनी उराशी घट्ट कवटाळून ठेवलेले दिसते. त्यांच्याच शब्दात :- "केंद्र शासन अनुच्छेद ३७१(२) च्या आदेशानुसार केवळ धोरणात्मक सुधारणाच करीत नाही तर आम्ही असे देखील मानतो की, **केंद्र शासनाने वित्तीय आयोगांमार्फत निधीची तरतूदही करायला हवी**..... प्रादेशिक असमतोल दूर करताना तसेच भविष्यात **राज्याच्या समतोल विकासाची सुनिश्चिती करताना, भारत सरकारचा सहभाग संविधानाच्या ३७१(२) मध्ये गर्भित असल्याचा निष्कर्ष काढता येतो.**" या शब्दात त्यांनी आपल्या शिफारशींची मांडणी केली आहे. उघड्या डोळ्यांना दिसणारा कलम ३७१(२) चा अर्थ पाहतांना डोळे झाकून घ्या आणि केळकर सांगतात तो गर्भित अर्थ ध्यानात घ्या. ३७१(२) **कलमातील तरतुदींना नवा अर्थ देण्याचा हा प्रयत्न म्हणजे पश्चिम महाराष्ट्राच्या काही नेत्यांसमोर हांजीखोरपणा करण्याचा व लांगुलचालन करण्याचा एक निंद्य प्रयत्न असल्यामुळे त्यांची तपशीलवार चिकित्सा होणे आवश्यक आहे.**

**५०.** महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या उभय सभागृहांनी जरी विकास मंडळांच्या स्थापनेचा ठराव दिनांक २६ जुलै १९८४ रोजी एकमताने मंजूर केलेला असला तरी प्रत्यक्षात वैधानिक विकास मंडळांची स्थापना दिनांक १ मे १९९४ रोजी म्हणजे त्यानंतर जवळ जवळ १० वर्षांनी झाली. एखाद्या राज्यातील विकसित


## वनराई फाउंडेशन

राष्ट्रभाषा संकुल, उत्तर अंबाझरी मार्ग, शंकर नगर चौक, नागपूर

**श्री. अनंत घारड, अध्यक्ष** (नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा) **प्रा.राम गावंडे, सचिव**

भाग आपल्या विकासाच्या आधारे जी राजकीय शक्ती प्राप्त करून घेतात त्या राजकीय शक्तीचा वापर करून अविकसित भागांच्या विकासाला पूरक ठरणाऱ्या एखाद्या लहानशा घटनात्मक तरतुदीला सुद्धा प्रत्यक्ष अमलात येण्यापासून किती दीर्घकाळ प्रलंबित ठेवू शकतात याचे स्वतंत्र भारताच्या इतिहासात घटनेच्या कलम ३७१(२) इतके दुसरे नामवंत उदाहरण शोधून सापडेल असे वाटत नाही. याच राजकीय शक्तीच्या आधारे दबाव आणल्याने १९९४ मध्ये ३७१(२) चा अंमल सुरु झाला तरी सिंचनाबाबतचे मा. राज्यपालांचे निदेश निर्गमित होण्यास २००१ सालचा डिसेंबर महिना उजाडला व याच दबावाच्या पोटी राज्यपालांच्या निदेशाने दिलेला निधी विदर्भ-मराठवाड्याला मिळू न देण्यात या राजकीय शक्ती यशस्वी झाल्या.

**५१. दांडेकर समितीचा अहवाल सादर झाल्यानंतरच्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या जुलै १९८४ च्या अधिवेशनात गुरुवार दिनांक २६ जुलै १९८४ रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी वैधानिक विकास मंडळाबाबतचा पुढील ठराव उभय सभागृहात मांडला :-**

"भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१ खंड (२) या अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, भारताच्या राष्ट्रपतींनी महाराष्ट्र राज्याच्या संबंधात आदेश काढून त्याद्वारे विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वेगवेगळी विकास मंडळे स्थापन करावीत अशी विनंती महाराष्ट्र शासनाने राष्ट्रपतींना करावी." (या ठरावानुसार तशी विनंती महाराष्ट्र शासनाने करवयाची होती/केलेली होती.)

**५२. दोनही सभागृहांनी हा ठराव एकमताने मंजूर केला,** तेव्हा ठराव मांडतांना मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी जे भाषण केले त्यातील तीन महत्त्वाचे मुद्दे मी त्यांच्याच शब्दात खाली नमूद करीत आहे :-

(१) "१९५६ चा राज्य पुनर्रचनेचा कायदा व अनुषंगिक संविधानिक दुरुस्त्या यांचा संसदेमध्ये ज्यावेळी विचार झाला, तेव्हा नागपूर करारातील तरतुदी दृष्टीसमोर ठेऊन कलम ३७१(२) ची तरतूद करताना असे सांगण्यात आले होते की. **वेगवेगळ्या विभागांना विकास कार्यक्रमांमध्ये न्याय मिळेल किंवा नाही अशी जी शंका व्यक्त करण्यात येत होती, तिचे निरसन करण्यासाठी स्वतंत्र विकास मंडळाची तरतूद घटनेमध्ये करण्यात आली."**

(२) "महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे विधेयक मांडतांना तत्कालीन मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनी शासनातर्फे एक धोरणात्मक निवेदन केले होते. त्या निवेदनात हे स्पष्ट करण्यात आले होते की, **विदर्भ आणि मराठवाडा हे विभाग मागासलेले आहेत हे लक्षात घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे विशेष लक्ष दिले जाईल व त्या विभागांकरिता स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्यात येतील."**

(३) "आज सर्वांची अशी भावना झालेली दिसते की घटनेच्या कलम ३७१(२) प्रमाणे प्रादेशिक विकास मंडळे स्थापन केल्याशिवाय या राज्याच्या वेगवेगळ्या विभागांचा विकास अपेक्षित वेगाने व समन्यायाने घडू शकणार नाही." मा. वसंतदादांचे हे भाषण केळकरांनी वाचले असेल तर आणि वाचले असेल व त्यांना समजले असेल तर त्यांनी असा हांजीखोरपणा व लांगूलचालनाचा निंद्य प्रयत्न करण्याचे कोणतेही वाजवी कारण नव्हते.

**५३.** भारतीय संविधानाच्या कलम ३७१(२) मध्ये असे म्हटलेले आहे की :-

"**महाराष्ट्र व गुजरात या राज्यांबाबत विशेष उपबंध :** ३७१(१) या संविधानात काहीही असले तरी महाराष्ट्र किंवा गुजरात ह्या राज्यांबाबत आदेश करून त्याव्दारे राष्ट्रपतीला पुढील गोष्टींसाठी राज्यपालावर कोणतीही विशेष जबाबदारी सोपवण्याचा उपबंध करता येईल.

(क) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र किंवा प्रकरणपरत्वे सौराष्ट्र, कच्छ व उर्वरित गुजराथ यांच्यासाठी अलग अलग विकास मंडळे स्थापन करून, त्यापैकी प्रत्येक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल दरवर्षी राज्य विधानसभेसमोर ठेवला जाईल अशी तजवीज करणे;

(ख) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रावरील **विकासखर्चासाठी पैशाची समन्यायानुसार वाटणी करणे;** आणि

(ग) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्राबाबत **तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण** यासाठी पर्याप्त सोयी व **राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्यायानुसार व्यवस्था करणे"**

हांजीखोरपणा व लांगुलचालनाचा मार्ग स्वीकारल्यामुळे घटनेतील "**विकासखर्चासाठी पैशाची समन्यायानुसार वाटणी** " या शब्दरचनेकडे केळकरांना लक्ष देण्याची गरज वाटली नाही.

**५४.** घटनेमध्ये मुळांत हे कलम १९५३ च्या नागपूर कराराला घटनात्मक आधार देण्याच्या धडपडीतून आले. राज्यपुनर्रचनेच्या वेळी आणलेल्या विधेयकावर संसदेच्या दोनही सभागृहांची जी संयुक्त चिकित्सा समिती नेमली होती त्या समितीच्या अहवालामध्ये पुढील उल्लेख आहे :-

"On page 4, original clause 21,--- It was argued before the Committee by its Members from the Vidarbha that the agreement entered into September, 1953 known as Nagpur Agreement should to the extent practicable be given constitutional recognition. The Members from other Maharashtra area gave their full support to this proposal. A new clause has accordingly been added to the proposed article 371 with the consent of the Members from Maharashtra."

**५५.** महाराष्ट्राच्या तीनही विभागाचे तत्कालीन मान्यवर नेते तत्कालीन गृहमंत्री श्री. गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखालील संसदेच्या संयुक्त चिकित्सा समितीपुढे गेले होते. तेथे त्यांनी एकमताने ३७१(२) ची मागणी केली होती. हे केळकरांना ठावूक नसेल तर त्यांनी ते माहित करून घ्यावे. एवढ्या साऱ्या खटाटोपानंतर महाराष्ट्र नावाचे राज्य भारताच्या नकाशावर आले. आता 'आम्ही' (म्हणजे १९८४ मध्ये खुद्द महाराष्ट्र शासनाने) मागणी केल्यानंतर ३७१(२) ची व्यवस्था आली असतांना 'आम्ही' वाढविलेला अनुशेष कमी करण्यासाठी केंद्र शासनाने निधी द्यावा ही केळकरांची शिफारस पाहिली म्हणजे महाराष्ट्राच्या नकाशावर कुणीतरी शेणसडा ओतत आहे असे दुर्दैवी चित्र डोळ्यासमोर उभे राहते. हांजीखोरपणा व लांगूलचालनाची सुध्दा एक नशा असते. ही नशा केळकरांना इतकी चढली आहे की "भारताच्या घटनेतील तरतुदी प्रमाणे राज्याच्या मुख्यमंत्र्याचे पद निर्माण झालेले आहे. **"श्री. देवेंद्र फडणवीस हे विदर्भातील मुख्यमंत्री आहेत तेव्हा मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयावर होणारा सर्व खर्च केंद्र शासनाने द्यावा" असा ३७१(२) चा गर्भित अर्थ" काढायला केळकरांनी मागेपुढे पाहिले नसते.** त्यांचे दुर्दैव असे की हा अहवाल सादर झाल्यानंतर फडणवीस यांचे सरकार आले.

**५६.** घटनेच्या कलम ३७१ (२) अन्वये भारताच्या मा. राष्ट्रपतींना असलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी **दिनांक ९ मार्च १९९४ रोजी "महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची विशेष जबावदारी) आदेश १९९४"** पारीत करून महाराष्ट्राच्या राज्यपालांना शक्ती प्रदान केली. त्या आदेशाच्या परिच्छेद दोन मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, :-

**"2. Special responsibility of governor :** The Governor of Maharashtra shall have special responsibility for the

***अंधश्रद्धा निर्मूलनाच्या क्षेत्रात काही चमत्कारापोटी व काही चमत्कारासाठी नरबळी दिले जातात. अनुशेष निर्मूलनाच्या क्षेत्रातील चमत्कारसुद्धा निर्हेतुक नसतात. ''अनुशेष दूर झाल्याच्या या चमत्कारामुळे'' महत्प्रयासाने मिळविलेल्या निधी वाटपाच्या सूत्राचे उगमस्थान असलेल्या मा.राज्यपालांच्या निदेशातून २०१० व त्यानंतर आजपर्यंत ''अनुशेषाला देण्यात आलेल्या वेटेज''ची हकालपट्टी करण्यात आली.***

***''अनुशेष दूर झाल्याच्या या चमत्काराने'' अनुशेषग्रस्त भागाच्या निधी उपलब्धीचा गळा आवळला गेला व शेतकरी आत्महत्यांच्या मार्गाने नरबळी घेण्याच्या ''अगोदरच अस्तित्वात असलेल्या राज्यमहामार्गाचे'' अत्यंत दुर्दैवी अशा ''राष्ट्रीय महामार्गामध्ये'' रुपांतर झाले.***

(प्रस्तावना परिच्छेद १२ पहा)

establishment of separate Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra and for matters specified in sub-clauses (b) and (c) of clause (2) of Article 371 of the constitution in respect of the area of each such Development Board."

मा. राष्ट्रपतींनी आदेश काढून महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविली. कोणती विशेष जबाबदारी तर विकासकामावर होणाऱ्या खर्चाचे समन्यायी वाटप झाले पाहिजे ((b) & (c) of clause 2 of Article 371) हे केळकरांना वाचता येत नाही असे नाही. **"त्यात काही कमी पडले तर दोन रुपये आम्ही तुम्हाला केंद्र शासनाकडून देऊ" अशी शब्दरचना त्यात कुठेही नाही. असे असूनही केळकर उपरोक्त शिफारस करतात ती केवळ लांगुलचालन व हांजीखोरपणापोटीच होय.**

**५७.** मा. राष्ट्रपतींनी प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी **दिनांक ३० एप्रिल १९९४ रोजी "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, १९९४"** हा आदेश प्रख्यापित केला. महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी प्रख्यापित केलेल्या या आदेशाला राज्याच्या अधिनियमांचे स्वरूप प्राप्त झाले असून महाराष्ट्र विधानमंडळाने केलेले अधिनियम ज्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या भाग चार मध्ये प्रसिद्ध होतात त्या भागाच्या (असाधारण, १ मे १९९४) पृष्ठ क्रमांक २३२ अ ते २३२ ड वर हा आदेश प्रसिद्ध करण्यात आला आहे. मा. राज्यपालांचा हा आदेश काळजीपूर्वक वाचला तर "केंद्राकडून निधी मागण्याची कल्पना" त्यामध्ये कोठेही नाही.

**५८.** भारतीय संविधानातील कलम ३७१(२) च्या अर्थाला नवीन वळण देणाऱ्या केळकरी अहवालातील एक-दोन लहान लहान वाक्यांचा मी सुरुवातीला उल्लेख केलेला आहे. ही वाक्ये ज्या परिच्छेदामध्ये आहे ते परिच्छेद मुळातून पाहण्यासारखे आहेत. अहवालाच्या पृष्ठ १३१ वरील परिच्छेद ४.६.२३ ची सुरुवातच पुढील प्रमाणे आहे. :-

"आमच्या दृष्टीकोनाने, आम्ही 'केंद्र शासनाच्या' जबाबदाऱ्या व त्याची भूमिका यांदेखील ठळकपणे निदर्शनास आणल्या आहेत. 'शासन' या प्रकरणात केंद्र शासनाची भूमिका यावर एक पूर्ण खंड आहे. हे अतिशय महत्त्वाचे असून, त्यावर आमचा विश्वास आहे आणि घटनेचे अनुच्छेद ३७१(२) मध्ये झालेल्या सुधारणेप्रमाणे वरील बाबींचे अनुपालन करते. **अशाप्रकारे, केंद्र शासन अनुच्छेद ३७१(२) च्या आदेशानुसार केवळ धोरणात्मक सुधारणाच करीत नाही तर आम्ही असे देखील मानतो की, केंद्र शासनाने वित्तीय आयोगांमार्फत निधीची तरतूदही करायला हवी.**"

**५९.** एवढ्यावर केळकरांचे समाधान झाले नाही. ३७१(२) मधून सरळसरळ आपण काढतो तो अर्थ निघत नाही, निघणार नाही. असे वाटल्यामुळे पृष्ठ २०८ वरील परिच्छेद ६.१०.१२ मध्ये गर्भित अर्थ सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. तो पुढील शब्दात :-

**"प्रादेशिक असमतोल दूर करताना तसेच भविष्यात राज्याच्या समतोल विकासाची सुनिश्चिती करताना, भारत सरकारचा सहभाग संविधानाच्या ३७१(२) मध्ये गर्भित असल्याचा निष्कर्ष काढता येतो.** ज्यामुळे विकास प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो त्याकरिता काही महत्त्वाच्या अधिनियमांमध्ये सुधारणा करून केंद्र स्तरावर काही गुणवत्तापूर्ण सुधारणा करण्याची आवश्यकता असेल आणि **हा खर्च भागविण्यासाठी राज्याला काही अतिरिक्त निधी आगाऊ देण्याची देखील आवश्यकता असेल.** असे करण्यासाठीचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे, क्रमवर्ती केंद्रीय वित्तीय आयोगाच्या 'विचारार्थ विषयाची' व्याप्ती अशा प्रकारे वाढविणे की, त्यामुळे आयोगाच्या **शिफारशींवर प्रादेशिक असमतोलाच्या मुद्यासाठी समुचित रीतीने योजना तयार करता येतील.** आमच्या समितीने केलेली ही शिफारस भारत सरकार लवकरात लवकर विचारात घेईल, अशी आम्ही आशा बाळगतो." केंद्र सरकारला काही शिफारशी सुचविण्याचे काम केंद्र सरकारने डॉ. केळकरांवर सोपविले नसतांना त्यांनी केलेला हा आगाऊपणा होय.

**६०.** लांगूलचालन व हांजीखोरपणा हा गुणविशेष बाजूला ठेवला तरी घटनेच्या कलम ३७१(२) वर असा विकृत अर्थ लादण्याची कृती ही डॉ. केळकरांनी पश्चिम महाराष्ट्राच्या दबावाखालीच केली असे मला हा अहवाल हाती आल्याच्या पहिल्या दिवसापासून वाटत होते. सात-आठ दिवसांपूर्वी याबाबतचा मजबूत पुरावाच उपलब्ध झाला. या समितीचे एक सदस्य डॉ. विनायक देशपांडे यांचा "केळकर समिती अहवाल : दिशादर्शक दस्तावेज" या मथळ्याचा एक सविस्तर लेख रविवार, दिनांक १ फेब्रुवारीच्या 'लोकसत्ता'मध्ये प्रकाशित झाला आहे. या लेखाच्या दुसऱ्या परिच्छेदातील हा मजकूर पहा :-

"ही सगळी चर्चा सुरु असताना वैधानिक विकास महामंडळांचे काय करावे, ती असावीत की नकोत, यावर मंथन सुरु झाले होते. **घटनेतील ज्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये वैधानिक विकास महामंडळे अस्तित्वात आली, ते केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्याने या महामंडळांची जबाबदारी राज्य शासनाने का उचलावी, अशी भूमिका पश्चिम महाराष्ट्रातून सातत्याने मांडण्यात आली**".

**६१.** केंद्राकडून एखाद्या राज्याने निधी मागणे हा वेगळा व स्वतंत्र विषय आहे. खंड ३७१(२) वर तसा अर्थ लादणे हा वेगळा विषय आहे. "विदर्भ-मराठवाड्याचा अनुशेष आम्ही वाढवू तो भरून काढण्याचा खर्च केंद्र शासनाने द्यावा" हा पश्चिम महाराष्ट्राचा विचार उराशी कवटाळून व या अहवालाचे निमित्त करून डॉ. केळकरांनी भारताच्या घटनेतील कलम ३७१(२) वर नवीन अर्थ लादण्याचा जो विचार मांडला आहे. तो अत्यंत विषारी विचार आहे. त्या विचारांची जेवढी तीव्र शब्दात निंदा व निर्भत्सना करता येईल तेवढी थोडीच आहे.

**६२.** कलम ३७१(२) अन्वये अस्तित्वात आलेल्या वैधानिक विकास मंडळांचे काय करावे? ती असावीत की नकोत? याबाबतचे मंथन सुध्दा केळकर समितीत सुरु झाले होते, हे डॉ. देशपांडे यांच्या लेखाच्या निमित्ताने कळले हे बरेच झाले. याला काय म्हणावे? भारताची घटना कुठे? केळकर केव्हढे? केळकर समिती केव्हढी? कलम ३७१ (२) केव्हढे? हांऽ जी ! हांऽ जी ! जीऽ हां ! करीत लांगुलचालन करण्याला काही मर्यादा असावी का नको?

**"Therefore, It is necessary for the Irrigation Department that the outlays corresponding to the weightage for backlog are spent in backlog districts on priority so that the physical backlog will be fully liquidated in those districts at the end of 4 years."**

(मा.राज्यपालांचे १५.१२.२००१ चे निदेश परिच्छेद ७.२ व ७.१२ पहा) (प्रस्तावना परिच्छेद १६ (३) व (८) पहा)

**The latest revised quantum of physical and financial backlog should be taken into account when the allocations are made on an annual basis.This concept of rolling backlog will reflect the realistic picture of backlog in the Irrigation Sector.**

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

# विदर्भ गौरव प्रतिष्ठान

*द्वारा : वनराई, राष्ट्रभाषा संकुल, उत्तर अंबाझरी मार्ग, शंकर नगर चौक, नागपूर*

(५) १५ फेब्रुवारी २०१५

# समतोल विकासाच्या नावाखाली असमतोल शिफारशी

**६३. एक म्हणजे** १९८२ च्या स्तरावर दांडेकर समितीने काढलेला व त्यानंतर १९९४ च्या स्तरावर अनुशेष व निर्देशांक समितीने काढलेला जलसिंचन या विकासक्षेत्रातील अनुशेष विदर्भ व मराठवाड्यामधे कमी तर झाला नाहीच उलट तो मोठ्या प्रमाणात वाढला आहे. जलसिंचन या विकासक्षेत्राबाबत प्रचंड प्रमाणामध्ये वाढलेला अनुशेष आपल्या अहवालामध्ये कोठेही दिसता कामा नये. **दुसरे म्हणजे** १९८२ च्या व १९९४ च्या स्तरावर जे पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हे राज्यसरासरीच्या बरेच वर होते ते आणखी वेगाने नव-नव्या सरासरीवर आणखी वर गेलेले आहेत ही गोष्ट आपल्या अहवालामध्ये दिसता कामा नये याची केळकरांनी उत्तम काळजी घेतली. **तिसरे व सर्वात महत्त्वाचे** म्हणजे विदर्भ-मराठवाड्यात अनुशेष कितीही असू दे, जास्त निधी उर्वरित महाराष्ट्रात वळविला पाहिजे हे पक्के धरूनच केळकरांनी आपल्या शिफारशींची मांडणी केली आहे. **त्यासाठी प्रथम तालुक्यांच्या नावाखाली व नंतर जलक्षेत्राच्या नावाखाली अजिबात अनुशेष नसलेल्या भागांना निधी ओरपण्याचा मार्ग त्यांनी खुला करून दिला.**

**६४.** संकोच वाटत असल्यामुळे त्यांनी 'अनुशेष' या शब्दाचा फारसा वापर केला नाही, त्याऐवजी 'विकासातील तुट' असा भंपक शब्द वापरला. **केळकरांना अनुशेषाच्या समस्येची माहिती नव्हती असे नाही. लोकांमध्ये यामुळे तीव्र क्षोभ आहे याचीही त्यांना जाणीव होती. पश्चिम महाराष्ट्राच्या पदरात त्यांचा 'न्याय्य हक्क' टाकण्यासाठी केळकरांनी बराच वेळ खर्च केला,** हेही त्यांनी नमूद केले असून या विषयाचा आम्ही जो परामर्श घेतला तसा इतर कुणीही घेतला नाही अशी फुशारकीही त्यांनी मारली आहे. अहवालातील 'समितीचा दृष्टीकोन' या मथळ्याखाली पृष्ठ २९४ वरील परिच्छेद १०.१ मधील पुढील मजकूर पहा :-

"आम्ही केलेल्या चर्चेदरम्यान या विषयाबाबतची संवेदना दिसून आली होती. 'न्याय्य हक्क' मिळण्यासाठी आम्ही जो वेळ खर्च केला तो आम्ही या विषयाशी किती जोडले गेलो आहोत याचा पुरावा आहे. आमचा सूक्ष्म फरकाचा-बहुआयामी, दुहेरी मार्गाचा, संस्थात्मक व सुधारणावादी दृष्टीकोन वापरून आम्ही पाणी या विषयाचा जसा परामर्श घेतला आहे तसा इतर कुठेही घेतलेला नाही. **जरी आम्हाला सिंचनाशी संबंधित चर्चा ज्यामुळे जनतेमध्ये क्षोभ निर्माण झाला आहे (खासकरून अनुशेषाची समस्या) याच्या वर्चस्वाची जाणीव असली तरी आम्ही पाण्याचा सर्वंकष दृष्टीकोन स्वीकारलेला आहे. त्याचबरोबर, आम्ही प्रचलित समजुती व अन्यायाची वास्तवता याबाबत संवेदनशील आहोत. तसेच चालू प्रकल्पाबाबत व सिंचनाकडे आम्ही लक्ष दिले आहे.**"

**६५.** आत्महत्यांच्या मुळाशी प्रमुख कारण सिंचन सुविधांचा अभाव हेच आहे, हे देशाच्या मा. पंतप्रधानांनी लालकिल्ल्यावरून जाहीर केले होते. इतकेच नव्हे तर विदर्भात आत्महत्त्याग्रस्त भागातील जिल्ह्यांसाठी करोडो रुपयांचा निधी पंतप्रधानांनी सिंचनासाठी उपलब्ध करून दिला होता, याची केळकरांना माहिती नव्हती असे नाही. सिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या विदर्भ-मराठवाड्यामधे मोठ्या प्रमाणात आत्महत्त्या सिंचन सुविधेच्या अभावीच होत आहेत याची केळकरांना जाणीव नव्हती असेही नाही. पण प्रत्यक्षपणे त्यांनी त्या कारणमिमांसेमध्ये जाण्याचे जाणीवपूर्वक टाळले. पण अप्रत्यक्षपणे हे ज्ञान त्यांना होते ही गोष्ट ठिकठिकाणी अहवालात दिसून येते. उदाहरणार्थ पृष्ठ ३३९ वरील परिच्छेद १०.१८.२ मधील पुढील मजकूर पहा :-

"या प्रयोजनार्थ, सहा महसुली विभागांमधून प्रत्येकी, सिंचन सुविधा असलेले एक खेडे आणि सिंचन सुविधा नसलेले एक खेडे निवडण्यात आले. सिंचन सुविधा असलेल्या खेड्यातील शेतकऱ्यांचे एकुण वार्षिक सरासरी उत्पन्न अंदाजित करून त्याची तुलना सिंचन सुविधा नसलेल्या खेड्यातील शेतकऱ्यांच्या एकुण वार्षिक सरासरी उत्पन्नाशी केली. या सर्वेक्षणाच्या निकालांमध्ये सिंचनामुळे उत्पन्नात फायदेशीर वाढ झाल्याचे दिसून आले. **सरासरी उत्पन्नानुसार सिंचन सुविधा नसलेल्या शेतकऱ्यांपेक्षा सिंचन सुविधा असलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न हे दुप्पट ते चौपट अधिक होते.**"

**६६.** आत्महत्त्या कोणत्या भागात मोठ्या प्रमाणात होत आहेत, सिंचनाचा अनुशेष कोणत्या भागात मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे, सिंचनसमृध्द खेड्यांचे वैभव व समृध्दी कशी असते, सिंचन सुविधांच्या अभावी अशा खेड्याची काय दैना होते? याची सारी माहिती असून केळकरांनी विदर्भ व मराठवाड्याच्या अनुशेषग्रस्त भागातील शेतकऱ्यांना पाण्याचा काटेकोर वापर करा, काटकसरीने वापर करा, पाण्याची बचत करा, सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाचा वापर करा, म्हणजे तुमच्या दुष्काळी स्थितीत सुधारणा होईल **असे पोकळ सल्ले दिलेले आहेत.** "**समतोल विकासासाठी शिफारशी**" या मथळ्याखाली अहवालाच्या पृष्ठ ३४१ वर ११ वी शिफारस पुढीलप्रमाणे आहे :-

"११. औरंगाबाद आणि अमरावती विभागांमध्ये पाण्याचा **काटेकोर आणि काटकसरीने वापर** करण्यास चालना देण्याची नितांत गरज आहे. या विभागांमध्ये, पाणी बचतीच्या सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानांना (उदा. ठिबक सिंचन, तुषार सिंचन) चालना देण्यासाठी प्रकल्प आरेखन व पध्दती यांमध्ये सुधारणा व फेरबदल केले पाहिजेत. सध्याच्या प्रकल्पाशी संबंधित असे फेरबदल व सुधारणा तात्काळ हाती घेण्यात याव्यात, **जेणेकरून दुष्काळी परिस्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल.**"

**६७.** पश्चिम महाराष्ट्रामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये मोठमोठ्या किंमतीच्या महागड्या उपसासिंचन योजना अंमलात आणून डोंगरावरील शेती सिंचनाखाली आणण्याची होड लागलेली आहे. अजिबात अनुशेष नसलेल्या या भागात डोंगरावर पाणी चढविण्यासाठी दरवर्षी दर हेक्टरी ३० हजार ते ५० हजार रुपये विजेवर खर्च करावे लागतील. या उपसा सिंचनाविषयी केळकरांनी कमालीचा ममत्त्वभाव दाखविला व **भरीव शिफारस केली आहे.** अहवालाच्या पृष्ठ १४ वरील परिच्छेद ६.६.९१ शब्दशः पुढील प्रमाणे :-

"पश्चिम महाराष्ट्रामध्ये, कायमस्वरूपी पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या प्रदेशांकरिता **जास्त उंचीवर पाणी उचलावयास** (lifting of water at higher heights) "**एक विशेष बाब**" **म्हणून मंजुरी देण्यात यावी** आणि पाणलोट विकासासाठी सर्वात जास्त प्राधान्य द्यायला हवे."

**६८.** विदर्भ व मराठवाड्यावर कुऱ्हाड चालवावयाची असेल आणि पश्चिम महाराष्ट्राला 'न्याय' द्यायचा असेल तर सिंचन या विकासक्षेत्रामध्ये 'तालुका' विश्लेषणासाठी घटक धरावाच लागेल असे गृहीत धरूनच केळकरांनी आपली मांडणी केली. **महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये याबाबत असलेल्या तफावतीकडे पूर्णपणे डोळेझाक करण्याचे त्यांनी ठरविले. मात्र पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांतर्गत तालुक्या तालुक्यात असलेल्या तफावतींकडे मात्र लक्ष देणे गरजेचे आहे असे केळकरांना वाटले. अहवालातील** परिच्छेद ४.२.२.१ चा शेवट पृष्ठ १०८ वर ज्या मजकुराने झाला तो मजकूर लक्षात घेण्यासारखा आहे. पुढीलप्रमाणे:-

"जिल्ह्यांतर्गत असलेल्या तफावती या मोठ्या प्रमाणात असल्याने सिंचन क्षमतेच्या बाबतीत सुद्धा समितीने, दुष्काळग्रस्त भागाचे स्वतंत्र विश्लेषण आणि 'तालुका पातळीवरील विश्लेषणाचे' महत्त्वदेखील सांगितले आहे."

**६९.** दिनांक ३१ मे २०११ रोजीच्या ज्या शासन निर्णयाने केळकर समितीची नेमणूक केली होती त्या शासन निर्णयाने या समितीकडे पुढील महत्त्वाचे काम (कार्यकक्षा) सोपविले होते.

"३. उच्चस्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल. :-(१) विकासातील क्षेत्रीय असमतोलाचा अंदाज घेण्यासाठी Indicators ठरविणे. (२) वरील १ बाबत सन २०१० अखेर **अगदी अलिकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भात असमतोल निश्चित करणे.**"

असे असतांना **मागास भाग निश्चित करणे हे काही आमचे मुख्य काम नाही** असे केळकर म्हणतात. अहवालाच्या परिच्छेद ४.१.२ मध्ये तीन लहान लहान वाक्ये आहेत. त्यातील पहिल्या वाक्यातच त्यांनी तसे म्हटले आहे तर दुसऱ्या वाक्यात "**ते सर्वांनाच ठावूक आहे**" असे घोषित केले आहे. त्यामुळे ते आम्ही ठरविण्याचे काय कारण आहे असा अर्थ निघतो. पश्चिम महाराष्ट्राला 'न्याय' देण्यासाठी आम्ही बसलो आहोत. असा अर्थ तिसऱ्या वाक्यातून वाचकांना काढता येतो काय? हे वाचकांनी ठरवावयाचे आहे. तीन वाक्यांचा हा लहानसा परिच्छेद पुढीलप्रमाणे :-

"४.१.२ **मागास म्हणून क्षेत्रांची निश्चिती करणे हे आमचे मुख्य काम नव्हे. आमच्यासाठी महाराष्ट्रातील मागास असलेली 'क्षेत्रे' व 'प्रांत' हे आधीच निश्चित केलेले व ज्ञात आहेत.** म्हणून आम्ही फक्त धोरणाची रचना आणि स्त्रोतांचे निदर्शक वाटप या संदर्भातील मागासलेपणाची निर्देशके गृहीत धरली आहेत."


# अभिनंदन अर्बन को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय, प्रभात चौक, अमरावती

सतत ऑडिट वर्ग 'अ' असलेली अमरावती जिल्ह्यातील अग्रगण्य बँक

सहकार महर्षी स्व.वसंतदादा पाटील उत्कृष्ठ सहकारी बँक

**ॲड.विजय एस.बोथरा, अध्यक्ष** (नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा) **सौ.अनिता एन. चोरडिया, उपाध्यक्षा**

(६) २२ फेब्रुवारी २०१५

# अनुशेष दूर करण्यासाठी त्या प्रदेशांनाच केवळ संपूर्ण वित्तीय निधीचे वाटप करणे व इतर प्रदेशांना त्यापासून वंचित ठेवणे हे दूरदर्शीपणाचे व उचित ठरणार नाही

## केळकरांनी लावलेला अजब शोध

**७०.** अनुशेष दुर करावयाचा असेल तर त्याची सुरुवातच मुळी निधीच्या तरतुदीपासून करावी लागते. ही लहान मुलाला समजण्यासारखी गोष्ट आहे. त्यातल्या त्यात महाराष्ट्राच्या सर्व विभागात जी काही सिंचनक्षमता निर्माण झालेली आहे ती शासकीय निधीतून झालेली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील ज्या नेत्यांसमोर केळकर लांगुलचालन करीत आहेत त्यापैकी कोणत्याही नेत्याने "आपली स्वतःची शेतीवाडी विकून" पश्चिम महाराष्ट्रात सिंचन क्षमता निर्माण केलेली नाही तर ती शंभर टक्के शासनाच्या निधीतूनच उभारली गेली आहे. सत्यशोधन समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३२ मध्ये याबाबतचा मोठा समर्पक व वस्तुनिष्ठ असा उल्लेख केलेला आहे. तो पुढील शब्दात :- **"अनुशेष भरून काढण्यासाठी जी कृती करावयाची तिची सुरुवात पैशाची तरतूद करण्यापासूनच करावी लागते."**

**७१.** याबाबत केळकरांचे विचार मात्र एखाद्या "थोर साधुसंताच्या तोडीचे" आहेत. आतापर्यंत जी लुटमार झाली त्याकडे पूर्णपणे डोळेझाक करून मागासलेल्या भागांना पूर्ण निधी देणे व अजिबात अनुशेष नसलेल्या प्रदेशांना कमी निधी देणे हे उचित नाही, एवढे म्हणूनच केळकर थांबले नाहीत तर ते अदूरदर्शीपणाचे आहे असेही त्यांनी नमूद करून ठेवलेले आहे. त्यांच्या अहवालाच्या पृष्ठ ३४४ वरील परिच्छेद १०.२०.७ मधील सुरुवातीचा भाग मुळातूनच पाहिला पाहिजे. तो पुढील प्रमाणे :- **"मागे पडलेल्या प्रदेशांनाच केवळ संपूर्ण वित्तीय निधीचे वाटप करणे व इतर प्रदेशांना त्यापासून वंचित ठेवणे हे दूरदर्शीपणाचे व उचित ठरणार नाही."** मुळ इंग्रजी शब्दरचना पुढील प्रमाणे :- "10.20.7 It would not be prudent and advisable to allocate the entire financial capacity for the lagging regions alone and allow other regions to stagnate." अनुशेष दूर करण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर काय उजेड पडला याची माहिती असलेल्या जनमानसाला असा निधी उपलब्ध करून न देता अनुशेष दूर करण्याचा केळकरांचा हा प्रयोग अजब शोध या प्रकारातच मोडतो असे वाटल्यास नवल नाही. शिवाय केळकरांनी लावलेल्या या शोधाचे काय परिणाम होतील हेही लक्षात घेणे आवश्यक आहे.

**७२.** नियोजन विभागाच्या ३ ऑगस्ट १९८३ च्या ज्या शासन निर्णयाने सत्यशोधन समितीची स्थापना झाली त्याच शासन निर्णयाने **"निश्चित केलेला असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व तो पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून दूरगामी उपाय सुचविणे"** असा विषय समितीच्या विचारार्थ सोपविला होता. ३१ मे २०११ च्या शासननिर्णयाने केळकर समितीची स्थापना केली होती. त्या शासननिर्णयाने सुध्दा हेच काम केळकर समितीकडे सोपविले होते. सत्यशोधन समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३२ मध्ये "अनुशेष भरून काढण्यासाठी जी कृती करावयाची तिची सुरुवात पैशाची तरतूद करण्यापासूनच करावी लागते" हे तर सांगितलेच पण त्याच बरोबर विकासातील असमतोल दूर करावयाचा असेल तर **"मागास जिल्ह्यांचा विकासाचा वेग काही प्रमाणात वाढला पाहिजे आणि त्या प्रमाणात प्रगत जिल्ह्यांचा विकासाचा वेग काहीसा मंदावला पाहिजे ही गोष्ट अशा प्रयत्नात अभिप्रेत आहे. प्रादेशिक असमतोल दूर करावयाचा तर जे अपरिहार्य आहे, ते स्वीकारले पाहिजे. हे अवघड आहे म्हणूनच ते निस्संदिग्धपणे सांगितले पाहिजे,"** असे मत स्पष्टपणे आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३५ मध्ये समितीने व्यक्त केलेले आहे.

**७३.** अनुशेष भरून काढण्यासाठी त्यावेळी सत्यशोधन समितीने अत्यंत ठोस शिफारशी केल्या होत्या असे आपणाला दिसून येते. बिगर अनुशेष जिल्ह्यातील चालू कामे व स्वाभाविक वाढविस्तार या दोन कामासाठी १५ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम खर्ची करू नये अशी त्या समितीची शिफारस होती. "उपलब्ध असलेल्या वित्तीय तरतुदींच्या मर्यादेत लवकरात लवकर विवक्षित अनुशेष भरून काढावयाचा वा कमी करावयाचा असेल तर प्रत्येक विवक्षित क्षेत्र-उपक्षेत्र-योजना कार्यक्रम **यासाठी केलेली तरतूद ज्या त्या कामासाठी पण त्या त्या बाबतीत ज्या जिल्ह्याचा अनुशेष आहे त्या जिल्ह्यामधेच खर्ची पडली पाहिजे,** अशी आमची शिफारस आहे. त्याला फक्त दोन अपवाद आम्ही करू इच्छितो. (अ) हाती घेतलेल्या प्रकल्पाची पूर्तता करणे आणि (ब) ज्या जिल्ह्यामध्ये अनुशेष आढळत नाही त्या जिल्ह्याच्याही स्वाभाविक वाढ विस्तारात्मक गरजांची पूर्तता करणे हे ते दोन अपवाद होत." अशी शिफारस समितीने परिच्छेद १७.२१ मध्ये केलेली असून पुढे १७.२४ मध्ये असे सुचविले आहे की, "सारासार विचार करता आम्ही असे सुचवितो की, विवक्षित अनुशेष भरून काढण्यासाठीच्या राज्यपातळीवरील निधीपैकी १५ टक्के रक्कम वर सांगितलेल्या दोन बाबींशी संबंधित गरजा पूर्ण करण्यासाठी राज्यपातळीवर राखून ठेवली जाईल. या १५ टक्के रकमेचे वाटप अनुशेषरहित व अनुशेष असलेल्या दोन्ही प्रकारच्या जिल्ह्यांसाठी असेल."

**७४.** पुढे समितीने परिच्छेद १७.२५ मध्ये असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, "अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांमध्ये चालू असलेली कामे व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि स्वाभाविक वाढ विस्तारांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी राज्यपातळीवरील निधीमधून १५ टक्के रक्कम राखून ठेवावी, असे आम्ही सुचविलेले आहे. **१५ टक्के रक्कम ही यासाठीची कमाल मर्यादा मानावी हे बजावून सांगितले पाहिजे. राज्यपातळीवरील निधीमधून यापेक्षा अधिक प्रमाणात रक्कम अनुशेषाशी असंबध्द कामासाठी वापरली तर आजचा अनुशेष भरून काढण्याची वा कमी करण्याची प्रक्रिया पार मंदावेल."** त्या त्या कामाकरिता (जसे सिंचन) राज्यस्तरावर उपलब्ध असलेल्या निधीपैकी ८५ टक्के रक्कम अनुशेष जिल्ह्यांना द्यावी व ती कशा रितीने द्यावी याबाबतचे तपशीलवार विवेचन सत्यशोधन समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद १७.२९ ते १७.३२ मध्ये केलेले आहे.

**७५.** सत्यशोधन समितीने अनुशेष दुर करावयाचा असेल तर निधी वाटपाबाबत केलेली महत्त्वपूर्ण शिफारस म्हणजे १५/८५ चे सूत्र होय. ८५ टक्के रक्कम ही अनुशेष जिल्ह्यांना द्यावी. १५ टक्के रकमेतून बिगर अनुशेष जिल्ह्यांच्या गरजा भागवाव्या. १५/८५ ची ही एक शिफारस जरी अंमलात आणली असती तर अनुशेषाचा डोंगर आजच्या एवढा उंच झाला नसता. या शिफारशींना पुढच्या आठ-दहा वर्षात तत्कालीन सरकारने पूर्णपणे हरताळ फासल्यामुळे काय दुर्गती झाली हे पहाण्यासारखे आहे. हरताळ कसा फासला गेला हे प्रथम समजून घेऊ. दुर्गती काय झाली? हे त्यानंतर.

**७६.** हा अनुशेष भरून काढण्यासाठी शासनातर्फे झालेल्या प्रत्यक्ष कृतीचा थोडक्यात आढावा घेऊ. "अनुशेष भरून काढण्यासाठी जी कृती करावयाची तिची सुरुवात पैशाची तरतूद करण्यापासूनच करावी लागते." असे मोठे वस्तुनिष्ठ विधान समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३२ मध्ये केलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाने १९८२-८३ ते १९८९-९० या आठ आर्थिक वर्षामध्ये मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावर केलेल्या प्रत्यक्ष खर्चाची जिल्हावार विगतवारी देणारी आकडेवारी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आश्वासन समितीच्या सन १९९२-९३ च्या अहवाल क्रमांक १०६ च्या पृष्ठ २१२ वर उपलब्ध आहे. त्यामध्ये जिल्ह्याचे नाव दिले असून पुढे सन १९८२-८३ या वर्षात जिल्हावार करण्यात आलेला प्रत्यक्ष खर्च (लक्ष रुपयात) दिला आहे. त्यापुढील वर्षीचा खर्च पुढच्या स्तंभात दिला असून सन ८९-९० चा प्रत्यक्ष खर्च व शेवटी आठ वर्षात करण्यात आलेला एकूण खर्च दिलेला आहे.

**७७.** खर्चाच्या विगतवारीचे विश्लेषण करू जाता काही स्फोटक अशा प्रकारचे निष्कर्ष हाताशी येतात. या आठ वर्षाच्या कालखंडामध्ये मोठ्या व मध्यम प्रकल्पावर झालेला प्रत्यक्ष खर्च २३५२.८४ कोटी रूपये आहे. सामाईक योजनांवर झालेला २०५.४० कोटी रुपये खर्च वेगळा काढला तर जिल्हावार झालेल्या खर्चाची एकूण रक्कम २१४७.४४ कोटी रूपये होते. ८० हजार हेक्टरच्या वर अनुशेष असलेल्या अमरावती, यवतमाळ, उस्मानाबाद, अकोला व बुलढाणा या पाच महत्तम अनुशेष जिल्ह्याकरिता यापैकी किती रकमा खर्ची पडल्या आणि कोल्हापूर, पूणे, सातारा, सांगली व सोलापूर यासारख्या अजिबात अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांमध्ये किती खर्च झाला यांच्या आकडेवारीची तुलना केली असता एक अतिशय विदारक असे चित्र समोर उभे राहते. राज्य सरासरीच्या खूप खाली असलेल्या **अकोला किंवा बुलढाणा जिल्ह्यात या आठ वर्षामध्ये जेवढी एकूण रक्कम खर्च करण्यात आली तेवढीच किंवा जवळ जवळ त्या पेक्षा जास्त रक्कम राज्य सरासरीच्या खूप वर असलेल्या व अजिबात अनुशेष नसलेल्या कोल्हापूर सारख्या जिल्ह्यामध्ये दरवर्षी खर्च केली जात होती.**

**७८.** तीस जिल्हे असलेल्या महाराष्ट्रातील अजिबात अनुशेष नसलेल्या कोल्हापूर या एकट्या जिल्ह्यामध्ये या आठ वर्षाच्या कालखंडात १२६.९८ कोटी रूपये खर्च झाल्याचे दिसून येते. या उलट महत्तम अनुशेष असलेल्या पहिल्या पाच जिल्ह्यातील अकोला व बुलढाणा या जिल्ह्यात या आठ वर्षाच्या कालखंडात

एकूण फक्त अनुक्रमे १६.३३ कोटी व १७.८२ कोटी रुपये खर्च झाले असे दिसून येते. वेगळ्या भाषेत असे सांगता येईल की, या आठ वर्षात अकोला जिल्ह्यात एकूण १६.३३ कोटी रूपये व बुलढाणा जिल्ह्यामध्ये एकूण १७.८२ कोटी रूपये प्रत्यक्ष खर्च झाला असून ६० टक्के सिंचन क्षमता ज्यांनी १९८२ पूर्वीच पदरात पाडून घेतली आहे व ज्यात अजिबात अनुशेष नाही त्या कोल्हापूर सारख्या जिल्ह्यामध्ये ८८-८९ या एकाच वर्षी २९.६८ कोटी रुपये खर्च करण्यात आले असे दिसून येते.

**७९.** आणखी वेगळ्या भाषेत सांगावयाचे झाले तर असे सांगता येईल की, बुलढाणा आणि अकोला या दोन जिल्ह्यामध्ये मिळून आठ वर्षात झालेला एकूण खर्च हा ३४ कोटी रूपयाच्या जवळपास आहे तर अजिबात अनुशेष नसलेल्या कोल्हापुर जिल्ह्यात १२८.९८ कोटी रुपये या आठ वर्षात प्रत्यक्ष खर्च झाल्याचे दिसून येते. जिल्हा स्तरावरचा अजिबात अनुशेष नसलेल्या अहमदनगर, पुणे, सांगली, सोलापूर सारख्या जिल्ह्यांनी सुध्दा १०० कोटी रुपयाच्या वर रक्कमा प्रत्येकी पदरात पाडून घेतल्याचे दिसून येते. सोलापूर जिल्ह्याचा वाटा ११९ कोटी रुपयाच्यावर आहे.

**८०.** "अनुशेष भरून काढण्याची प्रक्रिया व यंत्रणा" आपल्या अहवालाच्या १७ व्या प्रकरणात सत्यशोधन समितीने दिली आहे. परिच्छेद १७.३५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे "या एकूण रक्कमेपैकी १५ टक्के रक्कम ही अनुशेषाशी संबंधित नसलेली चालू कामे पूर्ण करण्याकरिता वा नैसर्गिक व स्वाभाविक वाढ विस्ताराच्या सर्व जिल्ह्यांच्या गरजाकरिता राखून ठेवावी." असे समितीने सुचविले आहे. १९८२-८३ ते १९८९-९० या आठ वर्षाच्या कालखंडामध्ये महाराष्ट्र शासनाने मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावर राज्यात केलेल्या प्रत्यक्ष खर्चाची रक्कम २३५२.८४ कोटी रुपये आहे. एकूण रकमेतून ही १५ टक्क्याची रक्कम ३५२.९२ कोटी रुपये वजा केली असता या आठ वर्षामध्ये अनुशेष निर्मूलनार्थ प्रत्यक्ष खर्चासाठी ८५ टक्के निधी म्हणजे १९९९.९२ कोटी रुपये (ढोबळ मानाने दोन हजार कोटी रुपये) उपलब्ध होते. या दोन हजार कोटीचे वाटप अनुशेष असलेल्या सर्व जिल्ह्यामध्ये समितीच्या सूत्राप्रमाणे त्यांच्या अनुशेषाच्या प्रमाणात वाटून देण्याचे ठरविले तर किती रकमा खर्च व्हायला पाहिजे होत्या याचा अंदाज येऊ शकतो.

२००० कोटी रुपयाची तरतूद या आठ वर्षामध्ये उपलब्ध होती. ती अनुशेषाच्या प्रमाणात सर्व जिल्ह्यामध्ये समितीच्या सूत्रानुसार वाटतो म्हटले तर महत्तम अनुशेष असलेल्या पाच जिल्ह्यापैकी उस्मानाबाद (लातूरसह) जिल्ह्याला आठ वर्षात २९५.६८ कोटी रुपये मिळायला हवे होते. त्याऐवजी प्रत्यक्षात ८९.४७ कोटी रुपये मिळाले. बुलढाणा जिल्ह्याला १८३.४४ कोटी ऐवजी १७.८२ कोटी रुपये, अकोला जिल्ह्याला १९९.८२ कोटी ऐवजी १६.३३ कोटी रुपये, अमरावती जिल्ह्याला २९०.६६ कोटी ऐवजी ११८.१७ कोटी रूपये आणि यवतमाळ जिल्ह्याला २२८.६८ कोटी ऐवजी ९७.३६ कोटी रुपये इतकीच तरतूद प्रत्यक्षात उपलब्ध होऊ शकली.

**८१.** सत्यशोधन समितीच्या शिफारशी पूर्णपणे डावलून महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यांना अत्यंत '**भिकारचोट निधी वाटप**' व अजिबात अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांना '**घसघशीत निधी वाटप**' पुढच्या ८-१० वर्षात होत राहिल्याने जलसिंचित महाराष्ट्राचा चेहरा खूपच विद्रूप झाला. जून १९९४ च्या स्तरावरील राज्यसरासरीच्या व आकडेवारीच्या आधारावर अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालातील तक्ता क्रमांक ३.२ मधून हा किळसवाणा व ओंगळ प्रकार पुढे उघड झाला.

**८२.** जून १९९४ मध्ये असलेल्या जिल्हावार अनुशेषाचे मोजमाप अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालातील तक्ता ३.२४ मध्ये नमूद आहे. एकूण सिंचन क्षमता (प्रमाण रब्बी समतुल्यामध्ये) पेरणी खालील क्षेत्र नमूद केलेले असून पेरणी खालील क्षेत्राशी सिंचनाखालील क्षेत्राची टक्केवारी काढली. ३० जून १९८२ रोजी राज्याची सरासरी टक्केवारी २२.५५ इतकी होती ती आता ३० जून १९९४ रोजी ३७.२४ टक्के इतकी झाल्याचे दिसून आले. राज्यसरासरीवर आणण्यासाठी सरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांमध्ये किती हजार हेक्टर जमीन ही सिंचनाखाली आणावी लागेल (म्हणजेच अनुशेषाचे हेक्टरी आकडे) हेही त्या तक्त्या मध्ये दिलेले आहेत. जून १९८२ च्या स्तरावर ज्या सूत्रानुसार सत्यशोधन समितीने जिल्हा स्तरीय अनुशेष अहवालाच्या तक्ता ७.५ मध्ये काढला होता त्याच सूत्रानुसार जून १९९४ चा हा अनुशेष काढलेला आहे.

**८३.** जिल्हास्तरावरून अनुशेष काढला असता महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर, हे भाग्यवान जिल्हे १९८२ च्या राज्यसरासरीच्या वर होते व १९९४ च्या राज्यसरासरीच्या वरच होते त्यामुळे प्रत्येक वेळी ते बिगर अनुशेषात होते. १९८२ पासून तर १९९४ पर्यंत ते कधीही अनुशेषात नव्हते. इतकेच नव्हे तर नव्या वाढलेल्या सरासरीवर सुध्दा या जिल्ह्यांचे आधिक्य आणखी वाढले असे दिसून येते.

**पुणे** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **७६.३८** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **२०८.७९** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे तो जिल्हा **२८५.१७** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. **सातारा** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **८५.८२** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **३३७.०८** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे तो जिल्हा **४२२.९०** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. **सांगली** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **६४.७१** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **२३४.१४** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे तो जिल्हा **२९८.८५** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. **सोलापूर** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **९१.१२** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **६०.७०** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे तो जिल्हा **१५१.८२** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. **कोल्हापूर** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **१६२.९५** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात ४०४.४४ हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे तो जिल्हा **५६९.३९** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला.**अहमदनगर** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **१५४.४५** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **२१३.६६** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे तो जिल्हा **३६८.११** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला.

**८४.** अनुशेष दूर करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत अत्यंत द्वेषमुलक व तिरस्करणीय विचार मांडतांनाच केळकरांनी अनुशेष दूर करणे म्हणजे काय? याबाबत सुध्दा अत्यंत विषारी विचार मांडलेला आहे. एकदा राज्य सरासरी निश्चित झाली की राज्यसरासरीच्यावर असलेले बिगर अनुशेष जिल्हे व खाली असलेले जिल्हे म्हणजे अनुशेषात असलेले जिल्हे ठरतात. त्यांना त्या विकासक्षेत्रात मागासलेले जिल्हे म्हटले जाते किंवा केळकरांच्या सुसंस्कृत भाषेत त्याला विकासातील तुट असलेले जिल्हे म्हणता येईल. **राज्यसरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांना राज्यसरासरीच्या बरोबरीने आणणे म्हणजे त्यांचा अनुशेष दूर करणे होय, अशी आज अनुशेष दूर करण्याची सर्वमान्य झालेली कायदेशीर व्याख्या आहे.** डॉ. केळकर या व्याख्येला दफन करायला निघाले आहेत.

"वेगवेगळ्या जिल्ह्यातील जलसिंचनाच्या क्षेत्रातील विकासाचा दर्शक म्हणून या टक्केवारीचा आधार घ्यावा आणि मागे असलेल्या जिल्ह्यांचा अनुशेष त्या आधारे काढावा असे आम्ही सुचवितो" असे सत्यशोधन समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद ७.१२ मध्ये म्हटले आहे."**राज्य सरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांना खालपासून सरासरी पर्यंत वर आणणे म्हणजे त्या जिल्ह्यांचा त्या विकास क्षेत्रातील अनुशेष दूर करणे होय,**" (सत्यशोधन समितीच्या अहवालातील परिच्छेद १७.३० व १९.२८ पहा) अशी व्याख्या समितीने केली असून राज्य सरासरीपेक्षा कमी असलेल्या जिल्ह्यांना सरासरीवर आणण्यासाठी किती हजार हेक्टरची जलसिंचन क्षमता प्रमाण रब्बी समतुल्य मध्ये निर्माण करावी लागेल या विषयीचे अंदाज त्या समितीने नमूद केलेले आहेत.

पुढे अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालामध्ये सुध्दा अनुशेष दूर करण्याची उपरोक्त व्याख्या मान्य करण्यात आली. त्या समितीचा अहवाल मंत्रिमंडळाने व मा. राज्यपालांनी मान्य केलेला असल्यामुळे ही सर्वमान्य व्याख्या असे म्हणता येईल. (पुढे ती जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायद्याचा भाग बनली) अनुशेष दूर करण्याची ही सर्वमान्य व्याख्या उपलब्ध असतांना केळकरांनी मांडलेले मौलिक विचार विचारात घेण्यासारखे आहे. अहवालाच्या पृष्ठ ३४५ वरील परिच्छेद १०.२०.७ मध्ये विदर्भ व कोकण या दोन मागास विभागासाठी ते म्हणतात :-

"१०.२०.७..... **या दोन प्रदेशांसाठी केवळ राज्याची सरासरी गाठणे हेच अंतिम उद्दिष्ट नाही.** परंतु, पाण्याच्या उपलब्धतेने (नैसर्गिक किंवा प्राधिकरणानं दिलेले) आणि तांत्रिक आर्थिक सुसाध्यतेने अनुज्ञान उच्चतर स्तर गाठणे हे उद्दिष्ट आहे. पुढील पाच वर्षामध्ये या उद्दिष्टाच्या दृष्टीने नियोजन केलेच पाहिजे आणि ते नंतरच्या ८ वर्षांमध्ये साध्य केले पाहिजे."

**नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !**
श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित
**श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला**
नॅक द्वारे 'अ' श्रेणी तसेच युजीसी द्वारे कॉलेज वीथ पोटेंशियल फॉर एक्सलंस दर्जा प्राप्त
**डॉ.सुभाष भडांगे, प्राचार्य**

(७) १ मार्च २०१५

# असलेल्या अनुशेषावर माती लोटा व नव्याने समतोल विकासाला सुरुवात करा

## पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांनी हुकूम दिला व केळकर लागले कामाला

**८५.** जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रातील विकसित भागांनी सत्यशोधन समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतरसुद्धा दुष्काळी तालुक्यांच्या नावाखाली खूप मोठ्या प्रमाणात निधी पळविला व अविकसित भागांची मोठीच पिळवणूक केली. त्यानंतर "कृष्णा खोरे पाणी तंटा लवादाचे" निमित्त करून मोठ्या प्रमाणावर निधी पळविण्याचा कार्यक्रम सुरु झाला. "महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले पाणी सन २००० पर्यंत वापरले नाही तर त्या पाण्यावरील महाराष्ट्राचा हक्क गमावला जाईल" असा धडधडीत असत्य प्रचार मोठ्या गाजावाजाने सुरु करण्यात आला. मोठ्या प्रमाणात निधी पळविणे हाच या असत्य प्रचारामागील हेतू होता. वस्तुतः कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत लवादाने जो निर्णय दिलेला आहे त्याच्या आठव्या प्रकरणात असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की :- "Failure of any state to make use of any portion of the water allocated to it during any water year shall not constitute forfeiture or abandonment of its share of water in any subsequent water year nor shall it increase the share of any other state in any subsequent water year even if such state may have used such water" Clause VIII(B) of chapter 7. इतकेच नव्हे तर इ.स.२००० नंतर पुनर्विलोकनाची तरतूदसुद्धा या निर्णयात पुढील शब्दात नमूद आहे :-"At any time after the 31st May 2000 this order may be reviewed or revised by a competent authority or Tribunal" - Clause XIV (A) of chapter 7 असत्य प्रचाराच्या आधारावरसुद्धा राजकीय लूटमारीचे स्वरूप यावे एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी पळविण्याच्या या प्रकाराला पाटबंधारे विभागाला प्रतिबंध करता आला नाही.

**८६.** महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर तिसऱ्या योजनेपासून तर सातव्या योजनेच्या अखेरपर्यंत म्हणजे १९६१ ते १९९० या ३० वर्षाच्या कालखंडात शासनाने मोठ्या, मध्यम व लघुपाटबंधाऱ्यांच्या राज्यस्तरीय प्रकल्पावर एकूण ४२४२.२५ कोटी रुपयाची गुंतवणूक केली, त्यापैकी फक्त (२१.९० टक्के) ९२९.०४ कोटी रुपये विदर्भाच्या वाट्याला आले. मराठवाड्याला (२७.५४ टक्के) ११६८.३६ कोटी रुपये मिळाले व २१४४.८५ कोटी रुपये म्हणजे निम्म्याहून जास्त रक्कम (५०.५६ टक्के) उर्वरित महाराष्ट्राला मिळाली. त्याचा परिणाम विदर्भ व मराठवाड्याचा जलसिंचनाचा अनुशेष वाढण्यामध्ये झाला.

**८७.** विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष फार मोठ्या प्रमाणात वाढविण्यास पुढे कारणीभूत ठरणारी एक अत्यंत महत्त्वाची घटना १९९६-९७ मध्ये घडली. पूरक मागण्यांचा समावेश असलेले "१९९६-९७ चे खर्चाचे पूरक विवरणपत्र" दिनांक ३० जुलै १९९६ रोजी सभागृहाला सादर झाले. त्या विवरण पत्राच्या पृष्ठ ६३ वर पाटबंधारे विभागाची एक "लहानशी" मागणी (बाब क्रमांक ८४) नमूद होती. या मागणीच्या स्पष्टीकरणात्मक शासकीय निवेदनामध्ये पाटबंधारे मंत्र्यांनी असे नमूद होते की :- "कृष्णा पाणी तंटा न्यायाधिकरण निवाड्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. कृष्णा नदीचे पाणी उपयोगात आणणे या मुख्य उद्दिष्टासह या प्रदेशाच्या पाटबंधारे प्रकल्पाचे (मोठे, मध्यम, लहान व जलविद्युत) प्रचालन व प्रवर्तन त्याचप्रमाणे लाभक्षेत्रविकास प्राधिकरण व पूर नियंत्रण यासारखे इतर संलग्न कार्यक्रम महामंडळामार्फत हाती घेण्यात येतील. उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत खात्री करून घेण्यासाठी रु. ७,१०० कोटीच्या वित्तीय सहाय्याचा लाभ करून घेणे महामंडळाच्या दृष्टीने आवश्यक असेल. यापैकी राज्य शासन, पाच वर्षाच्या कालावधीमध्ये रु. ३,५०० कोटी एवढ्या रकमेची तरतूद करील. भाग भांडवली अंशदान म्हणून राज्य शासनाने ही रक्कम मंजूर करण्याचे ठरविण्यात आले आहे. महामंडळाच्या उर्वरित वित्तीय गरजा खुल्या बाजारातील कर्जे उभारून भागविण्यात येतील. आस्थापना, कामकाज, परतफेड दायीत्व आणि इतर अनुषंगिक खर्च यामुळे होणारा महामंडळाचा एकूण खर्च राज्य शासन करील."

**८८.** पाटबंधारे विभागाच्या या मागण्या दिनांक ६ ऑगस्ट १९९६ रोजी सभागृहापुढे चर्चेसाठी होत्या. रमेश किणी प्रकरणामुळे झालेल्या गोंधळामुळे कोणतीही चर्चा न होता अर्ध्या मिनिटात या मागण्या मंजूर झाल्या. बाब क्रमांक ८४ वर मंजूर झालेल्या पाटबंधारे विभागाच्या या एका मागणीमध्ये महत्तम अनुशेष असलेल्या जलसिंचन या विकासक्षेत्राचा अनुशेष आणखी वाढविण्याचे जे प्रचंड सामर्थ्य होते ते पुढे लक्षात आले. पुढच्या ४-५ वर्षात ७१०० कोटी रुपये जलसिंचनासाठी कृष्णा खोऱ्यामध्ये ओतणार. त्यापैकी ३५०० कोटी रुपये सरळ सरळ कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या भाग भांडवलामध्ये शासनाचे अंशदान असेल व ३६०० कोटी रुपये खुल्या बाजारातून कर्जरूपाने या महामंडळासाठी उभारण्यात येतील. या कर्जाच्या परतफेडीचे दायीत्व सुद्धा शासनाने स्वीकारले होते. याशिवाय या महामंडळाची आस्थापना, कामकाज आणि परतफेडीच्या दायीत्वासह इतर अनुषंगिक खर्चसुद्धा राज्य शासन करणार.

**८९.** निधीचा प्रचंड असा धो धो प्रवाह मुंबईहून कृष्णा खोऱ्यात वहात असल्यामुळे विदर्भ-मराठवाड्यातील अर्धा इंची तोट्या सुद्धा बंद करून ठेवण्यात आल्या होत्या. बंद करताना तोटी थोडी ढिली राहिल्यामुळे होणाऱ्या "लिकेज"वर काय भागेल ती तहान भागवा नाही तर तडफडून मरा, प्रातिनिधीक उदाहरण म्हणून मी नमूद करु इच्छितो. १९९७-९८ च्या अंदाजपत्रकांत मोठ्या व मध्यम प्रकल्पासाठी असलेल्या २१०२.३५ कोटी रुपयाच्या नियतव्ययापैकी कृष्णा खोऱ्यासाठी १९०० कोटी रुपयाची वित्तीय तरतूद करण्यात आली होती तर विदर्भासाठी फक्त ७६.४९ कोटी व मराठवाड्यासाठी ७०.५४ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती.

**९०.** १९६० ते १९९० या ३० वर्षाच्या ४२४२.२५ कोटी रुपयाच्या गुंतवणुकीपैकी ९२९.०४ कोटी रुपये विदर्भाला व ११६८.३६ कोटी रुपये मराठवाड्याला उपलब्ध झाले त्यामुळे अगोदरच मोठा अनुशेष निर्माण झाला होता. कृष्णा खोऱ्यासारख्या विकसित व अजिबात अनुशेष नसलेल्या भागाला ७१०० कोटी रुपये व महत्तम अनुशेष असलेल्या विदर्भाला ३८०० कोटी रुपये, कृष्णा खोऱ्यासाठी ५० टक्के अनुदान आणि ५० टक्के कर्जरोखे पण विदर्भासाठी मात्र ३० टक्के अनुदान आणि ७० टक्के कर्जरोखे, यातून किती अधोगती होईल? राज्यसरासरी किती वर जाईल? राज्यसरासरीखालील अनुशेषात असलेल्या जिल्ह्यांना दिलेल्या व दिल्या जात असलेल्या या आणखी भेदभावपूर्ण वागणुकीमुळे मुळात खोल असलेली ही अनुशेषाची जखम या वागणुकीच्या घावामुळे आणखी किती चिघळेल? यातून हा अनुशेष किती वाढेल? याचे निश्चित आकडे व त्यातून निघणारे निश्चित निष्कर्ष कालांतराने उपलब्ध झालेत.

**९१.** महाराष्ट्राच्या विकसित भागांनी अविकसित भागांची जलसिंचन या विकासक्षेत्रामध्ये पिळवणूक करण्याच्या या इतिहासाचे चार प्रमुख कालखंड पडतात. (१) महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून तर सत्यशोधन समितीचा अहवाल प्रसिद्ध होईपर्यंतचा (१९६० चे १९८४) **पहिला कालखंड.** याला चुपचाप निधी ओरपण्याचा कालखंड म्हणता येईल. सत्यशोधन समिती नेमण्याची वेळ आली यावरुनच या ओरपण्याचा वेग किती होता हे ओळखता येऊ शकते. (२) **दुसरा कालखंड** म्हणजे सत्यशोधन समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतरचे दशक (१९८५-१९९४) हा कालखंड अजिबात अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांनी दुष्काळी तालुक्यांच्या नावाखाली (त्यांचा अनुशेष दूर न होऊ देता) निधी पळविण्याचा कालखंड म्हणून सांगता येईल. या काळात निधी ओरपण्याचा प्रकार किती वेगवान होता याचा मजबुत पुरावा मी या लेखाच्या परिच्छेद ७६ ते ७९ मध्ये नमूद केलेला आहे. (३) **"कृष्णा आली हो अंगणी" चा तिसरा कालखंड** १९९५ ते इ.स. २००१ हा मोठ्या झगमगाटात सुरू झाला. कोणताही विधिनिषेध न बाळगता कृष्णा अवार्डाविषयी असत्य माहिती सांगून निधी लांबविण्याच्या या प्रकाराने तिसऱ्या कालखंडात घेतलेला वेग विस्मयचकित करणारा होता. या काळात निधी ओरपण्याचा प्रकार किती वेगवान होता याचे प्रातिनिधीक उदाहरण परिच्छेद ८९ व ९० मध्ये मी नमूद केलेले आहे. (४) **चौथा कालखंड** म्हणजे २००१ ते आतापर्यंतचा (सन २०१२ पर्यंतचा) या कालखंडात मा. राज्यपालांच्या निदेशाचे उल्लंघन करून सुध्दा विदर्भ-मराठवाड्याचा निधी मोठ्या प्रमाणात पळविण्यात आला. हा इतका ताजा इतिहास आहे की त्याची स्वतंत्र आकडेवारी व उदाहरणे देण्याची आवश्यकता नाही. राज्यपालांच्या निदेशांचे परिच्छेदच्या परिच्छेद या पळवा पळवीच्या प्रकाराने खचाखच भरलेले आहेत.

**९२.** सन १९६० ते सन २०१२ या कालखंडामध्ये महाराष्ट्रात जलसिंचन या विकासक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात निधीचे एकतर्फी वाटप झाले. अनुशेषग्रस्त जिल्ह्यांना खूपच कमी निधी व बिगर अनुशेष जिल्ह्यांना फार मोठे निधीवाटप केले गेले. त्यामुळे बिगर अनुशेष जिल्हे भराभर आणखी वेगाने नव्या राज्यसरासरीच्या वर गेले. राज्यसरासरी वाढत गेली व अनुशेषग्रस्त जिल्ह्यांचे सरासरी गाठण्याचे अंतर वाढत गेले म्हणजे त्यांचा अनुशेष वाढत गेला. विदर्भ व मराठवाड्यामध्ये हा अनुशेष कसा वाढत गेला व तो किती वाढला याची अधिकृत माहिती करून घेऊ. **सत्यशोधन समितीच्या अहवालामध्ये सर्व प्रथम जून १९८२ च्या स्तरावरील अनुशेषाचे** दर्शन झाले. त्यानंतर **जून १९९४** च्या स्तरावरील अनुशेषाचे दर्शन अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालातून झाले. हे दोनही अहवाल केळकरांना

उपलब्ध होते. **जून २०१२ च्या स्तरावरील** अनुशेषाची अद्यावत अधिकृत माहिती केळकरांना सहज उपलब्ध होण्यासारखी होती. ती त्यांनी मागितली किंवा नाही? मागितली असल्यास वापरली किंवा नाही हे आपल्याला कळायला काही मार्ग नाही. मात्र ही माहिती आता प्राधिकरणाच्या सन २०१२-१३ च्या वार्षिक अहवालातील जोडपत्र ५(३) मुळे सर्वांना उपलब्ध झाली आहे.

**९३.** एकतर्फी निधी वाटपामुळे विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष उपरोक्त तीनही टप्प्यावर किती वाढत गेला याविषयीची अधिकृत माहिती पुढील प्रमाणे :- **(१) विदर्भाचा** अनुशेष जून १९८२ मध्ये ५२७ हजार हेक्टरचा होता तो जून १९९४ मध्ये ८५३ हजार हेक्टरचा झाला होता. तो आता जून २०१२ च्या राज्यसरासरीवर ११८४.८० हजार हेक्टरचा झाला आहे. **(२) मराठवाड्याचा** अनुशेष जून १९८२ मध्ये २६० हजार हेक्टरचा होता तो जून १९९४ मध्ये ४०१ हजार हेक्टरचा झाला होता. आता तो ५६२.२८ हजार हेक्टरचा झालेला आहे. **(३) अमरावती महसुली विभागाचा** अनुशेष जून १९८२ मध्ये ४१७ हजार हेक्टरचा होता. तो जून १९९४ मध्ये ७२६ हजार हेक्टरचा झाला, आता जून २०१२ च्या राज्यसरासरीवर तो ९९७.४२ हजार हेक्टरचा झालेला आहे. **(४) नागपूर महसुली विभागाचा** अनुशेष जून १९८२ मध्ये ११० हजार हेक्टरचा होता तो जून १९९४ मध्ये १२७ हजार हेक्टरचा झाला. तो आता जून २०१२ च्या राज्यसरासरीवर १८७.३८ हजार हेक्टरचा झाला आहे.

**(५) अमरावती जिल्हा :-** जून १९८२ मध्ये अमरावती जिल्ह्याचा अनुशेष १३४ हजार हेक्टरचा होता. तो अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९९४) २०९ हजार हेक्टरचा झाला. तो आता जून २०१२ च्या राज्यसरासरीवर २६९.४४ हजार हेक्टरचा झाला आहे. या सर्व अहवालाप्रमाणे अमरावती हा क्रमांक एकचा अनुशेषग्रस्त जिल्हा आहे व अमरावती विभाग हा क्रमांक एकचा अनुशेषग्रस्त महसूली विभाग आहे. **(६) अकोला (वाशिमसह) जिल्हा :-** जून १९८२ मध्ये अकोला जिल्ह्याचा अनुशेष ९२.३५ हजार हेक्टरचा होता. तो अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९९४ च्या स्तरावर) १८१ हजार हेक्टरचा झाला. आता जून २०१२ च्या राज्यसरासरीवर तो वाशिम १३६.११ हजार हेक्टर व अकोला १५७.४६ हजार हेक्टर एवढा झाला आहे. **(७) बुलढाणा जिल्हा :-** जून १९८२ मध्ये बुलढाणा जिल्ह्याचा अनुशेष ८४.७८ हजार हेक्टरचा होता तो अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९९४ च्या स्तरावर) १६८ हजार हेक्टरचा झाला. तो आता जून २०१२ च्या राज्यसरासरीवर २३८.४६ हजार हेक्टरचा झालेला आहे. **(८) यवतमाळ जिल्हा :-** जून १९८२ मध्ये यवतमाळ जिल्ह्याचा अनुशेष १०५.४१ हजार हेक्टरचा होता तो अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे (जून १९९४ च्या स्तरावर) १५८ हजार हेक्टरचा झाला, तो आता जून २०१२ च्या राज्यसरासरीवर तो १९५.९४ हजार हेक्टरचा झाला आहे.

**९४.** मुळातच अनुशेष असलेल्या जिल्ह्यांना कमी निधी दिल्यामुळे त्यांचा अनुशेष वाढत गेला हे जसे खरे, तसेच हेही खरे की बिगर अनुशेष जिल्ह्यांमध्ये अनुशेष नसतांना त्यांना फार मोठा निधी राज्यकर्त्यांनी उपलब्ध करून दिल्यामुळे या तीनही टप्प्यावर पश्चिम महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व जिल्हे राज्यसरासरीच्या नुसते वर राहीले असे नव्हे तर मोठ्या वेगाने जास्तीची सिंचनक्षमता त्यांनी आपल्या पदरात पाडून घेतल्यामुळे नव-नव्या राज्यसरासरीच्या आणखी वर गेलेत. या तीनही टप्प्यावरील अधिकृत आकडेवारीनुसार परिस्थिती पुढील प्रमाणे :-

**पुणे** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या ७६.३८ हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **२०८.७९** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे (७६.३८+२०८.७९) तो जिल्हा **२८५.१७** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. आता सन २०१२ पर्यंत या जिल्ह्याने एकूण **८११.२७** हजार हेक्टरची सिंचनक्षमता पदरात पाडून घेतली आहे. **सातारा** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या ८५.८२ हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **३३७.०८** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे (८५.८२+३३७.०८) तो जिल्हा **४२२.९०** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. आता सन २०१२ पर्यंत या जिल्ह्याने एकूण **५२३.६** हजार हेक्टरची सिंचनक्षमता पदरात पाडून घेतली आहे. **सांगली** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **६४.७१** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **२३४.१४** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे (६४.७१+२३४.१४) तो जिल्हा **२९८.८५** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. आता सन २०१२ पर्यंत या जिल्ह्याने एकूण **७३०.१४** हजार हेक्टरची सिंचनक्षमता पदरात पाडून घेतली आहे. **सोलापूर** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **९१.१२** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **६०.७०** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे (९१.१२+६०.७०) तो जिल्हा **१५१.८२** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. आता सन २०१२ पर्यंत या जिल्ह्याने एकूण **७३१.६०** हजार हेक्टरची सिंचनक्षमता पदरात पाडून घेतली आहे. **कोल्हापूर** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **१६२.९५** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **४०४.४४** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे (१६२.९५+४०६.४४) तो जिल्हा **५६९.३९** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. आता सन २०१२ पर्यंत या जिल्ह्याने एकूण **९७५.४०** हजार हेक्टरची सिंचनक्षमता पदरात पाडून घेतली आहे. **अहमदनगर** जिल्हा १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीच्या **१५४.४५** हजार हेक्टरने वर होता. या जिल्ह्याने १९८२ ते १९९४ या काळात **२१३.६६** हजार हेक्टरची अतिरिक्त सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यामुळे (१५४.४५+२१३.६६) तो जिल्हा **३६८.११** हजार हेक्टरने त्या सरासरीच्या वर गेला. आता सन २०१२ पर्यंत या जिल्ह्याने एकूण **७५५.५३** हजार हेक्टरची सिंचनक्षमता पदरात पाडून घेतली आहे.

**९५.** शंभर टक्के शासकीय निधीच्या बळावर विकसित भागांनी फार मोठी सिंचनक्षमता पदरात पाडून घेतल्यानंतर, तसेच विदर्भ व मराठवाड्यात अनुशेष फार मोठ्या प्रमाणात वाढल्यानंतर, कलम ३७१(२) ची यंत्रणा अस्तित्वात आल्यानंतर, ती यंत्रणा अस्तित्वात आल्यानंतरही मोठ्या प्रमाणात या विभागांचा निधी पळविण्यात पश्चिम महाराष्ट्र यशस्वी झाल्यानंतर, **मा. केळकर महोदय आम्हाला असे सांगतात की आमचा (म्हणजे त्यांचा) दृष्टीकोन "केवळ शासकीय खर्चावर लक्ष केंद्रित करणारा नसेल."** (परिच्छेद ४.६.१ पृष्ठ ११८)

**९६.** ते पुढे विदर्भ व मराठवाड्याला असेही बोधामृत पाजतात की **विकासाचा वेग वाढविणे ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ती अनेक घटकांवर अवलंबून असते.** विदर्भ व मराठवाड्याचा इतिहास व भूगोल धड नाही, भौगोलिक साधन संपत्तीची नैसर्गिक देणगी तुम्हाला नाही, सामाजिक भांडवलाची सुसज्जता तुमच्याजवळ नाही. आधारभूत धोरणांचा अभाव आहे, भौतिक पायाभूत सोयी उपलब्ध नाही. संस्थाविषयक क्षमता कमी आहे, प्रदेशाचे राजकीय नेतृत्त्व नालायक आहे, शासन व व्यवसाय करण्याचा खर्च तुम्हाला कमी करता येत नाही. यासारख्या घटकांवर विकासाच्या वेगाची प्रक्रिया गंभीररित्या अवलंबून असते. निधी हाही त्यात एक घटक असतो असेही ते सांगून जातात. अहवालाच्या पृष्ठ ११८ वरील परिच्छेद ४.६.१ मधील पुढील मजकूर शब्दशः :-

**"कोणत्याही प्रदेशाच्या विशेषतः मागे पडलेल्या प्रदेशाचा वाढीचा वेग वाढविणे ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे आणि ती अनेक घटकांवर अवलंबून आहे. खात्री करून घ्यायची तर, मोठ्या प्रमाणावरील शासकीय खर्च हा एक सकारात्मक घटक आहे, परंतु आर्थिक विकास आणि वाढ निष्पत्ती या बाबी, प्रदेशाचा इतिहास व भूगोल, भौगोलिक साधनसंपत्तीची नैसर्गिक देणगी, समाजिक भांडवलाची सुसज्जता, आधारभूत धोरणे, भौतिक पायाभूत सोयी, संस्थाविषयक क्षमता, प्रदेशाचे राजकीय नेतृत्त्व, शासन आणि व्यवसाय करण्याचा कमी व्यवहार खर्च यासारख्या इतर घटकांवर गंभीररीत्या अवलंबून आहे."**

**९७.** निधीच्या एकतर्फी वाटपांमुळे आपला अनुशेष वाढला आहे असेच विदर्भ व मराठवाड्यातील लोकांना आजपर्यंत वाटत होते पण निधीचे वाटप हे एक लहानसे कारण आहे, इतर सुध्दा अनेक मोठमोठी कारणे आहेत हे केळकरांच्या अहवालामुळे लोकांना कळले, हे केळकरांचे विदर्भ व मराठवाड्यातील लोकांवर फार मोठे उपकार म्हटले पाहिजे व ते सुध्दा त्यांनी पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांच्या हुकूमावरुन केलेले असल्यामुळे त्याचे फार मोठे मोल आहे. पश्चिम महाराष्ट्रातील तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्यांना हुकूम दिला :-

**"यापूर्वी नेमलेल्या डॉ. दांडेकर समितीने १९८४-१९८५ साली राज्यातील असमतोल विकासावर प्रकाश टाकणारा अहवाल सादर केला होता. त्यावेळी विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनुशेषाची आकडेवारी सादर केली होती. मात्र, डॉ. केळकर यांना अनुशेष नव्हे तर राज्याच्या समतोल विकासावर अहवाल देण्यास सांगण्यात आले."**

तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी हुकूम दिला आणि केळकर भिडले कामाला आणि हे म्हणे राष्ट्रीय दर्जाचे (नव्हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ) अर्थतज्ज्ञ.

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी द्वारे संचालित

# सिताबाई कला महाविद्यालय, अकोला

**डॉ.आर.बी.हेडा, अध्यक्ष** | **ॲड.मोतीसिंह मोहता, सचिव** | **डॉ.आर.डी.सिकची, प्राचार्य**

(८) ८ मार्च २०१५

# जंगल न्यायाने निधी वाटप, समान वाटप व समन्यायी वाटप यापैकी केळकरांनी जंगल न्यायाने निधी वाटपाची निवड केली

**९८.** विकासाच्या प्रक्रियेत मागे पडलेले प्रदेश का म्हणून मागे पडले? याची कारणमीमांसा अहवालाच्या पृष्ठ ११८ वरील परिच्छेद ४.६.१ मध्ये केळकरांनी मांडलेली आहे, ती वर याच लेखात परिच्छेद ९५ ते ९७ मध्ये उधृत करण्यात आली आहे. आता श्री. केळकर या आपल्या बचनामृतांचा जाहिर प्रचार करीत फिरत आहेत. शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी २०१५ रोजी त्यांच्या सूचनेवरुन नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाने "**समतोल प्रादेशिक विकास : केळकर समिती अहवालावर दृष्टीक्षेप**" या विषयावर एका चर्चा सत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्राचा तपशीलवार वृत्तांत सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी २०१५ च्या 'लोकसत्ता'च्या नागपूर आवृत्तीमध्ये "महाप्रदेश" या पृष्ठावर प्रकाशित झाला आहे. डॉ. केळकर हे स्वतः या चर्चेला हजर होते.

**९९.** डॉ. केळकरांनी या चर्चासत्रामध्ये मांडलेले विचार तपशीलाने या वृत्तांतामध्ये समाविष्ट आहेत. अवतरणामध्ये नमूद असलेला त्या वृत्तांतातील त्यांच्या प्रतिपादनाचा एक परिच्छेद पुढील प्रमाणेः-

"समतोल विकासाची भूमिका मांडतांना दरडोई उत्पन्न वाढविण्यावर भर दिला पाहिजे. **विकास ही एकाच दिशेने होणारी प्रक्रिया नाही व केवळ सरकारी सहाय्याने ती होऊ शकत नाही.** इतिहास, भूगोल, सामाजिक परिस्थिती, धोरणे अशा अनेक बाबींचा विकासावर परिणाम होतो. राज्यातील आघाडी सरकारांचा विकासावर विपरित परिणाम झाला आहे. **दर्जेदार राजकीय नेतृत्व नसणे व चुकीची धोरणे राबविणे यामुळे मागास भागाचे मोठे नुकसान झाले आहे.** कापूस एकाधिकारसारख्या योजनांमुळे पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांचा तोटा झाला," असेही मत केळकर यांनी मांडले.

**१००.** प्रत्यक्ष अहवालाच्या परिच्छेद ४.६.१ मध्ये केळकरांनी एक कारण म्हणून 'राजकीय नेतृत्व' दाखविले असले तरी या मुक्त चर्चेमध्ये मोकळेपणाने विचार मांडतांना विदर्भ-मराठवाड्यात जो विकासाचा असमतोल निर्माण झाला व विकासात हे प्रदेश मागे पडले त्याचे महत्त्वाचे एक कारण म्हणजे **या दोनही भागांना दर्जेदार राजकीय नेतृत्व नसणे व दुसरे कारण म्हणजे या भागाच्या नेत्यांनी चुकीची धोरणे राबविली हे होय.** असे हे केळकरांचे प्रतिपादन आहे.

**१०१.** खरे म्हणजे विदर्भ व मराठवाड्यातील अनेक नेत्यांनी महाराष्ट्राला अत्यंत दर्जेदार नेतृत्व पूरविले आहे. त्यावर खूप तपशीलवार लिहिता येईल. पण तो आजचा मुख्य विषय नाही. विदर्भ व मराठवाड्याला दर्जेदार राजकीय नेतृत्व नसल्यामुळे हे भाग मागासलेले राहिले हे विधान कोणत्याही वस्तुस्थितीवर व तथ्यावर आधारित नाही. हे विधान खोडून काढणारी अनेक तथ्ये मांडता येतील. वस्तुस्थिती म्हणून नव्हे पण वादासाठी केळकर म्हणतात ती दोनही विधाने **(एक म्हणजे दर्जेदार राजकीय नेतृत्व नसल्यामुळे विदर्भ व मराठवाडा मागासलेला राहिला व दुसरे म्हणजे या भागाच्या नेत्यांनी चुकीची धोरणे राबविली)** खरी मानली तर प्रश्न असा निर्माण होतो की १९६० ते २०१४ या कालखंडातील फार मोठ्या भागावर जे पश्चिम महाराष्ट्रातील दर्जेदार नेते राज्य करीत होते? ते काय करीत होते? महाराष्ट्र म्हणून त्यांनी जी धोरणे राबविली ती पश्चिम महाराष्ट्रासाठी वेगळी होती? व विदर्भ-मराठवाड्यासाठी वेगळी होती काय? राज्यकर्ते म्हणून विदर्भ-मराठवाड्यासाठी ते राज्यकर्ते आपले दर्जेदार राजकीय नेतृत्वाचे महावस्त्र बाजूला काढून ठेवित होते काय? चुकीची धोरणे फक्त विदर्भ व मराठवाड्यात राबवित होते काय? या प्रश्नांची उत्तरे केळकर देऊ शकणार नाहीत कारण पश्चिम महाराष्ट्रातील ज्या नेत्यांचे लांगुलचालन ते करीत आहेत त्यांना या प्रश्नांची उत्तरे न आवडणारी आहेत.

**१०२.** दर्जेदार नेतृत्वामुळे सबंध महाराष्ट्र पुढे गेला किंवा अशा नेतृत्वाच्या अभावी सबंध महाराष्ट्र विकासात मागासलेला राहीला असे प्रतिपादन करणे वेगळे व प्रादेशिक असमतोलाच्या चर्चेमध्ये दर्जेदार राजकीय नेतृत्वाचा मुद्दा उपस्थित करणे हे वेगळे. त्यातही महाराष्ट्रातील ज्या प्रदेशांना दर्जेदार नेतृत्व लाभले ते प्रदेश विकसित झाले व ज्यांना असे दर्जेदार नेतृत्व लाभले नाही ते प्रदेश मागासलेले राहीले, असे प्रतिपादन करणे म्हणजे "**लायक असेल तो जगेल, नालायक असेल तो मरेल, तो मरणारच**" (Survival of the fittest) या सिध्दांताचे उघडउघड समर्थन करणे होय. केळकर यांच्या अहवालाने तसे ते केलेले आहे. या सिध्दांताचे अलिकडच्या काळातील हे वर्णन आहे. इतिहासात थोडे मागे गेल्यास "बळी तो कानपिळी" असे त्याचे वर्णन केले जात असे. "बलवान व्यक्तीची इच्छा ही न्यायाचे उगमस्थान असते" असे बळी तो कानपिळीचे शास्त्रीय वर्णन केले जात असे. इतिहासात बरेच मागे गेल्यास हाच सिध्दांत "जंगलचा न्याय" या नावाने ओळखला जातो. जंगलात चरणाऱ्या गाईच्या एखाद्या लहानशा बछड्याला त्याच जंगलात वास्तव्य करणाऱ्या एखाद्या बलदंड रानडुकराने गिळंकृत करावे या घटनेचे वर्णन 'जंगलचा न्याय' या न्यायसिध्दांताने करता येईल.

**१०३.** भारतीय घटना अस्तित्वात आली व ज्याला आपण जंगलचा न्याय म्हणतो तो पूर्णपणे संपुष्टात आला. कोणत्याही स्वरुपात अस्पृश्यता पालन करणे, वेठबिगार प्रथेचे पालन करणे कायद्याने संपुष्टात आले. **भारतीय घटनेने जे मुलभूत हक्क आपल्या नागरिकांना प्रदान केले त्यामुळे कोणत्याही स्वरुपात जंगलच्या न्यायाला जिवंत रहाण्यास प्रतिबंध करण्यात आला.** घटनेच्या कलम १४ अन्वये समतेचा हक्क प्रदान केला गेला. समान नागरिकांना समान वागणूक दिली पाहिजे व अशा समान वागणूकीची समान अंमलबजावणी केली पाहिजे असा दंडक घालून देण्यात आला. समान वागणूक देण्याच्या या घटनेतील सिध्दांताला सरळसरळ हरताळ फासणारे प्रतिपादन केळकर अहवालामध्ये करण्यात आलेले आहे.

**१०४.** समान गटांना समान वागणूक दिली पाहिजे. गटांमध्ये असमानता असेल तर त्यांना वाजवी वर्गिकरण करून वेगवेगळी वागणूक देता येईल. नियोजन विभागाच्या ३ ऑगस्ट १९८३ च्या ज्या शासन निर्णयाने सत्यशोधन समितीची स्थापना झाली त्याच शासन निर्णयाने "**निश्चित केलेला असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व तो पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून दूरगामी उपाय सुचविणे**" असा विषय समितीच्या विचारार्थ सोपविला होता. ३१ मे २०११ च्या शासननिर्णयाने केळकर समितीची स्थापना केली होती. त्या शासननिर्णयाने सुध्दा हेच काम केळकर समितीकडे सोपविले होते. सत्यशोधन समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३२ मध्ये "**अनुशेष भरून काढण्यासाठी जी कृती करावयाची तिची सुरुवात पैशाची तरतूद करण्यापासूनच करावी लागते**" हे तर सांगितलेच पण त्याच बरोबर विकासातील असमतोल दूर करावयाचा असेल तर "**मागास जिल्ह्यांचा विकासाचा वेग काही प्रमाणात वाढला पाहिजे आणि त्या प्रमाणात प्रगत जिल्ह्यांचा विकासाचा वेग काहीसा मंदावला पाहिजे ही गोष्ट अशा प्रयत्नात अभिप्रेत आहे. प्रादेशिक असमतोल दूर करावयाचा तर जे अपरिहार्य आहे, ते स्वीकारले पाहिजे. हे अवघड आहे म्हणूनच ते निस्संदिग्धपणे सांगितले पाहिजे,**" असे मत स्पष्टपणे आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३५ मध्ये त्या समितीने व्यक्त केलेले आहे.

**१०५.** आता याबाबत केळकरांनी काय उजेड पाडला ते पाहू. "प्रादेशिक विकास धोरण" या मथळ्याखाली पृष्ठ ६ वरील परिच्छेद ४ ची सुरुवातच केळकरांनी पुढील शब्दात केलेली आहे. शब्दशः :-

**"समतोल प्रादेशिक विकास साधण्याकरिता विदर्भ आणि मराठवाडा यांसारख्या मागे पडलेल्या प्रदेशांचा विकास गतिमान करण्याबरोबरच किमानपक्षी उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाचा आलेख राखावयास हवा."**

अहवालातील ही शब्दरचना काळजीपूर्वक पाहिली तर असे लक्षात येते की "**मागे पडलेल्या प्रदेशांचा विकास गतिमान करणे**" ही मोघम शब्दरचना आहे. मात्र (किमानपक्षी) "**उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाचा आलेख राखावयास हवा**" या शब्दरचनेला काटेकोर व निश्चित अर्थ आहे व तो अर्थ असा आहे की १९६० ते २०१४ या काळात ज्या वेगाने उर्वरित महाराष्ट्र पुढे गेला तो वेग (किमानपक्षी) कायम ठेवला गेला पाहिजे. **केळकरांची भूमिका इतकी पक्षपाती आहे की निश्चित झालेला असमतोल दूर करण्यासाठी नेमलेले केळकर हा असमतोल वाढविणाऱ्या शिफारशी करताहेत हेही त्यांच्या लक्षात आले नाही.** उपलब्ध राजकीय सत्तेचा एकतर्फी वापर करून महाराष्ट्राच्या ज्या विकसित भागांनी आपल्या विकासाचा आलेख वेगाने वर नेला व फार मोठा प्रादेशिक असमतोल अविकसित भागात निर्माण करून प्रचंड प्रमाणावरील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे 'पुण्य' पदरी पाडून घेतले, त्या विकसित भागांच्या विकासाचा आलेख असाच वाढत राहिला पाहिजे, किमानपक्षी त्याचा वेग कायम राहिला पाहिजे, असे प्रतिपादन करणे म्हणजे वाढलेला असमतोल असाच वाढत राहो ! असे प्रतिपादन करणे होय, हे केळकरांसारख्या बुध्दीवंताच्या लक्षातच आले नसेल असे कसे म्हणावे?

**१०६.** आपल्या अहवालाच्या पृष्ठ ६ वरील परिच्छेद ४ चा शेवट त्यांनी

पुढील मजकुराने केलेला आहे. :-

**"आम्ही अशा प्रत्येक प्रदेशाकरीता अशी विशिष्ट क्षेत्रे निश्चित केलेली असून खाजगी गुंतवणुकीचा ओघ वाढावा त्याचबरोबर विद्यमान धोरणांमधील अडथळे दूर व्हावेत याकरिता आवश्यक त्या धोरण-सुधारणा सुचविलेल्या आहेत. हे करताना आम्ही "सर्वासाठी एकसमान" हे तत्त्व कटाक्षाने दूर ठेवले आहे."**

**'विद्यमान धोरणातील अडथळे'** या शब्दांचा केळकरांना अपेक्षित असलेला अर्थ समजून घेणे कठीण नाही. कलम ३७१(२), त्याअंतर्गत मा. राष्ट्रपतींनी काढलेले आदेश, त्यानुसार मा. राज्यपालांनी निर्गमित केलेले निदेश, निदेशानुसार होणारे प्रदेशनिहाय व जिल्हानिहाय निधीचे वाटप, त्या वाटपामुळे सिंचनक्षेत्रात पश्चिम महाराष्ट्राने जी वेगाने प्रगती केली त्या वेगाला होणारी अडचण, हे ते प्रमुख अडथळे होत. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील काही नेत्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती व त्यांचे म्हणणे मा. उच्च न्यायालयाने फेटाळून लावले. आता या नेत्यांनी केळकरांचा आधार घेतला असून **केळकरांनी सुध्दा सर्वांना समानतेची वागणूक देण्याचे तत्व कटाक्षाने दूर ठेवण्याचे घोषित केले आहे.**

**१०७.** "सर्वांना समानतेची वागणूक देण्याचे तत्व आपण सोडून दिले आहे" हे तत्व केळकरांच्या इतके आवडीचे आहे की त्याचा त्यांनी अहवालात अनेक ठिकाणी पूनरूच्चार केलेला आहे. अहवालाच्या पृष्ठ ११८ वर परिच्छेद ४.६.१ चा शेवट त्यांनी पुढील शब्दांनी केलेला आहे. :-

"आमचा दृष्टिकोन **बहुपरिणामी** गरजांसाठी असेल आणि **केवळ शासकीय खर्चावर लक्ष केंद्रित करणारा नसेल.** आणखी असे की, बहुपरिमाणकत्त्वाचाच दुसरा ध्वनितार्थ असा आहे की, वेगवेगळ्या प्रदेशांना, वाढ व विकास यांचा वेग वाढविण्यासाठी उपाययोजनांच्या विनिर्दिष्ट व असाधारण एकीकरणाची आवश्यकता असेल. **अंतिमतः, आम्हाला राज्य आणि केंद्राकडून आधारात्मक धोरण सुधारण्याची आवश्यकता आहे** ज्यामुळे, प्रादेशिक महत्त्वाकांक्षा लक्षात घेऊन, जबाबदारीसह प्रादेशिक अधिकार प्रदान करणे शक्य होईल. **दुसऱ्या शब्दात सांगावयाचे तर 'आपण सर्वासाठी एकच' मोजमाप हा दृष्टिकोन काळजीपूर्वक सोडून दिला पाहिजे आणि आमचा अहवाल हेच करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो."**

**१०८.** अहवालाच्या पृष्ठ ६ वरील परिच्छेद ४ व पृष्ठ ११८ वरील परिच्छेद ४.६.१ मध्ये केळकरांनी "सर्वासाठी एकच मोजमाप हा दृष्टिकोन आपण काळजीपूर्वक सोडून दिला पाहिजे आमचा अहवाल हेच करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो" असे जेथे प्रतिपादन केले आहे, ते परिच्छेद काळजीपूर्वक वाचले तर पुढील बाबी समोर येतात :-

(१) सर्व प्रदेशांना सारखी वागणूक देण्यास ठाम नकार

(२) अनेक परिणाम साध्य करणारा आमचा दृष्टिकोन आहे

(३) केवळ शासकीय खर्चावर लक्ष केंद्रित करणारा आमचा दृष्टिकोन नसेल

(४) विद्यमान धोरणातील अडथळे दूर केले पाहिजे

(५) प्रादेशिक महत्त्वाकांक्षा लक्षात घेऊन त्या त्या प्रदेशांना अधिकार प्रदान केले पाहिजे

(६) वेगवेगळ्या प्रदेशांना, वाढ व विकास यांचा वेग वाढविण्यासाठी उपाययोजनांच्या विनिर्दिष्ट व असाधारण एकीकरणाची आवश्यकता असेल.

(७) अंतिमतः, आम्हाला राज्य आणि केंद्राकडून आधारात्मक धोरण सुधारण्याची आवश्यकता आहे.

(८) प्रादेशिक महत्त्वाकांक्षा लक्षात घेऊन, जबाबदारीसह प्रादेशिक अधिकार प्रदान करणे शक्य झाले पाहिजे.

(९) खाजगी गुंतवणूकीचा ओघ वाढावा. (असा ओघ फक्त पश्चिम महाराष्ट्रातच वाढू शकतो हे लक्षात घेऊन)

(१०) खाजगी गुंतवणूक घेण्याचे एकदा ठरविले की सरकारी गुंतवणुकीतून ज्यांनी आपली 'लायकी' वाढवून घेतली त्यांना जास्त खाजगी गुंतवणूक उपलब्ध होणार, कमी लायकी ज्यांनी प्राप्त करून घेतली त्यांना कमी खाजगी गुंतवणूक उपलब्ध होणार व अशा सरकारी गुंतवणुकीनंतर गेल्या ६० वर्षात ज्यांच्या पदरी नालायकीच पडली त्यांना कुठून मिळणार खाजगी गुंतवणूक?

(११) एकदा खाजगी गुंतवणूकीतून पश्चिम महाराष्ट्रात आणखी संपदा निर्माण केली म्हणजे या कर्जाचे मुद्दल व व्याज फेडणे हे घटनेच्या कलम २०२(३) (c) अन्वये राज्यावर बंधनकारक असते हे केळकरांना नक्कीच ठावूक असणार.

(१२) केंद्राने व राज्याने आपली धोरणे केळकर म्हणतात त्याप्रमाणे बदलली पाहिजेत.

**१०९.** खरे म्हणजे केळकरांची समिती ज्या कामासाठी नियुक्त करण्यात आली त्यामध्ये त्यांनी भारताच्या घटनेतील कलम ३७१(२) समोर ठेवून त्या मर्यादेत आपल्या शिफारशींची बांधणी करायला हवी होती पण तसे करण्यास त्यांनी स्पष्टपणे नकार दिला आहे. घटनेतील कलम ३७१(२) मध्ये पुढील प्रमाणे एक तरतूद आहे :-

"**विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र** या तीन प्रदेशामध्ये सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रावरील **विकासखर्चासाठी पैशाची समन्यायानुसार वाटणी करणे;**"

हांजीखोरपणा व लांगुलचालनाचा मार्ग स्वीकारल्यामुळे घटनेतील "**राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन**" आणि "**विकासखर्चासाठी पैशाची समन्यायानुसार वाटणी**" या शब्दरचनांकडे केळकरांना लक्ष देण्याची गरज वाटली नाही. या शब्दरचनांचा त्यांनी काळजीपूर्वक विचार केला असता तर या तीन प्रदेशांपैकी कोण, कोणत्या बाबतीत पुढे आहे व कोण, कोणत्या बाबतीत मागे आहे याचा विचार केळकरांना करावाच लागला असता कारण त्याशिवाय समन्यायी वाटप शक्यच झाले नसते. घटनेतील तरतुदींचा विचार न करण्याचे ठरविल्यामुळे केळकरांचा अगोदरच विकसित असलेल्या विभागाचे चांगभले करण्याचा मार्ग मोकळा झाला.

**११०.** मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ६ मे २००८ रोजी सन २००३ च्या याचिका क्रमांक ५८७२ मध्ये दिलेल्या निर्णयाच्या परिच्छेद २९ मधील पुढील आदेश पहा :-

"29. Regarding the fourth objection that the Governor has to take into account **State as a whole does not mean the Governor can ignore the special needs of Marathwada and Vidharbha and in the facts and circumstances of the case, we do not find anything wrong in the allocations made.**"

**१११.** मा. उच्च न्यायालयाने आपल्या याच निर्णयाच्या परिच्छेद २७ मध्ये पुढील प्रमाणे निर्णय नोंदविला आहे. :-

"**Under Article 371, there is a special responsibility imposed on the Governor to ensure that there is no backwardness in Vidharbha and Marathwada regions and the same was a constitutional obligation imposed on the Governor, which cannot be frustrated.**"

**११२.** याच निर्णयामध्ये मा. खंडपीठाने मा. राज्यपालांच्या अधिकाराविषयी परिच्छेद २८ मध्ये पुढील प्रमाणे निर्णय नोंदविला आहे. :-

"**Hence the Governor is fully empowered to make necessary allocation of funds to improve the backward areas like Marathwada and Vidharbha. The directives of the Governor are binding on the State.**"

**११३.** घटनेच्या कलम १४ मधील समानतेच्या हक्काबरोबर कलम ३७१(२) मधील विकासनिधीच्या समन्यायी वाटपावर मागासलेल्या भागांना हक्क-सहभाग देणारी तरतूद ही आणखी वरच्या दर्जाची आहे. समान लोकांना समान वागणूक या तत्वाच्या पुढे जावून विकासात मागे-पुढे राहीलेल्या या तीन विभागांचे मागासलेपण किंवा पुढारलेपण यासह सर्व परिस्थिती (all the circumstances of the particular case) लक्षात घेऊन न्याय्य (Just) असे, योग्य (Right) असे व निपक्षपातीपणे (impartially) केलेले विकासनिधीचे वाटप यामध्ये अपेक्षित आहे.

भारताच्या घटनेच्या कलम ३७१(२) मधील विकासनिधीच्या या समन्यायी वाटपाच्या तरतुदीकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करण्याचे केळकरांनी ठरविले. त्यामुळे त्या तरतुदींची थोडी आणखी माहिती घेणे आवश्यक आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात "It cannot be doubted that only that distribution can be said to be "equitable" which is "just and right under all the circumstances of the particuler case" असे नमुद केले आहे. (AIR 1979 SC 1459 : (1979) 3 SCR 709 : (1979) 3 SCC 229. Dt. 17-04-1979) "Reference has been made to Jowitt's Dictionary of English Law, where "equitable" has been stated to mean "that which is fair", and to Corpus Juris Secundum to show that equitable is that which is done "fairly, justly and impartially"

**मा. केळकर महोदयांनी समन्यायी वाटपाचा विचार सुध्दा केलेला नाही. सर्वासाठी एकसमान हा समान न्यायाचा सिध्दांत उघडउघड फेटाळून लावला आणि दर्जेदार नेतृत्व असेल तो जगेल, दर्जेदार नेतृत्व नसेल तो मरेल या जंगलच्या न्यायाचे विस्ताराने प्रतिपादन करण्यासाठी आपली सारी बुध्दीमत्ता खर्ची घातली.**

(९) १५ मार्च २०१५

# थेट निधीप्रदानाची व्यवस्था नसणाऱ्या पण अहवालाच्या सजावटीला सुंदर रितीने सुशोभित करणाऱ्या अतिसुंदर सुविचारांचा फार मोठ्या प्रमाणात विदर्भ व मराठवाड्यावर वर्षाव

**११४.** एका बाजुला '**उचलेली सुपारी**' व दुसऱ्या बाजुला '**प्रत्यक्ष वस्तुस्थिती**' यांच्या कात्रीत सापडल्यामुळे केळकरांचा बराच गोंधळ उडालेला आहे, असे दिसून येते. सुपारीच्या पोटी मागासलेपणाबद्दल विदर्भ व मराठवाड्यातील राजकीय नेतृत्त्वाला दोषी ठरवित असतांनाच केळकरांनी आपल्या अहवालात याबाबतची वस्तुस्थितीसुध्दा मांडलेली आहे. "आमच्या समितीने, पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पळशीकर यांच्या "Reimagining Maharashtra :- Moving Towards Creative Politics : Overview and Suggestions" या अहवालाचा अभ्यास केला. त्यामध्ये तीन प्रदेशांमधील मंत्र्यांच्या महत्त्वाच्या मंत्रिमंडळ खातेवाटपाच्या मुद्यावर सविस्तर लिहिले आहे. अहवालामधील संबंधित उतारे जोडपत्र ६.६ मध्ये देण्यात आले आहेत." असे केळकरांनी अहवालाच्या पृष्ठ १९१ वर परिच्छेद ६.८.२ मध्ये नमूद केले आहे.

**११५.** पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पळशीकर यांच्या अहवालातील समितीला पसंत असलेले काही उतारे केळकरांनी अहवालाच्या पृष्ठ ४६८ वर जोडपत्र ६.६ म्हणून उधृत केलेले आहेत. त्यात पळशीकरांनी नमूद केलेली काही महत्त्वपूर्ण निरिक्षणे पुढील प्रमाणे आहेत. :- (१) "परंतु आणखी एक निर्णायक मुद्दा आहे - तो म्हणजे मंत्र्यांमध्ये खात्यांचे वाटप. आपण, गृह, वित्त, नगरविकास, ग्रामविकास, महसूल, उद्योग, कृषी, सहकार, पाटबंधारे आणि सार्वजनिक बांधकाम ही दहा खाती सर्वाधिक निर्णायक खाती म्हणून विचारात घेतो." (२) "**यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर, जेव्हा जेव्हा पश्चिम महाराष्ट्रातील नेता मुख्यमंत्री झाला, तेव्हा तेव्हा पश्चिम महाराष्ट्राचा सत्तेतील हिस्सा वाढला. परंतु, १९९९ पासून, मुख्यमंत्री मराठवाड्याचा असला तरी, पश्चिम महाराष्ट्रातील मंत्र्यांचे प्रमाण दहा पैकी पाच किंवा सात या प्रमाणातच राहिलेले आहे. म्हणूनच, असे म्हणू शकतो की, मागील दोन दशकात राजकीय समतोल ढळला आहे.**" (३) "**जर विदर्भ आणि मराठवाड्यातील मंत्र्यांकडे मुख्य खात्यांचा प्रभार नसेल तर, या प्रदेशांसाठीच्या संसाधनांचे वाटप थोड्या प्रमाणात का होईना असमाधानकारक असतेच, परिणामी अनुशेष आणि पायाभूत सुविधांची कमतरता कायम राहते याला पुष्टी मिळते.**" (४) "राज्यातील लोकशाही सत्तेच्या सहभागानुसार (आणि महाराष्ट्राबाबत, विशेष करून नागपूर कराराच्या संदर्भात) हे खातेवाटपांचे काहीसे झुकते माप हे प्रश्नास्पद ठरते." (५) "अशा बाबींना सांकेतिक महत्त्वही असते. म्हणून, विदर्भ आणि मराठवाड्यातील मंत्री त्यांच्या प्रदेशासाठी काही करत नाहीत किंवा त्यांनी काही केले नाही, असे जरी आपण गृहीत धरले तरी, **प्रतिकात्मकदृष्ट्या, प्रतिदर्शित घोर आणि चिंतांचा संस्थात्मक व्यवस्थापनाद्वारे उपशम** ("Symbolically, an institutional arrangement has to assuage representational anxieties and concerns.") व्हायला हवा." (६) "म्हणून, प्रत्यक्ष मूलभूत विकास आणि अनुशेषाच्या सर्वंकष मुद्यांच्या आव्हानाव्यतिरिक्त (ज्याचा ह्या पुनरावलोकनात विचार करण्यात आलेला नाही), **राजकीय दृष्ट्या, मंत्रिमंडळाची रचना करताना हे महत्त्वाचे ठरते.**"

**११६.** डॉ. पळशीकरांनी व्यक्त केलेल्या मतांचा आढावा घेऊन झाल्यावर खुद्द केळकरांनी आपली स्वतःची मते पृष्ठ १९१ वर परिच्छेद ६.८.२ मध्ये व्यक्त केलेली आहेत. त्यातील काही पुढील प्रमाणे :- (१) "असे दिसून येईल की, या सर्व तीन प्रदेशांतील मंत्री कमीजास्त प्रमाणात असले तरी, कॅबिनेट मंत्रीपदे उपभोगली आहेत. असे नमूद करता येईल की, अनेक मुख्यमंत्री हे मराठवाड्यातून होऊन गेले आहेत. **तथापि, राजकीय सत्तेतील विदर्भ प्रदेशाचा सहभाग हा अगदीच कमी राहिला आहे.**" (२) "नागपूर करारात असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, "सरकार तयार करण्याच्या रचनेत या तीन घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रतिनिधित्व देण्यात येईल." (३) "समितीने, तडजोड करण्याची वृत्ती 'महाराष्ट्रप्रती', बांधीलकी-महाराष्ट्राच्या स्वप्नांसाठी पुन्हा समर्पित होण्याची वृत्ती, महाराष्ट्राच्या पुनर्विचाराची कल्पना आवश्यक असेल आणि **प्रसंगोपात्त लबाडीपेक्षा मुत्सद्देगिरीवर आधारित राजकारण करणे देखील आवश्यक असेल** (पळशीकर २०१२, पृ.७१) अशा आशयाच्या (पळशीकर) अहवालाच्या शिफारशींना पूर्णपणे पुष्टी दिली आहे."

**११७.** नागपूर करार आणि घटनेतील कलम ३७१(२) मधील तरतुदीनुसार केळकरांनी समन्यायी वाटपाबाबत काहीच शिफारशी केल्या नाहीत असे म्हणणाऱ्या विदर्भ-मराठवाड्यातील टिकाकारांनी आनंदाने टाळ्या पिटाव्या, अशी एक शिफारस केळकरांनी पृष्ठ १९१ वर केलेली आहे. ती पुढील प्रमाणे :- "**म्हणून, समिती अशी शिफारस करते की, मंत्रिमंडळातील महत्त्वाच्या खात्यांचे वर्गीकरण करून ती खाती या तीन प्रदेशांमध्ये समन्यायाने वाटून देण्यात यावीत.**" "सरकार तयार करण्याच्या रचनेत या तीन घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रतिनिधित्व देण्यात येईल." असे नागपूर करारात स्पष्टपणे नमूद केले आहे, ही गोष्ट खरी असली तरी घटनेच्या कलम ३७१(२) मध्ये मात्र "**सरकार तयार करण्याच्या रचनेत या तीन घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रतिनिधित्व देण्यात येईल.**" **अशी कोणतीही तरतूद नसतांनासुध्दा केळकरांनी ही शिफारस केलेली आहे.** विकास कामावर करावयाच्या खर्चाच्या समन्यायी वाटपाबाबत स्पष्ट उल्लेख घटनेच्या कलम ३७१(२) मध्ये असतांना त्याबाबत एका ओळीचीसुध्दा शिफारस केळकर करीत नाहीत. उलट सिंचन क्षेत्रात समन्यायी वाटपाच्या विपरित शिफारस ते करतात. इथे मात्र घटनेच्या कलम ३७१(२) मध्ये तशी तरतूद नसतांना उदार अंतःकरणाने मंत्रिमंडळातील जागा समन्यायाने वाटून द्याव्यात अशी शिफारस ते करतात, याबद्दल त्यांची वर्णावी तेवढी थोरवी थोडीच आहे. केळकरांनी मांडलेल्या त्यांच्या अहवालातील अतिसुंदर सुविचार या सदरात मोडणारा हा नंबर एकचा सुविचार होय असे म्हणावे लागेल. तसे पाहिले तर त्यांनी मांडलेल्या अतिसुंदर सुविचारांची एक मालिकाच आपल्याला वर परिच्छेद ११६ मध्ये दिसून येईल.

**११८.** आता अतिसुंदर सुविचारांचा प्रश्न निघाला म्हणून तो विषय सुध्दा खुलासेवारपणे मांडणे आवश्यक आहे. एका बाजुला सिंचन या विकासक्षेत्रामध्ये विदर्भ व मराठवाड्याचा फार मोठा अनुशेष असतांना या क्षेत्रातील रोख रकमा मोठ्या प्रमाणात पश्चिम महाराष्ट्राकडे केळकरांनी वळविल्या (नमुना उदाहरणे याच लेखाच्या परिच्छेद २९ मध्ये पहा) कारण त्यांनी तशी 'सुपारी' घेतली होती. असे करीत असतांना सिंचन अनुशेषाने ग्रस्त व आत्महत्त्यांनी त्रस्त अशा विदर्भ-मराठवाड्यावर आपण फार मोठा अन्याय करीत आहोत याची केळकरांना जाणीव होती व त्या जाणिवेतूनच निर्माण झालेल्या गोंधळलेल्या मानसिकतेतून त्यांनी अनेक गोंधळपूर्ण, परस्परविरोधी विधाने आपल्या अहवालात केलेली आहेत. **याच गोंधळपूर्ण मानसिकतेतून प्रत्यक्ष व थेट निधीप्रदानाची व्यवस्था**

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

**चांदूर रेल्वे विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. (र.अ.२६९)**

**प्रा.प्रभाकरराव वाघ, अध्यक्ष** **श्री.रविंद्रजी का.भैसे, उपाध्यक्ष**

**प्रमोद राऊत, सचिव** **श्री.निळकंठराव काळे, मा.सचिव**

**नसणाऱ्या पण अहवालाच्या सजावटीला सुंदर रितीने सुशोभित करणाऱ्या अतिसुंदर सुविचारांचा फार मोठ्या प्रमाणात विदर्भ व मराठवाड्यावर वर्षाव करण्यात आलेला आहे.**

**११९.** पाच पन्नास वर्षांपूर्वीचा काळ लक्षात घेतला तर त्या स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामिण भागात सावकारांचा मोठा सुळसुळाट होता. फार मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण ठेवून भरमसाठ व्याज आकारून पुढे त्या जमिनी गिळंकृत करणारे हे सावकार पदरी पडलेले पाप धुवून काढण्यासाठी मंदिरे बांधणे, धर्मशाळा बांधणे, पाणपोया लावणे अशी पुण्यकर्मे पार पाडीत असत. अतिसुंदर सुविचाराचा केळकरांनी विदर्भ-मराठवाड्यावर केलेला वर्षाव किंवा अहवालात केलेली अशा विचारांची पेरणी करण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न थोडेफार पुण्य गाठी मारण्यासाठीच केलेला दिसतो.

**१२०.** सिंचन क्षेत्रातील विकासाच्या मोजमापाचे मापदंड निश्चित करतांना केळकरांचा बराच गोंधळ उडालेला दिसून येतो. याबाबतचा केळकरी मापदंड त्यांनी अहवालाच्या पृष्ठ १४ वर परिच्छेद ८४ मध्ये पुढील शब्दात मांडला :- **"प्रत्यक्ष सिंचनाचे क्षेत्र आणि पाण्याचा साठा या दोन गोष्टी गणनेच्या कोणत्याही प्रयोजनासाठी सिंचनाच्या विकासाचा निर्देशांक म्हणून विचारात घेण्यात याव्यात."**

**१२१.** आपला हा मापदंड समाधानकारक नाही याची खात्री असल्यामुळेच केळकरांनी पृष्ठ ३४२ वर **"पाण्याच्या आधारावर विकासाचे प्रस्तावित निर्देशांक"** या मथळ्याखाली परिच्छेद १०.२०.१ मध्ये पुढील मजकूर खरडला आहे :- "सिंचन व सिंचनेतर उपयोगासाठी भूपृष्ठीय पाण्याशिवाय भूजलाचा वापर वाढत आहे. भूजलाचा वापर मुख्यतः विहिरी, कूप नलिका व पाण्याच्या पंप संचासाठी आवश्यक असलेली उपकरणे यांच्यामार्फत झाला आहे. **म्हणून, नळाद्वारे पाणी पुरवठ्याची क्षमता व भूजलाचा अधिकाधिक वापर, हा विकासाचा वेगळा निर्देशक म्हणून विचारात घेण्यात यावा.**"

**१२२.** एवढ्यावर केळकरांचा गोंधळ संपला नाही तर त्यांनी आणखी एक मापदंड सुचवितांना परिच्छेद १०.२०.२ मध्ये पुढील प्रमाणे आणखी तारे तोडलेले आहेत :- "**आणखी तीन घटक विचारात घेता येऊ शकतील** (अ) लाभक्षेत्राकरिता असलेले सिंचन सेवांचे प्रमाण (ब) किती पाणी वापरकर्ता संस्था प्रभावीरीतीने कार्यरत आहेत? (क) किती लहान पाणलोटक्षेत्रांचा क्षेत्र विकास कार्यक्रमासोबत विचार करण्यात येतो?"

**१२३.** या तीन प्रदेशांपैकी व त्यातील जिल्ह्यांपैकी सिंचन या क्षेत्रामध्ये कोण राज्यसरासरीच्या वर आहे, कोण राज्यसरासरीच्या खाली आहे व तो किती हजार हेक्टरने खाली आहे किंवा वर आहे **हे लक्षातच येऊ नये म्हणून केळकरांनी सिंचन क्षेत्रातील विकासाच्या मोजमाप करण्यासाठीच्या मापदंडांची उदंड रेलचेल उडवून दिली आहे.** अहवालाच्या पृष्ठ १५ वर परिच्छेद १०४ मध्ये त्यांनी आणखी एक मापदंड सुचविला आहे. तो पुढील प्रमाणे :- "१०४. भूजल हा सिंचनाचा एक महत्त्वाचा भाग आहे, म्हणून तो एक स्वतंत्र विकास निर्देशांक म्हणून समजण्यात यावा." ("Ground Water has a substantial share in irrigation, hence it should be considered as separate development Indicator")

**१२४.** गोंधळात आणखी भर घालणारा आणखी एक मापदंड केळकरांनी पृष्ठ ३४१ (परिच्छेद १०) वर सुचविला आहे. तो पुढील प्रमाणे :- "१०. सध्या पिकाखालील वापरातील क्षेत्राच्या आधारे सिंचन क्षमतेचे व सिंचनाच्या वापराचे मोजमाप केले जाते. याऐवजी, **सिंचनाद्वारे प्रत्यक्ष लागवडीखाली आलेल्या जमिनीचे मोजमाप करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सिंचन सुविधेची वास्तविक स्थिती अधिक दिसून येईल.**" स्वतःच्या कोणत्याही मापदंडाच्या न्याय्यतेबाबत त्यांना स्वतःला खात्री नसल्यामुळेच केळकरांनी सिंचन क्षेत्रात अनेक मापदंड सुचविले आहेत. त्यावरूनच त्यातील प्रत्येक मापदंड काय लायकीचा आहे? हे लक्षात येते व त्याबाबत स्वतंत्रपणे लिहिण्याची गरज नाही.

**१२५.** केळकरांचा हा गोंधळ एवढ्यावरच थांबत नाही तर सिंचनक्षेत्रातील अनुशेषाची व्याख्या (त्यांच्या शब्दात पाण्याच्या कमतरतेची व्याख्या) याबाबत महाराष्ट्रात वाद आहेत. आम्हाला देण्यात आलेली माहिती व अंदाज यामध्ये खूपच तफावत आहे. त्याबाबत वादही आहेत. **त्यामुळे आमचे समाधान होऊ शकलेले नाही. आम्हाला सध्या जी प्रश्नार्थक (खरे म्हणजे संशयास्पद) आकडेवारी देण्यात आलेली आहे व जलसंपदा विभागाचे तात्पुरते अंदाज आम्ही तात्पुरते अंदाज, म्हणून वापरण्याचे ठरविले आहे.** एवढ्या या "पोचट साधनसामुग्रीच्या" आधारावर पुढच्या ८ वर्षांचे निधीवाटप आम्ही केलेले आहे. असा कबूलीजबाबच केळकरांनी आपल्या अहवालात नोंदविला आहे. आपल्या साधनसामुग्रीचा पोचटपणा त्यांना ठावूक असल्यामुळे अत्यंत असमाधानी मनाने पृष्ठ ३४२ वर परिच्छेद १०.२०.२ च्या शेवटी ही अपराधी पणाची भावना त्यांनी पुढील शब्दात व्यक्त केलेली आहे. :- "समितीला असे आढळून आले की, तीनही प्रदेशामधील **पाण्याच्या कमतरतेची व्याख्या,** माहिती व अंदाज यात खूपच तफावत आहे व त्याबाबतीत वादही आहेत. **यामुळे आमचे समाधान होऊ शकले नाही म्हणून, आम्ही सध्याची प्रश्नार्थक माहिती व जलसंपदा विभागाचे अंदाज तात्पुरते अंदाज म्हणून वापरण्याचे ठरविले आहे.** आपले निधीचे नियतवाटप केवळ त्याचा भाग म्हणून मर्यादित ठेवण्यात यावे व तो ८ वर्षात पूर्ण करण्यात यावा. **पुढील ५ वर्षांमध्ये आधारसामग्रीच्या पडताळणीसाठी व समन्यायी वाटपाचा संपूर्ण अंदाज एकत्र करण्यासाठी एक वेगळा स्वतंत्र गट नेमण्यात यावा.**"

**१२६.** उपरोक्त परिच्छेदातील त्यांचा विचार मुळातूनच जास्त चांगला समजतो. तो पुढीलप्रमाणे :- "The committee found that there are **severe gaps and controversies in the definitions, data and estimates of deficits in three regions.** Since these couldn't be resolved to our satisfaction, we decided to use the current questionable data and estimates of the Water Resources Department as provisional estimates, but to limit our allocation of funds only to a part of it, to be completed in the eight years. **A separate independent group should be appointed to verify the data and made complete estimates of equitable distribution in the next 5 years.**" घटनेतील तरतुदी प्रमाणे समन्यायी वाटप करायला केळकरांची ना नाही पण त्यासाठी पुढच्या ५ वर्षात दुसरी समिती नेमा असे ते म्हणतात. आता पुन्हा ५ वर्षांनी दुसरी समिती बसवावयाची तर मग प्रश्न असा निर्माण होतो की आज "केळकरांचे देवदेवक" कशासाठी बसविले?

**१२७.** समन्यायी वाटपाची घटनेतील तरतूद केळकरांना निश्चितपणे ठावूक होती. याचा स्पष्ट पुरावा उपरोक्त परिच्छेदात दिसून येतो. विदर्भ व मराठवाड्याची जी 'धुलाई' करावयाची ती मी आज करून टाकतो. ५ वर्षांनंतर नवी समिती नेमली की पुढे ती समिती समन्यायी वाटपाचे काय करायचे ते करील, केवढा हा घटनेतील तरतुदी विषयी आदर? घटनेतील समन्यायी वाटपाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यास केळकर उघडउघड नकार देतात व ५ वर्षांनी नवी समिती नेमा व त्या समितीने हे काम करावे असे सुचवितात. घटनेतील तरतुदींप्रती उघड उघड औद्धत्त्याचे प्रदर्शन करणारा हा अहवाल त्या एका कारणाने कचऱ्याच्या टोपलीत टाकण्याच्या लायकीचा ठरू शकतो हे त्यांच्या लक्षात आले नसेल काय? ज्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या हुकुमावरून डॉ. केळकरांनी या अहवालाचे एवढे मोठे लेखीकाम केले, त्या माजी मुख्यमंत्र्यांनी नागपूरातील एका कार्यक्रमामध्ये अहवालातील घटनाबाह्य कृत्ये व क्रौर्य कळल्यावर "**तो अहवाल कचऱ्याच्या टोपलीत टाका, माझे काही म्हणणे नाही**" असे जाहीर उद्‌गार काढले. खूप मोठ्या प्रमाणावरील हत्त्यांचा हत्त्यारा असलेल्या वाल्याच्या कुटुंबियांनी त्या पापी नक्षीकामात सहभागी होण्यास नकार दिला होता. विदर्भ व मराठवाड्यातील शेकडो शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या दुर्देवी, दुःखदायक व क्लेशकारक पार्श्वभूमीवर सदस्य-सचिव या नात्याने या नक्षीकामामध्ये सहभागी असलेल्या श्री. के. पी. बक्षी यांनीसुद्धा आपण त्या गावचेच नव्हतो अशी भूमिका घेतल्यास आश्चर्य वाटायला नको. श्री.बक्षी यांच्यासारखे ज्येष्ठ **सेवारत सनदी अधिकारी** "समन्यायी वाटपाच्या घटनेतील तरतुदींकडे आम्ही अजिबात लक्ष देणार नाही. ५ वर्षांनी नवी समिती नेमा ! ती समिती समन्यायी वाटप करेल" अशी घटनाबाह्य भूमिका घेण्यामध्ये कसे काय सहभागी होऊ शकतात? ३७१(२) **चा अंमल आजही सुरु असल्याने मा. राज्यपालांनी गांभीर्याने घेण्याची ही बाब आहे.**

**१२८.** खरे म्हणजे एखादा विषय वादग्रस्त असेल तर तो वाद मिटविण्यासाठी अशा समित्या नेमल्या जातात. अशा समितीकडून समोर आलेले सूत्र किंवा मापदंड सर्वांना एकमताने मान्य व्हावे किंवा किमान बहुमताला ते मान्य व्हावे अशी अपेक्षा असते. इथे तर केळकरांनी हे सर्व चक्र उलटे फिरविले आहे. **महाराष्ट्रातील सर्व पक्षांनी व सर्व विभागांनी एकमताने मान्य केलेला व कायद्यामध्ये स्थानापन्न असलेला सिंचनक्षेत्रातील अनुशेषाच्या मोजमापाचा सर्वमान्य कायदेशीर मापदंड मोडीत काढला व नवे वाद सुरु करणारा विवादास्पद मापदंड पोचट माहितीच्या आधारावर केळकरांनी समोर केला. तो विवादास्पद आहे याची**


**नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !**

# चांदूर रेल्वे तालुका प्राधिकृत रास्त भाव व केरोसिन संघटना

चांदूर रेल्वे तालुका प्राधिकृत स्वस्त धान्य दुकानदार व किरकोळ हॉकर्स केरोसिन परवानाधारक संघ

**श्री. श्रीधरराव धापडे (पाटील), अध्यक्ष** **श्री.रमेशराव मंगळे, उपाध्यक्ष**

**श्री.पुरुषोत्तम बनसोड, सचिव** **श्री.राजेंद्रजी राजनेकर, कोषाध्यक्ष**

**माहिती असल्यामुळे त्याला अनेक पर्याय सुध्दा त्यांनी देऊन ठेवले.** त्या पोचट साधनसामग्रीच्या आधारे पुढच्या ८ वर्षांचे निधी वाटप सूचविले. या साऱ्या गोंधळामुळे तुम्ही जखमी झाला असाल तर पाच वर्षांनी वेगळी समिती नेमा अशी आणखी गोंधळात भर घालणारी शिफारस त्यांनी केली. हा सर्व गोंधळ त्यांनी विचारपूर्वक केला असून घेतलेली 'सुपारी' सुफळ करण्याच्या लांगुलचालनाचा विचार त्यामागे आहे हे उघड आहे.

**१२९.** कोणत्याही शासननिर्णयाचा मथळा किंवा प्रस्तावनेतील मजकूर यामध्ये शासनाचा निर्णय नसतो तर तो त्या शासननिर्णयातील 'शासननिर्णय' या मथळ्यानंतर सुरु झालेल्या मजकूरामध्ये असतो याची जाणीव असतांना घेतलेली सुपारी सुफळ करण्यासाठी केळकरांनी एका कपटी प्रयोगाचा वापर केला आहे. हा कपटी प्रयोग दोन अंकी आहे. ज्या शासननिर्णयाने त्यांची नेमणूक झाली होती त्या ३१ मे २०११ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ३(१) मध्ये "**विकासातील क्षेत्रीय असमतोलाचा अंदाज घेण्यासाठी Indicators ठरविणे.**" हे काम त्यांच्याकडे सोपविले होते. असे असतांना त्यांनी ते काम करण्यास स्पष्ट नकार दिला व त्याऐवजी "**प्रादेशिक समतोल निर्माण करण्यासाठी व तो टिकून ठेवण्यासाठीचे निर्देशांक**" असा विषय आपणच आपल्यासाठी बदलवून घेतला. शासननिर्णयाने ठरवून दिलेली कार्यकक्षा त्यांनी आपल्या स्वतःच्या पातळीवर आपल्याच अधिकारात अनधिकाराने बदलवून घेतली. येथे पहिला अंक संपला. कपटी प्रयोगाचा दुसरा अंक त्यापेक्षा क्रौर्याचे भव्य प्रदर्शन करणारा आहे. '**सिंचन' हे विकासाचे क्षेत्रच त्यांनी गायब केले.** सत्यशोधन समितीने ज्या निरनिराळ्या विकासक्षेत्रातील असमतोल निश्चित केला होता त्यामध्ये सिंचन हे स्वतंत्र विकासक्षेत्र होते व पाणीपुरवठा हे वेगळे विकासक्षेत्र होते. पाणीपुरवठ्यामध्ये नागरी पाणीपुरवठा व ग्रामीण पाणीपुरवठा असे दोन भाग त्या समितीने केले होते. मा. राज्यपालांनी नेमलेल्या अनुशेष व निर्देशांक समितीने सुद्धा सिंचन हे विकासाचे वेगळे व स्वतंत्र क्षेत्र मानले होते.

**१३०.** आपल्या अहवालाच्या चौथ्या प्रकरणात पृष्ठ १३५ वर "असमतोल ठरविण्याचे (Indicator) मापदंड" नव्हे, तर "प्रादेशिक समतोल निर्माण करण्यासाठी व तो टिकून ठेवण्यासाठीचे (Indicator) निर्देशांक" केळकरांनी नमूद केलेले आहेत. **मापदंड ठरविण्याच्या या यादीतून सिंचन हा विषयच त्यांनी गायब केलेला आहे.** निरनिराळ्या विकासक्षेत्रासाठीचे मापदंड तेथे नमूद केले असून उपमथळ्याचा दर्जा देऊन "पाणी" या मथळ्याखाली सिंचनाला त्यांनी ढकलून दिले व **सिंचन हा एक चिल्लर विषय आहे असे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.** या कपट प्रयोगाचा दुसरा अंक येथे संपतो.

**१३१.** देणे-घेणे कवडीचे नाही अशा अतिसुंदर सुविचारांची एक स्वतंत्रपणे लांबलचक यादी या अहवालातून उपलब्ध होवू शकेल. अहवालाच्या पृष्ठ २८१ वर "**विदर्भ प्रदेशामध्ये औष्णिक वीज केंद्रे स्थापन करण्याचा अपेक्षित भार**" या मथळ्याखाली परिच्छेद ९.३.३.६ मधील पुढील मजकूर पहा :- "राज्य क्षेत्राकडे औष्णिक वीज केंद्रांचा मोठा हिस्सा असताना, विदर्भ प्रदेशाच्या क्षमतांमध्ये भर घालण्यासाठी खाजगी क्षेत्रे वेगाने पुढे येत आहे. वर्धा पॉवर, ग्रॅन्डी मल्लिकार्जुन राव (जीएमआर) लॅन्को आयईपीएल, इंडिया बुल्स या व्यापारी तत्त्वावर वीज निर्माण करण्याची शक्यता असलेल्या काही प्रमुख कंपन्या आहेत. या सर्व कंपन्यांनी, चंद्रपूर, नागपूर, अमरावती, गोंदिया व वर्धा या जिल्ह्यांमध्ये आपले लक्ष केंद्रित केले आहे. **या प्रकल्पांमुळे प्रतिकूल सामाजिक व पर्यावरणीय परिणाम होण्याची शक्यता आहे.**"

**१३२.** सर्वसाधारणपणे विदर्भात व मुख्यत्वे चंद्रपूर जिल्ह्यात प्रदुषणाने घातलेला धुमाकूळ व प्रदुषण निर्देशांक सर्वाधिक उच्चतम पातळीवर नेऊन ठेवणाऱ्या व प्रदुषण निर्माण करणाऱ्या कारखान्यांची विदर्भात होत असलेली रेलचेल याबाबतचा मोठा समर्पक उल्लेख "**प्रदुषणात वाढ**" या मथळ्याखाली परिच्छेद ९.३.३.६ मध्ये केळकरांनी केलेला आहे तो पुढील प्रमाणे :- "**चंद्रपूर औद्योगिक क्षेत्राचे वर्चस्व असलेल्या विदर्भ प्रदेशाला (विशेषतः खाणकाम, औष्णिक वीज प्रकल्प, सिमेंट उद्योग इत्यादी असलेल्या क्षेत्रांमध्ये) प्रदूषणाच्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत असून, पर्यावरण व वन मंत्रालयाने २०१० मध्ये या प्रदेशाला भारताचा सर्वाधिक चौथा प्रदुषित औद्योगिक समूह म्हणून वर्गीकृत केले आहे.** हवा, जल व भूमी प्रदूषणाचा विचार करून गणना केलेल्या सर्वसमावेशक पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांकाच्या आधारे हे वर्गीकरण केले आहे. **कोळशावर आधारित औष्णिक वीज प्रकल्प, कोळसा खाणी, सिमेंट प्रकल्प आणि पोलाद व लोह उद्योग हे मोठ्या प्रमाणात असल्यामुळे व हे उद्योग सर्वाधिक प्रदूषण करणारे उद्योग मानले जात असल्यामुळे या प्रदेशाचा सर्वसमावेशक पर्यावरणीय प्रदूषण निर्देशांक सर्वाधिक आहे असे म्हणता येऊ शकेल.**"

**१३३.** महाराष्ट्रातील वीज परिस्थिती व त्या स्थितीत विदर्भ व कोकणाची होणारी पिळवणूक याचे मोठे यथार्थ वर्णन केळकरांनी आपल्या अहवालाच्या पृष्ठ २८१-२८२ वर परिच्छेद ९.३.३.५ मध्ये "**महाराष्ट्रातील वीज परिस्थिती आणि विदर्भाची भूमिका**" या मथळ्याखाली केलेले आहे. ते पुढील शब्दात :- "महाराष्ट्र राज्यात, मोठ्या प्रमाणावरील औष्णिक वीज प्रकल्प येऊ घातले आहे. वस्तुतः, ८९२६९ मेगावॅट इतकी प्रचंड औष्णिक क्षमता असलेले हे एक राज्य आहे. यामुळे, जलविद्युत व अणुऊर्जा यांसह महाराष्ट्राच्या एकूण विद्यमान क्षमतेत सुमारे ५ पट इतकी वाढ होईल. **यापैकी बहुतांश प्रकल्प हे विदर्भ (४१,१९५ मेगावॅट) किंवा कोकण प्रदेशात (३०,९७८ मेगावॅट) येत आहेत.**"

**१३४.** प्रदुषण करणाऱ्या उपरोक्त उद्योगांचे साम्राज्य विदर्भावर आक्रमण करीत आहे हे लक्षात येताच विदर्भ वैधानिक विकास मंडळाने याबाबत अहवाल देण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमली होती. तज्ज्ञ सदस्य श्री. मधुकरराव किंमतकर हे या समितीचे अध्यक्ष होते. या समितीच्या बऱ्याच बैठका झाल्यात. या बैठकीमध्ये समितीने वेगवेगळ्या स्त्रोताकडून मिळविलेल्या माहितीवर विचार करुन दिनांक १९ नोव्हेंबर २००८ च्या बैठकीत आपल्या अहवालाला अंतिम रूप दिले. "**REPORT** on need of regionwise equitable distribution of energy and load sheding" असे या अहवालाचे शीर्षक असून दिनांक २० नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या वैधानिक विकास मंडळाच्या बैठकीत हा अहवाल विचारात घेण्यात आला व संमत करण्यात आला. वैधानिक विकास मंडळाच्या अध्यक्षांनी हा अहवाल मा. राज्यपालांना दिनांक २६ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये (D.O. No. 116/Chairman/RO/2008/761) सादर केला. **विजेचे उत्पादन जर राज्याला आवश्यक आहे तर राज्याच्या सर्व भागामध्ये अशा प्रकल्पांचे समन्यायी वाटप झाले पाहिजे. एकट्या विदर्भाच्याच बोकांडी बसणे अन्यायकारक आहे. असा या अहवालातील एकूण निष्कर्ष आहे.**

**१३५.** केळकर समितीला हा (किंमतकर समितीचा) अहवाल सहज उपलब्ध (झाला असेल किंवा) होऊ शकला असता. त्याचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास केळकरांच्या हे लक्षात आले असते की "**विदर्भातील ६ हजारावर हेक्टर शेतजमिन या प्रकल्पांनी यापूर्वीच गिळली असून १२ हजार हेक्टर ते यापुढे गिळंकृत करीत/करणार आहेत.**" सिंचन सुविधांच्या अभावी प्रचंड आत्महत्त्या होत असलेल्या व सर्वात जास्त सिंचन अनुशेष असलेल्या "**या भागातील ९९२ दलघमी पाण्यावर डल्ला मारला गेला आहे.**" हेही श्री. किंमतकर यांच्या अहवालामुळे त्यांना कळले असते. असमतोलाचे शोधन करण्यासाठी नेमलेल्या केळकरांनी ते काम करण्याचे सोडून समतोल विकासाचा उद्योग आपल्या हाती घेतला, त्या अंगाने जरी विचार करतो म्हटले तरी औष्णिक प्रकल्पांचा वर्षाव फक्त विदर्भामध्येच करण्यामध्ये महाराष्ट्राचा समतोल बिघडला असून या अपकृत्त्याला जबाबदार असलेल्या त्यावेळच्या राज्यकर्त्यांचा खूपच तोल गेलेला होता हे नमूद करून त्याबाबतच्या 'रोख' उपाय योजना त्यांनी मांडल्या असत्या तर त्यांच्या अहवालाचे मोल खूपच वाढले असते. पण **उपरोक्त परिच्छेद १३१ ते १३३ मधील मजकूर वाचला तर इतक्या महत्त्वाच्या समतोल बिघडवणाऱ्या विषयाच्या बाबतीत अतिसुंदर सुविचारांचा वृथा वर्षाव करण्यापलीकडे त्यांनी काही केले नाही.**


नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

**कृषी उत्पन्न बाजार समिती, चांदूर रेल्वे, जि.अमरावती**

**श्री.सी.एस.इंगळे, सचिव** **श्रीमती.के.पी.धोपे, प्रशासक**

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

**चांदूर रेल्वे विकास खंड सह. शेतकी खरेदी-विक्री समिती मर्या. (र.न.६१३) चांदूर रेल्वे जि.अमरावती**

**श्री.गो.अ.देशमुख, मुख्य प्रशासक** **श्री.एस.बी.राऊत, व्यवस्थापक**

## (१०) २२ मार्च २०१५

# बळीराजाच्या ऐका हाका ! जाळुनी किंवा पुरुनी टाका

**१३६.** केळकरांनी आपला अहवाल तयार करीत असतांना भारतीय घटनेतील अनेक तरतुदींकडे दुर्लक्ष केले. काही बाबतीत तर त्यांनी सरळसरळ घटनेतील तरतुदींच्या विरोधात शिफारशी केलेल्या आहेत. अत्यंत ठळक व विक्षिप्तपणाचे प्रतिनिधीत्त्व करणारे एक उदाहरण म्हणजे अहवालाच्या पृष्ठ १९३ वर त्यांनी आपल्या "**मुख्य शिफारशी**" सांगितल्या असून त्यातील पहिलीच शिफारस परिच्छेद ६.९.१ मध्ये "**प्रादेशिक मंडळाची पूनर्रचना करणे**" याबाबतची असून ती पूर्णपणे भारतीय घटनेच्या कलम ३७१(२) च्या विरोधात आहे.

**१३७.** मुळात राज्याचे मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ या लोकनियुक्त प्रतिनिधींनी १९६० पासून पुढच्या काळात समन्यायाने कारभार चालविला असता तर घटनेच्या कलम ३७१(२) ची यंत्रणा अस्तित्वात येण्याचे काही कारणच नव्हते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर २० वर्षांनी प्रादेशिक असमतोलाचे भेसूर चित्र जेव्हा समोर दिसायला लागले तेव्हा कलम ३७१(२) च्या यंत्रणेची एकमताने मागणी करण्यात आली. खुद्द महाराष्ट्र शासनाच्या ॲडव्होकेट जनरलनी शासनाच्या वतीने न्यायालयात याचा कबूली जबाब दिला व तो न्यायालयाच्या निर्णयामध्ये नोंदला गेला आहे. सन २००३ च्या याचिका क्रमांक ५८७२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ६ मे २००८ रोजी दिलेल्या निर्णयाच्या परिच्छेद 23(4) (ii) मधील पुढील मजकूर पहा :- "The learned Advocate General submits that the total number of MLAs from the Rest of Maharashtra region far outweighs the MLAs from the Vidarbha and Marathwada regions. Hence, if the directives of the Governor are to be subject to the vote of the Legislature, they will never be implemented and the very purpose of Article 371 of the Constitution of India will be defeated."

**१३८.** राज्याच्या लोकप्रतिनिधींना, मंत्रिमंडळाला व मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्रातील या तीनही विभागाच्या विकासाचा समतोल कायम राखता आला नाही. त्यामुळेच ३७१(२) ची यंत्रणा अस्तित्वात आली असे असतांना डॉ. केळकर यांनी प्रादेशिक मंडळाची जी पूनर्रचना सुचविलेली आहे. त्यामध्ये राज्याचे मुख्यमंत्री यांनाच अध्यक्षस्थानी बसविले असून उपमुख्यमंत्री हे उपाध्यक्ष म्हणून नेमावेत असे सुचविले आहे. मंत्रिमंडळातील वरिष्ठतम कॅबिनेट मंत्री कार्यकारी अध्यक्ष असतील अशीही त्यांची शिफारस आहे. त्या शिवाय कॅबिनेट मंत्री (वित्त व नियोजन) हे सदस्य असतील व प्रदेशातील इतर कॅबिनेट मंत्री हे सुद्धा सदस्य असतील. ही संपूर्ण शिफारस निःसंशयपणे कलम ३७१(२) च्या विरोधात आहे.

**१३९.** घटनेतील तरतुदींच्या सरळसरळ विरोधात शिफारशी करण्याचे दुसरे आणखी एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे **घटनेच्या कलम ३७१(२) चा अंमल चालू असतांना व त्या कलमात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र असे तीनच प्रदेश असतांना केळकरांनी त्यामध्ये सरळसरळ तीन 'कल्पित प्रदेश' व एक 'कल्पित सदृश प्रदेश' अशी सात प्रदेशांची कल्पना मांडली आहे.** सरळसरळ घटनेतील तरतुदींच्या विरोधात अशी शिफारस करतांना केळकरांची आढ्यता मात्र वाखाणण्यासारखी आहे. आपल्याकडे शासननिर्णयाने विचारार्थ जो विषय सोपविला आहे त्यामध्ये हा आगावूपणा बसत नाही याची कल्पना असल्यामुळेच आमच्या विचारार्थ सोपविलेल्या विषयाची व्याप्ती हे कुकर्म करतांना आम्ही आमच्याच पातळीवर वाढवून घेतली आहे अशी शेखी केळकरांनी मारली आहे. अहवालाच्या पृष्ठ १०५ वरील परिच्छेद ४.१.१ मध्ये त्यांनी दिलेला कबूलीजबाव त्यांच्याच शब्दात पुढील प्रमाणे :- "**आम्ही त्यांचा समावेश आभासी किंवा कल्पित क्षेत्रे म्हणून केला आहे. (एका अर्थाने, अशाप्रकारे आम्ही आमच्या विचारार्थ विषयाच्या अर्थाची व्याप्ती विस्तारली आहे.)**"

**१४०.** कोणत्याही शासननिर्णयाचा मथळा किंवा प्रस्तावनेतील मजकूर यामध्ये शासनाचा निर्णय नसतो तर तो त्या शासननिर्णयातील 'शासननिर्णय' या मथळ्यानंतर सुरु झालेल्या मजकूरामध्ये असतो याची जाणीव असतांना केळकरांनी "**महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल**" असे आपल्या अहवालाचे नामकरण केलेले आहे. खरे म्हणजे त्यांच्याकडे शासननिर्णयाने सोपविलेले काम लक्षात घेतले तर "**महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल**" असे व असेच नाव या अहवालाला योग्य ठरले असते व शोभून दिसले असते पण तसे नाव ठेवण्याचीसुद्धा लाज वाटावी एवढा हा अहवाल असमतोलाचे दर्शन घडविण्याच्याबावतीत निकृष्ट असल्यामुळे केळकरांनी आपल्याच स्तरावर अहवालाचे नामांतरसुद्धा अनधिकाराने व बेकायदेशीरपणे आपणच घडवून आणले. दिनांक ३१ मे २०११ रोजीच्या ज्या शासन निर्णयाने केळकर समितीची नेमणूक केली होती त्या शासन निर्णयाने या समितीकडे पुढील महत्त्वाचे काम (कार्यकक्षा) सोपविले होते. :- "(१) विकासातील क्षेत्रीय असमतोलाचा अंदाज घेण्यासाठी Indicators ठरविणे. (२) वरील १ बाबत सन २०१० अखेर **अगदी अलिकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भात असमतोल निश्चित करणे.**" असे असतांना "**मागास म्हणून क्षेत्रांची निश्चिती करणे हे आमचे मुख्य काम नव्हे. आमच्यासाठी महाराष्ट्रातील मागास असलेली 'क्षेत्रे' व 'प्रांत' हे आधीच निश्चित केलेले व ज्ञात आहेत.**" अशी सुटका करून घेणारी दोन वाक्ये अहवालाच्या परिच्छेद ४.१.२ मध्ये टाकून अहवालाच्या नामांतराचा मार्ग केळकरांनी मोकळा करून घेतला.

**१४१.** डॉ. केळकरांनी सर्वात जास्त माती कुठे खाल्ली असेल तर ती शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या व सिंचनसुविधांचा अभाव यांचा संबंध लपवून ठेवण्याचे दुष्कर्म पार पाडून. वस्तुतः गेल्या १५-२० वर्षांमध्ये लहानापासून थोरापर्यंत सर्वांनाच ही गोष्ट कळून चुकलेली आहे. सिंचनसुविधांचा अभाव असलेल्या भागातच शेतकऱ्यांच्या या आत्महत्त्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. ही गोष्ट लपवून ठेवण्याचे केळकरांनी ठरविल्यामुळे त्याबाबतची माहिती तपशीलवारपणे मांडणे आवश्यक झाले आहे.

**१४२.** मंगळवार, दिनांक १५ ऑगस्ट २००६ रोजी सकाळी भारताचे तत्कालीन मा. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग झेंडावंदनानंतर दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून भाषण करीत होते. दूरदर्शनवरून देशभर होत असलेल्या थेट प्रक्षेपणामुळे लक्षावधी नागरिकांना हे थेट भाषण ऐकता येत होते. "**मेरे प्यारे देशवासियो, भाईयो, बहनो और प्यारे बच्चो**" या शब्दाने त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. पहिल्या ५-१० मिनिटात निरनिराळ्या क्षेत्रात भारताने कसा विकास केला आहे व भारत कसा विकास करीत आहे याचे वर्णन केल्यानंतर एकदम त्यांच्या चेहऱ्यावर दुःखमिश्रित गंभीर भाव उमटले व त्यांच्या तोंडून विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांबाबत पुढील उद्‌गार बाहेर पडले :- "भाईयो और बहनो, चारो ओर तरक्की तो हो ही रही है. लेकिन उसे देखकर मुझे कुछ चिंताएं भी होती है. जहां एक और हम दुनिया के देशों के बीच अपनी सही जगह हासिल करने के लिए तेजी से आगे बढ रहे है, वहीं दूसरी ओर बडी तादाद मे हमारे कई तबको के लोग आधुनिकता और विकास से दूर है. दो वक्त की रोटी कमाने के लिए वे जी-तोड मेहनत कर रहे है. वे अभीभी असमान सामाजिक व्यवस्था से पीडित हैं. मुझे अहसास है कि देश के कई हिस्सो में हमारे किसान भाई काफी संकट मे है और काफी मेहनत-मशक्कत के बाद भी उन्हें अपनी जमीन से सही कमाई नही हो पा रही है. **जब मै विदर्भ गया तो वहां के किसानों के हालात ने मुझ पर गहरा असर डाला. इन्हीं हालात की वजह से किसान खुदकुशी करने के लिए मजबूर हो रहे है. हमें सोचना होगा कि हम उनकी दिक्कतों को कैसे दूर करें और उन्हे बेहतर आमदनी कैसे दिलाएं.**"

**१४३.** एवढ्या मोठ्या खंडप्राय भारताच्या मा. पंतप्रधानांनी दिल्लीच्या लाल किल्ल्यावरुन स्वातंत्र्य दिनानिमित्त झेंडावंदनानंतर केलेल्या भाषणामध्ये **शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात फक्त विदर्भाचा उल्लेख केला होता. व तो एकदा नव्हे तर दोनदा केलेला होता.** हा उल्लेख ज्या कुणी दूरदर्शनवरून थेट पाहिला किंवा ऐकला असेल त्या महाराष्ट्रातील या अपप्रकाराला जबाबदार असलेल्या प्रत्येक लोकप्रतिनिधीची मान (मग तो मंत्री असो वा आमदार) निश्चितच लज्जेने खाली झुकली असेल. मा. पंतप्रधानांनी आपल्या या भाषणात आहे ही स्थिती केवळ सांगितली नाही तर आपत्तीचा उगम कशातून आहे व आपत्ती निवारणार्थ काय उपाययोजना केलेली आहे याबावत अत्यंत महत्त्वपूर्ण असे सूचक उद्‌गार काढले. ते शब्दशः पुढील प्रमाणे :- "हमने तीन सालों में किसानों के लिए कर्ज की सुविधा को दोगुना करने के अपने वादे को लगभग पूरा किया है. हम किसानों को फसल उगाने के लिए सात फीसदी की दर पर कर्ज मुहैया करा रहे हैं. **विदर्भ में कर्ज के बोझे से दबे हुए किसानो के बकाया कर्ज के व्याज को माफ कर दिया गया है..... इसके बावजूद मैं मानता हूँ कि किसानो की हालत सुधारने के लिए अभी बहुत कुछ किया जा सकता है खास तौर पर, उन इलाकों में जहां सिंचाई की सुविधाएं नही हैं और खेती बारिश पर निर्भर है.** हमें अपने किसानो को फायदेमंद किमते दिलाने की ओर तवज्जो देनी होगी. मै अपने उन किसानों की दुःख तकलीफों से वाकिफ हूँ जो भारी कर्ज मे डूबे हुए हैं. किसानो के कर्ज के बोझ को हल्का करने के लिए हमने हाल ही में एक दल गठित किया हैं जो इस समस्या पर गौर करेगा. **मुझे यकीन है कि हम चंद महीनों में किसानों के कर्ज के बोझ को हल्का करने के लिए कुछ ठोस उपाय कर पाएंगे**" मा. पंतप्रधानाच्या भाषणातील अवतरणामध्ये दिलेला प्रत्येक शब्द विनचूकपणे नमूद केलेला आहे.

**१४४.** मा. पंतप्रधानांनी घोषित केलेले उपरोक्त निष्कर्ष हे त्यांनी त्यापूर्वीसुद्धा जाहीररीत्या मांडले होते. "**जब मै विदर्भ गया तो वहांके किसानों की हालात ने मुझपर गहरा असर डाला.**" हा जो त्यांच्या भाषणातील संदर्भ आहे, तो जुलै २००६ मधील त्यांच्या विदर्भ भेटीशी संबंधित आहे. दिनांक १ जुलै २००६ रोजी नागपूर मुक्कामी त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जे अधिकृत वृत्तपत्रीय

निवेदन वितरीत करण्यात आले होते, त्यामध्ये सुद्धा आत्महत्येच्या कारणाविषयी "The causes of the crisis seem to be many. The Primary ones seem to be .... poor irrigation" (Page 1 of the Press Release (By Govt. of India) on conclusion of Prime Ministers Visit to Vidarbha on 1st July 2006 at Nagpur.) असे नमूद केलेले आहे. एवढे म्हणूनच ते थांबले नाहीत तर सिंचनाच्या खात्रीलायक सुविधा निर्माण व्हाव्यात म्हणून पॅकेजमधील सहा जिल्ह्यासाठी या कामी २१७७ कोटी रुपयाचा निधी त्यांनी उपलब्ध करून दिला. (Para 5 of the Press Release (By Govt. of India) on conclusion of Prime Ministers Visit to Vidarbha on 1st July 2006 at Nagpur.)"

**१४५.** मन विषण्ण करुन सोडणाऱ्या इतक्या मोठ्या प्रमाणावरील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या ही राज्याला एक अत्यंत लाजिरवाणी अशी घटना आहे, याबद्दल कुणाचेही दुमत होईल असे वाटत नाही. **आत्महत्त्या करणारा हा प्रत्येक शेतकरी** (एखादा दुसरा अपवाद सोडल्यास) **एक म्हणजे कोरडवाहूचा कास्तकार होता व दुसरे म्हणजे कर्जबाजारी होता,** ही गोष्ट आता निर्विवादपणे सिद्ध झालेली आहे. **या आत्महत्त्यांच्या मागे मुख्य कारण सिंचन सुविधांचा अभाव हे आहे ही गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे.** मान्यवर केंद्रीय मंत्र्यांनी जाहीरपणे ही भूमिका मांडलेली आहे. देशाच्या मा. कृषिमंत्र्यांनी "शेतीसाठी पाण्याच्या खात्रीलायक उपलब्धतेचा अभाव हेच विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागचे मुख्य कारण आहे" असे दिनांक ३१ जुलै २००६ रोजी लोकसभेत सांगितले. केंद्रीय माहिती व प्रसारण तसेच सांसदीय कार्यमंत्री श्री. प्रियरंजनदास मुन्शी यांनी त्याच दिवशी म्हणजे दिनांक ३१ जुलै २००६ रोजी नागपूर येथे "शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांमुळे उद्भवलेल्या भीषण स्थितीतून बाहेर काढण्यासाठी राज्यकर्ते आणि विरोधी पक्षाने सिंचनाच्या सोयीकडे, विशेषतः **विदर्भातील सिंचनाकडे प्राधान्याने लक्ष दिल्यास हा भाग कॅलीफोर्निया म्हणून विकसित होऊ शकतो.**" असे सांगितल्याचे आपण सर्वांनीच त्यावेळी दूरदर्शनवर पाहिले व ऐकले आहे. "**राज्यकर्त्यांनी गंभीरपणे सिंचनाची समस्या दूर केली असती तर आज शेतकऱ्यांवर ही वेळ आली नसती.**" असेही त्यांनी त्या भाषणात सांगितले.

**१४६.** राज्याच्या तत्कालीन मा. मुख्यमंत्र्यांनी सुद्धा मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या आत्महत्यांचे मुख्य कारण सिंचन सुविधांचा अभाव हेच आहे, ही गोष्ट सभागृहात स्पष्टपणे सांगितली होती. अधिकृत प्रतिवेदनातील त्यांनी वापरलेली शब्दरचना पुढील प्रमाणे आहे. :- "**विदर्भात शेतकऱ्यांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण जास्त आहे,** ही वस्तुस्थिती आहे. मराठवाडा, खानदेश किंवा अन्य प्रगत जिल्ह्यांमध्ये सुद्धा शेतकरी आत्महत्या करीत आहेत. परंतु विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे...... **या भागात सिंचनाची सुविधा अतिशय अपुरी आहे. नाही म्हटले तरी चालेल. त्यामुळे विदर्भात केवळ सिंगल क्रॉप घेतले जाते. सिंगल क्रॉपवरुन डबल क्रॉपवर जाण्यासाठी सिंचनाची आवश्यकता आहे.**" *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन ३ जुलै २००६ पृष्ठ ३क्यु-१ व २)*

**१४७.** देशाच्या मा. पंतप्रधानांनी दिनांक १ जुलै २००६ रोजी नागपूर येथे जे अधिकृत वृत्तपत्रीय निवेदन प्रसारित केले त्यात "We are announcing a series of measures for the 6 affected districts of Vidarbha namely, Amravati, Wardha, Yavatmal, Akola, Washim and Buldhana." असे नमूद करण्यात आले होते व त्याच निवेदनात तातडीच्या व दीर्घमुदतीच्या अनेक उपाययोजना त्यांनी घोषित केल्या होत्या. दीर्घमुदतीची पहिलीच उपाययोजना त्यामध्ये पुढील प्रमाणे नमूद होती. :- "There is a crying demand all around for improving irrigation. We are allocating Rs. 2177 crores from the Central Government for Completion of major, medium and minor irrigation projects in these districts over the next 3 years " (See page 1 and 2 of the Text of the Prime Ministers Statement issued on 1st July 2006 at Nagpur) शेतकऱ्यांना सिंचनसुविधा उपलब्ध करण्यासाठी केंद्राकडून निधी घेण्यात आला व पुढे प्रकल्पांचे पाणी खाजगी भांडवलदारांना औष्णिक प्रकल्पांसाठी विकून टाकले हा राज्यकर्त्यांच्या कर्तबगारीचा पुढचा इतिहास होय.

**१४८.** देशाच्या मा. पंतप्रधानांनी आलेल्या संकटाला तोंड देण्यासाठीची उपाययोजना म्हणून २१७७ कोटी रुपयांचा निधी या सहा जिल्ह्यांसाठी जादाची जलसिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी जाहीर केला. मा. राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे देण्यात येणाऱ्या निधीशी याचा काहीही संबंध नाही, ही गोष्ट राज्याच्या तत्कालीन मा. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात पुढील शब्दात नमूद केली :- "हा निधी तीन वर्षामध्ये उपलब्ध होईल व त्यानुसार तो खर्च केला जाईल. तसेच शासनाकडून इतर वेळी बॅकलॉगसाठी जो निधी दिला जातो तो या निधी व्यतिरिक्त असतो. वेगाने प्रकल्प पूर्ण होण्यासाठी दोन्ही निधी एकत्रित केल्यास प्रकल्प पूर्ण होऊ शकतील. अशा पद्धतीने निर्णय घेण्यात आला आहे." *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन ३ जुलै २००६ पृष्ठ ३टी-२)* मा. मुख्यमंत्र्यांनी हे जे सभागृहात जाहीर केले त्याचा आधार मा. पंतप्रधानाच्या निवेदनात आहे. त्या निवेदनात असे स्पष्टपणे म्हटले होते की :- "I do realise that the success of this approach depends on the implementation. **In addition to state and local implementation** and monitoring mechanisms, my office will monitor implementation of the package of relief measures. I have already asked my Principal Secretary to take a meeting of the officers concerned to avoid bureaucratic delays" (Page 2 of the Press Release (By Govt. of India) on conclusion of Prime Ministers Visit to Vidarbha on 1st July 2006 at Nagpur.)

**१४९.** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या मा. सभापतींच्या दालनामध्ये दिनांक २८ जुलै २००६ रोजी झालेल्या एका अधिकृत बैठकीमध्ये तत्कालीन पाटबंधारे मंत्री श्री. अजित पवार यांनी काढलेले उद्‌गार या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहेत. सदरहू बैठकीच्या अधिकृत प्रतिवेदनातील संबंधीत भाग पुढील प्रमाणे :- "विदर्भासाठी माननीय राज्यपालांनी निदेश दिलेले असले तरी अजूनही विदर्भातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. **आंध्र प्रदेश राज्यामधील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या केल्या आहेत. या आत्महत्या रोखण्यासाठी आंध्रप्रदेश सरकारने सिंचन प्रकल्पाकरिता मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिला आहे. अशा प्रकारे सिंचन प्रकल्पांसाठी अधिकचा निधी उपलब्ध करुन देऊन सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न त्या राज्याने केलेला आहे. त्याप्रमाणे आपल्याकडेसुद्धा सिंचन प्रकल्पासाठी जास्त निधी देऊन ही कामे लवकर पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.** आपण सिंचन प्रकल्पाची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केली आणि त्यासाठी निधी कमी पडत असेल तर माननीय पंतप्रधानांना आपण सांगू शकू की आम्ही अनेक प्रकल्पाची कामे सुरू केलेली आहेत परंतु त्यासाठी बजेट कमी पडते. तेंव्हा आपण देखील आम्हाला निधी द्यावा. परंतु आपण अगोदरच मर्यादित स्वरुपाची कामे सुरू केली तर माननीय पंतप्रधान असे म्हणतील की तुमच्या बजेटमधूनच ही कामे तुम्ही घ्यावीत. या प्रकल्पासाठी निधी आणण्यासाठी आपण वर्ल्ड बँकेबरोबरसुद्धा चर्चा करू शकतो."

**१५०.** मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या या आत्महत्त्या उपजिवीकेच्या साधनावर आलेल्या प्रचंड तणावाचे प्रतिनिधीत्त्व करतात व त्याचबरोबर अशा प्रचंड तणावाच्या समयी लोकांच्या उपयोगी पडण्याच्या शासनाच्या कुवतीचा तात्विक प्रश्नही त्यातून उपस्थित होतो, असे मत मा. पंतप्रधानांनी नेमलेल्या नियोजन आयोगाच्या सत्यशोधन पथकाने आपल्या अहवालाच्या पृष्ठ १४ वर व्यक्त केले आहे ते पुढील शब्दात :- "ix) Suicides and action by the State :- Suicide, an extreme expression of distress, has raised grave questions regarding not only the historical neglect of the region but also a philosophical question about the capacity of Governments to be of immediate service to people in such acute distress." त्याच अहवालाच्या पृष्ठ १९ वर पुढील प्रमाणे मत व्यक्त करण्यात आले होते :- "**The crying need of the area is for water, while it is true that the area is awaiting a favorable allocation under the Governor's directives,** the real ailment is also appropriate planning of projects which would benefit the most people......The list of projects to be taken up for Vidarbha should be reviewed urgently and a time bound programme for the implementation of the full backlog should be designed and put into implementation mode within the next six months, that is right after the monsoons......The intention should be to reduce the backlog of development of this component within the foreseeable future, in any case the projects should be sanctioned and work should be started no later than the current financial year."

**१५१. एवढ्या मोठ्या संख्येने झालेल्या व होत असलेल्या या आत्महत्त्या म्हणजे सातत्त्याने फोफावत गेलेल्या प्रादेशिक असमतोलाच्या अत्यंत जहरी वृक्षावर अतिविपूल प्रमाणात पैदा झालेली विषारी व कटू फळे आहेत.** सिंचनाची सुविधा हे कृषी उत्पादनासाठीचे एक अत्यंत आवश्यक साधन आहे हे समजण्याएवढी बुद्धीमत्ता केळकरांच्या ठिकाणी निश्चितच होती व आहे. "**महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्त्या होत आहेत त्यांची संख्या नमूद करून सिंचनसुविधांचा अभाव असलेल्या भागातच हा दुर्देवी प्रकार घडत आहे" याचे तपशील नमूद करण्यासाठी केळकरांना आपली लेखणी झिजविता आली नाही.** निरनिराळी १३ प्रकरणे समाविष्ट असलेल्या ४१३ पानामधील एखादे प्रकरण या तपशीलासाठी खर्ची घालावे असे त्यांना वाटले नाही, आपल्या अहवालाच्या ५७१ पानांच्या त्या अगडबंब रद्दीमध्ये त्यांनी १०८ तक्ते टाकले आहेत. त्यातला एखादा तक्ता या तपशीलासाठी त्यांना वापरता आला असता. एकूण ३० आकृत्यांपैकी एखाद्या आकृतिमध्ये जरी त्यांनी हे तपशील भरले असते तर अनुशेषग्रस्त व आत्महत्त्यांनी त्रस्त अशा भागाकडे पहाण्याची त्यांची मानसिक विकृती थोडी तरी सौम्य भासली असती. निरनिराळी ११२ जोडपत्रे त्यांनी या अहवालाला जोडलेली आहेत. एखाद्या जोडपत्रात त्यांनी उपरोक्त तपशील नमूद केले असते तर, दिवा लावणे व अंधार दूर करणे ही दोन वेगवेगळी कामे नाहीत, दिवा लावला की अंधार दूर होतोच, हे केळकरांच्या लक्षात आले असते. असमतोल उध्वस्त केला की समतोल

**(पुढील मजकूर पृष्ठ १९० वर)**

## (११) २९ मार्च २०१५

# माजी मालगुजारी तलाव, खारपाणपट्टा व दुष्काळी तालुके

**१५३.** स्वातंत्र्यपूर्व भारतामध्ये किंवा स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही अनेक वर्षे प्रत्येक खेड्यामध्ये किंवा शहरामध्ये गावकुसावर किंवा गावकुसाच्या बाहेर मागासलेल्या वस्त्या असत, कमालीची गरिबी, शिक्षणाचा अभाव व सुविधांची दुरावस्था या वस्त्यांमधून प्रकर्षाने दिसून येत असे. त्या गावातील हा दुर्लक्षित भागच म्हणाना! दुष्काळी तालुके, खारपाणपट्टा व मालगुजारी तलावांचे प्रदेश म्हणजे महाराष्ट्र या प्रगतिशील राज्यातील सिंचनसुविधांच्या बाबतीत अत्यंत मागासलेले भाग म्हणून सांगता येतील. त्या भागामध्ये सिंचनसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तळमळीने प्रयत्न करण्यापेक्षा तेथील सिंचनसुविधांच्या अभावाचा गाजावाजा करून त्या भागांना अशा सुविधांपासून वंचितच ठेवण्याचे काम काही राजकारणी मंडळींनी सातत्त्याने केल्याचे दिसून येते. प्रथम माजी मालगुजारी तलाव, त्यानंतर खारपाणपट्टा व त्यानंतर दुष्काळी तालुक्यांची माहिती घेऊ. त्यासोबतच या दुर्दैवी प्रकरणांचा केळकरांनी कसा दुरुपयोग केला तेही पाहू.

**१५४.** भंडारा जिल्ह्यात माजी मालगुजारी तलावांची संख्या ३२५० असून त्यापासून ४०,७३४ हेक्टरची संभाव्य सिंचनक्षमता उपलब्ध होऊ शकते. चंद्रपूर जिल्ह्यात अशा तलावांची संख्या १७२६ असून संभाव्य सिंचनक्षमता ३८,९४३ हेक्टर आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये १६४० ही तलावांची संख्या असून ३०,५०२ हेक्टर संभाव्य सिंचनक्षमता असू शकते. नागपूर जिल्ह्यामध्ये अशा तलावांची संख्या २०३ असून त्यापासून ५८१० हेक्टर संभाव्य सिंचनक्षमता असू शकते. महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या (१९९९) अहवालाच्या खंड १ मध्ये पृष्ठ ५४७ वरील विवरणपत्र ७.६.३ चे अवलोकन केल्यास असे दिसून येते की या चार जिल्ह्यात माजी मालगुजारी तलावांची संख्या ६८१९ असून त्यांना सुस्थितीत आणल्या गेल्यास त्यातून संभाव्य सिंचनक्षमता १,१५,९८९ हेक्टर असू शकते.

**१५५.** या जिल्ह्यांच्या जुन्या गॅझेटीयरमधून व सिंचन आयोगाच्या अहवालातून जी अधिकृत माहिती उपलब्ध होते त्यानुसार जवळजवळ ३०० वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी स्वतःच्या श्रमाने व स्वतःच्या पैशाने हे तलाव गोंड राजांच्या कारकीर्दीत बांधले. या जिल्ह्यांमध्ये १२०० ते १६०० मिमि पर्जन्यमान आहे. मुख्यत्वे भाताच्या पिकास सप्टेंबरच्या शेवटी किंवा ऑक्टोबरमध्ये पाऊस झाला नाही तर मोठा मार बसतो व उत्पादनात मोठी घट येते. धानाच्या उत्पादनात सातत्त्य व खात्री रहावी म्हणून त्या काळातील शेतकऱ्यांनी खाजगी प्रयत्नाने अशा तलावांची शृंखला त्यावेळी निर्माण केली. पुढे इंग्रजी राजवटीत मालगुजारांच्या कडे 'मध्यस्थ' म्हणून हे तलाव सोपविण्यात आले. जमीन महसूल कायदा १९१७ च्या कलम ७९ नुसारच्या अधिकृत कागदपत्रात लाभधारक शेतकऱ्यांना मोफत पाणी वापराचा हक्क असल्याच्या नोंदी आहेत. मात्र देखभाल व दुरुस्तीची व्यवस्था कुणाकडे असेल? याच्या नोंदी दिसून येत नाहीत. सन १९५० च्या संपत्ती हक्क संपादन कायद्यानुसार मालगुजारांच्या अधिपत्त्याखालील हे तलाव मध्यप्रदेश शासनाच्या ताब्यात गेले. **मालगुजार हे माजी झाले** व हे तलावसुद्धा **'माजी मालगुजारी तलाव'** झाले. त्याच नावाने ते आजही ओळखले जातात.

**१५६.** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर या तलावांची मालकी पाटबंधारे विभागाकडे आली आणि "Everybody's property is Nobody's property" अशी या तलावांची अवस्था झाली. १९६३ नंतर हळूहळू हे तलाव मोडकळीस आले, त्यातील अनेक गाळांनी भरले, अनेकांचे क्षेत्र झाडाझुडपांनी व्यापले. परिणामी येवा घटला. याबाबतच्या उपाययोजनाचा विचार झाला नाही असे नाही पण कृती मात्र फारशी काही झाली नाही. त्याचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे :-

(अ) **बर्वे आयोगाने** या माजी मालगुजारी तलावांबाबत नवे धोरण तातडीने ठरवावे अशी शिफारस केली होती पण त्यावर काही उपाययोजना झाली नाही.

(ब) **दांडेकर समितीने** खाजगी धनातून व खाजगी श्रमातून निर्माण केलेली व देखभाल दुरुस्तीच्या अभावी मोडकळीस आलेली ही सिंचनक्षमता राज्यशासनाने निर्माण केलेली सिंचनक्षमता म्हणून धरली व त्या आधारावर त्यांच्या अहवालाच्या परिच्छेद ७.६ मध्ये "विदर्भामध्ये मुख्यत्वेकरून भंडारा, चंद्रपूर व नागपूर जिल्ह्यात जलसिंचनाचा विकास झालेला आहे" असा शेरा मारला व विदर्भाचा प्रत्यक्षात खूप मोठा असलेला अनुशेष त्याप्रमाणात कमी दाखविण्यामध्ये यश मिळविले.

(क) या मालगुजारी तलावांचे काय करता येईल? यासाठी शासनाने दोन वर्षांपूर्वी वैधानिक विकासमंडळाचे तज्ज्ञ सदस्य **ॲड.मधुकरराव किंमतकर** यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. त्या समितीने आपला अहवाल २०१२ मध्ये शासनास सादर केला पण त्याबाबत पुढे काहीही कारवाई करण्यात आली नाही.

**१५७.** अनुशेष व निर्देशांक समितीने आपल्या अहवालात पृष्ठ ४५ वर **"विदर्भातील भूतपूर्व मालगुजारी तलाव"** या मथळ्याखाली याबाबत विदर्भातील लोकांची मागणी काय आहे हे परिच्छेद ३.२० मध्ये पुढील शब्दात नमूद केले आहे :-

"३.२० **आम्हाला अशी सूचना करण्यात आली आहे की, विदर्भातील चार जिल्ह्यांमधील मालगुजारी तलावांच्या खालील सिंचनक्षम क्षेत्र जिल्ह्यातील एकूण सिंचन क्षेत्रामधून वगळण्यात यावे.** कारण :- (अ) ते शंभर वर्षाइतके जुने असून गाळ साचल्यामुळे व सर्वसाधारण दुरुस्तीची कामे न केल्यामुळे त्यांची मूळ सिंचनक्षमता परिपूर्णपणे अधिक काळ वापरता येणार नाही. (ब) मालगुजारी तलाव हा खाजगी प्रयत्नाने व गुंतवणुकीद्वारे बांधण्यात आला आहे. म्हणून त्यांना खाजगी मालकीच्या विहिरींप्रमाणेच समजण्यात यावे."

**१५८.** माजी मालगुजारी तलावांची सद्यस्थिती व त्याबाबत लोकांच्या कडून येणाऱ्या मागण्या यांचा अनुशेष व निर्देशांक समितीने परिच्छेद ३.२१ मध्ये पुढील शब्दात आढावा घेतला आहे :-

"१०० हेक्टर्स किंवा त्यापेक्षा कमी सिंचनक्षमता असणारे मालगुजारी तलाव जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्यामुळे त्यांची देखभाल करण्यासाठी जे अनुदान मिळत असेल ते अपुरे असल्याने त्यांच्याकडे जवळजवळ दुर्लक्षच करण्यात आले. १०० हेक्टर्स किंवा त्यापेक्षा अधिक सिंचनक्षमता असणारे मालगुजारी तलाव त्यावरील मालगुजारी हक्क रद्द झाल्यानंतर परिरक्षण करण्यासाठी पाटबंधारे विभागाने हाती घेतले आहे. त्यांचा ताबा घेतल्यानंतर फक्त उत्प्लवमार्ग क्षमतेत वाढ करण्याची बांधकामेच हाती घेण्यात आली होती. काही प्रकरणांमध्ये, या फेरबदलामुळे तलावांच्या पाणी साठवण्याच्या क्षमतेत घट झाली आहे. प्रमुख बांधकामांच्या दुरुस्तीचा किंवा बळकटीकरण करण्याचा किंवा कालवा वितरण पद्धतींमध्ये सुधारणा करण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला नसल्याने पाणी साठवण्याच्या क्षमतेची पुनःस्थापना करून तलावांच्या सिंचनक्षमतेत वाढ करण्याच्या मागणीने अजूनपर्यंत जोर धरला आहे. परिणामतः शासनाने मालगुजारी तलावांच्या मोठ्या प्रमाणावरील दुरुस्तीचा कार्यक्रम नुकताच घोषित केला आहे."

**१५९.** मालगुजारी तलावांची सिंचनक्षमता राज्याने निर्माण केलेली सिंचनक्षमता म्हणून दांडेकर समितीने धरलेली असल्याने या तलावांची सिंचनक्षमता वगळण्याची मागणी अनुशेष व निर्देशांक समितीला मान्य करता आली नाही व तसे त्यांनी अहवालाच्या परिच्छेद ३.२३ मध्ये नमूद केले. ते पुढील शब्दात :-

"३.२३ या परिस्थितीत, आम्हाला अनुशेषाबाबतची गणना करण्यासाठी या तलावांची पाटबंधारे सिंचनक्षमता वगळण्याची आवश्यकता वाटत नाही. तथापि, आम्हाला, अनुशेषाबाबतच्या गणनेमध्ये त्यांच्या संबंधातील दुरवस्थेवर आम्ही विचार करत आहोत **आणि सिंचनक्षमता पुनःस्थापित करण्यासाठी पुरेशी तरतूद करण्याची गरज असल्याची जाणीवही आम्हाला होत आहे."**

**१६०.** मालगुजारी तलावांची सिंचनक्षमता राज्याने निर्माण केलेली सिंचनक्षमता म्हणून दांडेकर समितीने धरलेली असल्याने या तलावांची सिंचनक्षमता वगळण्याची मागणी अनुशेष व निर्देशांक समितीला मान्य करता आली नाही हे खरे असले तरी त्या समितीने या माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे ही अनुशेषाची कामे समजून त्यासाठी ठरावीक रक्कम अनुशेषात जोडण्याची डोळस शिफारस परिच्छेद ३.२४ मध्ये केली. ती पुढील शब्दात :-

"३.२४. तथापि मालगुजारी तलावांमधील काही प्रमाणात पाणी कमी होणे ही एक प्रतिकूल घटना आहे. म्हणून आम्ही अशी शिफारस करीत आहोत की, **त्या बाबतीत करावयाची दुरुस्तीची कामे ही अनुशेष दूर करण्याची योजना म्हणून समजण्यात यावीत.** जरी आम्हाला या तलावांचे आकारमान कसे आहे आणि ते पूर्वस्थितीत आणण्याकरिता आवश्यक दुरुस्तीच्या कामांची व्याप्ती कितपत आहे याची सखोल माहिती नसली तरीही आम्ही या प्रकारची पाटबंधाऱ्याची कामे करावयाच्या प्रत्येक राज्यातील तलावांखाली येणाऱ्या **एकूण सिंचन क्षेत्राची प्रति हेक्टरी रु. दहा हजार इतक्या किंमतीच्या विशेष अनुशेषाची त्यात भर घालत आहोत.** त्यामुळे विदर्भ प्रदेशातील ११७ कोटी रुपयांने अनुशेषात भर पडली आहे आणि ते तक्ता ३.३ च्या स्तंभ ८ मध्ये विदर्भप्रदेशाच्या चार जिल्ह्यांसमोर दर्शविण्यात आले आहे."

**१६१.** मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी अनुशेष व निर्देशांक समितीने अनुशेष निर्मूलनार्थ म्हणून जी रक्कम ठरवून दिली ती ११७ कोटी रुपये होती. आज आकडा तसा लहान वाटत असला तरी तो वीस वर्षांपूर्वीच्या म्हणजे १९९४ च्या किंमतीस्तरावर निर्धारीत केलेला आकडा आहे. त्या हिशेबाने ११७ कोटी ही मोठी घसघशीत रक्कम नसली तरी ती त्यावेळच्या किंमतीला धरून समाधानकारकच म्हणावी लागेल. ११७ कोटी रुपयांच्या रकमेपेक्षाही महत्त्वाची बाब कोणती असेल तर ती अशी की अनुशेष व निर्देशांक समितीने काही धोरणात्मक शिफारशी

आपल्या अहवालामध्ये याबाबतीत केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :-

(१) आम्ही अशी शिफारस करीत आहोत की, **त्या बाबतीत करावयाची दुरुस्तीची कामे ही अनुशेष दूर करण्याची योजना म्हणून समजण्यात यावीत.**

(२) आम्ही या प्रकारची पाटबंधाऱ्याची कामे करावयाच्या प्रत्येक राज्यातील तलावांखाली येणाऱ्या **एकूण सिंचन क्षेत्राची प्रति हेक्टरी रु. दहा हजार इतक्या किंमतीच्या विशेष अनुशेषाची त्यात भर घालत आहोत.**

(३) त्यामुळे विदर्भ प्रदेशातील ११७ कोटी रुपयांने अनुशेषात भर पडली आहे.

(४) ते तक्ता ३.३ च्या स्तंभ ८ मध्ये विदर्भप्रदेशाच्या चार जिल्ह्यांसमोर दर्शविण्यात आले आहे.

**१६२.** दांडेकर समितीच्या अहवालामध्ये एक हेक्टरचा अनुशेष दूर करण्याची किंमत जून १९८२ च्या दरसूची प्रमाणे दहा हजार रुपये धरण्यात आली होती. येथे माजी मालगुजारी तलावांकरीता अनुशेष व निर्देशांक समितीने दुरुस्तीचा खर्च प्रतिहेक्टरी दहा हजार रुपये जून १९९४ च्या दरसूची प्रमाणे धरला आहे. इतकेच नव्हे तर आपल्या अहवालाच्या तक्ता ३.३ मध्ये अनुशेषाच्या रक्कमेत ही ११७ कोटी रुपयाची रक्कम जोडून दिली.

**आता याबाबतीत केळकरांनी काय उजेड पाडला ते पाहू.** वस्तुतः अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल हा मंत्रिमंडळाने स्वीकारलेला अहवाल होता. तसेच तो राज्यपालांनी स्वीकारलेला अहवाल होता. असे असतांना माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची शिफारस गेले २० वर्षे इमानेइतबारे अंमलात आणली गेली नाही याबद्दल केळकरांना खेद व्यक्त करता आला असता पण त्यांनी तसे केले नाही. ११७ कोटी रुपयाची १९९४ च्या भावपातळीवर निश्चित झालेली ती अनुशेषाची रक्कम अद्यावत दरसूचीनुसार दुरुस्त करून सर्व स्तरावर मान्य झालेली ती शिफारस आता तरी अंमलात आणा असे त्यांना म्हणता आले असते पण तसे त्यांनी म्हटले नाही, तर दुष्काळी तालुक्याला अनुकूल अशा आपल्या वेगळ्याच शिफारसींचे बांधकाम त्यांनी पार पाडले.

**१६३.** पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यांचा कठीण प्रश्न सोपा करण्यासाठी केळकरांनी अकारणच विदर्भातील मालगुजारी तलाव व खारपाणपट्ट्याचा सोपा प्रश्न कठीण करून टाकला. इतकेच नव्हे तर घटनाबाह्य सोडवणुकीच्या खड्ड्यात त्या प्रश्नाला दुष्काळी तालुक्यांसोबत ढकलून दिले. भारताच्या घटनेमध्ये कलम ३७१(२) मध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र असे फक्त तीनच प्रदेश नमूद असतांना दुष्काळी तालुक्यांच्या दोन काल्पनिक प्रदेशांना मोक्ष मिळावा म्हणून त्यांच्या जोडीला "मालगुजारी तलाव" व "खारपाणपट्टा" या दोन काल्पनिक प्रदेशांचा कपाळमोक्ष (घटनाबाह्य शिफारस असल्यामुळे) करण्याची शिफारस त्यांनी केली. हे एक अवतार कार्य समजून किंवा प्रेषिताचे कार्य (in a mission mode) समजून आम्ही खास बाबतीत (अर्वषणप्रवण तालुके) तालुका घटक धरण्याचे ठरविले आहे. त्यासाठी 'कल्पित प्रदेश' उभे करण्याचे धोरणसुध्दा आम्ही स्वीकारले आहे. केळकरांच्या अहवालातील त्यांनी मांडलेला हा विचार मुळातूनच समजून घेतला पाहिजे तो पुढील प्रमाणे :-

"The blocks/talukas are considered in case of treatment (in a mission mode) pertaining to special issues. These special issues were identified as virtual or imagined regions." (Para 4.6.3 P119)

**घटनेच्या कलम ३७१(२) चा अंमल चालू असतांना व त्या कलमात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र असे तीनच प्रदेश असतांना केळकरांनी त्यामध्ये सरळसरळ तीन 'कल्पित प्रदेश' व एक 'कल्पित सदृश प्रदेश' अशी सात प्रदेशांची कल्पना मांडली आहे.** सरळसरळ घटनेतील तरतुदींच्या विरोधात अशी शिफारस करतांना केळकरांची आढ्यता मात्र वाखाणण्यासारखी आहे. अहवालाच्या पृष्ठ १०५ वरील परिच्छेद ४.१.१ मध्ये त्यांनी दिलेला कबूलीजबाब त्यांच्याच शब्दात पुढील प्रमाणे :- **"आम्ही त्यांचा समावेश आभासी किंवा कल्पित क्षेत्रे म्हणून केला आहे. (एका अर्थाने, अशाप्रकारे आम्ही आमच्या विचारार्थ विषयाच्या अर्थाची व्याप्ती विस्तारली आहे.)"**

**१६४.** खरे म्हणजे घटनाबाह्य शिफारशींचे आंगडे-टोपडे माजी मालगुजारी तलावांना चढविण्याची गरज नव्हती तशी ती खारपाणपट्ट्याला सुद्धा नव्हती. कारण माजी मालगुजारी तलावांना २० वर्षांपूर्वीच्या किंमतीला ११७ कोटी रुपयाचा अनुशेष, अनुशेष व निर्देशांक समितीने निश्चित केला होता व ती शिफारस मंत्रिमंडळाने व मा. राज्यपालांनी मान्य केलेली होती. खारपाणपट्ट्याच्या बाबतीत सुद्धा घटनाबाह्य शिफारशींच्या अंगड्या-टोपड्याची गरज नव्हती कारण सिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातच खारपाणपट्ट्याचे क्षेत्र असल्यामुळे अनुशेष निर्मूलनाचा निधी हा अग्रहक्काने खारपाणपट्ट्याला मिळायला हवा असे म्हणून केळकरांना त्यांची याबाबतची शिफारस थांबविता आली असती. पण त्यांनी तसे न करता माजी मालगुजारी तलाव व खारपाणपट्टा यांना दुष्काळी तालुक्यांच्या जोडीला बसवून घटनाबाह्य शिफारशींच्या कामाला भिडविले.

**१६५.** महाराष्ट्रातील अमरावती, अकोला व बुलढाणा या तीन जिल्ह्यांत पूर्णा नदीच्या खोऱ्यातील जवळ जवळ २,५०० चौ. कि.मी. क्षेत्र खाऱ्या भूजलाने व्यापले आहे. खाऱ्या भूजलाचा प्रदेश साधारणतः अमरावती ते चांदूर बाजार या पट्ट्यात पेढीच्या काठाकाठाने सुरू होऊन पुढे पूर्णा नदीच्या दिशेने जवळ जवळ १२० कि.मी.पर्यंत लांब पसरला आहे. तसेच या पट्ट्याची रुंदी पूर्णा नदीच्या दोन्ही बाजूला एकत्रितपणे सरासरी २० ते २२ कि.मी. आहे. या पट्ट्याच्या भूजलातील क्लोराईडचे प्रमाण ५०० मि.ग्रॅ./लि. पासून २००० मि.ग्रॅ./लि. किंवा त्याहूनही अधिक आढळते. जसजसे पूर्णा नदीच्या पात्राकडे आपण येऊ तसतसे हे प्रमाण वाढत जाते. ह्या प्रदेशातील मुख्यत्वे खाऱ्या पाण्याच्या समस्येमुळे जनता त्रस्त आहे. पिण्याचे पाणी गेल्या पाच-पंधरा वर्षांपूर्वी दुर्मीळ होते. त्यासाठी नदी लगतच्या गावी ४ ते ५ कि.मी. एवढ्या अंतरावरुन विशेषतः स्त्रियांना डोक्यावर नदीतून पिण्याचे पाणी वाहून आणावे लागे. त्यासाठी फार कष्ट व वेळ लागत असे. पिण्याच्या पाण्याशिवाय इतर उपयोगासाठी सर्रास खाऱ्या पाण्याचा वापर करावा लागे. त्यासाठी खाऱ्या पाण्याच्या विहिरी आजही त्या भागात आहेत. महाराष्ट्र सरकारने नळाद्वारे खेडोपाडी पाणी पुरवठा योजना राबविल्यामुळे गेल्या काही वर्षांत पिण्याच्या पाण्याची समस्या थोडी कमी झाली आहे.

**१६६.** हजारो वर्षे इतरत्र मानवी समूह ज्या रितीने आपले जीवन जगत होते, तसेच जीवन जगणे खारपाण पट्ट्यातील लोकांच्यासुद्धा नशिबी होते. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' याशिवाय त्यावेळी मानवी समुहाच्या हाती दुसरे काही नव्हते. संघटीत समाज सुसंघटीत शासनाच्या नेतृत्वाखाली आपले जीवन जगायला लागला आणि स्वाभाविकपणे चांगले जीवन जगण्याच्या त्याच्या अपेक्षा वाढल्या. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात या अपेक्षांना काही मर्यादा निश्चितच होत्या. संरक्षण, परराष्ट्र संबंध, कायदा-सुव्यवस्था व न्यायव्यवस्था ही शासनाची चार प्रमुख कामे आम्ही करु. इतर 'फालतू' कामात आम्ही लक्ष घालणार नाही. शिक्षण, आरोग्य, सिंचन, कृषिमालाला भाव या गोष्टी परकीय राज्यकर्त्यांना फालतू वाटत होत्या, तर मग खारपाणपट्ट्याकडे लक्ष देणे तर दूरच राहीले. भूवैज्ञानिक अभ्यास करणाऱ्या कोणत्याही औपचारिक शासकीय यंत्रणा १८५१ पूर्वी भारतात अस्तित्वात नव्हत्या. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया) या संस्थेची स्थापना (१८५१) झाल्याच्या काळापासून पूर्णा खोऱ्यातील या खारपाण पट्ट्याने अनेक संशोधकांना व शास्त्रज्ञांना चक्रावून सोडलेले दिसते.

**१६७.** स्वातंत्र्योत्तर काळामध्ये स्वाभाविकपणे लोकांच्या शासनाकडून अपेक्षा वाढल्या. **'नुसते जीवन जगणे'** या कल्पनेपासून तर **'सुसह्य जीवन जगणे'** व त्याच्याही पुढे जावून **'उत्तम जीवन जगणे'** यासाठी आवश्यक स्थिती निर्माण व्हावी म्हणून शासनाने सर्वतोपरी मदत केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली जावू लागली व त्यामध्ये अस्वाभाविक असे काहीही नव्हते. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्र राज्य निर्माण होईपर्यंतच्या काळात खारपाणपट्ट्याच्या समस्येबाबत काही उपाययोजना सुचविण्यात आल्या असे दिसून येत नाही. काही अभ्यास मात्र शोधनिबंधांच्या स्वरुपात प्रसिद्ध झालेले दिसून येतात.

**१६८.** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या सुरुवात वर्षात म्हणजे जून १९६० पावेतो महाराष्ट्रातील जलसिंचन क्षमता ३,८६,२०० हेक्टर होती. जून १९८२ पावेतो ती २१,५७,३९० हेक्टर झाली. जून १९९४ मध्ये ती प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये ६७,२६,७५० हेक्टर झाली व आता जून २०१२ मध्ये ती १०,८८६ हजार हेक्टर झालेली आहे. वाढत असलेल्या जलसिंचन क्षमतेबरोबरच प्रादेशिक असमतोल सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढला. जलसिंचनाचा विकास समतोल झाला असता तर कदाचित खारपाणपट्ट्याकडे शासनाचे लक्ष लवकर गेले असते. पण तसा तो न झाल्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरच्या पहिल्या २५-३० वर्षात प्रादेशिक असमतोल हाच एकूण चर्चेचा केंद्रबिंदू झाला. खारपाणपट्ट्याचा प्रश्न शासनस्तरावर मागे पडला. खारपाणपट्ट्याच्या एकूणच विकासाबाबत १९६० ते १९९० या कालखंडातील घडामोडींसंदर्भात यापेक्षा जास्त काही माहिती देता येईल असे वाटत नाही. एक गोष्ट मात्र नमूद केली पाहिजे की खारपाणपट्ट्याच्या गावातून निदान उत्तम पेयजल उपलब्ध झाले पाहिजे. यासाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना शासनातर्फे याच काळात बांधण्यात व राबविण्यात आल्या.

**१६९.** एका बाजूला प्रादेशिक असमतोलाची व त्याच्या परिणामाची होत असलेली तीव्र जाणीव, त्यातही जलसिंचनाचा प्रादेशिक असमतोल आपण आज ज्याला "पंतप्रधान पॅकेज मधील सहा जिल्हे" म्हणतो या सहा जिल्ह्यात अति जास्त आहे ही लक्षात आलेली वस्तुस्थिती, त्या सहा जिल्ह्यातील फार मोठे क्षेत्र (जवळ जवळ ४.६९ लक्ष हेक्टर) खारपाणपट्ट्याने व्यापलेले असल्यामुळे खारपाणपट्ट्याच्या प्रश्नाला हात लावल्याशिवाय प्रादेशिक असमतोल दूर करण्याची चर्चा निष्फळ ठरते या स्थितीचे झालेले दर्शन, यामुळे १९९० नंतरच्या काळात फार मोठ्या नसल्या तरी काही लहान सहान उपाययोजना या क्षेत्रासाठी शासनातर्फे करण्यात आल्याचे दिसून येते. समस्येच्या स्वरूपाची निश्चिती, उपाययोजनांचा आराखडा, आकडेवारी गोळा करणे, अभ्यास, प्रयोग, प्रात्यक्षिके, शास्त्रीय निष्कर्ष, उच्चाधिकार समितीची नियुक्ती, असे या उपाययोजनांचे स्वरूप होते. वरवर पहाणाऱ्याला ह्या उपाययोजना जुजबी वाटत असल्या तरी एका जुनाट पण रोगट अशा लागट समस्येचे दीर्घमुदती समाधान शोधण्यासाठी उपरोक्त उपाययोजनांचे महत्त्व व उपयुक्तता कोणीही नाकारू शकत नाही.

(१२) ५ एप्रिल २०१५

# माजी मालगुजारी तलाव, खारपाणपट्टा व दुष्काळी तालुके : २

**१७०.** महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाचा जून १९९९ मध्ये सादर केलेला अहवाल निरनिराळया पाच खंडामध्ये उपलब्ध असून या अहवालाच्या खंड २ मध्ये परिच्छेद १२.९ पुढीलप्रमाणे आहे :-

"**खाऱ्या पाण्याच्या पट्ट्याच्या विकासाबाबत :** पूर्णा नदीच्या उपखोऱ्यात भूजल खारे असण्याची मूळ कारणे भूस्तरीय असोत वा जलवैज्ञानिक असोत, क्षारतेची तिव्रता हळू हळू कमी करुन संपू शकते. त्यातील क्षाराचे प्रमाण उपयोगालायक मर्यादेपर्यंत कमी करण्यासाठी पाण्याचा दीर्घ उपसा (पंपिंग) व भूजल पुनर्भरण (ग्राऊंड वॉटर रिचार्ज) यांचा एकत्रित उपयोग केल्यास परिस्थिती सुधारणे शक्य आहे, असे दापूरा, काटी, जिल्हा अकोला या गावात झालेल्या प्रयोगावरुन निदर्शनास आले आहे. शिवाय **क्षारयुक्त मातीतून सचैल स्थितीत पाण्यावाटे क्षार निघून जातील व कालांतराने ती क्षारविरहीत होऊ शकते असेही प्रयोगामधे दिसून आले आहे. पावसाचे क्षाररहित पाणी जमिनीत जास्त झिरपून त्याच प्रमाणात खाऱ्या पाण्याचा उपसा पावसाळ्यात करुन नैसर्गिक नाल्यात सोडल्यास क्षाराचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होऊ शकेल.**" यानंतर आयोगाने याबावत विविध उपाययोजना सांगितल्या आहेत. याचे कारण खारपाणपट्ट्यात आजही पाहिजे तिथे मुबलक गोड पाणी उपलब्ध नाही, आणि म्हणूनच या भागात जमीन अत्यंत सुपीक असूनही फक्त खरीप (कोरडवाहू) शेतीच करतात. पाणी नाही म्हणून उद्योगधंदेही या भागात उभारता आले नाहीत. या सर्व बाबींमुळे या प्रदेशाचा विकास इतर भागांच्या तुलनेने झाला नाही.

**१७१.** केळकरांनी आपल्या अहवालामध्ये पृष्ठ ५१४ वर जोडपत्र १०.२७ जोडलेले असून त्यामध्ये खारपाणपट्ट्याने बाधित १५ तालुक्यांची यादी दिलेली आहे व त्या प्रत्येक तालुक्यासमोर जिल्हा नमूद केलेला आहे. यातील प्रत्येकी ५ तालुके अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्यांमध्ये आहेत. ३० जून २०१२ च्या सरासरीवर जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २०१२-१३ च्या वार्षिक अहवालामध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त अनुशेष असलेले जे आठ जिल्हे आहेत त्यामध्ये हे तीन जिल्हे पहिल्या चार मध्ये समाविष्ट आहेत. "अनुशेषाच्या गुणवत्ता यादीत" सर्वात जास्त अनुशेष असलेल्या पहिल्या आठ क्रमांकाचे हे जिल्हे 'गुणवत्ते'नुसार पुढील प्रमाणे आहेत :- (१) अमरावती : अनुशेष २६९.४४ हजार हेक्टर (२) बुलढाणा : २३८.४६ हजार हेक्टर (३) यवतमाळ : १९५.९४ हजार हेक्टर (४) अकोला : १५७.४६ हजार हेक्टर (५) वाशिम : १३६.११ हजार हेक्टर (६) जालना : १२८.६७ हजार हेक्टर (७) औरंगाबाद : १०८.६६ हजार हेक्टर (८) हिंगोली : १०२. ५७ हजार हेक्टर. अशी ही महाराष्ट्रातील अनुशेष जिल्ह्यांची गुणवत्ता यादी आहे. महाराष्ट्राच्या ३५ जिल्ह्यांपैकी शंभर हजार हेक्टरच्यावर अनुशेष असलेले उपरोक्त एकूण आठ जिल्हे आहेत. त्यापैकी ५ जिल्हे विदर्भातील असून ३ जिल्हे मराठवाड्यातील आहेत. खारपाणपट्टा असलेले १५ तालुके ज्या अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्यांत आहेत ते तीनही जिल्हे पंतप्रधान पॅकेजमध्ये तर आहेतच पण अद्यावत सरासरीवर महाराष्ट्रात सर्वात जास्त अनुशेष असलेल्या पहिल्या चार जिल्ह्यांत हे तीन जिल्हे आहेत. हे केळकरांना ठावूक नव्हते? असे केळकर कसे काय म्हणू शकतात?

**१७२.** कायदेशीररित्या व अधिकृतपणे सिंचनाची जून २०१२ मध्ये राज्याची अद्यावत सरासरी ६०.२७ टक्के झाली हे केळकरांना ठावूक नव्हते? "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण : वार्षिक अहवाल २०१२-१३" : याच्या जोडपत्र : ५ (३) मध्ये ही माहिती नमूद आहे त्यातील राज्य सरासरी हा अहवाल तयार करतांना केळकरांना उपलब्ध झालेली होती. जून २०१२ पर्यंत निर्मित क्षमते प्रमाणे जिल्हानिहाय अनुशेषसुद्धा त्यांना ठावूक झालेला होता. जून २०११ किंवा जून २०१० ची सरासरी नमूद असलेले अहवाल अगोदरच प्रकाशित झालेले होते. ही सारी अधिकृत व कायदेशीर माहिती उपलब्ध असतांना त्या माहितीच्या आधारे उपाययोजना सुचविण्याचे टाळण्याच्या हेतूनेच अहवालाच्या परिच्छेद ४.१.२ मध्ये "**मागास म्हणून क्षेत्रांची निश्चिती करणे हे आमचे मुख्य काम नव्हे. आमच्यासाठी महाराष्ट्रातील मागास असलेली 'क्षेत्रे' व 'प्रांत' हे आधीच निश्चित केलेले व ज्ञात आहेत.**" या महावाक्याचा केळकरांनी वापर केला, यापेक्षा वेगळा अर्थ यातून निघत नाही. पश्चिम महाराष्ट्रातील तत्कालीन मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खाजगी खटल्यावर डॉ. विजय केळकर यांची सालदार म्हणून नेमणूक झालेली नव्हती किंवा स्वातंत्र्यपूर्व काळात अशा सालदाराला खटल्याचे मालक तोंडी काम सांगतात तसे केळकरांना तोंडी आदेशाने हे काम सांगितले गेले नव्हते. दिनांक ३१ मे २०११ रोजीच्या ज्या शासन निर्णयाने केळकर समितीची नेमणूक केली होती त्याच शासन निर्णयाच्या परिच्छेद ३(२) नुसार त्यांच्याकडे "**अगदी अलिकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भात असमतोल निश्चित करणे.**" हे काम केळकरांच्या समितीकडे सोपविले होते. असे असतांना **मागास भाग निश्चित करणे हे काही आमचे मुख्य काम नव्हे** असे केळकर कसे काय म्हणू शकतात?

**१७३.** सुरुवातीलाच हे नमूद केले पाहिजे की दुष्काळी तालुके म्हणून ज्यांना संबोधिले जाते त्यांचे प्रश्न मनापासून समजावून घेण्यासारखे आहेत. वस्तुतः दुष्काळी तालुके कोणाला म्हणावे याबाबतच खूप वाद आहेत. निरनिराळ्या समित्यांनी ही संख्या वेगवेगळी दाखविली आहे. कोणत्या तालुक्यांना दुष्काळी तालुके म्हणावे? याबाबतचा वाद क्षणभर बाजूला ठेवला आणि पश्चिम महाराष्ट्रातच असे दुष्काळी तालुके मोठ्या प्रमाणात आहेत असे गृहीत धरून चालले, तर नमुना म्हणून पुणे विभागातील चार विकसित जिल्ह्यातील या दुष्काळी तालुक्यांची केवढी मोठी अवहेलना व दुर्दशा त्याच जिल्ह्यांच्या विकसित भागाकडून केली गेली याची माहिती करून घेऊ. खालील तक्त्याच्या स्तंभ १ मध्ये जिल्ह्याचे नाव दिले असून स्तंभ २ मध्ये दांडेकर समितीने काढलेला दुष्काळी तालुक्यांचा त्या जिल्ह्यांचा अनुशेष दाखविला आहे. स्तंभ ३ मध्ये त्या जिल्ह्याने जून १९९४ च्या स्तरावर पदरात पाडून घेतलेली सिंचनक्षमता दाखविली असून स्तंभ ४ मध्ये त्या जिल्ह्याने जून २०१२ च्या स्तरावर पदरात पाडून घेतलेली सिंचनक्षमता नमूद केलेली आहे.

(आकडे प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये व हजार हेक्टरात आहेत)

| जिल्हा | दुष्काळी तालुक्यांचा अनुशेष जून ८२ | सिंचन क्षमता जून १९९४ | सिंचन क्षमता जून २०१२ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| पुणे | ५६.३९ | ५१०.९० | ८११.२७ |
| सातारा | २२.५९ | ५५५.०२ | ५२३.६९ |
| सांगली | ५९.९१ | ४३७.७८ | ७३०.१४ |
| सोलापूर | ९९.७५ | ४०८.३७ | ७३१.६० |
| | २३८.६४ | १९१२.०७ | २७९६.७० |

या तक्त्याच्या स्तंभ २ मधील माहिती दांडेकर समितीच्या अहवालाच्या तक्ता ७.७ मधून घेतली असून स्तंभ ३ मधील माहिती अनुशेष व निर्देशांक समितीच्या तक्ता ३.३ मधून घेतलेली आहे तर स्तंभ ४ मधील माहिती महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २०१२-१३ च्या अहवालातील जोडपत्र ५(३) मधून घेतलेली आहे.

**१७४.** या तक्त्याचे काळजीपूर्वक विश्लेषण केले तर असे लक्षात येते की **(अ)** पुणे जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांचा जून १९८२ च्या स्तरावर दांडेकर समितीने ५६.३९ हजार हेक्टरचा अनुशेष काढला होता. जून १९९४ पर्यंत ५१०.९० हजार हेक्टरची व जून २०१२ पावेतो ८११.२७ हजार हेक्टरची सिंचनक्षमता पुणे जिल्ह्याच्या पदरात पडली तरी त्या जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांचा अनुशेष भरून निघालाच नाही? **(ब)** सातारा जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांचा जून १९८२ च्या स्तरावर दांडेकर समितीने २२.५९ हजार हेक्टरचा अनुशेष काढला होता. जून १९९४ पर्यंत ५५५.०२ हजार हेक्टरची व जून २०१२ पावेतो ५२३.६९ हजार हेक्टरची सिंचनक्षमता सातारा जिल्ह्याच्या पदरात पडली तरी त्या जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांचा अनुशेष भरून निघालाच नाही? **(क)** सांगली जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांचा जून १९८२ च्या स्तरावर दांडेकर समितीने ५९.९१ हजार हेक्टरचा अनुशेष काढला होता. जून १९९४ पर्यंत ४३७.७८ हजार हेक्टरची व जून २०१२ पावेतो ७३०.१४ हजार हेक्टरची सिंचनक्षमता सांगली जिल्ह्याच्या पदरात पडली तरी त्या जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांचा अनुशेष भरून निघालाच नाही? **(ड)** सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांचा जून १९८२ च्या स्तरावर दांडेकर समितीने ९९.७५ हजार हेक्टरचा अनुशेष काढला होता. जून १९९४ पर्यंत ४०८.३७ हजार हेक्टरची व जून २०१२ पावेतो ७३१.६० हजार हेक्टरची सिंचनक्षमता सोलापूर जिल्ह्याच्या पदरात पडली तरी त्या जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांचा अनुशेष भरून निघालाच नाही?

**१७५.** पुणे, सातारा, सांगली, सोलापूर या चार जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांचा जून १९८२ च्या स्तरावर दांडेकर समितीने २३८.६४ हजार हेक्टरचा अनुशेष काढला होता. जून १९९४ पर्यंत १९१२.०७ हजार हेक्टरची म्हणजे आठ पटीहून

जास्त व जून २०१२ पावेतो २७९६.७० हजार हेक्टरची म्हणजे जवळजवळ बारापट सिंचनक्षमता या चार जिल्ह्यांच्या पदरात पडली तरी त्या जिल्ह्यांतील दुष्काळग्रस्त तालुक्यांचा अनुशेष दूर झालाच नाही, याला काय म्हणावे? आणि आता केळकर पुन्हा विदर्भ व मराठवाड्याच्या बोकांडी बसायला मागताहेत.

**१७६.** मुख्यत्वे हे दुष्काळी तालुके ज्या कृष्णा खोऱ्यामध्ये आहेत असे सांगितले जाते त्या कृष्णा खोऱ्यामध्ये प्रचंड प्रमाणावर निधी ओतण्यात आला. मुळात कृष्णा खोऱ्यासाठी ७१०० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती. १९९९ पर्यंत ती ११६६० कोटी रुपयावर गेली. पुढे तर ती मूळ अंदाजाच्या दुप्पटीच्या वर गेली. एवढा प्रचंड मोठा निधी खर्च झाला तरी तो या दुष्काळी तालुक्यांच्या पदरी पडला नाही हे स्पष्टपणे दिसून येते. याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे या कामात झालेला मोठा भ्रष्टाचार असे सांगितले जाते. दुसरे व आणखीच महत्त्वाचे कारण म्हणजे कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी न करण्याचे राज्यकर्त्यांचे उद्धट धोरण होय. अधिकृत कागदपत्राच्या आधारे या दोनही कारणांची माहिती करून घेऊ.

**१७७.** महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या "महाराष्ट्राच्या आर्थिक सद्यःस्थिति विषयीची श्वेतपत्रिका डिसेंबर, १९९९" ही पुस्तिका अधिकृत माहिती देणारी आहे. **(अ)** या पुस्तिकेच्या परिच्छेद ५३ मधील मजकूर नजरेखालून घालण्यासारखा आहे. तो पुढील प्रमाणेः- "कृष्णा खोरे विकास महामंडळांअंतर्गत प्रकल्प हाती घेतांना प्रकल्पांची किंमत अंदाजे रु. ७,१०० कोटी असल्याचे जनतेस सांगण्यात आले. मात्र अल्पावधीतच प्रकल्पांची किंमत रु. ११,६६० कोटीवर गेली आहे. प्रकल्पांच्या किंमती इतक्या कमी कालावधीत कशा वाढल्या हे न समजण्यासारखे गूढ आहे." **(ब)** याच श्वेतपत्रिकेमध्ये परिच्छेद ५४ मध्ये पुढे असे नमूद करण्यात आले आहे की :- "कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत चालू असलेल्या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी होत होत्या. या महामंडळातील एक मुख्य अभियंता दर्जाचा वरिष्ठ अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या धाडीत सापडला, महाराष्ट्रात इतक्या वरिष्ठ दर्जाचा अधिकारी सापळ्यात सापडणे ही घटना इतिहासात प्रथमच घडली. अर्थातच ही घटना म्हणजे हिमनगाचे एक टोक आहे." **(क)** जादा व्याजदर देण्याबाबत, सल्लागार नेमण्याबाबत, सल्लागाराचे सेवाशुल्क ठरविण्याबाबत जे घडले, त्याचा मोठा मार्मिक उल्लेख या श्वेतपत्रिकेच्या परिच्छेद ५६ मध्ये आहे. तो पुढील प्रमाणे :- "फेब्रुवारी, १९९६ मध्ये कृष्णा खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी कर्जरोख्यांगद्वारे अतिरिक्त निधी उभा करण्याच्या दृष्टीने बैठक घेण्यात आली. हे रोखे काढण्यासाठी तांत्रिक सल्लागार म्हणून डी. एस. पी. फायनान्स कन्सल्टन्ट या एका संस्थेची नियुक्ती करण्यात आली व त्यांना या कामापोटी ०.९५% इतके सेवाशुल्क देण्याचे ठरले. तद्नंतरच्या काळात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीमार्फत स्पर्धात्मक पध्दतीने सल्लागारांची नियुक्ती करण्याची पध्दत ठरविण्यात आली. या स्पर्धात्मक पध्दतीमुळे सल्लागाराचे शुल्क ०.२०% इतके खाली आले व याच सेवाशुल्कावर डी. एस. पी. फायनान्स कन्सल्टन्ट ही संस्था काम करण्यास राजी झाली, हे नोंद घेण्याजोगे आहे. या कर्जरोख्याच्या प्रथम मालिकेत १७.५% इतका अधिक व्याजाचा दर (राज्य शासनाची परतफेडीची हमी असताना देखील) देण्यात आला. त्याचवेळी भांडवली बाजारात अन्य संस्थांनी अशा प्रकारचे कर्जरोखे अंदाजे १४% इतक्या कमी व्याजदराने जारी केले होते, याचाच अर्थ कृष्णा खोरे विकास महामंडळावर ३ ते ३.५ टक्के अधिक व्याजाचा भूर्दंड पडला."

**१७८.१** कायद्यातील तरतुदींचे शासनानेच पालन न करण्याच्या मुद्यांची त्यानंतर माहिती घेऊ. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ म्हणजेच सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ हा कायदा प्रत्यक्ष अंमलात येऊन आता ९-१० वर्षांचा काळ लोटलेला आहे. या कायद्याच्या कलम १२ च्या उपकलम ९ मध्ये "प्राधिकरण धोरण ठरवितांना राज्यपालांच्या निदेशान्वये निर्मूलन करावयाच्या आर्थिक अनुशेषाला आधारभूत असलेला भौतिक अनुशेष संपुष्टात येईल अशा प्रकल्पांना प्राधान्य व वरचे प्राथम्य देईल." अशा प्रकारची स्पष्ट तरतूद आहे. या प्राधिकरणाने विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष दरवर्षी कसा व किती वेगाने वाढत आहे याची आकडेवारी आपल्या दरवर्षीच्या अहवालात नमूद केलेली आहे. मात्र खुद्द मा. राज्यपालांच्या निदेशान्वये विदर्भ व मराठवाड्याला देण्यात आलेल्या निधीमध्ये कपात करण्यात आल्याच्या तक्रारी खुद्द मा. राज्यपालांना दरवर्षी कराव्या लागल्या तिथे या प्राधिकरणाची राज्यकर्त्यांच्या पुढे काय पत्राज लागून गेली?

**१७८.२** विकसित जिल्ह्यांच्या या उद्धटपणाचा फटका महाराष्ट्रातील अविकसित जिल्ह्यांना बसला तितकाच तो त्याच जिल्ह्यांतील अविकसित अशा दुष्काळी तालुक्यांना सुद्धा बसला असे दिसून येते. कारण त्याबाबतीतसुद्धा कायद्यातील तरतुदींचा अंमल न करण्यात राज्यकर्ते अग्रेसर राहीलेत असे दिसून येते. उपरोक्त कायद्याच्या उपकलम (९) मध्ये "राज्यातील अवर्षणप्रवण भागास पाणी उपलब्ध करण्यासाठी प्राधिकरण प्रयत्नशील राहील; तसेच अवर्षणप्रवण जिल्ह्यासाठी उपलब्ध होणारा निधी प्राथम्याने त्या जिल्ह्यातील वंचित राहिलेल्या अर्वषणप्रवण भागात खर्च होईल याची खातरजमा प्राधिकरण करील." अशी स्पष्ट तरतूद आहे. इंग्रजी मसुद्यातील शब्दरचना पुढील प्रमाणे :- "(b) The Authority shall ensure that, the funds made available to a drought prone district are spent preferably in the areas, where irrigation facilities are less than the other areas of that district." त्या त्या जिल्ह्यांच्या वाट्याला आलेला निधी त्या त्या जिल्ह्यांतील दुष्काळी तालुक्यांना प्राथम्याने दिला जावा अशी कायद्यातच तरतूद असतांना राज्यकर्त्यांनी त्याकडे उद्दामपणे दुर्लक्ष केले हाच त्याचा अर्थ आहे.

**१७९.** सन १९९६ ते २०१४ पर्यंतच्या काळात ७१०० ते १४००० कोटी रुपया पर्यंतचा निधी कृष्णा खोऱ्याच्या पदरात पडला पण दुष्काळी तालुके कोरडेच राहिलेत. सन २००५ च्या कायद्यामध्ये या दुष्काळी भागांना वरचे प्राथम्य द्या अशी कायद्यातच तरतूद आली या गोष्टीला १० वर्षांच्या वर काळ झाला तरी दुष्काळी तालुके कोरडेच राहीलेत. दांडेकर समितीने तालुका घटक धरून काढून दिलेल्या अनुशेषाच्या जवळजवळ बारापट सिंचनक्षमता असा अनुशेष निश्चित झाल्यानंतरच्या ३० वर्षाच्या काळात (जून २०१२ पावेतो) त्या त्या जिल्ह्यांनी पदरात पाडून घेतली असून सुद्धा त्या जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यांचा अनुशेष अजूनही शिल्लक आहे. **याचा अर्थ जवळजवळ बारापट सिंचनक्षमता या पुढारलेल्या जिल्ह्यांच्या पदरात पडली असली तरी ती त्या दुष्काळी तालुक्यांच्या नशिबी आलेली नाही. दुष्काळी तालुक्यांच्या पात्राभोवती फुलपात्र भरून 'घी' ठेवले होते. मात्र दुष्काळी तालुक्यांच्या नावाने ओढलेले "घी" मोठ्या प्रमाणात त्याच जिल्ह्यातील संपन्न तालुक्यांनी पकविलेल्या खिचडीमध्ये घुसले ही गोष्ट उघड आहे. विकसित जिल्ह्यातील ज्या प्रवृत्ती राज्यातील अविकसित जिल्ह्यांची पिळवणूक करतात त्याच प्रवृत्ती आपल्याच जिल्ह्यातील अविकसित भागामध्ये सुद्धा लूटमार करण्यास कमी करीत नाहीत. प्रसंगी ते भाग दुष्काळी असले तरीही. शिवाय आपल्याच जिल्ह्यातील अशा तालुक्यांना अविकसित ठेवण्यात पुन्हा नव्या सरासरीवर अनुशेष काढतांना त्यांच्या दुष्काळीपणाची झोळी पुढे करून आपल्या कपाळावरील "अनुशेषाचा बोर्ड" कायम ठेवण्याचा या विकसित जिल्ह्यांचा मार्ग शाबूत राहतो.**

**१८०.** माजी मालगुजारी तलावांची, खारपाणपट्ट्यांची व दुष्काळी तालुक्यांची एवढी माहिती करून घेतल्यानंतर आता केळकरांनी भारतीय घटनेच्या कलम ३७१(२) मध्ये फक्त तीन प्रदेश नमूद असतांना त्यात आपल्याच कल्पनेतून निर्माण केलेले चार **"कल्पित प्रदेश" किंवा "आभासी प्रदेश" किंवा "काल्पनिक प्रदेश" जन्माला घालण्याचे घटनाबाह्य कुभांड काय म्हणून रचियले? हे विचारात घेणे आवश्यक आहे.**

**१८१.** वस्तुतः खारपाणपट्टा ज्या तीन जिल्ह्यांमध्ये आहे त्या तीन जिल्ह्यांचा १९९४ चा सुद्धा अनुशेष अजून दूर झालेला नाही. जून २०१२ च्या सरासरीवर या तीन जिल्ह्यांचा ६६५.३६ हजार हेक्टरचा अनुशेष आहे. हे महत्तम अनुशेष असलेले तीन जिल्हे आहेत. हा अनुशेष दूर करण्याचा राज्यकर्त्यांनी निर्धार केल्यास खारपाणपट्ट्याचा अनुशेष सहजच दूर होतो असे असतांना केळकर महाशयांनी, तशी शिफारस न करता, **खारपाणपट्ट्याला कल्पित प्रदेशाच्या सिंहासनावर अधिष्ठित करण्याचे कारणच काय आहे? हे फक्त केळकरच सांगू शकतील.**

**१८२.** माजी मालगुजारी तलावांच्या बाबतीतसुद्धा अशीच परिस्थिती आहे. खाजगी श्रमाने व खाजगी धनाने बांधलेली माजी मालगुजारी तलावांची एक ते सव्वा लाख हेक्टरची सिंचनक्षमता ही राज्यनिर्मित सिंचनक्षमता म्हणून दांडेकरांनी हिशेबात धरली. तेवढा त्या त्या जिल्ह्यांचा अनुशेष कमी मोजण्यात आला. अनुशेष व निर्देशांक समितीने हा अन्याय झाला होता, ही गोष्ट मान्य केली व मालगुजारी तलावांचा ११७ कोटी रुपयांचा अनुशेष काढून दिला. "अनुशेष व निर्देशांक समितीने काढलेला माजी मालगुजारी तलावांचा अनुशेष आजच्या किंमतीला अद्यावत करून भरून काढावा" एवढी एक लहानशी शिफारस न करता तो अनुशेष दूर व्हावा म्हणून **माजी मालगुजारी तलावांच्या खऱ्याखुऱ्या अनुशेषाला घटनाबाह्य अशा आभासी किंवा "काल्पनिक प्रदेशा"च्या अम्बारीत बसविण्याचे कारणच काय? हे फक्त केळकरच सांगू शकतील.**

**१८३.** केळकरांनी असे का केले असावे याचा आपण अंदाज बांधू शकतो. ज्या दुष्काळी तालुक्यांचा कृत्रिमरितीने तालुका घटक धरून दांडेकरांनी अनुशेष काढला, त्या अनुशेषाच्या बारापट सिंचनक्षमता त्या त्या जिल्ह्यांच्या पदरात पडलेली असतांना पुन्हा त्या जिल्ह्यांत अनुशेष आहे असे गृहीत धरून त्या जिल्ह्यांना निधी द्या असे म्हणणे फारच लाजीरवाणे वाटले असते. म्हणून मग अशा तालुक्यांचा आपण एक काल्पनिक प्रदेश तयार करू, हा काल्पनिक प्रदेश मागासलेला असल्याचे धरू, त्यासाठी विशेष निधीची मागणी करू, असा मार्ग केळकरांनी धरला. एकट्या दुष्काळी तालुक्यांची या मार्गावरून 'कल्पित प्रदेश' म्हणून मिरवणूक काढली तर साऱ्या महाराष्ट्रात आपली छिःथू होईल, याची कल्पना असल्यामुळेच **केळकरांनी कारण नसतांना या मिरवणूकीत 'माजी मालगुजारी तलाव' व 'खारपाणपट्टा' यांच्या शीरावर 'कल्पित प्रदेश' हा फेटा चढवून त्यांनाही या कल्पित प्रदेशांच्या मिरवणूकीमध्ये सामील करून घेतले. शोभा यात्रेची शोभा वाढविणे यापेक्षा वेगळा हेतू त्या कृतीमागे दिसत नाही.** अजिबात अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांना महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यांच्या मांडीला मांडी लावून, अनुशेष निर्मूलनाच्या पंगतीला बसवून, सुरु असलेली ही लुटमार तशीच पुढे चालु ठेवण्याचा खुला असलेला यापुर्वीचा मार्ग आणखी प्रशस्त करून देण्यातील आपले बुद्धीचातुर्य राज्यकर्त्यांना दाखविण्याचा लांगूनचालनी हेतूसुद्धा "कल्पित प्रदेशाच्या कल्पने"मागे आहे हे उघड आहे.

## (१३) १२ एप्रिल २०१५

# केळकरी कपटाच्या कथनोत्तर उपाययोजनांचा विचार करावाच लागेल

**१८४.** केळकर समितीचा हा अहवाल ५७१ पृष्ठांचा आहे. या अहवालातील बराच मोठा भाग 'रद्दी' या स्वरूपाचाच आहे. या साऱ्या रद्दीचा समाचार घेणे बरेच परिश्रमाचे काम आहे व त्याची आज आवश्यकता आहे असे वाटत नाही. मात्र चांगल्या चांगल्या विचारांचा व निवेदनांचा उपयोग रद्दीचा भरणा करण्यासाठी व अहवाल फुगविण्यासाठी या अहवालामध्ये कसा करण्यात आलेला आहे हे दाखविण्यासाठी एक नमुना सादर करण्यासारखा आहे. "**हितसंबंधीतांचा दृष्टीकोन**" या मथळ्याचे एक सविस्तर "**प्रकरण दोन**" या अहवालामध्ये समाविष्ट आहे. पृष्ठ ३१ ते ६४ अशी जवळ जवळ ३४-३५ पृष्ठे या कामी खर्ची पडलेली आहेत. निरनिराळ्या व्यक्ती व संस्था यांनी मांडलेले विचार या प्रकरणात दाखल करण्यात आलेले आहेत. ते विचार समिती का स्वीकारीत आहे किंवा नाकारीत आहे, याचे तपशीलवार विवेचन केळकरांनी केले असते तर ती गोष्ट वेगळी होती. तसे त्यांनी केलेले नाही.

**१८५.** हितसंबंधीतांची मते नमूद करतांना अनेक ठिकाणी केळकरांनी आपली स्वतःची/समितीची मतेसुद्धा मध्ये मध्ये घुसडली आहेत. परिच्छेद २.१.२२ ची सुरुवातच पुढील प्रमाणे आहे :-

"**२.१.२२ शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या** : मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांमुळे अमरावती विभाग व वर्धा जिल्ह्याचा भाग चर्चेत आहे. कर्जबाजारीपणा, सतत लागोपाठच्या वर्षात पीक न येणे यामुळे आलेली पराकोटीची विपन्नावस्था व अत्यंत कमी मिळकत, कुटुंबातील सदस्यांचे आजार, मुलींच्या विवाहात येणारे अडथळे व उत्पन्नाची पर्यायी व्यवस्था नसणे **ही प्रमुख कारणे त्यांच्या आत्महत्त्येस कारणीभूत होत आहेत.** राज्यात कृषिक्षेत्रात ही समस्या रौद्ररुप धारण करीत असून विशेष करून कापूस उत्पादन करणाऱ्या विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये या समस्येचे प्रमाण लक्षणीय आहे."

**१८६.** हितसंबंधीतांचे मत मांडतांना त्यांनी आपले मत घुसाडण्याचे काही कारण नव्हते. या आत्महत्त्याची कारणे म्हणून :-

(१) कर्जबाजारीपणा
(२) सतत लागोपाठच्या वर्षात पीक न येणे
(३) यामुळे आलेली पराकोटीची विपन्नावस्था
(४) अत्यंत कमी मिळकत
(५) कुटुंबातील सदस्यांचे आजार
(६) मुलींच्या विवाहात येणारे अडथळे
(७) उत्पन्नाची पर्यायी व्यवस्था नसणे

ही सात प्रमुख कारणे केळकरांनी आत्महत्त्यांची कारणे म्हणून नमूद केलेली आहेत व त्या मागोमागच "**राज्यात कृषिक्षेत्रात ही समस्या रौद्ररुप धारण करीत असून विशेष करून कापूस उत्पादन करणाऱ्या विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये या समस्येचे प्रमाण लक्षणीय आहे.**" असा शेरा मारला आहे. ते कापसाचे पिक घेतात हे एक आत्महत्त्यांचे कारण म्हणून केळकरांनी सांगितले नाही हे त्या कापसाच्या पिकाचे नशीबच म्हटले पाहिजे. आत्महत्त्यांचे एक कारण म्हणून "**सिंचन सुविधांचा अभाव**" हे आठव्या क्रमांकावरचे कारण म्हणूनसुद्धा केळकरांना नमूद करावेसे वाटले नाही यावरून त्यांनी किती विषारी व कलुषित मनाने आपली लेखणी चालविली हे स्पष्ट दिसून येते.

**१८७.** चलाखीने सिंचनसुविधांचा अभाव हे कारण म्हणून नमूद करण्याचे त्यांनी टाळले. या पापाचे क्षालन करण्यासाठी केळकरांनी त्याच परिच्छेदात पुढे "शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येस कारणीभूत ठरणाऱ्या या कृषिविषयक समस्यांच्या संदर्भात, सर्वस्व गमावून बसलेल्या कुटुंबांच्या सहाय्यासाठी व पुन्हा अशा घटना घडू नयेत यासाठी **हितसंबंधितांनी अनेक सूचना केल्या आहेत.**" असे नमूद करून त्याखाली क्रमशः ५ सूचना नमूद केल्या आहेत. इथे मांडणी करतांना ह्या सूचना हितसंबंधी लोकांच्या आहेत हे नमूद करण्याची केळकरांनी काळजी घेतली आहे. ५ पैकी तिसऱ्या क्रमांकावर हितसंबंधीतांनी केलेली एक सूचना नमूद आहे. ती पुढील प्रमाणे :-

"३. आत्महत्त्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांना १००% सिंचनाच्या सुविधा व वीज मोफत उपलब्ध करून दिली पाहिजे व हे शेतकरी त्यांच्या कर्जाचा परतावा करीत आहेत व कर्जाच्या बोज्याला बळी पडत नाहीत ना याची खातरजमा करणे आवश्यक आहे. **पाच एकरापेक्षा कमी जमीन धारण करीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी आगामी तीन वर्षांकरिता, शासनाने, शेतकऱ्यांच्या प्रत्येक कुटुंबास रु. २००० इतकी रक्कम निश्चित केली पाहिजे.**"

**१८८.** म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांची कारणे केळकरांनी सांगितली त्यात "**सिंचनाचा अभाव**" **हे कारण गैरहजर आहे.** आत्महत्त्या होऊ नयेत म्हणून आलेल्या सूचना हितसंबंधीतांनी सांगितल्या असे त्यांनी नमूद केले आहे. त्यामध्ये "**पाच एकरापेक्षा कमी जमीन धारण करीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी आगामी तीन वर्षांकरिता, शासनाने, शेतकऱ्यांच्या प्रत्येक कुटुंबास रु. २०००/- इतकी रक्कम निश्चित केली पाहिजे.**" ही जी सूचना नमूद आहे, त्याबाबत केळकरांनी त्यांच्या अहवालात काय उजेड पाडला हे त्या अहवालात कोठेही नमूद केलेले नाही. ही सूचना कोणी केलेली आहे हेही तेथे नमूद केलेले नाही. कोणीही ही सूचना केलेली असो आम्ही अनुशेष निर्मूलन चळवळीत काम करणारे कार्यकर्ते अशा प्रकारच्या सूचनेशी पूर्णपणे सहमत आहोत. तशी आम्ही हेल्पलाईनच्या मार्फत मागणी केली होती व त्यावेळी सभागृहात त्याचा पाठपुरावासुद्धा केला होता.

**१८९.** उदाहरण म्हणून नमूद करावयाचे झाल्यास "**असमतोल असलेल्या जिल्ह्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांना जलसिंचन असुविधेप्रती सानुग्रह अनुदान देण्याबाबत**" या विषयावरील आमचा तारांकीत प्रश्न क्रमांक २०४०४ हा गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २००६ रोजी सभागृहापुढे होता. "बुधवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २००६ रोजी अमरावती येथे झालेल्या लोकप्रतिनिधींच्या बैठकीमध्ये संमत करण्यात आलेला, शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात होत असलेल्या आत्महत्त्या रोखण्यासाठी तात्पुरता व कायमस्वरुपी उपाययोजनांचा एक तपशीलवार प्रस्ताव एका निवेदनासह हेल्पलाईन या संघटनेच्या सरचिटणीसांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २००६ रोजी किंवा त्या दरम्यान मा. मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी अमरावती यांच्यामार्फत सादर केलेला आहे हे खरे आहे काय," या प्रश्न भाग १ ला महसूल मंत्र्यांनी "होय" असे एका शब्दात उत्तर दिले होते व "**खरे असल्यास, जलसिंचनाचा प्रादेशिक असमतोल दूर होईपर्यंतच्या काळात असमतोलाच्या प्रमाणात असमतोल असलेल्या जिल्ह्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांना जलसिंचन असुविधेप्रती सानुग्रह अनुदान देण्यात यावे अशी मागणी या उपाययोजनांमध्ये समाविष्ट आहे हेही खरे आहे काय,**" या प्रश्न भाग २ ला सुद्धा त्यांनी एका शब्दात "होय" असेच उत्तर दिलेले होते.

**१९०.** सारांश काय तर हितसंबंधीयांनी मांडलेला "**पाच एकरापेक्षा कमी जमीन धारण करीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी आगामी तीन वर्षांकरिता, शासनाने, शेतकऱ्यांच्या प्रत्येक कुटुंबास रु. २००० इतकी रक्कम निश्चित केली पाहिजे.**" हा एक चांगला विचार केळकरांनी आपल्या अहवालात "हितसंबंधितांचा दृष्टीकोन" या प्रकरणात नमूद केला पण त्याबाबत कोणतीही शिफारस मात्र केली नाही. तो विचार विचारपूर्वक फेटाळून लावला नाही किंवा स्वीकारला नाही व अशारितीने या विचाराला त्या अहवालामध्ये "रद्दीचा भरणा" असे स्वरूप प्राप्त झाले. अशी बरीच रद्दी या ५७१ पृष्ठांमध्ये आहे. अशा अहवालाकडे पहाण्याची आमची दृष्टी व वृत्ती स्पष्ट करणे आवश्यक आहे. "**शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या**" व "**जलसिंचनाचा प्रचंड प्रमाणात वाढत गेलेला अनुशेष**" या दोनबाबतीत अहवालकर्त्यांचे काय मत आहे? हे आम्ही प्रथम पहाणार! व मग त्यावरून अहवालाच्या इतर भागाकडे पहायचे की पाहायचे नाही हे ठरविणार. या दोन बाबीवरून अहवाल लेखक काय लायकीचा आहे? हे निश्चित होते. सत्ताधाऱ्यांचे पाय चाटण्यात धन्यता मानणारा तो आहे की निःपक्षपातीपणे काही विचार मांडू शकतो हे त्यावरून चटकन कळून येते.

**१९१.** गेले १२ आठवडे एकामागून एक १८३ परिच्छेदामध्ये केळकर यांनी त्यांच्या अहवालात जलसिंचन या विकासक्षेत्राबाबत जे काही निरुपण केलेले आहे त्याबाबतची मते मी सविस्तरपणे मांडलेली आहेत. शितावरून भाताची परीक्षा होते, त्यामुळे अहवालाच्या इतर काही भागाबद्दल लिहिण्याचा विचारसुद्धा करणे म्हणजे आपले श्रम वाया घालविणे होय. सरलेल्या आठवड्यात महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाच्या उभय सभागृहात या विषयावर बरीच तपशीलवार चर्चा झाल्याचे वृत्तपत्रातील बातम्यावरून लक्षात येते.

**१९२.** बहुसंख्य सदस्यांनी केळकरांना सभागृहात चांगलेच 'नागवे' केले. विदर्भ व मराठवाड्यातील सदस्यांमध्ये मोठ्या प्रमाणात केळकर अहवालातील विषारी शिफारशींना विरोध करण्यात एकवाक्यता होती असे दिसून आले. एका माजी अर्थमंत्र्याने "**श्री केळकर हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ज्ञ आहेत व त्यांच्या अहवालावर अशी टिका केली तर यापुढे कोणतीही तज्ज्ञ व्यक्ती अशा कामासाठी उपलब्ध होणार नाही**" अशी खंत व्यक्त केली. भरपूर सिंचनक्षमता पदरात पाडून घेतलेल्या महाराष्ट्राच्या विकसित भागांना व त्यांच्या नेत्यांना "पाहिजे तसे अहवाल लिहून देणारे तज्ज्ञ" यापुढे उपलब्ध न होण्याचे दुःख होणे स्वाभाविक आहे. अनुशेषग्रस्त भागाने त्यासाठी गळा काढण्याचे काहीच कारण नाही. उलट अशा कपटी अहवालाचा गळा धरण्याचे धैर्य दाखविणे हेच गरजेचे होय. दुसऱ्या एका माजी अर्थमंत्र्याने "**प्रादेशिक वाद वाढेल, फुटीची बीजे रोवली**

**जातील, असे काहीही करून नका**" असा गळा काढल्याचे प्रसिद्ध झाले आहे. संपूर्ण महाराष्ट्राची संपत्ती एकट्या कृष्णा खोऱ्यात ओतली तर महाराष्ट्र एकसंघ राहतो व प्रचंड वाढलेला अनुशेष भरून काढा अशी साधी मागणी केली तर एकदम फुटीची बीजे रोवली जातात अशी बोंब मारणे ही वैचारिक विकृती व दिवाळखोरी होय. एका माजी मुख्यमंत्र्यांनी "**त्या अहवालात जे चांगले असेल ते घेतले पाहिजे**" असे सांगितले, त्यात बरेच वाईट आहे याचा कबूली जबाबच या उद्‌गारात दडलेला आहे. शिवाय विषाने भरलेल्या कुपीच्या कोपऱ्यात कुठेतरी थोडासा अविषारी द्रव सापडेल असा अविचार करण्याचे कारणच काय?

**१९३.** या निमित्ताने अनेक विधानमंडळ सदस्यांशी चर्चा झाली. त्यातील काहींनी, विशेषतः विधानसभा सदस्य श्री. विरेंद्र जगताप यांनी तर मला सरळसरळ असा प्रश्नच विचारला की "**ही सारी केळकर यांच्या 'कर्तृत्वा'वर टिका झाली. पण हे सारे बोलून झाल्यावर आपल्याला काय पाहिजे? आपली मागणी काय असावी किंवा असली पाहिजे हे निश्चित करावेच लागेल**" केळकर यांनी घटनेच्या विरोधात, कायद्याच्या विरोधात अत्यंत आकसाने या अहवालाचे लेखन केले. पण एकदा हे सारे बोलून झाल्यावर घटनेच्या व कायद्याच्या मर्यादेत राहून या अनुशेष निर्मूलनासाठी लोकांनी व लोकप्रतिनिधींनी काय मागणी केली पाहिजे हे निश्चित ठरवावेच लागेल याबाबत दुमत असण्याचे कारण नाही.

**१९४.** "वित्तीय वर्ष, २०१५-१६ च्या वार्षिक योजनेतील नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय संवितरणाकरिता, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ७ अन्वये **महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेले निदेश**" हे दिनांक १० मार्च २०१५ रोजीचे असून ते विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेले आहेत. या निदेशातील परिच्छेद ३५ शब्दशः पुढील प्रमाणे आहे :-

"३५. महाराष्ट्राच्या **समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीने** आपला अहवाल राज्यपाल यांना सादर केला आहे. राज्यपाल यांनी या अहवालाबाबत राज्य शासनाचे मत मागविले आहे. **राज्यपाल यांची अशी अपेक्षा आहे की, राज्यशासन हा अहवाल, समितीच्या शिफारशी, नियतवाटपांची तत्वे यांसह विचारार्थ घेईल** आणि यावरील आपली मते तातडीने राज्यपाल यांच्या विचारार्थ सादर करेल."

**१९५.** मा. राज्यपालांच्या निदेशातील परिच्छेद ३५ चे नीट अवलोकन केले तर विदर्भ व मराठवाड्यातील लोकांना व लोकप्रतिनिधींना एक म्हणजे केळकर अहवाल संपूर्णपणे का फेटाळला पाहिजे व दुसरे म्हणजे यापुढे निश्चितपणे काय केले पाहिजे याबाबतची निश्चित मते ही शासनासमोर व मा. राज्यपालांसमोर मांडावी लागतील असे दिसते. यामध्ये **निधी वाटपाबाबतचे स्थायी सूत्र** ही बाब सर्वांत महत्त्वाची आहे. यासंदर्भात सन २००१ चे व सन २०१५ चे मा.राज्यपालांचे निदेश व त्या दोनही निदेशातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे.

**१९६. मा. राज्यपालांचे १५ डिसेंबर २००१ रोजीचे निदेश :** महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी १५ डिसेंबर २००१ रोजी निर्गमित केलेले निदेश हा अनुशेष निर्मूलनाच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण असा कायदेशीर दस्तऐवज आहे. भारतीय संविधानाच्या कलम ३७१ (२) अन्वये भारताच्या मा. राष्ट्रपतींनी प्रदान केलेल्या खास अधिकारांचा वापर करून राज्यपालांनी हे निदेश काढलेले आहेत. देशातील दुसऱ्या कोणत्याही राज्याच्या राज्यपालांना अशा प्रकारचे अधिकार घटनेने दिलेले नाहीत. या निदेशाच्या परिच्छेद ७.९ मध्ये वाढलेला असमतोल कमी व्हावा व यापुढे असमतोल वाढू नये यासाठी "**निधी वाटपाचे स्थायी सूत्र**" शास्त्रशुद्ध पद्धतीने योजिलेले आहे. यापूर्वीच्या निधीवाटपाच्या सूत्रामध्ये बदल करून व अनुशेष निर्मूलनाला केंद्रस्थानी ठेवून हे सूत्र पुढच्या चार वर्षांच्या निधीवाटपासाठी दिशादर्शन करणारे आहे. १०० रुपये इतका निधी जर सिंचन क्षेत्रासाठी उपलब्ध असेल तर दरवर्षी त्यापैकी २५ टक्के निधीचे वाटप पेरणीखालील निव्वळ क्षेत्राच्या प्रमाणानुसार करावे.

**१९७.** पहिल्या वर्षात लोकसंख्येच्या प्रमाणात ४० टक्के तर अनुशेषाच्या प्रमाणात ३५ टक्के निधीचे वाटप करावे. दुसऱ्या वर्षी हेच लोकसंख्येसाठी ३० तर अनुशेषासाठी ४५ टक्के, तिसऱ्या वर्षी २० व ५५ टक्के व चौथ्या वर्षी १० व ६५ टक्के करावे असे या स्थायी सुत्राचे स्वरुप होते. निदेशातील तो भाग जसाच्या तसा पुढील प्रमाणे :-

WEIGHTAGES to

| वर्ष | अनुशेष | लोकसंख्या | पेरणीखालील निव्वळ क्षेत्र |
|---|---|---|---|
| २००२-२००३ | ३५ | ४० | २५ |
| २००३-२००४ | ४५ | ३० | २५ |
| २००४-२००५ | ५५ | २० | २५ |
| २००५-२००६ | ६५ | १० | २५ |

**१९८. १० मार्च २०१५ च्या मा. राज्यपालांच्या निदेशातील निधी वाटपाबाबतचे स्थायी सूत्र :** एखाद्या जिल्ह्याचा १९९४ सालचा अनुशेष अजूनही शिल्लक राहीला असेल तर त्यासाठी दहा रुपये बाजूला काढून ठेवणे हा वेगळा विषय आहे. एखादा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित झाला असेल तर त्यासाठी एकशे दहा रुपये बाजूला काढून ठेवणे हा वेगळा विषय आहे. यापूर्वी वाढलेला अनुशेष/असमतोल दूर व्हावा, नवीन असमतोल/अनुशेष निर्माण होऊ नये यासाठी मा. राज्यपालांच्या निदेशामध्ये निधीवाटपाच्या **स्थायी सूत्राचे प्रतिपादन काय आहे?** ही गोष्ट सर्वात महत्त्वाची आहे. १० मार्च २०१५ रोजी मा. राज्यपालांनी जे निदेश जारी केले त्याच्या परिच्छेद (9) (ii) मध्ये १०० रुपयांपैकी ५० रुपये लोकसंख्येच्या प्रमाणात व ५० रुपये पेरणीखालील क्षेत्राच्या प्रमाणात वाटून द्यावे असे स्थायी सूत्र नमूद आहे.

**१९९.** सन १९९४ चा एखाद्या जिल्ह्याचा अनुशेष अजूनही शिल्लक असेल तर त्याच्यासाठी पाच दहा रुपये वेगळे काढा असे सांगून झाल्यावर १० मार्च २०१५ च्या मा. राज्यपालांच्या निदेशामध्ये निधी वाटपाच्या स्थायी सूत्राबाबत स्पष्टपणे असे नमूद आहे की "राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य योजना नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशांची **लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यातील प्रत्येक घटकाला सम भारांकाच्या आधारे करावे.** तीन प्रदेशासाठी निधीच्या हिश्श्याची टक्केवारी जोडपत्र-६ अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे." १९९४ ते २०१५ या काळांत निरनिराळ्या जिल्ह्यांचा जो अनुशेष प्रचंड प्रमाणात वाढला त्याला कोणतेही "वेटेज" देण्यात आलेले नाही. मा. राज्यपालांच्या निदेशाच्या जोडपत्र-६ अ मध्ये "**वार्षिक योजना २०१५-१६ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र**" नमूद केले असून त्यानुसार ५१.८१ टक्के निधी हा सतत उर्वरित महाराष्ट्राला मिळत राहील. विदर्भाला २५.६५ टक्के व मराठवाड्याला २२.५४ टक्के निधी मिळत राहील. स्थायी सूत्र या नात्याने विदर्भापेक्षा दुप्पट व मराठवाड्याच्या निधीपेक्षा दुप्पटीहून जास्त निधी उर्वरित महाराष्ट्राला मिळत राहिला तर हा अनुशेषाचा डोंगर किती प्रचंड वाढेल? याची कल्पना करता येते व गणीतही करता येते.

**२००.** ३० जून २०१२ च्या सरासरीवर जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २०१२-१३ च्या वार्षिक अहवालामध्ये महाराष्ट्रात "अनुशेषाच्या गुणवत्ता यादीत" सर्वात जास्त अनुशेष असलेल्या पहिल्या आठ क्रमांकाचे जिल्हे 'गुणवत्ते'नुसार पुढील प्रमाणे आहेत :- (१) अमरावती : अनुशेष २६९.४४ हजार हेक्टर (२) बुलढाणा : २३८.४६ हजार हेक्टर (३) यवतमाळ : १९५.९४ हजार हेक्टर (४) अकोला : १५७.४६ हजार हेक्टर (५) वाशिम : १३६.११ हजार हेक्टर (६) जालना : १२८.६७ हजार हेक्टर (७) औरंगाबाद : १०८.६६ हजार हेक्टर (८) हिंगोली : १०२. ५७ हजार हेक्टर. **शंभर हजार हेक्टरच्यावर अनुशेष असलेल्या या प्रवर्गात एकूण आठ जिल्हे आहेत.** त्यापैकी ५ जिल्हे विदर्भातील असून ३ जिल्हे मराठवाड्यातील आहेत. **५० हजार ते १०० हजार हेक्टरचा अनुशेष असलेल्या प्रवर्गात वर्धा, नागपूर व गोंदीया हे तीन जिल्हे विदर्भातील असून बीड व उस्मानाबाद हे दोन जिल्हे मराठवाड्यातील आहेत.** याशिवाय रत्नागिरी व नाशिक धरून या प्रवर्गात एकूण आठ जिल्हे आहेत. मा. राज्यपालांनी निर्गमित केलेल्या १० मार्च २०१५ च्या निदेशांनी सन १९९४ ते जून २०१२ या काळात वाढलेल्या व त्यानंतरही वाढत असलेल्या या अनुशेषाला निधी वाटपाच्या स्थायी सूत्रात 'अनुशेष' यास एक घटक या नात्याने कोणतेही 'वेटेज' दिलेले नाही.

**२०१.** अनुशेष निर्मूलनाच्या या प्रक्रियेमध्ये 'अनुशेष' या घटकाचे 'वेटेज' पूर्णपणे काढून टाकण्याची 'कुळकथा'सुद्धा ऐकण्यासारखी आहे. सन २००१ व त्यानंतरच्या मा. राज्यपालांच्या निदेशामध्ये "अनुशेष" या घटकाला निधी वाटपाच्या सूत्रात अग्रमानाचे स्थान होते. सन २००९ नंतर "**आर्थिक अनुशेष संपुष्टात आला**" असा मोठा गलका करण्यात आला. वित्तमंत्र्यांच्या अंदाजपत्रकीय भाषणात "आर्थिक अनुशेष संपुष्टात आला" असा उल्लेख आला. मा. राज्यपालांच्या अभिभाषणात "आर्थिक अनुशेष संपुष्टात आला" असा उल्लेख आला. हा असत्य प्रचार एवढ्या गाजावाजाने करण्यात आला की त्यातून पुढे "अनुशेषाचे वेटेज" मा. राज्यपालांच्या निदेशातून पूर्णपणे काढून टाकण्यात त्याचे पर्यवसान सन २०१० च्या निदेशापासून झाले व ते पुढे तसेच चालू राहीले. या साऱ्या कारस्थानाची माहिती केळकरांना देण्यात आली होती असे दिसून येते. **केळकरांच्या अहवालाच्या परिच्छेद ४.२.३.४ मध्ये तसा स्पष्ट उल्लेख आहे.** १९९४ च्या अनुशेषातील एखाद्या जिल्ह्याचा काही अनुशेष शिल्लक राहीला असेल तर त्यासाठी पाच-दहा रुपये वेगळे काढून ठेवा व इतर "विभागणी योग्य योजना खर्च हा लोकसंख्या व निव्वळ पेरणी क्षेत्राच्या आधारे प्रत्येक घटकासाठी तीनही प्रदेशामध्ये ५० टक्के असा विभागण्यात यावा" असे २०१० च्या मा. राज्यपालांच्या निदेशाने बंधनकारक केल्याचा स्पष्ट उल्लेख केळकर अहवालाच्या या परिच्छेद ४.२.३.४ मध्ये आहे.

**२०२.** अनुशेष या घटकाचे निधीवाटपातील 'वेटेज' पूर्णपणे काढून टाकण्याचा सिलसिला २०१० च्या निदेशापासून सुरु झाला तो पुढे दरवर्षी सुरु राहीला. तो आता १० मार्च २०१५ च्या मा.राज्यपालांच्या निदेशामध्येसुद्धा सुरुच रहावा, हे भयसूचक आहे. राज्यकर्ते नवीन आले असले तरी अनुशेष वाढविण्याचे कंकण बांधलेल्या जुन्या राज्यकर्त्यांची अनुशेष वाढविण्याच्या यंत्रावरील व यंत्रणेवरील पकड अजूनही कायम आहे हा यातून निघणारा निष्कर्ष भयसूचकच आहे.

## (१४) १९ एप्रिल २०१५

# अनुशेष निर्मूलनार्थ निधी वाटपाचे स्थायी सूत्र

**२०३.** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या प्रदेशांमध्ये प्रादेशिक असमतोल मोठ्या प्रमाणात वाढत गेला. हा अनुशेष दूर करावयाचा असेल तर त्या संदर्भात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या त्या विकासक्षेत्रातील **अद्यावत राज्यसरासरीवर शास्त्रशुद्ध मापदंडाच्या आधारे अनुशेषाचे करण्यात आलेले मोजमाप** ही पहिली आवश्यकता असून दुसरी व त्यापेक्षा महत्त्वाची आवश्यकता म्हणजे **अनुशेष निर्मुलनार्थ निधी वाटपाचे स्थायी सूत्र** निश्चित असणे ही होय. सत्यशोधन समितीच्या अहवालापासून अशा सूत्राचा शोध घेण्यास सुरुवात झाली. उत्तम प्रकारची सूत्रे सुचविण्यात आलीत पण त्यांचा स्वीकारच करण्यात आला नाही. अनेकदा उत्तम सूत्र स्वीकारले गेले पण त्याची अंमलबजावणी झाली नाही. आजच्या घडीला या स्थायी सूत्राचा मुळातून विचार होणे आवश्यक आहे.

**२०४.** नियोजन विभागाच्या ३ ऑगस्ट १९८३ च्या ज्या शासन निर्णयाने सत्यशोधन समितीची स्थापना झाली त्याच शासन निर्णयाने "**निश्चित केलेला असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व तो पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून दूरगामी उपाय सुचविणे**" असा विषय समितीच्या विचारार्थ सोपविला होता. सत्यशोधन समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३२ मध्ये "**अनुशेष भरून काढण्यासाठी जी कृती करावयाची तिची सुरुवात पैशाची तरतूद करण्यापासूनच करावी लागते**" हे तर सांगितलेच पण त्याच बरोबर विकासातील असमतोल दूर करावयाचा असेल तर "**मागास जिल्ह्यांचा विकासाचा वेग काही प्रमाणात वाढला पाहिजे आणि त्या प्रमाणात प्रगत जिल्ह्यांचा विकासाचा वेग काहीसा मंदावला पाहिजे ही गोष्ट अशा प्रयत्नात अभिप्रेत आहे. प्रादेशिक असमतोल दूर करावयाचा तर जे अपरिहार्य आहे, ते स्वीकारले पाहिजे. हे अवघड आहे म्हणूनच ते निस्संदिग्धपणे सांगितले पाहिजे,**" असे मत स्पष्टपणे आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३५ मध्ये त्या समितीने व्यक्त केलेले आहे.

**२०५.** "उपलब्ध असलेल्या वित्तीय तरतुदीच्या मर्यादेत लवकरात लवकर विवक्षित अनुशेष भरून काढावयाचा वा कमी करावयाचा असेल तर प्रत्येक विवक्षित क्षेत्र-उपक्षेत्र-योजना कार्यक्रम **यासाठी केलेली तरतूद ज्या त्या कामासाठी पण त्या त्या बाबतीत ज्या जिल्ह्याचा अनुशेष आहे त्या जिल्ह्यामधेच खर्ची पडली पाहिजे,** अशी आमची शिफारस आहे. त्याला फक्त दोन अपवाद आम्ही करू इच्छितो. (अ) हाती घेतलेल्या प्रकल्पाची पूर्तता करणे आणि (ब) ज्या जिल्ह्यामध्ये अनुशेष आढळत नाही त्या जिल्ह्याच्याही स्वाभाविक वाढ विस्तारात्मक गरजांची पूर्तता करणे हे ते दोन अपवाद होत." अशी शिफारस सत्यशोधन समितीने परिच्छेद १७.२१ मध्ये केलेली असून पुढे १७.२४ मध्ये असे सुचविले आहे की, "सारासार विचार करता आम्ही असे सुचवितो की, विवक्षित अनुशेष भरून काढण्यासाठीच्या राज्यपातळीवरील निधीपैकी १५ टक्के रक्कम वर सांगितलेल्या दोन बाबींशी संबधित गरजा पूर्ण करण्यासाठी राज्यपातळीवर राखून ठेवली जाईल. या १५ टक्के रकमेचे वाटप अनुशेषरहित व अनुशेष असलेल्या दोन्ही प्रकारच्या जिल्ह्यांसाठी असेल."

**२०६.** पुढे समितीने परिच्छेद १७.२५ मध्ये असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, "अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांमध्ये चालू असलेली कामे व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि स्वाभाविक वाढ विस्तारांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी राज्यपातळीवरील निधीमधून १५ टक्के रक्कम राखून ठेवावी, असे आम्ही सुचविलेले आहे. **१५ टक्के रक्कम ही यासाठीची कमाल मर्यादा मानावी हे बजावून सांगितले पाहिजे. राज्यपातळीवरील निधीमधून यापेक्षा अधिक प्रमाणात रक्कम अनुशेषाशी असंबध्द कामासाठी वापरली तर आजचा अनुशेष भरून काढण्याची वा कमी करण्याची प्रक्रिया पार मंदावेल.**"

**२०७.** अनुशेष दूर करण्यासाठी राज्यस्तरीय निधीचे वाटप करण्यासाठीची जी पद्धती समितीने अंतिमतः स्वीकारली ती पुढील प्रमाणे :- "आमच्या पध्दतीमध्ये प्रत्येक वार्षिक योजनेमध्ये विवक्षित क्षेत्र-योजना-उपक्षेत्र कार्यक्रम यांच्या साठी **तरतुदी किती आहेत** हे पाहणे, त्यापैकी १५ टक्के रक्कम ही **अनुशेषाशी संबधित नसलेली चालू कामे** पूर्ण करण्याकरिता व नैसर्गिक वाढविस्तारांच्या सर्व जिल्ह्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता राखून ठेवणे, आणि उरलेल्या **८५ टक्के निधीचे वाटप अनुशेष असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये त्यांच्या आजच्या राज्यसरासरीपासून काढलेल्या अनुशेषाच्या प्रमाणात वाटून देणे या तीन गोष्टींचा समावेश आहे**" अशा प्रकारचा उल्लेख समितीने परिच्छेद १७.३३ मध्ये केलेला आहे.

**२०८.** राज्याच्या एकूण नियतव्ययापैकी ८५ टक्के रक्कम अनुशेष निर्मूलनाच्या कामासाठी खर्च करावी व १५ टक्के रक्कम बिगर अनुशेष प्रयोजनार्थ खर्च करावी ही शिफारस तर राज्यशासनाने स्वीकारली नाहीच उलट अत्यंत सुडबुद्धीने उलट कारवाई केली व १९८५ ते १९९५ या काळात १५ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम अनुशेष निर्मूलनाच्या कामी उपलब्ध होणार नाही याची कसोशीने काळजी घेतली. १९८५-८६ ते १९९४-९५ या दहा वर्षांच्या काळात एकूण नियतव्ययापैकी अनुशेषासाठीचा नियतव्यय १९८९-९० या वर्षी तो जास्तीत जास्त १८.९४ टक्के होता. त्या दहा वर्षांत तो यापेक्षा जास्त कधीही नव्हता व तो कमीत कमी १९९४-९५ मध्ये ९.६० टक्के होता. याच्या खाली तो या दहा वर्षांत गेला नाही. या दहा वर्षांची सरासरी १४.१० टक्के येते.

**२०९.** अगदी रुपयाच्याच भाषेत रोकठोक बोलायचे तर असे सांगता येईल की सन १९९४-९५ मध्ये एकूण नियतव्यय ५२०८ कोटी रुपये होता त्यामध्ये अनुशेष नियतव्यय ५०० कोटी रुपये म्हणजे ९.६० टक्के होता. सन १९८९-९० या वर्षांत एकूण नियतव्यय २६४० कोटी रुपये होता व अनुशेष नियतव्यय ५०० कोटी रुपये म्हणजे १८.९४ टक्के होता. १९८५-८६ ते १९९४-९५ या दहा वर्षांत एकूण नियतव्यय २८,९२२ कोटी रुपये होता तर अनुशेष नियतव्यय ४०८०.८० कोटी रुपये होता. या दहा वर्षांची सरासरी टक्केवारी १४.१० टक्के पडते. **या १० वर्षांचा राज्यशासनाचा हा सारा पराक्रम अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालात पृष्ठ २४१ वर नोंदबद्ध झालेला आहे.**

**२१०.** सत्यशोधन समितीची १५/८५ ची एक शिफारस जरी अंमलात आणली असती तरी अनुशेषाचा हा डोंगर एवढा वाढला नसता. पण तसे झाले नाही. त्यानंतर अनुशेष व निर्देशांक समितीने सुद्धा याबाबतीत अतिशय भारदस्त शिफारशी केल्या. "**अनुशेष दूर करण्याच्या प्रक्रियेला अधिक चालना देण्याकरिता शिफारशी**" या मथळ्याखाली अहवालाच्या पृष्ठ २४३ वर परिच्छेद १२.१५ मध्ये समितीने पुढील प्रमाणे शिफारस केलेली आहे :-

"१२.१५ अनुशेष दूर करण्यासाठी देण्यात येणाऱ्या योजनांतर्गत निधीचे वाटप व वितरण यांकरिता समिती खालील तत्त्वांची शिफारस करत आहे.

(एक) राज्याच्या ३ प्रदेशांमधील व ३० जिल्ह्यांमधील अनुशेषाच्या तरतुदींचे वाटप हे एकूण अनुशेषातील त्यांच्या हिश्शाच्या आधारे केलेले असावे.

(दोन) अनुशेष दूर करण्यासाठी असलेल्या वार्षिक तरतुदींचे वाटप पुढील पद्धतीने एकूण अनुशेष संपूर्णपणे दूर करता येईल असे करण्यात यावे." असे नमूद करून पुढे पाटबंधारे विभागाच्या अनुशेषाविषयी समितीने "**पाटबंधारे व रस्ते या क्षेत्रांतील अनुशेष सात वर्षांच्या आत संपूर्णपणे दूर करावा.**" अशी शिफारस केलेली आहे.

**२११.** अनुशेष व निर्देशांक समितीचे काम चालू असतांनाच अनुशेष निर्मूलनाच्या प्रक्रियेवर कृष्णा खोरे प्रकल्पामुळे फार मोठे गंडातर आलेले आहे याची समितीला जाणीव आलेली होती. समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद १२.१८ मध्ये पुढील प्रमाणे जळजळीत इशारा दिला आहे. :-

"... दुर्देवाने तो तसा केला जात नाही. बऱ्याचशा नवीन योजना, प्रकल्प कार्यक्रम राज्याच्या विकसित प्रदेशांमध्ये आणि जिल्ह्यांत राबवण्यात येत आहेत. झपाट्याने होणारे औद्योगिकीकरण व **कृष्णा खोरे पाटबंधारे विकास ही दोन त्याची ढळढळीत उदाहरणे म्हणता येतील. हे असेच चालू राहिल्यास, प्रादेशिक असमतोल इतका ढासळत जाईल की तो सुधारणे भविष्यात कधीच शक्य होणार नाही.**"

**२१२.** अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल बराच काळपर्यंत पाडून


नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

**नगरपरिषद चांदूर रेल्वे जि.अमरावती**

**सौ.अंजली सुनिल अग्रवाल, अध्यक्ष** **सौ.सुशिला अनिल आठवले, उपाध्यक्ष**

ठेवण्यात आला. तीनही वैधानिक विकास मंडळांना प्रतिनिधित्व देणाऱ्या अनुशेष व निर्देशांक समितीची नोव्हेंबर १९९५ मध्ये राज्यपालांनी पुनर्रचना केली व त्यानंतर जुलै १९९६ मध्ये आणखी पुनर्रचना (पुन्हा) करण्यात आली. या समितीने आपला अहवाल दिनांक २३ एप्रिल १९९७ रोजी मा. राज्यपालांना सादर केला. या समितीच्या सदस्यांनी अत्यंत तळमळीने व कष्टपूर्वक आपले कार्य पार पाडले होते. विशेषतः खराखुरा अनुशेष शोधून काढण्यासाठी व तो संपुष्टात आणण्यासाठी खऱ्याखुऱ्या उपाययोजना सुचविण्यासाठी या समितीच्या सदस्यांनी अपार कष्ट उपसलेले होते. त्यामुळे या मेहनतीचे चीज झाले पाहिजे अशी भावना त्या सदस्यांच्या मनामध्ये होती. मात्र कृष्णा खोऱ्याच्या एकूण दबावाखाली हा अहवाल गुंडाळून तर ठेवला जाणार नाही ना? अशी भीतीसुद्धा त्यातील जाणकार सदस्यांना वाटत होती. अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल एकमताचा आहे, हे खरे असले तरी या अहवालात सुरुवातीलाच या समितीचे सदस्य व मराठवाडा वैधानिक विकासमंडळाचे अध्यक्ष श्री. दिवाकरराव रावते यांनी मा. राज्यपालांना लिहिलेले एक पत्र जोडलेले असून त्यातील परिच्छेद ४ पुढील प्रमाणे आहे :-

"४. मसुदा लेखन समितीने दिनांक ३१.०३.१९९४ रोजी असल्याप्रमाणे प्रत्यक्ष अनुशेष निश्चित केला असून सध्याच्या किंमतीचा विचार करता त्यासंबंधातील खर्चाची गणना करून तो खर्च रु. १५,३५५.७७ कोटी एवढा असेल असे म्हटले आहे. **हा अनुशेष दूर करण्यासाठी समितीने सूचित केलेल्या ३ ते ७ वर्षांच्या वेळापत्रकाशी शासनाने बांधिलकी मानली पाहिजे. या वेळापत्रकाशी शासनाने बांधिलकी मानली नाही तर सत्यशोधन समितीच्या उत्तरवर्ती कालावधीत अनुभवल्याप्रमाणे या दिशेने केलेले प्रयत्न निष्फळ ठरतील.**"

**२१३.** अनुशेष व निर्देशांक समितीचे दुसरे एक सदस्य, माझ्या महाविद्यालयातील माझे एक ज्येष्ठ सहकारी व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य श्री. एच. बी. उलेमाले हे हा अहवाल सादर झाल्यानंतर काही महिन्याने एक दिवस भल्या सकाळी रिक्षाने माझ्या निवासस्थानी आले. या! बसा! झाल्यावर मी त्यांना म्हणालो "सर! इतक्या सकाळी न कळविता तुम्ही आलात. काही विशेष काम काढलेले आहे का?" दुर्धर आजाराने ग्रासलेले प्राचार्य उलेमाले क्षीण आवाजात म्हणाले "बी. टी.! आम्ही समितीच्या सदस्यांनी मनापासून मेहनत केलेली आहे. विशेषतः सिंचनाचा अनुशेष कितीतरी पटीने वाढलेला आहे. आम्ही अहवाल सादर करून काही महिने झाले आहेत. विकसित भागांचा मोठा दबाव असल्याने हा अहवाल आणखी काही महिने दाबूनच ठेवला जाईल असे आम्हाला स्पष्टपणे दिसत आहे." "मी काही फार दिवस जगेल असे मला वाटत नाही. ही अहवालाची प्रत तुमच्याकडे ठेवा व याच्यावर काही करता येईल काय ते पहा" असे म्हणून उलेमाले सरांनी त्या अहवालाची मूळ इंग्रजीतील जाडजुड प्रत माझ्या सुपूर्त केली. मला काय बोलावे ते सुचेना. काय करता येईल? याबाबतचा ढोबळ विचार विनिमय होऊन आमची त्यादिवशीची चर्चा संपली.

**२१४.** पुढचे दोन-चार दिवस माझ्यासमोर सतत एकच विषय होता, तो म्हणजे अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल. अतिशय अस्वस्थ करणारी बाब म्हणजे सर्व विकास क्षेत्रांचा मिळून एकूण अनुशेष सत्यशोधन समितीने ३१८६ कोटी रुपयाचा काढलेला होता, तो आता या अहवालाप्रमाणे १५३५५ कोटी रुपये झाला होता. समितीने खूपच मेहनत केलेली होती. चांगले उपाय सुचविले होते. अत्यंत चिंताजनक बाब म्हणजे सत्यशोधन समितीने तक्ता ७.५ मध्ये सिंचनाचा जो अनुशेष ९२४ कोटी रुपयाचा सांगितला होता, तो आता अनुशेष व निर्देशांक समितीने ८२६५ कोटी रुपये झाल्याचे तक्ता ३.२ मध्ये नमूद केले होते. हेक्टरामध्ये सत्यशोधन समितीने ९२४ हजार हेक्टरचा अनुशेष काढला होता, तो आता १६५३ हजार हेक्टर झाला होता.

**२१५.** या अहवालाचे माझे व्यक्तिगत स्तरावरील वाचन संपल्यानंतर शासनाच्या स्तरावर याबाबत काय विचारधारणा आहे याबाबत माहिती घेतली तर निदान वर्ष दोन वर्षे तरी हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवल्या जाणार नाही, असा अंदाज सर्वच बाजूकडून आला. अशा स्थितीत आपण काय करावे याबाबत मी माझ्या संघटनेतील सहकाऱ्यांशी विचार विनिमय केला. प्राचार्य उलेमाले सरांच्या निवासस्थानी जाऊन याबाबत त्यांच्याशी चर्चा केली व **दोन बाजूने हा संघर्ष उभा करावा असे ठरले. एक म्हणजे निदान जलसिंचन या विकास क्षेत्राविषयीची या अहवालातून उपलब्ध झालेली माहिती लोकांपर्यंत पोचवावी व दुसरे म्हणजे विधानमंडळ सदस्य या नात्याने सभागृहात हा अहवाल सभागृहाच्या पटलावर तातडीने ठेवला जावा यासाठी प्रयत्न करावा.**

**२१६.** चार भिंतीच्या आत चाललेल्या कारस्थानांना प्रकाशात खेचून आणता येते ते मुद्रित शब्दांच्या मदतीनेच. शासनाने एखादी गोष्ट दडपून ठेवावयाची ठरविले की अनेक अफवांना उत येतो. अफवांच्या या कुजबुजीपासून बचाव करण्याचे महत्त्वपूर्ण साधन म्हणजे मुद्रित शब्द. पुढच्या निदान वर्ष-दोन वर्षे, अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल प्रकाशात आणायचाच नाही असा शासनस्तरावर अलिखित निर्णयच झालेला होता. तो निर्णय शासनाने अंमलात आणलासुद्धा. म्हणूनच अनुशेष व निर्देशांक समितीच्या या अहवालातील निदान जलसिंचन अनुशेषाबाबतचा महत्त्वपूर्ण भाग लोकांसमोर आणण्याच्या हेतूने या विषयावर आवश्यक ती आकडेवारी व विचार समाविष्ट असलेले एक पुस्तक प्रकाशित करावे असा आमच्या संघटनेने निर्णय घेतला व त्याप्रमाणे ते पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

**२१७.** रविवार, दिनांक १७ मे १९९८ रोजी दुपारी २.३० वाजता श्रीमती विमलाबाई देशमुख सभागृह, शिवाजी नगर, अमरावती येथे नुटाचे अध्यक्ष व विधानपरिषद सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी लिहिलेल्या "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष 'क्ष' किरण परीक्षा" या पुस्तकाचे प्रकाशन मा. कुलगुरु डॉ. एस. टी. देशमुख यांच्या हस्ते समारंभपूर्वक पार पडले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प. सि. काणे हे होते. अनुशेष समस्येचे जाणकार अभ्यासक व विधानपरिषद सदस्य श्री. मधुकरराव किंमतकर यांचे प्रमुख अतिथी म्हणून भाषण झाले. प्राचार्य बी. एस. ऊर्फ डॅडी देशमुख व डॉ. शरद कळणावत यांची पुस्तक परिचयार्थ प्रमुख वक्ते म्हणून भाषणे झालीत.

**२१८.** प्रकाशित झालेल्या १२८ पृष्ठांच्या या पुस्तकामध्ये १९ प्रकरणे व १३ परिशिष्टे समाविष्ट होती. या पुस्तकामधील १७ वे प्रकरण पूर्णपणे अनुशेष व निर्देशांक समितीने दिलेल्या माहितीवर आधारीत होते. या प्रकरणातील पहिलेच वाक्य पुढील प्रमाणे होते :-

"जून १९९४ मध्ये असलेल्या जिल्हावार अनुशेषाचे मोजमाप या विवेचनाच्या **परिशिष्ट बारा**[१] मध्ये दिलेले आहे, स्तंभ ३ मध्ये राज्य क्षेत्रातील सिंचन प्रकल्पांच्या सिंचन क्षमतेचे जून १९९४ चे क्षेत्र, प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये दिलेले असून स्तंभ ४ मध्ये स्थानिक क्षेत्र प्रकल्पांनी निर्माण केलेली सिंचनक्षमता दिलेली आहे. स्तंभ ५ मध्ये एकूण सिंचन क्षमता (प्रमाण रब्बी समतुल्यामध्ये) नमूद केलली असून दिलेले आकडे हे हजार हेक्टरचे आहेत."

या पुस्तकांतील परिशिष्ट १२ म्हणजे दुसरे तिसरे काही नसून शासनाने अजूनही प्रसृत न केलेल्या, सभागृहाच्या पटलावर न ठेवलेल्या, अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालातील तक्ता ३.२ जसाच्या तसा सर्व आकडेवारीसह या ठिकाणी उद्धृत केलेला होता. ही माहिती कुठून घेतली आहे, हे वाचकांना कळावे म्हणून या प्रकरणातील पहिल्याच वाक्याला पहिलीच तळटीप पृष्ठ ६८ वर पुढील प्रमाणे होती :- "Source : See Table No. 3.2 on page 97 of "Report of the Indicators and backlog committee : volume 1 on Relative levels of Development, Backlog and Removal of Regional imbalances-1997"

**२१९.** अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालातील जलसिंचन या विकासक्षेत्रातील वाढलेल्या अक्राळविक्राळ अनुशेषाला प्रकाशात आणण्याचे काम या पुस्तकाच्या प्रकाशनाने पूर्णत्वाला गेलेले होते. आता हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा यासाठी सभागृहात सुरु असलेला संघर्ष आणखी तीव्र करण्याचे काम वेगाने हाती घेण्याचा प्रश्न होता. प्रत्यक्ष अनुभवाने हे काम बरेच कठीण होते हे त्यानंतर लक्षात आले. आम्ही काही लोकप्रतिनिधींनी शेवटपर्यंत त्या कामाचा सभागृहात चांगलाच पाठपुरावा केला. अहवाल सादर झाल्यापासून ३ ते ७ वर्षांत सर्व विकासक्षेत्रातील अनुशेष दूर व्हावा अशी शिफारस अनुशेष व निर्देशांक समितीने केली होती. सादर झाल्यापासून जवळजवळ ४ वर्षेपर्यंत तो अहवाल दाबूनच ठेवण्यात आला. श्री दिवाकरराव रावते यांनी व्यक्त केलेली **"हा अनुशेष दूर करण्यासाठी समितीने सूचित केलेल्या ३ ते ७ वर्षांच्या वेळापत्रकाशी शासनाने बांधिलकी मानली पाहिजे. या वेळापत्रकाशी शासनाने बांधिलकी मानली नाही तर सत्यशोधन समितीच्या उत्तरवर्ती कालावधीत अनुभवल्याप्रमाणे या दिशेने केलेले प्रयत्न निष्फळ ठरतील.**" ही भीती अक्षरशः खरी ठरली.

---

**(पृष्ठ १८२ वरून मजकूर पुढे चालू)** स्थापन होतो हे न कळण्याइतके केळकर दुधखुळे नाहीत तरीही त्यांनी आपल्या अहवालाचे नामांतर केले.

**१५२.** देशाच्या मा. पंतप्रधानांनी दिल्लीच्या लाल किल्ल्यावरून जे सांगीतले ते डॉ. विजय केळकर या ज्ञानवान व्यक्तीच्या "सामान्य ज्ञान" कक्षातसुद्धा उपलब्ध नसेल काय? पंतप्रधानांच्या आदेशावरून नियोजन आयोगाने नेमलेल्या सत्यशोधन पथकाने (FFT) सादर केलेला अहवाल केळकरांनी नक्कीच पाहिला असणार, कारण कठिण अशा वापरलेल्या शब्दांचे अर्थ नमूद करणाऱ्या 'शब्दसूची'मध्ये केळकर अहवालात क्रमांक ९५ वर त्यांनी FFT म्हणजे "सत्यशोधन पथक" असे नमूद केले आहे. सत्यशोधन पथकाचा अहवाल वाचल्यानंतर सिंचनसुविधांचा अभाव व शेतकऱ्यांच्या आत्महत्त्याविषयीचे ज्ञान त्यांना नक्कीच झालेले असणार. केंद्राच्या मंत्र्यांनी, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी व मंत्र्यांनी सिंचनसुविधांचा अभाव व होणाऱ्या आत्महत्त्या या विषयी अधिकृतपणे जी मते मांडली ते केळकरांच्या कानावर गेलीच नसतील काय? शेवटी केळकर हे काही आभाळातून पडलेले नाही. विदर्भ आणि मराठवाड्यातील या आत्महत्त्यांबद्दल त्यांना काहीच बोलावेसे वाटले नाही. या एका कारणावरूनसुद्धा माजी मुख्यमंत्र्यांनी म्हटल्या प्रमाणे त्यांचा अहवाल कचऱ्याच्या टोपलीत टाकून देण्याच्या लायकीचा ठरतो. त्यामुळे कचऱ्याच्या टोपलीचा अवमान होतो असे वाटत असेल तर आत्महत्त्यांनी होरपळलेल्या विदर्भ व मराठवाड्याच्या बळीराजाकडे त्यांचा अहवाल जाळून टाकायचा की पुरून टाकायचा याबाबत पर्याय मागता येईल. एकमुखाने व एकमताने बळीराजाचा आवाज येईल "या दोनपैकी केळकरांना जे पसंत असेल ते करा"

## (१५) २६ एप्रिल २०१५

# *विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला*

**२२०.** महाराष्ट्राच्या विकसित भागाच्या नेत्यांनी महाराष्ट्रामध्ये दीर्घकाळ जी सत्ता प्राप्त केली व त्या माध्यमातून जी राजकीय शक्ती प्राप्त केली त्याचा जो विपरित वापर त्यांनी केला त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासाला प्रादेशिक असमतोलाच्या वृद्धीच्या इतिहासाचे स्वरूप प्राप्त झाले. या इतिहासामध्ये असा असमतोल वाढविण्यासाठी अत्यंत विषारी अशा सापळ्यांची योजना करून विदर्भ व मराठवाड्याचा सिंचन अनुशेष भरून काढणे तर दूरच राहीले पण तो भरून निघण्याची सुरुवात सुद्धा होणार नाही व तो चक्रवाढ गतीने वाढत राहील. यासाठी अत्यंत लक्षणीय व अभद्र योजना विकसित भागांच्या नेत्यांनी आखल्या. **अशा विषारी सापळ्यांच्या शृंखलेने हा इतिहास ओतप्रोत भरला असून केळकर समितीचा अहवाल हा या शृंखलेतील सहावा विषारी सापळा होय.**

**२२१.** महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या उभय सभागृहांनी जरी विकास मंडळांच्या स्थापनेचा ठराव दिनांक २६ जुलै १९८४ रोजी एकमताने मंजूर केलेला असला तरी प्रत्यक्षात वैधानिक विकास मंडळांची स्थापना दिनांक १ मे १९९४ रोजी म्हणजे त्यानंतर जवळ जवळ १० वर्षांनी झाली. एखाद्या राज्यातील विकसित भाग आपल्या विकासाच्या आधारे जी राजकीय शक्ती प्राप्त करून घेतात त्या राजकीय शक्तीचा वापर करून अविकसित भागांच्या विकासाला पूरक ठरणाऱ्या एखाद्या लहानशा घटनात्मक तरतुदीला सुद्धा प्रत्यक्ष अंमलात येण्यापासून किती दीर्घकाळ प्रलंबित ठेवू शकतात याचे स्वतंत्र भारताच्या इतिहासात घटनेच्या कलम ३७१(२) इतके दुसरे नामवंत उदाहरण शोधून सापडेल असे वाटत नाही. लोकलाजेस्तव ठराव जरी एकमताने मंजूर झाला तरी विधानमंडळाचा तो ठराव **अंमलात येऊ नये किंवा शक्य तितक्या विलंबाने तो अंमलात यावा यासाठी विकसित भागांच्या नेत्यांनी त्यावेळी केलेले प्रयत्न हा या शृखंलेतील पहिला विषारी सापळा होय.** याबाबतचे अधिकृत कागदोपत्री उपलब्ध असलेले तपशील नमूद करायचे तर तो एका स्वतंत्र पुस्तिकेचा विषय होतो. पण विस्तारभयास्तव आज तो विषय एवढ्यावरच थांबविणे अपरिहार्य आहे.

**२२२.** सत्यशोधन समितीची १५/८५ ची एक शिफारस जरी अंमलात आणली असती तरी अनुशेषाचा हा डोंगर एवढा वाढला नसता. पण तसे झाले नाही. सत्यशोधन समितीने परिच्छेद १७.२४ मध्ये अशी स्पष्टपणे शिफारस केली होती की, "सारासार विचार करता आम्ही असे सुचवितो की, विवक्षित अनुशेष भरून काढण्यासाठीच्या राज्यपातळीवरील निधीपैकी १५ टक्के रक्कम वर सांगितलेल्या दोन बाबींशी संबधित गरजा पूर्ण करण्यासाठी राज्यपातळीवर राखून ठेवली जाईल. या १५ टक्के रकमेचे वाटप अनुशेषरहित व अनुशेष असलेल्या दोन्ही प्रकारच्या जिल्ह्यांसाठी असेल." **पुढच्या दहावर्षांमध्ये सत्यशोधन समितीची १५/८५ ची शिफारस ८५/१५ अशी उलटी करून अंमलात आणली गेली. हा महाराष्ट्राच्या विकसित भागांच्या नेत्यांनी मांडलेला दुसरा अत्यंत विषारी सापळा होय.** अनुशेषग्रस्त जिल्ह्यांना ८५ टक्के निधी हा उपलब्ध करून देणे तर बाजूलाच राहीले त्यांना धड १५ टक्केसुद्धा निधी मिळणार नाही याची काळजी विकसित भागांच्या नेत्यांनी घेतली. त्या दहा वर्षातील अधिकृत आकडेवारी याच लेखाच्या परिच्छेद २०७ ते २११ मध्ये नमूद केलेली आहे. १५/८५ चा हा विषारी सापळा अधिकृत माहितीसह विवेचनासाठी घेतला तर तो एका स्वतंत्र पुस्तिकेचा विषय होतो. पण विस्तारभयास्तव आज तो विषय एवढ्यावरच थांबविणे अपरिहार्य आहे.

**२२३.** घटनेतील तरतूदीनुसार सिंचन अनुशेषाच्या निर्मूलनार्थ राज्यपालांनी कायदेशीर निधीवाटपाचे निदेश काढल्यानंतरसुद्धा त्याची अंमलबजावणी न करण्यासाठी विकसित भागांच्या नेत्यांनी ज्या कारवाया केल्या, त्या समग्र कारवायांचे वर्णन एकत्रितरित्या **राज्यपालांच्या निदेशांचे पालन होणार नाही यासाठी विकसित भागांतील नेत्यांनी लावलेला तिसरा अत्यंत विषारी सापळा असे करता येईल.** मा. राज्यपालांचे निदेश सभागृहाच्या पटलावर न ठेवणे, खूपच असंतोष झाल्यावर निदेश जाहीर केले तरी त्यांची अंमलबजावणी न करणे, पुढे निधी दिला तरी तो निधी अखर्चित राहील याची काळजी घेणे, अविकसित जिल्ह्यांचा निधी अन्यत्र वळविणे इत्यादी कारवायांनी हा चौथा विषारी सापळा ओतप्रोत भरला आहे. याबाबतचे अधिकृत कागदोपत्री उपलब्ध असलेले तपशील हा एका स्वतंत्र पुस्तिकेचा विषय होतो. पण विस्तारभयास्तव आज तो विषय एवढ्यावरच थांबविणे अपरिहार्य आहे. अगदी ओघानेच आले म्हणून नमूद करणे आवश्यक आहे, ते असे की या चौथ्या विषारी सापळ्याचे तपशीलवार वर्णन करणारे "सिंचन अनुशेषाचा संघर्ष" या मथळ्याचे एक २६० पृष्ठांचे पुस्तक तत्कालीन ज्येष्ठ विधानपरिषद सदस्य श्री. नितिन गडकरी यांनी यापूर्वीच प्रकाशित केलेले आहे. त्या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेच्या पृष्ठावर जॉर्ज वाशिंगटन यांचा एक सुविचार प्रकाशित करण्यात आला आहे. तो पुढील प्रमाणे :- "Government is not reason, it is not eloquence, it is force; like fire, troublesome servant and a fearful master. Never for a moment should it be left to irresponsible action."

**२२४.** "सिंचन अनुशेष" म्हणजे काय? तो दूर झाला म्हणजे काय झाले? भौतिक अनुशेष म्हणजे काय? आर्थिक अनुशेष म्हणजे काय? शंभर हेक्टरचा अनुशेष दूर झाला म्हणजे काय झाले? शंभर हेक्टरची सिंचनक्षमता पदरात पडली म्हणजे काय झाले? १०० हेक्टरची सिंचनक्षमता पदरात पडणे व शंभर हेक्टरचा अनुशेष दूर होणे या दोन गोष्टी समानार्थी कशा नाहीत? या सर्वच बाबतीत विकसित भागांच्या नेत्यांनी गेल्या ३०-४० वर्षांत अविकसित भागांना वेठीस धरले आहे. सिंचन अनुशेष निर्मूलनाशी संबंधित सर्व शब्दसंपदेला, संज्ञांना व व्याख्यांना आपल्या सोयीचे अर्थ चढविले आहेत. त्या अर्थाला मंत्रिमंडळाची मान्यता देणे व त्याद्वारे **अविकसित भागांची पिळवणूक चालूच ठेवण्याच्या या कार्यक्रमाला चौथा विषारी सापळा असे म्हणता येईल.** याबाबतचे अधिकृत कागदोपत्री उपलब्ध असलेले तपशील नमूद करायचे तर तो एका स्वतंत्र पुस्तिकेचा विषय होतो पण विस्तारभयास्तव आज तो विषय एवढ्यावरच थांबविणे अपरिहार्य आहे.

**२२५.** देशाच्या घटनेतील तरतुदीनुसार ३७१(२) या कलमाचा अंमल प्रत्यक्ष सुरु होण्याच्या कितीतरी दिवस अगोदर पासून त्या कलमाच्या अंमलबजावणीला निष्प्रभ करणाऱ्या विषारी सापळ्याची रचना विकसित भागांच्या नेत्यांनी योजित केलेली होती. मा. राज्यपालांनी अनुशेष व निर्देशांक समिती नेमलेली आहे, मा. राज्यपालांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत, येत आहेत, हे पाहून **अविकसित भागांना पुढील ५-१० वर्षे तसेच तडफडत ठेवणारा पाचवा विषारी सापळा म्हणजे कृष्णा खोऱ्याचे कारस्थान होय.** विकसित भागातील नेत्यांचे राजकीय चातुर्य असे कमालीचे की 'त्यांची' सत्ता गेली व 'यांची' सत्ता आली तरी कृष्णा खोऱ्याचे घोंगडे बेमालुमपणे 'यांच्या' गळ्यात अडकविण्यात 'त्यांनी' प्रचंड यश मिळविले. हे यश इतके 'विलोभनीय' होते की अनुशेषग्रस्त भागाला न्याय देणारा अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल हाती आल्यावर 'त्यांना' नको असलेला तो अहवाल कुठे लपवून ठेवावा याची 'यानां'च काळजी लागली. खरे म्हणजे अनुशेष व निर्देशांक समितीने जून १९९४ च्या सरासरीवर अनुशेष मोजलेला होता. त्या वाढलेल्या अनुशेषाची कोणतीही जबाबदारी 'यांच्या'वर नव्हती पण बेमालूमपणे 'त्यांनी' कृष्णा खोऱ्याचे घोंगडे 'यांच्या' गळ्यात अडकवून दिल्यामुळे सिंचन अनुशेष वाढविण्यास आपणच कारणीभूत झालो आहोत अशी जनमानसांत भावना होईल म्हणून 'यांनी' तो अहवाल निवडणूका होईपर्यंत दाबून ठेवण्याचे ठरविले. त्यात ३७१(२) चा अंमल सुरु झाल्यानंतरची सात वर्षे व अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल सादर झाल्यानंतरची साडेतीन-चार वर्षे निघून गेली.

**२२६. अनुशेषग्रस्त व अविकसित भागांचा गळा घट्ट आवळणारा सहावा विषारी सापळा म्हणजे केळकर समितीचा अहवाल होय.** मराठवाडा विकास व संशोधन प्रतिष्ठानचे कार्यकारी संचालक व सिंचन अनुशेषाचे एक सखोल अभ्यासक श्री. या. रा. जाधव (सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता) यांनी केळकर समितीच्या अहवालावर प्रखर टिका करणारा "महाराष्ट्र समतोल प्रादेशिक विकास (केळकर) समिती अहवाल (ऑक्टो-२००३) स्वरूप व समीक्षा" या मथळ्याचा १७५ पृष्ठांचा एक लहानसा ग्रंथच प्रकाशित केला आहे. **केळकर समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद १३.५ मध्ये "ब्रॉडबँड जोडणी"वर एक 'लघुनिबंध' लिहिला आहे. त्यामध्ये "ब्रॉडबँड जोडणीची उपलब्धता ही खास करून मागास क्षेत्रांना मोठी झेप घेण्याची संधी देईल हे लक्षात असू द्या." असा 'लॉलीपॉप' मागास भागांना दाखविला आहे.** तो परिच्छेद पूर्ण वाचला की त्यातील विषारीपणा लक्षात येतो. श्री. या. रा. जाधव यांनी या ग्रंथाला लिहिलेल्या प्रास्ताविकामध्ये **"केळकरांचा ब्रॉडबँड"** विस्ताराने उध्दृत केला असून त्यातील विष उलगडून दाखवितांना या प्रास्ताविकात पुढील प्रमाणे भाष्य केले आहे :- "समितीच्या या विधानाचा तात्पर्यार्थ असा दिसतो की, मागास भागानी, मागील काळातील निधी वाटप धोरणांमुळे निर्माण झालेल्या विकासाच्या अनुशेष निर्मूलनाच्या पाठीमागे लागणे म्हणजे आपली फसवणूक करून घेण्यासारखे होईल, **म्हणून त्यांनी ब्रॉडबँड सारख्या नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपला विकास करून घ्यावा.** अशा प्रकारचा दृष्टीकोन व उद्दिष्ट ठरवूनच आपला अहवाल व शिफारशी सादर केलेल्या दिसतात."

**२२७.** मराठवाडा विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष, माजी शिक्षणमंत्री व ज्येष्ठ नेते श्री. कमलकिशोर कदम यांनी या ग्रंथाला लिहिलेली प्रस्तावना अत्यंत बोलकी असून केळकरी कारस्थानातील विषारीपणा उजेडात आणणारी आहे. या प्रस्तावनेत ते म्हणतात :- "विदर्भ व मराठवाड्यात सिंचनाच्या सुविधा फारच तोकड्या आहेत व केवळ पर्जन्याधारित बहुतांशी कोरडवाहू शेतीमुळे तो व्यवसाय लाभदायक होत नसल्यामुळे व **कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्यांना प्रवृत्त होत आहेत. समितीने ती बाब ठळकपणे आपल्या अहवालात नमूद करून ती परिस्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविणे आवश्यक होते, पण समितीने ते केले नाही."** याच प्रस्तावनेत त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की :- "समितीने सिंचन क्षेत्रासाठी सुचविलेल्या निधी वाटपाचे मराठवाड्यावर फार मोठे दुष्परिणाम होणार आहेत. यामुळे राज्यातील तिन्ही प्रदेशांत प्रादेशिक समतोल तर प्रस्थापित होणार नाहीच, उलट तो अधिक वाढून मरावाड्याचा **सिंचन क्षमतेचा अनुशेष आणि मागासपण दरवर्षी १४ ते १५ हजार हेक्टर्सनी वाढतच जाणार आहे."**

**२२८.** जे काम आपल्यावर सोपविले नाही, त्याबाबत अत्यंत विषारी शिफारशी करावयाच्या व जे काम आपल्याकडे शासननिर्णयाने सोपविलेले आहे ते काम करण्यासाठी पुढे शासनाने नवी समिती नेमावी अशी शिफारस करण्याच्या

केळकरी मनोवृत्तीवर श्री. कमलकिशोर कदम यांनी पुढील शब्दात प्रखर टिका केलेली आहे :-

"समितीने आपला अहवाल सादर करण्यासाठी १२ ऐवजी २८ महिन्यांचा कालावधी घेऊन देखील समितीच्या दृष्टीने विश्वसनीय नसलेल्या त्यांना मिळालेल्या आकडेवारीच्या आधारावर आपल्या शिफारसी सादर केल्या आहेत. अशा शिफारसी करून **समितीने अहवाल परिच्छेद १०.२० मध्ये अशा आकडेवारीच्या पडताळणीसाठी व निधीच्या समन्यायी वाटपासाठी शासनाने एक वेगळी समिती नेमावी, असे सुचविले आहे.** अशा परिस्थितीत समितीने आता केलेल्या शिफारसी स्वीकारण्या योग्य आहेत असे म्हणता येणार नाही. तसेच एखाद्या समितीने तिला दिलेले काम योग्य प्रकारे न करता **त्यासाठी दुसरी समिती नेमण्याची शासनाला सूचना करणे देखील अयोग्यच वाटते.**"

**२२९.** केळकर समिती नेमली 'त्यांनी'. 'त्यांचे' राज्य गेले. 'यांचे' राज्य आले. केळकर समितीने आपल्या अहवालात भरलेली इतर रद्दी बाजूला ठेवली तरी सिंचन अनुशेषाबावत त्यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण दोन शिफारसी पुढील प्रमाणे आहेत :-

"**(१)** कल्पित प्रदेशांना ६५९२ कोटी रुपयांचा निधी देण्यात यावा यापैकी (१) दुष्काळी तालुक्यांना (दोनही प्रकारच्या कल्पित प्रदेशांना मिळून पाण्याची गंभीर समस्या असलेले व भूस्तर प्रतिकूल असलेले) ३५३० कोटी रुपये म्हणजे ५३.६ टक्के (२) खारपाणपट्टा या कल्पित प्रदेशाला ५४२ कोटी रुपये म्हणजे ८.२ टक्के (३) मालगुजारी तलाव या कल्पित सदृश प्रदेशाला २५२० कोटी रुपये म्हणजे ३८.२ टक्के निधी द्यावा अशी ही शिफारस आहे. (परिच्छेद ६.३ व ६.४ पृष्ठ ७)

**(२)** कल्पित प्रदेशाच्या "नियतवाटपाला प्राधान्य देण्यात यावे" (पृष्ठ ७) असे स्पष्टपणे नमूद केल्यानंतर या क्षेत्रांना नियतवाटप केल्यानंतर उर्वरित जलक्षेत्राचे नियतवाटप कसे करावे याची टक्केवारी समितीने ठरवून दिली आहे. त्याप्रमाणे ४३.१५ टक्के उर्वरित महाराष्ट्राला, ३५.२६ टक्के विदर्भाला व २१.५९ टक्के मराठवाड्याला देण्यात यावे अशी ही शिफारस आहे." (परिच्छेद ५ व ६ पृष्ठ ७) केळकर समितीच्या उपरोक्त दोनही शिफारसी काळजीपूर्वक वाचल्या तर विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष कितीही असो जास्त निधी हा उर्वरित महाराष्ट्रालाच दिला पाहिजे असे हे गणित आहे.

**२३०.** गेल्या शतकातला एखाद्या जिल्ह्याचा अनुशेष अजूनही शिल्लक असेल तर त्याच्यासाठी पाच दहा रुपये वेगळे काढणे ही वेगळी गोष्ट आहे. एखाद्या जिल्ह्याचे शंभर रुपये दुसऱ्या जिल्ह्याने पळविले ते परत करणे ही वेगळी गोष्ट आहे. या दोनही बाबी स्थायी सूत्राचा भाग असू शकत नाहीत. १० मार्च २०१५ च्या मा. राज्यपालांच्या निदेशामध्ये निधी वाटपाच्या स्थायी सुत्राबाबत स्पष्टपणे असे नमूद आहे की "राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य योजना नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशांची **लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यातील प्रत्येक घटकाला सम भारांकाच्या आधारे करावे.** तीन प्रदेशासाठी निधीच्या हिश्श्याची टक्केवारी जोडपत्र-६ अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे." मा. राज्यपालांच्या निदेशाच्या जोडपत्र-६ अ मध्ये "**वार्षिक योजना २०१५-१६ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र**" नमूद केले असून त्यानुसार ५१.८१ टक्के निधी हा सतत उर्वरित महाराष्ट्राला मिळत राहील. विदर्भाला २५.६५ टक्के व मराठवाड्याला २२.५४ टक्के निधी मिळत राहील. स्थायी सूत्र या नात्याने विदर्भापेक्षा दुप्पट व मराठवाड्याच्या निधीपेक्षा दुप्पटीहून जास्त निधी उर्वरित महाराष्ट्राला मिळत राहील.

**२३१.** अनुशेष या घटकाचे निधीवाटपातील 'वेटेज' पूर्णपणे काढून टाकण्याचे उर्वरित महाराष्ट्राच्या हिताचे धोरण हे पुढे दरवर्षी सुरु राहील असे स्पष्टपणे दिसून येते. दिनांक १० मार्च २०१५ च्या मा. राज्यपालांच्या निदेशामध्येसुद्धा ते धोरण सुरुच रहावे, हे भयसूचक आहे. राज्यकर्ते नवीन आले असले तरी अनुशेष वाढविण्याचे कंकण बांधलेल्या जुन्या राज्यकर्त्यांची अनुशेष वाढविण्याच्या यंत्रावरील व यंत्रणेवरील पकड अजूनही कायम आहे हा यातून निघणारा निष्कर्ष भयसूचकच आहे. मा. राज्यपालांना याबाबतीत कोण सल्ला देतात याची चर्चा करण्यात अर्थ नाही. मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे. निधी वाटपाचे केळकरी सूत्र व मा. राज्यपालांच्या निदेशातील स्थायी सूत्र यामध्ये कमालीचे साम्य आहे. खरे म्हणजे केळकरांच्या शिफारसीचे कापड राज्यपालांच्या निदेशाला कोट शिवण्याच्या बेतानेच कापण्यात आलेले होते. निवडणूकांच्या भितीमुळे तो अहवाल दडपून ठेवण्यात आला, त्यामुळे वेळापत्रक थोडेसे चुकले एवढेच. घटनेच्या कलम ३७१(२) अन्वये मा. राज्यपालांना हे विशेष अधिकार असमतोल दूर करण्यासाठी दिलेले आहेत, हा सल्ला कोणीतरी मा. राज्यपालांच्या सल्लागारांनी त्यांना देण्याची गरज आहे. लोकप्रतिनिधींनी सुद्धा मा. राज्यपालांच्या हे लक्षात आणून दिले पाहिजे. कारण असमतोल वाढविण्यासाठी मा. राज्यपालांनी विशेष अधिकार वापरण्याचे काहीही कारण नाही. तो तसाही वाढतोच आहे.

**२३२.** घटनेतील कलम ३७१(२) वगैरे आम्ही काही जाणत नाही, अनुशेष वगैरे आम्ही काही जाणत नाही. आम्हाला निधी ओरपायचा तेवढा आम्ही ओरपणारच! या भावनेने सन १९८० पासून तर सन २०१४ पर्यंत अशा लूटमारीसाठी जे अनेक लहान-मोठे विषारी सापळे योजिण्यात आले त्यातील प्रमुख अशा अत्यंत विषारी सहा सापळ्यांचा (इतर छोटे मोठे बरेच सापळे असलेत तरी तो स्वतंत्र लेखनाचा विषय आहे.) उल्लेख मी वर केलेला आहे. त्यातील शेवटच्या दोन सापळ्यांविषयी म्हणजे कृष्णा खोऱ्याचा सापळा व केळकर अहवालाचा सापळा याबाबत सविस्तर माहिती देण्याचे मी ठरविले आहे.

**२३३.** श्री. दिवाकरराव रावते हे सत्ताधारी पक्षाचे एक ज्येष्ठ नेते होते. इतकेच नव्हे तर ते मराठवाडा विकासमंडळाचे अध्यक्षही होते. अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल तयार करण्यामध्ये त्यांचा मोठा पुढाकार होता. या समितीने आपला अहवाल दिनांक २३ एप्रिल १९९७ रोजी मा. राज्यपालांना सादर केला. या अहवालात सुरुवातीलाच या समितीचे सदस्य व मराठवाडा वैधानिक विकासमंडळाचे अध्यक्ष श्री. दिवाकरराव रावते यांनी मा. राज्यपालांना लिहिलेले एक पत्र जोडलेले असून त्यामध्ये "**हा अनुशेष दूर करण्यासाठी समितीने सूचित केलेल्या ३ ते ७ वर्षांच्या वेळापत्रकाशी शासनाने बांधिलकी मानली पाहिजे. या वेळापत्रकाशी शासनाने बांधिलकी मानली नाही तर सत्यशोधन समितीच्या उत्तरवर्ती कालावधीत अनुभवल्याप्रमाणे या दिशेने केलेले प्रयत्न निष्फळ ठरतील.**" अशी भिती व्यक्त केली आहे.

प्रत्यक्ष हा अहवाल सोमवार, दिनांक ११ डिसेंबर २००० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला. ११ जुलै १९९७ रोजी या समितीने हा अहवाल मा. राज्यपालांना सादर केला. (जुलै १९९७ मध्येच राज्यपालांनी आपला अहवाल शासनाकडे पाठविला.) तब्बल साडेतीन वर्षांनी हा अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात आला. "काही महत्वपूर्ण विकास क्षेत्रांचा अनुशेष ३ वर्षात दूर करण्यात यावा" अशी शिफारस या अहवालामध्ये होती. **अहवालच साडेतीन वर्षांनी सादर झाल्यामुळे तीन वर्षात अनुशेष दूर करण्याच्या शिफारसीचे धिंडवडेच निघाले हे वेगळे नमूद करण्याची आवश्यकता नाही.**

**२३४.** जुलै १९९७ मध्येच राज्यपालांनी हा अहवाल "**सदर अहवालाचा अभ्यास करून त्यावरील शासनाचे अभिप्राय मा. राज्यपालांना सादर करावे.**" म्हणून शासनाकडे पाठविला. शासनाला अहवाल प्राप्त झाल्यावर २३ डिसेंबर १९९७ रोजी सभागृहात याबाबत बरीच चर्चा झाली. मुळात मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी हे काही कृष्णा खोऱ्याचे पक्षपाती नव्हते. पण ते घोंगडे शासनाच्या गळ्यात अडकलेले होते. अहवाल मुख्यमंत्र्यांनी पाहिलेला होता. अनुशेष खूप प्रचंड वाढलेला होता. इतका की तो खरा आहे की नाही याविषयी खुद्द मुख्यमंत्र्यांनाच शंका वाटली. अशा मनस्थितीमध्ये मा. मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी सभागृहात दिलेले उत्तर शब्दशः पुढील प्रमाणे :-

"जुलै १९९७ मध्ये महाराष्ट्र शासनाला माननीय राज्यपालांकडून हा अहवाल प्राप्त झालेला आहे. **मी आताच चौकशी करीत होतो. अनुशेषाची एकूण रक्कम १५२५६ कोटी रुपये. ही रक्कम टोटल आहे. त्यातील विदर्भाचा हिस्सा विचारात घेतला तरी ही रक्कम मोठी आहे.** मागासलेला जो भाग आहे, त्याला न्याय मिळण्याची आवश्यकता आहे. याची मला पूर्ण खात्री आहे. यासाठी निर्णय तावडतोबीने झाला पाहिजे. **म्हणून जानेवारी महिन्यामध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीपुढे जाऊन यासंबंधीची चर्चा आम्ही करू. माझ्यासमोर खरा प्रश्न हा आहे की, हा जो अनुशेष माननीय राज्यपालांनी काढला आहे, त्याच्या रकमासुद्धा पुन्हा एकदा खात्यांकडून तपासून घ्यायला सांगितले आहे. याचे कारण असे की, अजून मागचा अनुशेष पूर्ण करू शकलो नाही.** तो यामध्ये अंतर्भूत आहे. परंतु लागणारी रक्कम वाढल्यामुळे अर्थखात्याकडून तपासणी करून घेत आहोत, मंत्रिमंडळासमोर जातो. जानेवारीमधील मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये यासंबंधीचा निर्णय घेऊ. मागासलेल्या भागावर अन्याय होणार नाही या पद्धतीने निर्णय घेतल्या जाईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २३ डिसेंबर १९९७ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११३ क्रमांक ७ पृष्ठ १०९)*

**२३५.** त्यानंतर १९ मार्च १९९८ रोजी आमच्या तारांकित प्रश्न क्रमांक २४१७३ ला शासनातर्फे असे उत्तर देण्यात आले होते की, "**शासनाचे अभिप्राय अद्याप राज्यपालांना कळविण्यात आले नाहीत. अहवालाची तपासणी करुन शासनाच्या निर्णयार्थ शिफारस करण्यासाठी शक्ती प्रदान समिती नियुक्त करण्याचा विचार चालू आहे.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : १९ मार्च १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११४ क्रमांक ४ पृष्ठ ३१)* **पुढे अशी माहिती मिळाली की "निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल व त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या महत्वाच्या मुद्याबाबत विचार होणे आवश्यक असल्यामुळे मा. मुख्यमंत्र्यांनी सर्व संबंधितांची एक बैठक घ्यावी.**" असे सुरुवातीला ठरले होते. पण त्यानंतर मा. मुख्यमंत्र्यांनी असे आदेश दिले की, "**ही बैठक मा.वित्त व नियोजन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी.**" याचा सरळ अर्थ असा की त्या रिपोर्टवर काय उपाययोजना करायला पाहिजे याबाबत खुद्द मा. मुख्यमंत्र्यांनीच असे आदेश दिले की, बैठक मा. वित्त आणि नियोजन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी. **मा. मुख्यमंत्र्यांनी सरळ सरळ आपली जबाबदारी वित्त मंत्र्यांवर ढकललेली होती.**

**२३६.** त्यानंतर मा. वित्त आणि नियोजन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६ नोव्हेंबर १९९८ रोजी ही बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये असा निर्णय झाला की, "**निर्देशांक व अनुशेष समितीने तयार केलेला अहवाल व त्या अनुषंगिक मुद्दे तपासून अनुशेष दूर करण्यासाठी पुढील निश्चित अशी कारवाई ठरविण्यासाठी श्री. व्ही. रंगनाथन, अप्पर मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली एक सचिव स्तरावरील समिती नियुक्त करण्यात यावी.**" मा. मुख्यमंत्र्यांच्या अधिकारामध्ये असलेली गोष्ट, त्यांनी उपरणे झटकले व ती वित्तमंत्र्यांकडे सोपविली गेली आणि वित्तमंत्र्यांकडे सोपविलेली गोष्ट, त्यांनी घोंगडे झटकले व अप्पर मुख्य सचिव श्री. रंगनाथन यांची समिती नेमून त्यांच्या गळ्यात अडकविले.

(१६) ३ मे २०१५

# विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला : २

**२३७.** दिनांक २१ डिसेंबर १९९८ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ३१३२६ च्या "मा. राज्यपालांनी नेमलेल्या अनुशेष व निर्देशांक समितीने विभागीय अनुशेषाचा नव्याने अभ्यास करून सादर केलेल्या अहवालाची तपासणी करण्यासाठी शक्तीप्रधान समिती नियुक्त करण्याचा सुरू असलेला विचार पूर्ण झाला आहे काय;" या प्रश्न भाग १ ला मा.नियोजनमंत्र्यांनी **"होय"** असे उत्तर दिले होते. "असल्यास, त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला आहे;" या प्रश्न भाग २ ला त्यांनी **"शक्तीप्रधान समितीऐवजी आता अहवालातील अनुशेषाबद्दलचे मुद्दे तपासून अनुशेष दूर करण्यासाठी पुढील कार्यवाही ठरविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे अध्यक्षतेखाली सचिव स्तरावरील समिती नियुक्त करण्यात आली आहे."** असे उत्तर दिले होते. हे अपर मुख्य सचिव म्हणजेच रंगनाथन होत. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ६, पृष्ठ १५)*

**२३८.** सोमवार, दिनांक २१ डिसेंबर १९९८ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ३१३२६ वर अनुपूरक चर्चा सुरू झाली तेव्हा अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्याला शासनाला काय अडचण आहे? या उपप्रश्नाला उत्तर देतांना नियोजन मंत्र्यांनी **"सभापती महोदय, त्या अहवालासंबंधी पूर्ण अभ्यास झाल्यानंतर मग सदनापुढे ठेवण्यात येईल."** असे उत्तर दिले. "या अहवालाच्या आधारे एकंदर विदर्भामध्ये कितीचा अनुशेष राहिलेला आहे याबाबतची मंत्रिमहोदयांकडून माहिती मिळेल काय?" असे विचारले तर त्याला विदर्भातील या नियोजन मंत्र्यांनी **"ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल."** असे उत्तर दिले. तुमच्या पक्षाने या अनुशेषाची जाहिरात दिलेली होती काय? या प्रश्नाला त्यांनी "सरकारने अशा प्रकारची कोणत्याही वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिलेली नाही. ती जाहिरात भारतीय जनता पक्षाने दिली असेल तर त्याची माहिती मला नाही.... हा जो इंडिकेटर समितीने अनुशेषाचा आकडा काढलेला आहे त्याची माहिती मी पटलावर ठेवतो.... **या समितीने अभ्यास केल्यानंतर त्या समितीचा अहवाल मंत्रिमंडळाच्या समितीकडे येईल आणि त्यानंतर तो अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल."** असे उत्तर दिले. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ६, पृष्ठ १६ व १७)* विदर्भाचा इतका मोठा अनुशेष त्या अहवालामध्ये दाखविण्यात आलेला असतांना त्याबाबत विदर्भातील नियोजन मंत्र्यांनी दिलेली ही उत्तरे अत्यंत दुर्दैवी होती.

**२३९.** सर्व सदस्यांनी स्वाक्षरीत केलेली अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाची अधिकृत प्रत व्यक्तिशः मला पूर्वीच अनधिकृतपणे प्राप्त झालेली होती. या अहवालाने विदर्भाचा अनुशेष ठसठशीतपणे पुढे आणलेला होता. त्या अहवालातील जलसिंचन या विकासक्षेत्राशी संबधीत अधिकृत आकडेवारीचा आधार देऊन **"महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष : क्ष किरण परीक्षा"** या नावाचे एक पुस्तक मे १९९८ मध्ये मी समारंभपूर्वक अमरावती येथे प्रसिद्ध केले होते. पण तो अहवाल सभागृहासमोर ठेवायला २१ डिसेंबर १९९८ रोजी सुद्धा मंत्री सभागृहात नकार देत होते. अहवाल लपवून का ठेवण्यात येत आहे? असा प्रश्न आला, त्यावर विचार पूर्ण झाल्यानंतर तो मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल, असे उत्तर आले. त्यातूनच निषेध आला व त्यातून सभात्याग आला. याबाबतच्या चर्चेचे अधिकृत प्रतिवेदन पुढील प्रमाणे :-

"**श्री. बी. टी. देशमुख :** प्रश्न असा आहे की, **मा. राज्यपाल महोदयांनी अनुशेष व निर्देशांक समिती नेमली.** याबाबतचा प्रश्न सभागृहांमध्ये वारंवार उपस्थित करण्यात आला. **या समितीचा अहवाल १९९७ मध्ये शासनाला सादर झालेला आहे.** ज्याप्रमाणे दांडेकर समितीचा अहवाल सभागृहात सादर करण्यात आला त्याप्रमाणे हा अहवाल सभागृहामध्ये सादर करण्यात अडचण काय आहे? **या रिपोर्टप्रमाणे कितीचा अनुशेष आहे? हा अहवाल लपवून का ठेवण्यात येत आहे?**

**श्री. म. सु. शिवणकर :** हा अहवाल सभागृहापासून लपवून ठेवण्याची या शासनाची कोणतीही इच्छा नाही ... म्हणून अध्यक्ष महाराज, जी इंडीकेटर कमिटी आहे तिचा रिपोर्ट आल्यानंतर त्याची छाननी आणि अमलबजावणी कशी करावी याचा विचार चालू आहे आणि **हा विचार पूर्ण झाल्यानंतर तो मंत्रिमंडळासमोर ठेवल्यानंतर तो सभागृहात येईल.**

(अनेक मा. सदस्य एकदम बोलतात)

**श्री. बी. टी. देशमुख :** हा रिपोर्ट येथे **सादर करतो असे सांगितले जात नाही. केव्हा सादर करणार ते सुध्दा सांगत नाहीत याचा आम्ही निषेध करतो.**

(अनेक मा. सदस्य एकदम बोलतात)

**श्री. छगन भुजबळ :** सभापती महोदय, बाहेर वर्तमानपत्रामध्ये जेव्हा एखाद्या गोष्टीची माहिती मिळते ती माहिती विदर्भातीलच मंत्री असताना आणि त्यांना तोंडपाठ असताना आम्हाला कां मिळत नाही? ती माहिती कां लपविण्यात येते? या ठिकाणी विदर्भाच्या प्रश्नावरील माहिती लपविली जाते आणि ही बाब विदर्भावर अन्याय करणारी आहे. म्हणून आम्ही निषेध म्हणून सभात्याग करतो आहेत." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ६, पृष्ठ १६-१७)*

**२४०.** कृष्णा खोऱ्यावर ७१०० कोटी रुपये खर्च करण्याचा शासनाने पूर्वीच निर्णय घेऊन टाकलेला होता, प्रत्यक्षात हा खर्च पुढे ११ हजार कोटीच्या वर गेला. **अधिकृत आकडेवारीप्रमाणे १९९७-९८ च्या अंदाजपत्रकांत मोठ्या व मध्यम प्रकल्पासाठी असलेल्या २१०२.३५ कोटी रुपयाच्या नियतव्ययापैकी कृष्णा खोऱ्यासाठी १९०० कोटी रुपयाची वित्तीय तरतूद करण्यात आली व विदर्भासाठी फक्त ७६.४९ कोटी व मराठवाड्यासाठी ७०.५४ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती.** स्वाभाविकपणे मुळातच अनुशेष ग्रस्त असलेल्या भागाचा आणखीनच वाढलेला येवढा मोठा अनुशेष असलेला अहवाल उघड करण्याचा शासनाला संकोच वाटत होता. पुढच्या निवडणुका होईपर्यंत अहवाल दाबून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता, असे आता स्पष्टपणे म्हणता येते. २१ डिसेंबर १९९८ रोजीच्या या चर्चेची अधिकृत प्रतिवेदने काळजीपूर्वक पाहिली तर यापेक्षा वेगळा निष्कर्ष निघत नाही. मुख्यमंत्र्यांनी जबाबदारी नियोजनमंत्र्यांच्या खांद्यावर टाकली व नियोजन मंत्री विदर्भातील असून सुद्धा त्यांनी हे घोंगडे रंगनाथन या नावाच्या अधिकाऱ्याच्या खांद्यावर टाकले. गंमत अशी की विदर्भातील या नियोजनमंत्र्यांनी हे घोंगडे झटकून टाकले आहे याची त्याच मंत्रिमंडळातील उपमुख्यमंत्र्याना अजिबात कल्पना नव्हती. दिनांक २१ डिसेंबर १९९८ रोजी आम्ही अनेक सदस्यांनी सभात्याग केल्यावर मा. उपमुख्यमंत्र्यांनी पुढील प्रमाणे उद्‌गार काढलेः-

"सभापती महोदय, मा. सदस्यांनी सभात्याग करताना जो आरोप केला आहे त्यासंबंधाने मला खुलासा करावयाचा आहे. मा. मंत्रीमहोदय श्री. महादेवराव शिवणकर यांच्या अध्यक्षतेखाली ही अनुशेष व निर्देशांक समिती नेमलेली आहे आणि यासंबंधीचे मूल्यमापन केल्यानंतर जो अहवाल येईल तो सभागृहात सादर करण्यात येईल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ६, पृष्ठ १७)*

**२४१.** निवडणुका होईपर्यंत अहवाल अधिकृतपणे उजेडात न येऊ देण्याचा शासनपातळीवर धोरणात्मक असा अलिखित निर्णयच झाला होता (त्यात त्यांना यशही मिळाले) असा आरोप मी उगाच करीत नाही. नागपूर अधिवेशनामध्ये २१ डिसेंबर १९९८ रोजी अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी टाळाटाळ करणारी उत्तरे मा. नियोजन मंत्र्यांनी खूपच तपशीलवारपणे दिलेली असतांना त्याच अधिवेशनात आमचा अतारांकित प्रश्न क्रमांक २७३०३ हा सभागृहासमोर गुरुवार, दिनांक २४ डिसेंबर १९९८ रोजी ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये उत्तरीत झाला होता. हा प्रश्न १ सप्टेंबर १९९८ रोजी विचारण्यात आला होता व त्याचे उत्तर नियोजनमंत्र्यांनी ५ नोव्हेंबर १९९८ रोजी पाठविले. ते सभागृहासमोर २४ डिसेंबर १९९८ रोजी आले. (रंगनाथन समितीची नेमणूक करणारा आदेश १ डिसेंबर १९९८ रोजी काढण्यात आला होता) अतारांकित प्रश्न क्रमांक २७३०३ च्या "राज्यपालांनी नेमलेल्या अनुशेष व निर्देशांक समितीने विभागीय अनुशेषांचा नव्याने अभ्यास करून सादर केलेल्या अहवालावर तपासणी करून शासनाचे अभिप्राय तयार करण्यासाठी शक्ती प्रदान समिती नियुक्त करण्यात आली आहे काय;" या प्रश्न भाग १ ला "नाही" असे उत्तर देण्यात आले होते. "यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे?" या प्रश्न भाग ३ ला **"यासंदर्भात आता कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ यांच्या समवेत बैठका घेऊन पुढील कार्यवाहीबाबत ठरविण्यात येत आहे."** असे उत्तर देण्यात आले होते. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २४ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ९, पृष्ठ वि.प.३(१३))* हे उत्तर काळजीपूर्वक वाचल्यास रंगनाथन समिती नेमणुकीचा आदेश निघण्याच्या पूर्वीसुद्धा अहवाल झाकून ठेवण्यासाठी विदर्भातले नियोजनमंत्री निमित्तच शोधत होते असे स्पष्टपणे

दिसून येते.

**२४२.** "राज्य शासनाच्या अखत्यारितील विविध महामंडळे सुस्थितीत आणणे व सिंचन विकास महामंडळा तर्फे विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष संपुष्टात आणणे." या विषयावर मंगळवार, दिनांक २९ डिसेंबर १९९८ रोजी विधानपरिषदेत आम्ही तपशीलवार चर्चा उपस्थित केली. प्रस्ताव मांडणारे भाषण मी स्वतः केले. अनुशेष व निर्देशांक समितीचे निष्कर्ष तपशीलवार आकडेवारीसह मी सभागृहात ओतले. माझ्या भाषणाच्या शेवटी मी पुढील प्रमाणे मागणी केली :-

**"निर्देशांक समितीचा अहवाल मिळवून घेणे हा आमचा घटनात्मक अधिकार आहे. विलंब लावण्याचा तुमचा अधिकार आम्ही नाकारित नाही. पण तुम्हांला जो काही विलंब लावायचा आहे तो आता लावून झालेला आहे.** ते तुमच्या हातामध्ये आहे. माझी अत्यंत महत्वाची मागणी अशी आहे की, **निर्देशांक समितीचा रिपोर्ट ताबडतोब सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा. लोकांना तो माहिती झालेला आहे. लोकापासून त्यातले काहीही लपून राहिलेले नाही. तुम्हीच जाहीराती दिल्या. तरी हा रिपोर्ट सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावा अशी मागणी करून मी माझे भाषण संपवितो.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २९ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ११, पृष्ठ ९३)*

**२४३.** दिनांक २१ डिसेंबर १९९८ रोजीच्या चर्चेला नियोजनमंत्र्यांनी उत्तर दिले होते. ते विदर्भातील होते. "अहवाल पटलावर ठेवायचा नाही" हा शासनाचा निर्णय झालेला असल्याने कोणताही मंत्री त्याबाबत तेच उत्तर देणार पण इतर माहितीसुद्धा आमचे हे वैदर्भीय मंत्री देत नव्हते. 'नंतर पटलावर ठेवतो' 'आता ती माहिती माझ्याजवळ नाही' अशा प्रकारची मोघम, भंपक व पोकळ उत्तरे त्यांनी दिली होती. दिनांक २९ डिसेंबर १९९८ रोजीच्या चर्चेला उत्तर पाटबंधारे मंत्र्यांनी दिले. आपल्या उत्तराच्या भाषणात दांडेकर समितीच्या अहवालाची अंमलबजावणी नीटपणे झाली नाही असे त्यांनी सांगितले. मागच्या शासनाने याबद्दल कठोर निर्णय, कठोर भूमिका घ्यायला पाहिजे होती ती घेतली नाही याबद्दल त्यांनी मागच्या शासनाला दोष दिला पण एकाच दमात आम्हीही तशी भूमिका घेतली नाही हे त्यांनी प्रांजळपणे कबूल केले. श्री. एकनाथराव खडसे यांच्या भाषणातील हा प्रांजळपणाचा भाग शब्दशः पुढील प्रमाणे :-

"सभापती महोदय, एवढे मी मान्य करतो, सन्माननीय सदस्य श्री बी.टी. देशमुख यांनी जो विषय सांगितला आहे, अनुशेषासंबंधी काही सूचना केल्या आहेत, माननीय सदस्य श्री. रणजित देशमुख यांनीही काही सूचना केल्या आहेत. मला एक गोष्ट मान्य आहे की, जो विषय आपण सांगितला. इतर ठिकाणचा दांडेकर समितीने अनुशेष काढला आहे. त्यावेळेस आपण समान सूत्र ठरविले. हा अनुशेष कसा भरून काढावा. ज्यांचा विकास झालेला आहे, ती मर्यादित रेषा आखून, ज्यांचा विकास व्हावयाचा आहे त्यांना या रेषेबरोबर आणावे आणि जे रेषेच्या वर गेलेले आहेत, त्यांच्यासाठी कमी तरतूद करावी, किंबहुना यांना थाबंवा असे सूत्र ठरविले. परंतु दुर्दैवाने काय झाले. अनेक वर्षे हे नीटपणे पालन केले नाही. **अनुशेषासंबधी कठोर निर्णय, कठोर भूमिका राज्यशासनाने घ्यायला पाहिजे होती. मागच्या कालखंडामध्ये ती घेतली गेली नाही आणि आताही घेतली गेली नाही.**" (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २९ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ११, पृष्ठ ११२-११३)

**२४४.** कृष्णा खोऱ्यातील सर्व जिल्हे हे बिगर अनुशेष जिल्हे आहेत व कृष्णा खोऱ्यात जो पैसा आपण ओतत आहोत त्यामुळे हा अनुशेष आणखी वाढण्याची शक्यता आहे असेही उत्तराच्या भाषणात पाटवंधारे मंत्री श्री. एकनाथराव खडसे यांनी प्रांजळपणे मान्य केले. त्यांच्या भाषणातील तो भाग शब्दशः पुढील प्रमाणे :-

"कृष्णा जलसिंचन विभागामध्ये अनुशेष नाही. **त्या क्षेत्रात २ हजार सालापर्यंत पाणी अडविण्यासाठी अधिक पैसा घातला आहे. त्यामुळे अनुशेष दूर करण्याऐवजी त्याठिकाणी पैसे घातले म्हणून अनुशेष वाढण्याची शक्यता आहे हे मी नाकारू शकत नाही.**" (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २९ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६ क्रमांक ११ पृष्ठ ११३)

**२४५.** नव्याने काढलेला १९९४ चा जलसिंचनाचा विदर्भाचा अनुशेष दूर करणे तर दूरच राहिले पण सत्यशोधन समितीने काढलेला १९८४ चा अनुशेष सुद्धा दूर करणे किती कठीण आहे याचे मोठे तपशीलवार वर्णन पाटबंधारे मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात केले ते पुढील शब्दातः-

"अनुशेष दूर करण्यासाठी प्राधान्याने निधीची उपलब्धता करुन देणे आणि प्रकल्प सुरु करणे महत्त्वाचे आहे. या दोन्ही बाबी मोठ्या प्रमाणात आपण करणार आहोत. पूर्वी असलेल्या तरतुदीमध्ये कितीतरी पटींनी वाढ केली पाहिजे. किमान पाच ते सहा टक्क्यांनी तरतुदीमध्ये वाढ केली तर ३ वर्षामध्ये अनुशेष दूर होऊ शकेल अशी परिस्थिती आहे. त्यासाठी आपला असा प्रयत्न आहे की, सिंचन विकास महामंडळाच्या माध्यमातून जे प्रकल्प घेतो आहोत त्यामधून अनुशेष दूर होऊ शकतो. सभापती महोदय, **हा अनुशेष राज्य सरकारच्या बजेटमधून दूर होणार नाही हे मला स्पष्टपणाने सांगितले पाहिजे. राज्य सरकारच्या बजेटमधून हा अनुशेष दूर करु त्यासाठी मोठ्याप्रमाणात पैसे देऊ असे म्हटले तरी ते राज्य सरकारला शक्य नाही हे मी आपल्याला प्रमाणिकपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो. त्याकरिता बाहेरुन कोठून तरी कर्जाची उभारणी करुन तो पैसा या विदर्भामध्ये घातला तरच आपल्याला १९८२ चा अनुशेष दूर करता येऊ शकेल.**" (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २९ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ११, पृष्ठ ११३-११४)

**२४६.** अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाबाबत आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांना पाटबंधारे मंत्र्यांनी थोडक्यात उत्तर दिले. विदर्भातील मंत्री किती रुपयाचा अनुशेष आहे हे सुद्धा सांगायला तयार नव्हते, मात्र श्री.एकनाथराव खडसे यांनी एकूण १५५३६ कोटी रुपयाचा अनुशेष आहे हे मान्य केले. तो त्यांच्या भाषणातील भाग पुढील प्रमाणे :-

"**सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला की , राज्यपालांनी नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल आहे. त्या समितीने जो अनुशेष काढलेला आहे, तो दूर झाला पाहिजे. त्याप्रमाणे अनुशेष दूर करावयाचा म्हटला तर मला प्रामाणिकपणे सभागृहाला सांगावे लागेल की, एवढा पैसा दरवर्षी देऊनही तो अनुशेष दूर होणार नाही.** राज्यपालांच्या इंडिकेटर ,समितीने जो अहवाल तयार केलेला आहे तो राज्य शासनाकडे आलेला आहे. The Indicator Committee appointed by Governor has submitted Volume 1 of its report to Government in July 1997 based on assets created till 1994-95. त्यांचा रिपोर्ट जो दिलेला आहे तो... it calculates a backlog in sectors like irrigation, roads, power, etc. at Rs. 15,536 crores. It recommends removal of backlog in 7 years. हा अहवाल आपल्याकडे आल्यानंतर या राज्याच्या वित्तमंत्र्यांनी चर्चा केली. नियोजन विभागाच्या सचिवांशी मा. वित्तमंत्र्यांनी चर्चा केली . त्यांनी सांगितले की, It has major implications for the State. The report was discussed by Minister Finance + Planning + Shri Javdekar, Chairman of State Planning Board + Shri Bhujangrao Kulkarni from the Statutory Board in November, 1998. १५,५३६ कोटी रुपयाचा अजून अनुशेष आहे. त्यामध्ये रस्ते, वीज, पाटबंधारे योजना... त्या समितीच्या अनुषंगाने अनुशेष आहे. सात वर्षात बॅकलॉग कसा दूर करावा याबाबतची त्यांची कल्पना आहे... It is decided to ask a Committee under ACS, Shri Rangnathan to look into the various issues." (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २९ डिसेंबर १९९८ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ११, पृष्ठ ११४)

**२४७.** अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल पुढच्या निवडणुका होईपर्यंत लोकाच्या समोर येऊ द्यायचा नाही असे शासनाचे धोरण ठरलेले असल्यामुळे याबाबतीत वेगळे उत्तर येणे शक्य नव्हते. मात्र रंगनाथन समिती काय उजेड (छाननी) पाडणार आहे याचा उल्लेख व नंतर तो अहवाल सभागृहासमोर ठेऊ असे मंत्रिमहोदयांनी आपल्या भाषणात सांगितले तो भाग शब्दशः पुढील प्रमाणे :-

"अनुशेष नवीन काढलेला आहे तो दूर करण्यासाठी काय करता येईल याबाबत विचार केला. **राज्य शासनाच्या माध्यमातून अतिरिक्त मुख्य सचिव श्री.रंगनाथन यांना राज्यपालांकडून आलेल्या अहवालाची छाननी करावी म्हणून नेमले. त्या छाननीनुसार हा अनुशेष, ७ वर्षात कसा पूर्ण करता येईल.... २ वर्षात, ३ वर्षात कितीही सांगितले तरी ते शक्य नाही. दांडेकरांनी काढलेला अनुशेष आहे तो या ३ वर्षात दूर होऊ शकेल. परंतु राज्यपालांच्या इंडिकेटर समितीने सुचविलेला अनुशेष दूर करणे आपल्याला शक्य नाही. आपण कितीही सांगितले तरी एवढा पैसा दोन-तीन वर्षात आपण देऊ शकणार नाही.** त्यामुळे श्री. रंगनाथन यांच्याकडे छाननीचे काम सोपविले आहे. त्यांच्या शिफारशी आपल्याकडे अपेक्षीत आहे आणि त्यांच्या शिफारशी आल्यानंतर तो संपूर्ण अहवाल सभागृहासमोर ठेवून त्यावर चर्चा करु." (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २९ डिसेंबर १९९८: अधिकृत प्रतिवेदन खंड ११६, क्रमांक ११, पृष्ठ ११४)

**नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !**

शिक्षण प्रसारक मंडळ, वणी जि.यवतमाळ रजि.नं.F-43 द्वारा संचालित -

लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, औषधी निर्माण शास्त्र संस्था, वणी,

शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वणी

**अध्यक्ष नरेंद्र नगरवाला, उपाध्यक्ष सुभाष देशमुख, सचिव लक्ष्मण भेदी, सहसचिव अशोक सोनटक्के, संचालक गण - उमाकांत कुचनकर, सुधीर दामले, रमेश बोहरा, नरेंद्र बरडिया, प्रमोद देशमुख, अरविंद गोरंटीवार, कांतीलाल जोबनपुत्रा, नरेंद्र ठाकरे**

(१७) १० मे २०१५

# *विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला : ३*

**२४८.** "वैधानिक विकास मंडळाच्या अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल" या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ३३७७३ हा मंगळवार, दिनांक १६ मार्च १९९९ रोजी ७ व्या क्रमांकावर उत्तरासाठी होता. "मा. राज्यपालांनी नेमलेल्या अनुशेष व निर्देशांक समितीने विभागीय अनुशेषांचा नव्याने अभ्यास करून त्याबाबतचा आपला जो अहवाल मा. राज्यपालांना ११ जुलै १९९७ रोजी सादर केला त्यावरील शासनाने **नियुक्त केलेल्या सचिव स्तरावरील समितीने आपल्या शिफारशी शासनास सादर केल्या आहेत काय;" या प्रश्न भाग १ ला मा. नियोजन मंत्र्यांनी "नाही"** असे उत्तर दिले होते तर "अद्याप सचिव स्तरावरील समितीने आपल्या शिफारशी शासनास सादर केल्या नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे?" या प्रश्न भाग ४ ला "दिनांक १ डिसेंबर १९९८ च्या आदेशान्वये सचिव स्तरावरील समितीचे गठन करण्यात आले आहे व त्यानंतर **या समितीची पहिली बैठक दिनांक ८ जानेवारी १९९९ रोजी झाली. त्यामुळे विलंब झाला असे म्हणता येत नाही." असे उत्तर देण्यात आले होते.** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : १६ मार्च १९९९ : अधिकृत प्रतिवेदन खंड ११८, क्रमांक २, पृष्ठ २२)* मंत्री विदर्भातील होते. या रंगनाथन समितीची पहिली बैठक कोणत्या तारखेला झाली त्या तारखेपासून दिवस मोजून "विलंब झाला नाही" असे ते सांगत होते. अहवाल सादर झाल्याची तारीख सांगून "बराच विलंब झाला आहे" हे सांगण्यात त्यांना संकोच वाटत होता. विधानसभेच्या मूळ वेळापत्रकाप्रमाणे फेब्रुवारी २००० मध्ये निवडणुका आल्या असत्या. विधानसभेच्या मुदतपूर्व विसर्जनामुळे त्या ६ महिने अगोदर आल्या. सचिव स्तरावरील रंगनाथन समितीने निवडणुका होईपर्यंत काहीच करू नये याचा उत्तम बंदोबस्त शासनाने करून ठेवला होता. "विलंब झाला असे म्हणता येत नाही" असे खुद्द नियोजनमंत्री सभागृहात सांगत होते, हा एकप्रकारे त्या समितीलाही संदेशच होता. शेवटी काय? तर "काम करा" असे सांगण्यासाठी मागे लागण्याची गरज असते. "काम करू नका" यासाठी मागे लागण्याची काय गरज? नुसता शासनाचा तसा संदेश पुरेसा असतो.

**२४९.** सिंचनक्षेत्रात अविकसित भागांची पिळवणूक करण्यासाठी विकसित भागांच्या नेत्यांनी सन १९८० ते २०१४ या काळांत ज्या निरनिराळ्या विषारी सापळ्यांची योजना केली त्यातील प्रमुख सहा विषारी सापळ्यांचा मी सुरुवातीलाच उल्लेख केलेला आहे. त्यातील कृष्णा खोऱ्याचा पाचवा व केळकरी कारस्थानाच्या सहाव्या विषारी सापळ्याची तपशिलाने माहिती देण्याचे मी ठरविलेले आहे हेही मी सुरुवातीलाच नमूद केले होते. युती शासनाची राजवट संपून आघाडी शासन सत्तेवर आल्यानंतर त्यांनी कृष्णा खोऱ्याच्या सापळ्याचे (म्हणजेच अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाचे) काय केले हे सांगण्यापूर्वी कृष्णा खोऱ्याचा सापळा काय होता? याचे आणखी तपशील मी नमूद करू इच्छितो.

**२५०.** विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष फार मोठ्या प्रमाणात वाढविण्यास पुढे कारणीभूत ठरलेली ही एक अत्यंत महत्त्वाची बाब लक्षात घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. खर्चाच्या पूरक मागण्यांचा समावेश असलेले "**१९९६-९७ चे खर्चाचे पूरक विवरणपत्र**" दिनांक ३० जुलै १९९६ रोजी सभागृहाला सादर झाले. त्या विवरण पत्राच्या पृष्ठ ६३ वर पाटबंधारे विभागाची एक "लहानशी" मागणी (बाब क्रमांक ८४) नमूद होती. या मागणीच्या स्पष्टीकरणात्मक शासकीय निवेदनामध्ये पाटबंधारे मंत्र्यांनी असे नमूद केले होते की :-

"कृष्णा पाणी तंटा न्यायाधिकरण निवाड्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. कृष्णा नदीचे पाणी उपयोगात आणणे या मुख्य उद्दिष्टासह या प्रदेशाच्या पाटबंधारे प्रकल्पाचे (मोठे, मध्यम, लहान व जलविद्युत) प्रचालन व प्रवर्तन त्याचप्रमाणे लाभक्षेत्रविकास प्राधिकरण व पूर नियंत्रण यासारखे इतर संलग्न कार्यक्रम महामंडळामार्फत हाती घेण्यात येतील. **उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत खात्री करून घेण्यासाठी रु. ७,१०० कोटीच्या वित्तीय सहाय्याचा लाभ करून घेणे महामंडळाच्या दृष्टीने आवश्यक असेल. यापैकी राज्य शासन, पाच वर्षाच्या कालावधीमध्ये रु. ३,५०० कोटी एवढ्या रकमेची तरतूद करील. भाग भांडवली अंशदान म्हणून राज्य शासनाने ही रक्कम मंजूर करण्याचे ठरविण्यात आले आहे.** महामंडळाच्या उर्वरित वित्तीय गरजा खुल्या बाजारातील कर्जे उभारून भागविण्यात येतील. आस्थापना, कामकाज, परतफेड दायीत्व आणि इतर अनुषंगिक खर्च यामुळे होणारा महामंडळाचा एकूण खर्च राज्य शासन करील"

**२५१.** पाटबंधारे विभागाच्या या मागण्या दिनांक ६ ऑगस्ट १९९६ रोजी सभागृहापुढे चर्चेसाठी होत्या. काही एका लहानशा प्रकरणामुळे उभय बाजूकडून इतका गोंधळ घातला गेला की त्यामुळे कोणतीही चर्चा न होता अर्ध्या मिनिटात या मागण्या त्या दिवशी मंजूर झाल्या. बाब क्रमांक ८४ वर मंजूर झालेल्या **पाटबंधारे विभागाच्या या एका मागणीमध्ये महत्तम अनुशेष असलेल्या जलसिंचन या विकासक्षेत्राचा विद्यमान अनुशेष आणखी वाढविण्याचे जे प्रचंड सामर्थ्य आहे ते लक्षात घेतले म्हणजे अनुशेषग्रस्त भागावर भविष्यात जो वरवंटा फिरविला जाणार आहे त्यांचा अंदाज येण्यास वेळ लागत नाही.** पुढच्या ४-५ वर्षात ७१०० कोटी रुपये जलसिंचनासाठी कृष्णा खोऱ्यामध्ये ओतणार. त्यापैकी ३५०० कोटी रुपये सरळ सरळ कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या भाग भांडवलामध्ये शासनाचे अंशदान असेल व ३६०० कोटी रुपये खुल्या बाजारातून कर्जरूपाने या महामंडळासाठी उभारण्यात येईल. या कर्जाच्या परतफेडीचे दायीत्व सुद्धा शासनाने स्वीकारले आहे. याशिवाय या महामंडळाची आस्थापना, कामकाज आणि परतफेडीच्या दायीत्वासह इतर अनुषंगिक खर्चसुद्धा राज्य शासन करणार.

**२५२.** आपण खूप तयारी करून सभागृहात गेलो पण त्या विषयावर उभयपक्षी गोंधळामुळे आपले विचार मांडता आले नाही, यामुळे व्यक्तीशः मला मनस्वी दुःख झाले. लोकांसमोर हा विचार तर गेलाच पाहिजे. त्यातूनच त्यावेळी सन १९९६ च्या ऑक्टोबर महिन्यात नुटा बुलेटीनचा एक अनुशेष विशेषांक आमच्या संघटनेने प्रकाशित केला होता. जिल्हा-जिल्ह्याच्या ठिकाणी सभा घेऊन आम्ही त्या विशेषांकाचे वितरण केले. या अंकातील माझ्या लेखात पृष्ठ ६६ वर परिच्छेद १०१ शब्दशः पुढील प्रमाणे होता :-

"पुरवणी मागणीचे शासनाने नमूद केलेले उपरोक्त स्पष्टीकरणात्मक निवेदन ज्यावेळी मी वाचले, त्यावेळी दादाभाई नौरोजी यांनी विलायतेत केलेल्या एका अविस्मरणीय भाषणामधील ते प्रसिद्ध वाक्य मला आठवले. इंग्रज राज्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणतात "**महम्मद गझनीने १८ स्वाऱ्या करून हिंदुस्थान लुटला असे इतिहासकार सांगतात, पण त्याने या सर्व स्वाऱ्यात लुटून नेलेली संपत्ती ही तुम्ही एका वर्षात लुटून नेता तितकी होऊ शकली नाही**"

यापूर्वीच्या महाराष्ट्राच्या सत्ताधाऱ्यांनी गेल्या ३० वर्षात निर्माण केलेल्या अनुशेषाएवढा (जलसिंचन या विकासक्षेत्रात) अनुशेष निर्माण करण्याचे सामर्थ्य या एका पुरवणी मागणीमध्ये आहे. **यापूर्वीच्या ३० वर्षातील ४२४२ कोटी रुपयापैकी निदान ९२९ कोटी रुपये विदर्भाला व ११६८ कोटी रुपये मराठवाड्याला मिळाले तरी होते; यापुढे आम्ही मेलो काय किंवा जगलो काय? या ७१०० कोटी रुपयापैकी एक छदामसुद्धा विदर्भाला किंवा मराठवाड्याला मिळणार नाही.** मात्र ३६०० कोटी रुपयाच्या कर्ज फेडीचे जे उत्तरदायीत्व महाराष्ट्र शासनाने स्वीकारले आहे, त्यात आमचा सहभाग सक्तीचा असेल. आमच्या या पिढीची शक्ती कृष्णा खोऱ्यासाठी ३५०० कोटीचे भागभांडवल उभारून देण्यामध्ये व ३६०० कोटी रुपयाच्या कर्जाच्या उभारणीसाठी सहभागी होण्यात खर्ची पडेल. उभारलेल्या या

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

**एज्युकेशन सोसायटी, यवतमाळ**

**श्री.दिवाकर पांडे, अध्यक्ष** **श्री.विजय जतकर, सचिव,** **सौ.माणिक कद्रे, उपाध्यक्ष**

**कार्यकारिणी सदस्य - ॲड.शं.भो.महल्ले, चंद्रकांत रानडे, मोहन जोशी, ॲड.उदय पांडे**

द्रव्यबळातून बिगर अनुशेष जिल्ह्यांमध्ये निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सिंचनक्षमतेचा थंडगार वारा त्या जिल्ह्यात सुटत असतांना मागास जिल्ह्यामध्ये वाढलेल्या अनुशेषाचा रखरखीत व दाहक असा प्रचंड डोंगर शिरावर घेऊन आमच्या पुढच्या पिढ्या व्याज व मुद्दलाचे हप्ते फेडण्यात सहभागी व समभागी झालेल्या असतील.”

**२५३.** विदर्भातील पाटबंधारे मंत्री असतांना त्यांच्याच खांद्यावर बंदूक ठेऊन विदर्भाची शिकार करण्यात आली होती. सन १९९६ च्या नुटा बुलेटीनमधील या लेखामध्ये पृष्ठ ६६ वरील परिच्छेद १०२ मध्ये मी हे दुःख पुढील शब्दात मांडले होते. :-

“अनुशेषाचा डोंगर वाढविण्याचा हा सारा प्रकार ज्या पाटबंधारे खात्याच्या मंत्र्यांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन सुरू आहे ते विदर्भातीलच आहेत हे विशेष. “तुमच्या भागातील मंत्री काय करीत होते?” अशी बोलणी खात या भागातील लोक व्याजाचे हप्ते फेडत असतांना सत्तेतून बाहेर पडल्यानंतर मंत्र्यांना मात्र अनुशेष वाढल्यामुळे वेगळ्या विदर्भाची मागणी करण्याचा मार्ग मोकळा असेल. **सत्ताधारक राजकीय पक्षाने सत्ताधारी असतांना भरभरून अनुशेष वाढविण्याचे काम करावयाचे व त्याच पक्षाने नंतर विरोधी पक्ष या नात्याने विदर्भावर सतत अन्याय होतो म्हणून वेगळ्या विदर्भाची मागणी करावयाची; दुसऱ्या बाजूला कालपर्यंत विदर्भाच्या अनुशेषामुळे संतप्त होत असलेल्या विरोधी पक्षाने सत्ताधारक होताच तो अनुशेष वाढविण्याचे काम दुप्पट जोमाने सुरू करावयाचे हा “विदर्भ विकासाचा सर्वपक्षीय कार्यक्रम” आणखी ५-१० वर्षे असाच सुरू राहीला तर निर्माण झालेल्या अनुशेषाचा प्रचंड डोंगर पाहून “विदर्भ वेगळा काढून द्या” म्हणणारी चळवळ उद्या पश्चिम महाराष्ट्रातून सुरू झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.**”

**२५४.** नियतीचा खेळ किती विचित्र असतो पहा? सत्ता गेल्यानंतर झालेल्या डिसेंबर २००० च्या नागपूर अधिवेशनामध्ये विधानसभेत वेगळ्या राज्याच्या ठरावावर या माजी मंत्रिमहोदयांनी मोठे लांबलचक भाषण केले व रात्रभरात ते भाषण छापून काढले. तयार केलेल्या पुस्तिकेच्या मुखपृष्ठावर आपले पूर्णाकृती छायाचित्र छापले, थाटात एका हाताची तर्जनी उंच करून “वेगळा विदर्भ हवाच” या मथळ्याची पुस्तिका प्रकाशित केली. दोन-चार दिवसांनी दिनांक १२ डिसेंबर २००० रोजी विधानपरिषदेमध्ये त्याच विषयावर चर्चा होती. त्या चर्चेमध्ये सहभागी होतांना सन १९९६ च्या नुटा बुलेटीनमधील वर परिच्छेद २५२ व २५३ मध्ये नमूद केलेला मजकूर मी सभागृहात शब्दशः उधृत केला. त्यांची ती पुस्तिका सभागृहाला दाखविली व पुढील प्रमाणे उद्‌गार काढले :-

“त्यावेळी पाटबंधारे मंत्री असलेल्या आमच्या विदर्भातील पाटबंधारे मंत्र्यांनी हातून सत्ता गेल्यावर कालपरवा विधानसभा सदस्य या नात्याने भाषण केले व “वेगळा विदर्भ हवाच” या नावाची एक पुस्तिका छापून प्रसिध्द केली. ती मी आपल्याला मुद्दाम दाखवित आहे. पहा! मुखपृष्ठावर त्यांचे पूर्णाकृती छायाचित्र आहे. आहे ना कमाल? मी त्या वेळी म्हटले होते की, मंत्री आमचेच आहेत. उद्या सत्तेतून गेले की, वेगळ्या विदर्भाची मागणी करतील. मला वाटले की, कमाल झाली! केवढ्या लवकर माझे भविष्य खरे झाले. सत्तेत असतांना ज्यांनी अनुशेष वाढवावयाचा त्यांनीच सत्तेतून गेल्यावर विदर्भाची मागणी करायची ही आता कोणत्याही एका पक्षाची मोनापोली राहीली नाही.” *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : १२ डिसेंबर २००० : अधिकृत प्रतिवेदन खंड १२३, क्रमांक १२, पृष्ठ १४)*

**२५५.** विधानसभेचे विसर्जन झाले. जुने शासन जाऊन नवे शासन व नवे नियोजनमंत्री आले. आमचा तारांकित प्रश्न क्रमांक २९३ हा बुधवार, दिनांक १६ डिसेंबर १९९९ रोजी उत्तरासाठी होता. “मा.राज्यपालांनी नेमलेल्या “अनुशेष व निर्देशांक समिती” ने विभागीय अनुशेषांचा नव्याने अभ्यास करुन त्याबाबतचा आपला जो अहवाल मा.राज्यपालांना ११ जुलै १९९७ रोजी सादर केला, त्यावरील शासनाने नियुक्त केलेल्या सचिव स्तरावरील समितीच्या प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे;” या प्रश्न भाग १ ला नियोजन मंत्र्यांनी **“सचिव स्तरावरील समितीच्या आतापर्यंत एकूण ३ बैठका झाल्या आहेत. या समितीने अद्याप शासनास शिफारशी केलेल्या नाहीत.**” असे उत्तर दिले होते. या समितीची पहिली बैठक ८ जानेवारी १९९९ रोजी झाल्याचे त्यावेळच्या नियोजनमंत्र्यांनी १६ मार्च १९९९ रोजी सभागृहात सांगितले होते. पहिली बैठक झाल्यानंतर जवळ जवळ ११ महिन्याचा काळ उलटल्यानंतर “एकूण ३ बैठका झाल्या आहेत” असे आताचे नियोजनमंत्री सभागृहाला सांगत होते. उत्तर संतापजनक असले तरी प्रश्न १३ व्या क्रमांकावर असल्यामुळे त्यावर चर्चा होऊ शकली नाही. *(खंड १२०, क्रमांक ४, पृष्ठ २०)*

**२५६.** दिनांक १६ डिसेंबर १९९९ रोजी याबाबत चर्चा होऊ शकली नाही हे खरे असले तरी त्याच अधिवेशनामध्ये मंगळवार, दिनांक २१ डिसेंबर १९९९ रोजी या प्रश्नावर तपशीलवार चर्चा व चांगलीच उठापटक झाली, ती नियम २६० अन्वये विदर्भ व मराठवाड्याच्या विकासाच्या अनुशेषाबाबत श्री. वसंत काळे यांनी उपस्थित केलेल्या चर्चेच्या निमित्ताने. श्री. वसंत काळे यांनी प्रस्ताव मांडला व त्यावर भाषण केले इतर अनेक सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला. विदर्भातील एक जेष्ठ सदस्य अकोल्याचे श्री. अजहर हुसेन यांनी या चर्चेमध्ये सहभागी होतांना रंगनाथन समितीच्या कपटी कारस्थानावर चांगलेच कोरडे ओढले व समितीचा मूळ अहवाल सभागृहासमोर आणण्याची मागणी केली. श्री. अजहर हुसेन यांच्या भाषणातील तो महत्त्वाचा परिच्छेद शब्दशः पुढील प्रमाणे :-

“सभापती महोदय, एक नया तिसरा षडयंत्र जो विदर्भ और मराठवाडा के साथ हो रहा है वह आज मुझे “तरुण भारत” मे पढने को मिला की अनुशेष और निर्देशांक समिति की जो रिपोर्ट है, उसके बारे मे पिछले ३ सालसे विनंती कर रहे कि आप उसे सदन के पटलपर रखीये और जो मापदंड दांडेकर समितीने तय किया था, **जो मापदंड निर्देशांक समितीने तय किए थे, उसको आप वैसे का वैसा ही कायम रखिए. हमको सुनने मे ऐसा आ रहा है की रंगनाथन की अध्यक्षता मे जो समिती बनाई है उसने मापदंड बदलने का काम किया है.** जिसकी वजह से आपको आश्चर्य होगा की अकोला और बुलढाणा का इरीगेशन का अनुशेष बस खतम हो गया है. जब की नाशिक और पुणे का अनुशेष रह गया है इस प्रकारसे मापदंड बदलने का अब षडयंत्र किया जा रहा है. और नए मापदंड लाने का प्रयत्न किया जा रहा है. **हमारा कहना है की किसी भी हालत मे इस मापदंड को बदलना नही चाहिए. विदर्भ का बॅकलॉग जब तक दूर नही होता है तो जो मापदंड को बदलना नही चाहीए.** विदर्भ का बॅकलॉग जब तक दूर नही होता है तो जो मापदंड दांडेकर समितीने तय किए थे, निर्देशांक समितीने अपनी रिपोर्ट मे तय किए है. उनको वैसा ही मान्य करे और इस अधिवेशन मे राज्य शासन की तरफ से उस रिपोर्ट को सभागृह के सामने रखीए” *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ डिसेंबर १९९९ : अधिकृत प्रतिवेदन खंड, १२०, क्रमांक ७, पृष्ठ ७४)*

**२५७.** श्री. अजहर हुसेन यांनी अतिशय टोकदारपणे व मोजक्या शब्दात आपली मागणी मांडलेली होती. या मागणीबाबत नव्या सरकारचे नवे नियोजन मंत्री काय उत्तर देतात हे ऐकून घेण्याची आम्हाला मोठीच उत्सुकता होती. या चर्चेत भाषण न करण्याचा निर्णय मी स्वतः घेतलेला होता व सभागृहात बसून उत्तराच्या भाषणाची मोठ्या आतुरतेने आम्ही वाट पहात होतो. चर्चेला उत्तर देतांना मूळ दुखण्यावर न बोलता नवे नियोजन मंत्री ती जुनीच भंपक आकडेवारी सांगायला लागले. १५-२० वर्षामध्ये किती अनुशेष वाढला हे न सांगता १५-२० वर्षापूर्वी दांडेकर समितीने ३१८६ कोटीचा अनुशेष काढला होता व त्यापैकी किती अनुशेष कमी झाला आहे याची आकडेवारी ते सांगायला लागले. नव्या नियोजनमंत्र्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करून ५ मिनिटे सुध्दा झालेली नव्हती. ती भंपक आकडेवारी त्यांच्या तोंडून बाहेर पडत असतांना दांडेकर समितीने (१९८४) काढलेल्या अनुशेषापैकी शिल्लक राहिलेला अनुशेष पुढच्या दीड दोन वर्षात आम्ही दूर करु अशा अर्थाचे वाक्य त्यांच्या तोंडून बाहेर पडले. नवीन मंत्र्यांच्या भाषणात अडथळा आणणे बरोबर नाही असे मनोमन वाटत असतांना मनाच्या दुसऱ्या कोपऱ्यातून आलेल्या आदेशाने मी ताडकन उभा झालो आणि माझ्या तोंडून “सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दांडेकर समितीने काढलेला अनुशेष ८३-८४ सालातील आहे त्यानंतर निर्देशांक समितीने त्याचे अपडेटींग केलेले आहे.” असे उद्‌गार बाहेर पडले. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ डिसेंबर १९९९ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२०, क्रमांक ७, पृष्ठ ८६)*

**२५८.** एकाएकी झालेल्या माझ्या या हस्तक्षेपामुळे नियोजनमंत्री थोडेसे विचलीत झाले पण लागलीच त्यांनी स्वतःला सावरून जे उद्‌गार काढले ते पुढील प्रमाणे :-

“**श्री. जयंत पाटील :** सभापती महोदय, मला बोलायला संधी मिळाल्यावर मा. सदस्यांनी माझे पूर्ण ऐकून घ्यावे अशी माझी विनंती आहे. मी त्याच्या पुढचा मुद्दा मांडतो आहे. जे झाले आहे ते सांगायला अडचण यावी असे मला वाटत नाही. जो खर्च झाला आहे त्याचा उल्लेख होणे आवश्यक आहे. विदर्भ व मराठवाड्यासाठी किती खर्च केला, अनुशेषाच्या माध्यमातून किती खर्च केला ते सांगणे आवश्यक आहे. सभापती महोदय, **त्यानंतर निर्देशांक समितीने १९९४-**

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

आर.एस.ओ. दर्जा व भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त श्री सरस्वती प्रगत विद्या प्रसारक मंडळ वाशिम द्वारा संचालित

**श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम**

सरस्वती शैक्षणिक संकुल रिसोड रोड, वाशिम जि.वाशिम

**प्राचार्य श्री.एस.एन.कोठारी, अध्यक्ष** **श्री.मनोजभाऊ कोठारी, संचालक**

**९५ नंतर एक नवा अनुशेष काढला. त्याचा अहवाल अजून शासनाने स्वीकृत केलेला नाही.** या अहवालानुसार १५३५५ कोटीचा अनुशेष आहे आणि तो सर्व विभागातून आपल्या समोर आहे. **त्यांनी शिफारस केलेली आहे की वार्षिक योजनेचा चाळीस टक्के पैसा या अनुशेषावर खर्च करण्यात यावा आणि तो दरवर्षी करण्यात यावा.** जुलै ९७ ला हा अहवाल शासनाला प्राप्त झाला. आधी मा. राज्यपालांना प्राप्त झाला आणि त्यानंतर तो सरकारला देण्यात आला. त्यावर तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी जवळ जवळ वर्ष व दीड वर्षानंतर एक बैठक घ्यावयाचे ठरविले. ही बैठक त्यावेळच्या मा. वित्त मंत्र्यांनी घेण्याचे आदेश दिले आणि त्यानंतर रंगनाथन समिती नेमण्यात आली. **रंगनाथन समितीने आता याबाबत अभ्यास करावयाला सुरुवात केलेली आहे.** जवळ जवळ १५००० कोटीचा अनुशेष आपल्या सर्वासमोर आहे. मागचा अनुशेष पूर्ण करावयाला जवळ जवळ १७ वर्षे लागली हे मला या ठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ डिसेंबर १९९९ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२०, क्रमांक ७, पृष्ठ ८६)*

**२५९.** त्यानंतर मा. नियोजनमंत्र्यांचे उर्वरित भाषण आम्ही शांतपणे ऐकत होतो. अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर केंव्हा ठेवणार? याविषयी त्यांनी काहीही सांगितले नाही. त्यांचे भाषण संपल्यावर मी या अधिवेशनात हा रिपोर्ट ठेवाल काय? अशी विचारणा केली. त्यावर रंगनाथन समितीचा उल्लेख त्यांनी केला. स्वाभाविकपणे हे रंगनाथन कोण आहेत? असा प्रश्न आला, त्यावर मागचा बॅकलॉग एकदोन वर्षात पूर्ण होणार आहे असे उत्तर आले. मंत्रिमहोदयांचे भाषण संपल्याबरोबर झालेली ती चर्चा शब्दशः पुढील प्रमाणेः-

"**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सदस्य श्री.अजहर हुसेन यांनी स्पष्ट मागणी केली होती. बॅकलॉग अँड इंडिकेटर समितीचा रिपोर्ट आपण सभागृहाच्या पटलावर ठेवावा. हा या चर्चेचा गाभा आहे. दांडेकर समितीने काढलेल्या अनुशेषापैकी इतका अनुशेष काढला आहे आणि आता इतका राहिला आहे असे सांगितल्यानंतर विदर्भातील लोकांना आपल्या जखमेवर मिठ चोळल्यासारखे वाटले. मा.सदस्य अजहर हुसेन यांनी स्पेसिफिक मागणी केली होती की, हा रिपोर्ट आपण सभागृहांच्या पटलावर ठेवणार काय? **दांडेकर समितीची एकही शिफारस एकाही शासनाने आजपर्यन्त स्वीकारली नाही.** परंतु इमाने इतबारे त्यांचा रिपोर्ट सहा महिन्याच्या आत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला होता. सन्माननीय तत्कालीन सदस्य श्री राजारामबापु पाटील आमच्यासोबत त्यावेळी भांडत होते. त्यावेळच्या शासनाने सांगितले की, हा रिपोर्ट सभागृहात ठेवण्यात येईल व ठेवला. **आज अडीच वर्षे आम्ही भांडत आहोत. आमचा चेहरा तर आम्हाला आरश्यात पाहू द्या. त्याचे उत्तर आले नाही. त्याचा निषेध करून आम्ही मागच्या वेळी बाहेर गेलो होतो.** आता या बाबत रंगनाथन समिती नेमली आहे. तिचा रिपोर्ट येईल ना? योग्यवेळी. त्याने काहीच बिघडत नाही. ही मा.राज्यपालांनी नेमलेली समिती आहे. या ठिकाणी दांडेकरांची एकही शिफारस आपण स्वीकारली नाही. पण अहवाल सभागृहाला सादर केला. आता या समितीची शिफारस स्वीकारा अथवा स्वीकारू नका. आपण हे नंतर करा. पण अहवाल ठेवा. माझे म्हणणे असे आहे की, सन्माननीय सदस्य श्री.अजहर हुसेन यांनी एक स्पेसिफिक प्रश्न मांडला होता. त्याप्रमाणे तो अहवाल पटलावर ठेवावा. आता आपण असे सांगा की, उद्या, परवा हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो, नाही तर त्या बाबत आपण उद्या निवेदन सादर करा. केव्हा ठेवणार? या बद्दल. **पण तो रिपोर्ट आपण ठेवणारच नसाल आणि त्या बाबत आपण काहीच सांगणार नसाल तर विदर्भाच्या वतीने आम्हाला निषेध करण्याशिवाय दुसरा मार्ग शिल्लक राहत नाही. गेली अडीच वर्षे हा रिपोर्ट लपविण्यात आला. आपण कृपया या पापामध्ये सहभागी होऊ नका. म्हणून या अधिवेशनात हा रिपोर्ट ठेवाल काय?**

**श्री.जयंत पाटील :** यामध्ये सहभागी होण्याचा प्रश्नच येत नाही. हा १९९७ साली रिपोर्ट सादर झाला आहे. आपली भूमिका मी समजू शकतो. परंतु आता नवीन सरकार आले आहे, त्याला थोडासा वेळ आपण दिला पाहिजे. .... (अडथळा)..... अध्यक्ष महोदय, दांडेकर समितीनंतर निर्देशांक समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे, तो अहवाल रंगनाथन समितीकडे देण्यात आला आहे.

**श्री.बी.टी.देशमुख : आता हे रंगनाथन कोण आहेत? हे सभागृह मोठे आहे की, रंगनाथन मोठे आहेत?**

(गोंधळ)

**श्री.जयंत पाटील :** सभागृहासमोर एखादी गोष्ट ठेवत असताना ती पूर्ण विचारांती या ठिकाणी आली पाहिजे. १५ हजार कोटी रुपयाचा जो अनुशेष काढला आहे, त्यामध्ये दांडेकर समितीचा अनुशेष सहभागी आहे. १९९४-९५ साली ती समिती गठीत करण्यात आली आहे. आता या ठिकाणी आतापर्यन्त कोणकोणत्या बाबीत हा खर्च झाला आहे, हे पाहुन त्या बाबतचा अहवाल सभागृहासमोर ठेवला पाहिजे... (अडथळा)... अडीच वर्षे थांबल्यानंतर एखाद्या गोष्टीला पुर्ण वेळ दिला पाहिजे आणि ती पूर्ण विचारांती या ठिकाणी ठेवली पाहिजे. आम्ही या ठिकाणी बिलकुल सहभागी होण्याचा प्रश्न नाही. मागचा जो बॅकलॉग आहे तो आम्ही दाखविणार आहोत. **मागचा बॅकलॉग एकदोन वर्षात पूर्ण होणार आहे.**" (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ डिसेंबर १९९९ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२०, क्रमांक ७, पृष्ठ ९०-९१)

**२६०.** मा. नियोजन मंत्र्यांच्या नकारार्थी भूमिकेमुळे प्रकरण चांगलेच हातघाईवर आले. दांडेकरांचा अहवाल चार महिन्यात सादर झाला होता. हा अहवाल २ वर्षापेक्षा जास्त काळ झाला तरी का सादर होत नाही? असा प्रश्न आला. त्यावर "**सादर करणार नाही**" असे उत्तर आले. त्यातून आरसा आला, कुरूप चेहरा आला, पहावत नाही हेही आले, निषेध आला, सभात्याग आला. शब्दशः चर्चा पुढील प्रमाणे :-

"**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, श्री.अजहर हुसेन या माननीय सदस्यांनी जी मागणी केली होती तिला आपण "नाही". असे उत्तर द्या ना! **आम्ही या पूर्वी ३ वेळा निषेध केला होता. पुन्हा आता आपला निषेध करून आम्ही बाहेर जाऊ.** सभापती महोदय, मा.मंत्रिमहोदयांनी एकतर तो अहवाल ठेवतो म्हणून सांगावे, नाही तर उद्या, केव्हा ठेवतो? याबाबत निवेदन करावे. विदर्भातील लोकांच्या भावना याबाबत अत्यंत तीव्र आहेत. **मा.वसंतदादा पाटील चार महिन्यात दांडेकरांचा तो रिपोर्ट ठेवू शकतात. आपण का दोन वर्षांनी सुद्धा ठेवीत नाही?** आपण एकापरीने मराठवाडा व विदर्भातील लोकांची थट्टा करीत आहांत? आपण आता या ठिकाणी स्पष्टपणाने सांगा की हा रिपोर्ट सादर करणार आहांत की नाही?

**श्री.जयंत पाटील :** या अधिवेशनात हा रिपोर्ट सादर करणार नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** ही अत्यंत लाजीरवाणी परिस्थिती आहे. दुसऱ्याचा चेहरा आपल्याला डोळ्यांनी दिसतो. आपला चेहरा आपल्याला दिसत नाही. तो आरशात पहावा लागतो. कुरुप चेहरा असेल तर आरसा पहावेसे वाटत नाही. निर्देशांक समितीचा अहवाल हा आरसा आहे. त्यात वाढलेल्या अनुशेषाचा कुरुप चेहरा त्यांना पहावासा वाटत नाही. दांडेकर समितीचा अहवाल त्यावेळी सादर केला होता परंतु आता निर्देशांक समितीचा अहवाल सादर होत नाही. याचा अर्थ त्या अनुशेषाच्या मुद्यावर तुम्ही पांघरुण घालणार आहात. अनुशेष झाकून ठेवणार आहात. त्या निर्देशांक समितीच्या अहवालाच्या आरश्यामध्ये तुमचा कुरुप चेहरा तुम्हाला पहावला जात नाही याचा आम्ही निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(काही मा.सदस्य सभात्याग करतात)

**श्री.जयंत पाटील :** सभापती महोदय, माननीय सदस्यांनी बोलणाऱ्यांना बोलू द्यायला पाहिजे होते. अनुशेषाच्या बाबतीत निर्देशांक समितीचा अहवाल रंगनाथन समितीकडे छाननीकरिता असून त्याची छाननी सुरू आहे. त्याची पूर्ण छाननी झाल्यानंतर तो विधानसभा आणि विधानपरिषदेत ठेवणे जास्त संयुक्तिक होईल. **कारण त्या अहवालामध्ये पुढील १० ते १५ वर्षाचे काम होणार आहे. म्हणून तो अहवाल पूर्ण विचारांती ठेवला पाहिजे.** नवीन आलेल्या सरकारने रंगनाथन समितीला तो अहवाल एक्स्पाडाईट करावयास लावण्यासंबंधी मा.मुख्यमंत्र्यांनी देखील सूचना दिल्या आहेत. आणि म्हणून अहवाल विचाराधीन असल्यामुळे त्यावरील छाननी पूर्ण झाल्यानंतर तो निश्चितपणे सभागृहासमोर ठेवण्यात येईल. **सभापती महोदय, या ठिकाणी मुद्दा हसण्याचा नाही. मी यासाठी हसत होतो की, या ठिकाणी बाजू मांडणाऱ्याला बाजू मांडू दिली नाही. आणि म्हणून पूर्ण व विचारांती शासनाने तो अहवाल स्वीकृत केल्यानंतर तो सभागृहापुढे मांडला पाहिजे.** नाहीतर या ठिकाणी घिसाडघाईने एखादा अहवाल मांडायचा आणि मग त्यावर बाहेर भाषण करायचे यापेक्षा सभागृहामध्ये त्यावर चर्चा होणे चांगले आहे. दांडेकर समितीने १९८१-८२ सालापासूनचा बॅकलॉगचा अभ्यास केला. गेल्या १७ वर्षामध्ये १५ हजार कोटींचा असतांना त्यावर पूर्ण विचार करून तो सभागृहामध्ये ठेवणे जास्त योग्य आहे." (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २१ डिसेंबर १९९९ : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२०, क्रमांक ७, पृष्ठ ९१-९२)

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

***सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ आणि स्व.दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय, मलकापूर***

**श्री.गजाभाऊ खर्चे, अध्यक्ष लोकसेवा मंडळ, नरवेल ता.मलकापूर जि.बुलढाणा**

(१८) १७ मे २०१५

# विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला : ४

**२६१.** जवळ जवळ दोन ते तीन वर्षे अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल शासनाने दडपून ठेवला. अविकसित भागाचा वाढलेला अनुशेष डोळ्यात भरणारा होता. त्यातील निष्कर्ष बाहेर पडू नयेत असे शासनाला वाटत होते. सोमवार, दिनांक २१ डिसेंबर १९९८ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ३१३२६ ला उत्तर देतांना त्यावेळच्या मा. वित्तमंत्र्यांनी एकदा **"सभापती महोदय, त्या अहवालासंबंधी पूर्ण अभ्यास झाल्यानंतर मग सदनापुढे ठेवण्यात येईल."** असे सांगितले. पुन्हा दुसऱ्यांदा **"या समितीने अभ्यास केल्यानंतर त्या समितीचा अहवाल मंत्रीमंडळाच्या समितीकडे येईल आणि त्यानंतर तो अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल."** असे सांगितले. पुन्हा विचारले तर तिसऱ्यांदा तेच उत्तर त्यांनी "हा अहवाल सभागृहापासून लपवून ठेवण्याची या शासनाची कोणतीही इच्छा नाही ... म्हणून अध्यक्ष महाराज, जी इंडीकेटर कमिटी आहे तिचा रिपोर्ट आल्यानंतर त्याची छाननी आणि अमंलबजावणी कशी करावी याचा विचार चालू आहे आणि **हा विचार पूर्ण झाल्यानंतर तो मंत्रिमंडळसमोर ठेवल्यानंतर तो सभागृहात येईल."** या शब्दात दिले. त्यांच्या उत्तराचा निषेध करुन आम्ही काही सभासदांनी सभात्याग केला. सरकार बदलले. वित्त मंत्री बदलले. **विदर्भासारख्या अविकसित भागातील वित्तमंत्र्यांचा अभ्यास सत्ता जाईपर्यंत पूर्ण झाला नाही. आता तर काय? विकसित भागातील वित्तमंत्री नव्यानेच आले होते.** त्यांनी सुरुवातीला **"सभागृहासमोर एखादी गोष्ट ठेवत असताना ती पूर्ण विचारांती या ठिकाणी आली पाहिजे."** असे सांगितले. पुढे ताडकन "या अधिवेशनात हा रिपोर्ट सादर करणार नाही." असे उत्तर दिले. त्यांच्या उत्तराचा निषेध करुन बरोबर एक वर्षांनी पुन्हा आम्ही काही सभासदांनी सभात्याग केला.

**२६२.** शासनाच्या धोरणाचा निषेध करून आम्ही काही सदस्यांनी हा जो सभात्याग केला त्याचे वृत्तपत्रातून चांगलेच पडसाद उमटले. दुसऱ्या दिवशीच्या दै. "तरुणभारत"मध्ये श्री. अनिल मोहरील यांनी आपल्या "विधिमंडळातून" या सदरामध्ये याबाबत पुढील प्रमाणे वृत्तांत दिला होता. :-

"विदर्भातील चर्चा हे विधानपरिषदेच्या कामकाजाचे वैशिष्ट्य ठरले. वसंत काळे यांनी ही अडीच तासाची चर्चा सुरू केली. अझहर हुसेन यांचे नेमके भाषण व बी.टी.देशमुख यांची तळमळ या चर्चेत प्रकर्षाने दिसून आली. आपल्या सरकारवर टीका करणारे अझहर हुसेन त्यामुळे उठून दिसले. बी.टी.देशमुख यांनी निर्देशांक समितीचा अहवाल सादर करण्याची मागणी लावून धरली. पण अर्थमंत्री जयंत पाटील यांनी ती फेटाळून लावल्यामुळे बी.टी.देशमुख, दिवाकर पांडे, डायगव्हाणे यांनी सभात्याग करून निषेध नोंदविला. या मुद्यावरुन बी.टी.देशमुख यांनी अक्षरशः रुद्रावतार धारण केला होता."

**२६३.** खुद्द सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल सभागृहाला सादर करावा अशी मागणी केली होती. त्याबाबत शासनाकडून स्पष्टपणे नकार आल्याने संतापाची भावना निर्माण होणे स्वाभाविकच होते. "बी.टी. जेंव्हा खवळतात" या पोटमथळ्याखाली २२ डिसेंबर १९९९ च्या दैनिक "लोकमत" च्या वार्तापत्रातील पुढील मजकुर पहा :-

"ज्येष्ठ शिक्षक आमदार बी.टी.देशमुख यांचा राग आज विधानपरिषदेत सभागृहाने अनुभवला. एरवी अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद बोलणारे बी.टी.देशमुख यांनी आज अर्थमंत्र्यांच्या उत्तरानंतर शासनाचा मोठमोठ्याने निषेध करून संताप व्यक्त करीत सभात्याग केला. अर्थमंत्र्यांच्या विदर्भ मराठवाड्याच्या विकासासंबंधीच्या प्रस्तावावर उत्तरानंतर बी.टी.देशमुख यांनी निर्देशांक समितीचा अहवाल सभागृहात कधी मांडणार? असे ठणकावून विचारले. ना. पाटील यांनी सांगितले की, हा अहवाल रंगनाथन समितीकडे दिला आहे. या अहवालात १५ हजार कोटी रु. चा अनुशेष दाखविण्यात आला आहे. देशमुख यांनी सभागृहात संतप्त भावना व्यक्त करून चिडलेल्या आवाजात अहवाल सादर करणार की नाही? असे विचारले, अर्थमंत्र्यांनी हा अहवाल सभागृहात सादर करणार नाही, असे सांगितले. यावर आ. देशमुख यांनी तीव्र शब्दात शासनाचा निषेध करून सभात्याग केला."

**२६४.** दिनांक २२ डिसेंबर १९९९ रोजी दै. "लोकसत्ता" च्या प्रथम पृष्ठावर "अनुशेष समितीचा अहवाल सादर करण्यास नकार : वैदर्भीय आमदारांचा सभात्याग" या मथळ्याखाली दिलेल्या बातमीमध्ये "निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल सभागृहात सादर करण्याची मागणी अर्थमंत्री जयंत पाटील यांनी फेटाळल्यामुळे संतापलेल्या विदर्भातील सभासदांनी आज विधान परिषदेतून सभात्याग केला." अशी सुरुवात करून पुढील माहिती देण्यात आली होती. :-

"या चर्चेला अर्थमंत्री जयंत पाटील यांनी उत्तर दिले. विदर्भ व मराठवाड्याच्या विकासासाठी केवळ पत्रिका काढण्याचे काम लोकशाही आघाडीचे सरकार करणार नसून काही ठोस उपाययोजना करण्यावर भर राहणार असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले. श्री. पाटील यांचे भाषण संपल्यानंतर श्री. बी.टी.देशमुख यांनी निर्देशांक व अनुशेष समितीने केलेला अहवाल सभागृहात सादर करावा, अशी मागणी केली. गेल्या अडीच वर्षापासून हा अहवाल या सभागृहापासून लपवून ठेवल्या जात आहे. गेल्या युती सरकारने हा अहवाल न ठेवल्यामुळे आम्ही तीनदा सभात्याग केला आहे. लोकशाही आघाडी सरकारने तरी हा अहवाल सभागृहासमोर ठेवावा, अशी आग्रही मागणी श्री. देशमुख यांनी केली. निर्देशांक व अनुशेष समितीचा अहवाल राज्य सरकारला प्राप्त झाला असून या अहवालावर विचार करण्यासाठी रंगनाथन समिती नेमण्यात आली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर सभागृहासमोर अहवाल मांडण्यात येईल, असे श्री. पाटील यांनी सांगितले. अर्थमंत्री जयंत पाटील यांच्या उत्तरावर विदर्भातील बी.टी.देशमुख व श्री. विश्वनाथ डायगव्हाणे यांनी हरकत घेतली. विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष किती झाला हे पाहण्यासाठी सदनापुढे हा अहवाल सादर करण्यात यावा. युती सरकारने हा अहवाल मुद्दाम झाकून ठेवला. लोकशाही आघाडीचे सरकार सुद्धा तेच करीत आहे. यावेळी बी.टी.देशमुख यांनी संतप्त झाल्याने चढ्या आवाजाने सभागृह दणाणून सोडले होते. वैदर्भीयांची बाजू अतिशय त्वेषाने बी.टी.देशमुख यांनी मांडली."

**२६५.** नागपूर अधिवेशनात २१ डिसेंबर १९९८ रोजी त्यावेळच्या अर्थमंत्र्यांचा निषेध झाला. **बरोबर १ वर्षाने २१ डिसेंबर १९९९ रोजी या निषेधाचा वाढदिवस नव्या अर्थमंत्र्यांच्या निषेधाने साजरा झाला.** याचा व्हायचा तो परिणाम निश्चित झाला. रंगनाथन समितीची नेमणूकच मुळात अहवाल "पाडून" ठेवण्यासाठी झाली होती. रंगनाथन यांनी आता त्यांचा अहवाल सादर करण्यासाठी आणखी विलंब करू नये अशी भावना या निषेधानंतर सर्वत्र दिसून आली. "रंगनाथन समितीने आता याबाबत अभ्यास करायला सुरुवात केली आहे" एवढ्या काटेकोर शब्दात अर्थमंत्र्यांनी विधानपरिषदेत २१ डिसेंबर १९९९ रोजी माहिती दिली होती. आता अभ्यासाला सुरुवात केली आहे हे ऐकल्यावर स्वाभाविकपणे "आता हा अभ्यास संपणार तरी केंव्हा?" अशी भावना आमच्या मनामध्ये निर्माण झाली होती. पण सभागृहामध्ये झालेल्या निषेधाची धार एवढी तीव्र होती की, तो अभ्यास २ दिवसात पूर्ण झाला व **दोनच दिवसात दिनांक २३ डिसेंबर १९९९ रोजी रंगनाथन यांनी आपला अहवाल मा. मुख्यमंत्र्यांना सादर केला.** अनेकांना सभात्याग ही एक 'गंमत' वाटते. अशा सभात्यागाने शेवटी काय साध्य होणार आहे? असेही विचारणारे लोक आहेत. 'सभात्याग' हे एक फार मोठे 'सांसदीय आयुध' आहे. लोकांच्या खऱ्याखुऱ्या व जिव्हाळ्याच्या प्रश्नावर तळमळीने, अभ्यासपूर्वक विचार मांडणारे व सभासदभागावर व चर्चेवर नितांत श्रद्धा ठेवणारे सदस्य, जेव्हा शासन पक्षाचे कान एखाद्या विषयाच्या बाबतीत ठार बहिरे झाल्याचे बघितल्यानंतर, आता या सभासदभागात व चर्चेत काही अर्थ राहीला नाही असेच जणू काही सुनावून, जेव्हा सभात्याग करतात, तेव्हा बड्या-बड्या राज्यकर्त्यांची झोप उडविण्याचे सामर्थ्य त्या सभात्यागात असते. हा अनुभव पुन्हा एकदा आला.

**२६६.** अनेक वर्षेपर्यंत सत्तेवर नियंत्रण ठेवल्यामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांचे लांगुलचालन करणारी एक सनदी अधिकाऱ्यांची फौजच तयार झाली होती. या फौजेत रंगनाथन यांचे स्थान बरेच वरचे होते. पुढे या रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखाली तालुका घटक घरून अनुशेष काढण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. नागपूर मुक्कामी विदर्भातील २५-३० आमदारांनी एकमुखाने त्या समितीसमोर हजर राहून रंगनाथन यांचा निषेध केला होता. हे रंगनाथन विदर्भ-मराठवाड्याला काय न्याय देणार? रंगनाथन समितीने आपल्या शिफारसींचा अहवाल दिनांक २३ डिसेंबर १९९९ रोजी मा. मुख्यमंत्रिमहोदयांना सादर केला. भारत प्रशासन सेवेतील एवढ्या मोठ्या पदावरील एका ज्येष्ठ अधिकाऱ्याने मूळ अहवाल "पाडून" ठेवण्यासाठी आपला पूर्णपणे दुरुपयोग करण्याची शासनाला संधी दिली होती. केवळ मूळ अहवाल पाडून ठेवण्याचीच कामगिरी रंगनाथन यांनी केली, असे नव्हे तर अनेक बाबतीत त्यांनी अनुशेषग्रस्त भागाच्या मानेवर जबरदस्त घाव घालण्याचे काम केले, असे स्पष्टपणे दिसून येते. **मागास भागांचा गळा घोटणाऱ्या रंगनाथन समितीच्या काही महत्त्वाच्या शिफारसींची नोंद घेणे आवश्यक आहे.**

**२६७.** अनुशेष व निर्देशांक समितीची एक महत्वाची शिफारस अशी होती

की, "तिनही विकास मंडळ क्षेत्रांना व जिल्ह्यांना अनुशेष दूर करण्यासाठी अनुशेषाच्या प्रमाणानुसार वार्षिक योजनेत नियतव्यय ठेवण्यात यावा. तसेच वार्षिक योजनेत तरतुदी करून संपूर्ण अनुशेष खालीलप्रमाणे दूर करण्यात यावा. (अ) तंत्र शिक्षणातील अनुशेष तीन वर्षात दूर करावा. (ब) पाटबंधारे आणि रस्ते क्षेत्रातील अनुशेष ७ वर्षात दूर करावा. (क) उर्वरित क्षेत्रातील अनुशेष ५ वर्षात दूर करावा. (ड) वार्षिक योजनेत राज्यस्तर आणि जिल्हा स्तर योजनांसाठी नियत व्ययाचे जे प्रमाण आहे तेच प्रमाण अनुशेषांतर्गत ठेवण्यात यावे." यांच्या उलट रंगनाथन समितीने मात्र आपल्या अहवालामध्ये "**अनुशेष दूर करण्यासाठी कोणतेही वेळापत्रक न ठेवता निधीच्या उपलब्धतेनुसार अनुशेष दूर करण्याची कार्यवाही व्हावी" अशी अत्यंत विषारी शिफारस केलेली होती.** "काही बाबतीतला अनुशेष ३ वर्षात, काही बाबतीत तो ५ वर्षात व काही बाबतीत तो ७ वर्षात दूर करावा. त्यासाठी आवश्यक तो निधी उलब्ध करून द्यावा" या **अनुशेष व निर्देशांक समितीच्या शिफारसीचे रंगनाथन यांनी "निधीच्या उपलब्धतेनुसार अनुशेष दूर करण्याची शिफारस" करून मातेरे केलेले होते.**

**२६८.** जलसिंचन या विकासक्षेत्रात फार मोठा अनुशेष असतांना तो अनुशेष नकली पद्धतीने व कृत्रिम रीतीने संपुष्टात आणण्यासाठी रंगनाथन समितीने आपल्या कार्यकक्षासुद्धा ओलांडल्याचे दिसून येते. १ डिसेंबर १९९८ च्या ज्या शासननिर्णयाने रंगनाथन समितीची नेमणूक केली त्या शासननिर्णयामध्ये या समितीची कार्यकक्षा स्पष्टपणे पुढील शब्दात नमूद करण्यात आलेली होती. :- "अनुशेषाची कामे ही योजनांतर्गत कामे असल्याने वार्षिक योजनेतील खालील बाबी मधून अनुशेषासाठी तरतूद करता येऊ शकते. १) रोजगार हमी योजना २) आदिवासी उप योजना ३) जिल्हा योजना ४) पाटबंधारे महामंडळांना द्यावयाचे अनुदान ५) वैधानिक विकास मंडळाचा विशेष नियतव्यय **वरील सूचना व अनुशेषाबद्दल अनुषंगिक मुद्दे तपासून अनुशेष दूर करण्यासंबंधी पुढील निश्चित अशी कार्यवाही ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात येत आहे.**" रंगनाथन समितीला वर नमुद केल्याप्रमाणे एका ओळीची कार्यकक्षा देण्यात आली होती. नेमणुकीच्या शासननिर्णयाने जे काम रंगनाथन समितीकडे सोपविले नव्हते, ते काम या समितीने मागास भागावर वरवंटा फिरविण्याचा स्पष्ट हेतू समोर ठेवून आपल्याकडे ओढून घेतले. शासनाच्या निरनिराळ्या विभागाकडून काही अभिप्राय मागविण्याचा निर्णय रंगनाथन समितीने घेतला. याबाबतचा या समितीच्या अहवालातील पुढील स्वयंस्पष्ट उल्लेख पहा :- "निर्देशांक व अनुशेष समितीच्या अनुशेषासंदर्भात तपासणी करून प्रशासकीय विभागांकडून खालील मुद्याबाबतचे अभिप्राय मागविण्यात आले :- (१) अनुशेष निश्चितीबाबत निर्देशांक व अनुशेष समितीने वापरलेले तत्त्व/परिमाण यथायोग्य आहे किंवा कसे (२) अनुशेष अहवालातील आकडेवारी वस्तुनिष्ठ आहे किंवा कसे, (३) नवीन भौतिक अनुशेष किती वर्षात दूर करता येवू शकेल व त्यासाठी प्रतिवर्षी किती तरतूद लागेल."

**२६९.** वस्तुतः अनुशेष व निर्देशांक समिती ही मा. राज्यपालांनी नेमलेली समिती होती. भारतीय घटनेच्या कलम ३७१ अन्वये राष्ट्रपतींनी तसे विशेष अधिकार राज्यपालांना बहाल केले होते. त्या अधिकारांत राज्यपालांनी ती समिती नेमली होती. शासनाच्या सर्व विभागांच्या सचिवांनी पुरविलेल्या अधिकृत आकडेवारीच्या आधारावरच अनुशेष व निर्देशांक समितीने आपला अहवाल तयार केलेला होता. असे असतांना रंगनाथन समितीने "**अनुशेष निश्चितीबाबत निर्देशांक व अनुशेष समितीने वापरलेले तत्त्व/परिमाण यथायोग्य आहे किंवा कसे?" अशी विचारणा विभागाकडे करणे हे हास्यास्पदच होते.** अशी विचारणा करूनच रंगनाथन थांबले नाही तर त्या माहितीची तपासणी करून जलसिंचन या अत्यंत महत्त्वाच्या विकास क्षेत्राबाबत त्यांनी आपल्या अहवालात पुढील मजकूर दाखल केला. :- "वरील मुद्यांसंदर्भात प्रशासकीय विभागांनी दिलेल्या माहितीची तपासणी करण्यात आली. त्यानुसार असे दिसून आले की, **पाटबंधारे प्रकल्पांचा अनुशेष जिल्हा हा घटक धरून काढणे योग्य ठरत नाही.** पाटबंधारे प्रकल्पांची बांधणी व स्थाननिश्चिती ही मुख्यत्वे प्रदेशातील पाणी उपलब्धता व भौगोलिक परिस्थिती यावर अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात समप्रमाणात सिंचनक्षमता निर्माण होऊ शकत नाही. **पाटबंधारे विभागाच्या अभिप्रायानुसार अनुशेष हा खोरेनिहाय परिगणित करून काढणे योग्य होईल.** तथापि, जर जिल्हानिहाय अनुशेष काढावयाचा झाल्यास जिल्ह्याची अंतिम सिंचन क्षमता आणि निर्मित सिंचनक्षमता या आकडेवारीच्या आधारे अनुशेष काढणे सुसंगत राहील असे त्या विभागाने मत व्यक्त केले आहे."

**२७०.** अविकसित भागाला पक्षपात करण्याच्या या कारस्थानाची सुरुवातच मुळांत पाटबंधारे विभागाने रंगनाथन समितीकडे केलेल्या उपरोक्त मागणीत आहे. **जिल्हा घटक धरून दांडेकर समितीने या विकास क्षेत्राचा अनुशेष निश्चित केलेला होता. त्याच मापदंडाने अनुशेष व निर्देशांक समितीने अनुशेष निश्चित केला होता.** आता एकाएकी पाटबंधारे विभागाने "**जिल्हा घटक धरून पाटबंधारे प्रकल्पाचा अनुशेष काढणे योग्य ठरत नाही**" अशी मोठीच 'क्रांतिकारक' भूमिका घेतली. केवळ नकारार्थी भूमिका घेऊनच ते थांबले नाहीत तर त्यासाठी "**खोरेनिहाय अनुशेष काढणे योग्य होईल**" असा प्रस्ताव त्यांनी मांडला. हा प्रस्ताव अत्यंत विषारी होता. एकाच नदीच्या खोऱ्यात (जलग्रहण क्षेत्रात) विकसित भागातील प्रकल्प बांधून झालेले आहेत, येवा संपलेला आहे किंवा सरासरी टक्केवारी त्या खोऱ्याच्या पदरात पडलेली आहे, तेंव्हा त्याच खोऱ्यातील अविकसित भागातील प्रकल्प गुंडाळून ठेवण्यात यावे असा या प्रस्तावाचा सरळसरळ अर्थ होता. गोदावरीच्या खोऱ्यातील बुलढाणा जिल्ह्यासारख्या जलसिंचन या विकासक्षेत्रात खूपच अनुशेष असलेल्या जिल्ह्याचे या सुत्रानुसार सरळसरळ बलिदान होणार हे स्पष्टच दिसून येत होते. मराठवाड्याचा अनुशेष भरून निघण्याला या प्रस्तावामुळे कायमची मुठमाती मिळाली असती.

**२७१.** खोरे निहाय सिंचन क्षमतेचे मोजमाप करून अनुशेष निर्धारणाचा प्रस्ताव पोरकट पणाचा असल्यामुळे हास्यास्पद ठरेल याची जाणीव झाल्यामुळे पाटबंधारे विभागाने याबाबतचा तेवढाच विषारी पर्याय सोबतच देऊन ठेवला होता तो पुढील शब्दात :- "पाटबंधारे विभागाच्या अभिप्रायानुसार अनुशेष हा खोरेनिहाय परिगणित करून काढणे योग्य होईल. तथापि, जर जिल्हानिहाय अनुशेष काढावयाचा झाल्यास **जिल्ह्याची अंतिम सिंचन क्षमता आणि निर्मित सिंचन क्षमता या आकडेवारीच्या आधारे अनुशेष काढणे सुसंगत राहील असे त्या विभागाने मत व्यक्त केले आहे.**" पाटबंधारे विभागाने वर नमूद केलेले जे विषारी प्रस्ताव रंगनाथन समितीसमोर मांडले त्याबाबत रंगनाथन समितीने केलेल्या कारवाईची नोंद या समितीच्या अहवालामध्ये आपल्याला दिसून येते ती पुढील शब्दात :-

**"पाटबंधारे विभागाच्या वरील अभिप्रायाच्या अनुषंगाने जिल्हानिहाय निश्चित असा किती अनुशेष येतो व तो दूर करण्यासाठी किती निधी लागेल याची माहिती मागविण्यात आली आहे.** या माहितीच्या आधारे सिंचनाचा अनुशेष व लागणारा निधी याची निश्चिती करता येईल." "**या माहितीच्या आधारे सिंचनाचा अनुशेष व लागणारा निधी याची निश्चिती करता येईल.**" हा या समितीच्या अहवालातील उल्लेख अत्यंत खेदजनक व आश्चर्याचा धक्का देणारा होता. रंगनाथन समितीने अधिकारकक्षा ओलांडून माहिती मागितली व पाटबंधारे विभागाने माहिती तातडीने सादर केली. खोरेनिहाय जलसिंचन क्षमतेचा अनुशेष काढण्याचा प्रयत्न सोडून देण्यात आला व **प्रत्येक जिल्ह्याची अंतिम सिंचन क्षमता लक्षात घेऊन त्या त्या जिल्ह्याचा अनुशेष दर्शविणारा एक तक्ता पाटबंधारे विभागाने समितीला सादर केला.** "District-wise Backlog as per potential created by June 1997" असा या तक्त्याचा मथळा असून मापदंड पूर्णपणे बदलवून त्या तक्त्यामध्ये जलसिंचन अनुशेष निश्चित करण्यात आला होता.

**२७२.** २३ डिसेंबर १९९९ रोजी मा. मुख्यमंत्र्यांना सादर केलेल्या रंगनाथन यांच्या अहवालातील महत्वाच्या शिफारशी मी वर नमुद केलेल्या आहेत. नागपूर अधिवेशन संपल्यानंतर या घडामोडींना वेग आला. "**मंत्रिमंडळाने अहवाल स्वीकारला**" अशा बातम्या वृत्तपत्रातून उमटल्या. बहुतेक वृत्तपत्रात "रंगनाथन समितीचा अहवाल मंत्रिमंडळाने स्वीकारला" असे वृत्त होते. काही वृत्तपत्रात मात्र "अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल मंत्रिमंडळाने स्विकारला" असे वृत्त होते. त्याच दिवशी दै. 'तरुण भारत'चे प्रतिनिधी श्री. शिवराय कुळकर्णी यांनी माझी मुलाखत घेतली. मी त्यांना असे सांगितले की, "**रंगनाथन समितीचा अहवाल स्वीकारला असेल तर त्याचा तीव्र निषेध झाला पाहिजे. अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल स्वीकारला असेल तर ती आनंदाची गोष्ट आहे.**" दै. तरुण भारतमध्ये ही मुलाखत प्रथम पृष्ठावर छापून आल्यावर विदर्भातील ज्येष्ठ मंत्री श्री. रणजीत देशमुख यांनी जाहीरपणे दुसऱ्या दिवशी खुलासा केला. "अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल स्वीकारला आहे."

**२७३.** मार्च-एप्रिल २००० च्या अधिवेशनांत योग्य दिशेने हा प्रवास थोडासा आणखी पुढे गेला. दिनांक १३ मार्च २००० रोजी झालेल्या मा. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये परिच्छेद १९ पुढीलप्रमाणे आहे. : *"अनुशेष व निर्देशांक समितीचा प्रादेशिक असमतोलावरील अहवाल शासनाने तत्त्वतः स्वीकारण्याचे ठरविले असून उपलब्ध साधन संपत्तीचा विचार करून अंमलबजावणीबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल"* अंदाजपत्रक सादर करतांना मा. अर्थमंत्र्यांनी २२ मार्च २००० रोजी केलेल्या भाषणात परिच्छेद ५ पुढील प्रमाणे आहे :- *"आता लोकशाही आघाडीच्या शासनाने निर्देशांक व अनुशेष समितीचा विभागीय अनुशेषासंबंधीचा अहवाल तत्त्वतः मान्य केला आहे."*

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

# आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, राजुरा, जि.चंद्रपूर

राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यातील मागास व ग्रामीण भागात शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणारी अग्रणी संस्था

**श्री. प्रभाकरराव मामुलकर अध्यक्ष, ॲड.मुरलीधर धोटे, कार्याध्यक्ष दत्तात्रयजी येगीनवार, श्रीधरराव गोडे, उपाध्यक्ष, किशनराव वाटेकर सचिव, अविनाश जाधव कोषाध्यक्ष, सुधाकरराव कुंदोजवार हिशोबतपासनीस संचालक गण - जाहेद हुसेन बियाबानी, जसविंदरसिंह धोतरा, दिलीपराव नलगे**

(१९) २४ मे २०१५

# विदर्भ-मराठवाड्याच्या सिंचन अनुशेष वृद्धीसाठी योजिलेली विषारी सापळ्यांची शृंखला : ५

**२७४.** या पार्श्वभूमीवर दिनांक ४ एप्रिल २००० रोजी याबाबतचा एक प्रस्ताव सभागृहात आम्ही चर्चेसाठी आणला. सर्वश्री अनिल पटेल, अजहर हुसेन, वसंत काळे, चंद्रकांत रघुवंशी, व्यंकाप्पा पतकी, गंगाधर पटने व बी.टी.देशमुख यांनी या प्रस्तावाची नोटीस दिलेली होती, असे असले तरी हा प्रस्ताव प्रा.बी.टी.देशमुख यांनीच सभागृहात मांडावा असे ठरले. प्रस्ताव पुढील प्रमाणे होता :-

"राज्यातील मागासलेल्या भागाकरिता दांडेकर समिती व निर्देशांक समितीने काढलेला अनुशेष भरुन काढण्याकरिता शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा व त्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजना तातडीने अंमलात आणण्याबाबतची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

**२७५.** उपरोक्त प्रस्ताव मांडण्याची जबाबदारी ही माझ्यावर आलेली होती. ती पार पाडणे हा माझ्यासाठी आनंदाचा विषय होता. पण मनामध्ये एक शल्य होते, दुःख होते, ते असे की आपण ज्या अहवालावर चर्चा घडवून आणतो आहोत तो अहवाल गेली तीन वर्षं दडवून ठेवण्यात आला आहे. अजूनही तो सभागृहाला सादर करण्यात आलेला नाही. व्यक्तिशः मी त्या अहवालाची अनेक पारायणे केली होती. त्यावर एक पुस्तकही लिहून प्रसिध्द केले होते. पण ती व्यक्तिगत गोष्ट होती. जो अहवाल सभागृहाला सादरच झालेला नाही त्यावर चर्चा मात्र सुरू होत आहे, असा मोठा अभुतपूर्व प्रसंग सभागृहापुढे होता. मी औपचारीकरित्या ठराव मांडला व भाषणाची सुरुवात केली व अगदी सुरुवातीलाच अहवाल सभागृहासमोर ठेवण्याची मागणी केली ती पुढील शब्दात :-

"सभापती महोदय, अनुशेष आणि निर्देशांक समितीचा अहवाल गेल्या तीन वर्षापासून पडून होता. **आता त्याला शासनाने तत्वतः मान्यता दिली आहे. ही या राज्याच्या अनुशेषाच्या इतिहासातील मोठी उपलब्धी आहे.** आता त्याच्या पुढील भागाकरिता मी शासनाचे लक्ष वेधणार आहे. आता येथे प्रस्ताव मांडण्यासाठी ज्या माननीय सदस्यांनी मला संधी दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानीत आहे. तसेच आपणही मला हा प्रस्ताव मांडण्यास संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानीत आहे. अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे महाराष्ट्रातील एकूण १७ जिल्हे निरनिराळ्या क्षेत्रात मागे आहेत. विदर्भातील आठ, मराठवाड्यातील सहा, कोकणातील दोन, आणि उर्वरित महाराष्ट्रातील एक असे हे जिल्हे आहेत. आता हा प्रस्ताव मांडीत असताना मी द्वीधा मनस्थितीत आहे. या प्रश्नाला न्याय देण्याच्या दृष्टीने ती महत्वाची बाब आहे. **अनुशेष आणि निर्देशांक समितीचा अहवाल अजून सभागृहाला सादर झालेला नाही.** माझी अशी अपेक्षा होती की, आज या प्रस्तावावर चर्चा आहे, म्हणून या निमित्ताने हा अहवाल आज सभागृहाला सादर करण्यात येईल. म्हणून माझी अशी विनंती आहे की, अनुशेष आणि निर्देशांक समितीचा अहवाल शासनाने सभागृहाला सादर केल्यानंतर दोन- तीन दिवसानंतर या प्रस्तावावर चर्चा व्हावी. मा. मंत्रिमहोदय या बाबत काय निवेदन करणार आहेत? तसेच हा अहवाल केव्हा या सदनासमोर ठेवण्यात येणार आहे, याची तयारी आम्हाला समजली तर बरे होईल. हा या सदनाच्या कामकाजाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : ४ एप्रिल २००० : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२१, क्रमांक १४, पृष्ठ ८७)*

**२७६.** अधिकृतपणे अहवाल आमच्या हातात आलेला नाही व आम्ही त्यावरील प्रस्तावाच्या चर्चेला सुरुवात करीत आहोत, ही गोष्ट मला अनुचित वाटल्याने मी वरील प्रमाणे "हरकतीचा मुद्दा" असे म्हटले नाही पण खऱ्या अर्थाने हरकतीचाच मुद्दा उपस्थित केला. अशा मुद्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी व्यवस्थेचा निर्णय द्यावयाचा असतो व त्यांचा तो निर्णय अंतिम असतो. **पीठासिन अधिकाऱ्यांनी आपला निर्णय देण्यापूर्वी शासनाच्या वतीने नियोजन राज्यमंत्र्यांनी पुढील शब्दात शासनाची बाजू सभागृहामध्ये मांडली :-**

"या विषयावर खालच्या सदनात चर्चा झाली आहे. अनुशेष आणि निर्देशांक समितीचा अहवाल जर सभागृहासमोर ठेवावयाचा असेल तर **त्यासाठी मा. राज्यपालांची परवानगी घ्यावी लागेल. कारण मा. राज्यपालांनी निर्देशांक समिती नियुक्त केली आहे. तेव्हा त्यांच्या परवानगीशिवाय हा अहवाल पटलावर ठेवता येणार नाही. मा.राज्यपालांची परवानगी मिळाल्यानंतर हा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.**" *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : ४ एप्रिल २००० : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२१, क्रमांक १४, पृष्ठ ८८)*

**२७७.** अहवाल सभागृहाला सादर झालेला नसतांना त्यावर चर्चा करण्याबाबत मी उपस्थित केलेल्या प्रारंभिक मुद्यावर शासनाच्यावतीने मा. नियोजन राज्यमंत्र्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सभापतीस्थानी असलेल्या मा. उपसभापतींनी याबाबत पुढील प्रमाणे व्यवस्थेचा निर्णय दिला. :-

"**उपसभापती :** या बाबतचा अहवाल आल्याशिवाय चर्चा करता येणार नाही. असे मा. सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी सांगितले आहे. आता हा अहवाल आल्यानंतर हा प्रस्ताव आपण सभागृहासमोर चर्चेला आणू.आता हा अहवाल सभागृहासमोर येण्यासाठी तातडीने कारवाई झाली पाहिजे. **जोपर्यंत अहवाल सभागृहासमोर येत नाही, तोपर्यंत या विषयावर चर्चा करणे योग्य होणार नाही. या मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्या मताशी मी सहमत आहे. म्हणून हा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आल्यानंतरच यावर चर्चा करण्यात येईल.**" व एवढ्यावरच त्यादिवशीची या विषयावरील चर्चा संपली. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : ४ एप्रिल २००० : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२१, क्रमांक १४, पृष्ठ ८८)*

**२७८.** सभागृहाला अहवाल सादर करण्याबाबत शासनाची भूमिका मा.नियोजन राज्यमंत्र्यांनी ४ एप्रिल २००० रोजी सभागृहामध्येच सांगितली होती. राज्यपालांच्या सम्मतीबाबत अनौपचारिकरित्या चौकशी केली असता असे कळले की मा.राज्यपालांची परवानगी हे वरवरचे, औपचारिक व सांगण्याचे कारण आहे. राज्यपालांनी एक समिती नेमली व त्या समितीचा अहवाल सभागृहाला सादर करण्याची शासनाची इच्छा असेल तर मा. राज्यपालांना आनंदच वाटेल, असे सांगितले जात होते. राज्यशासनाची खरोखरच इच्छा असेल तर एक तासातसुद्धा मा. राज्यपालांकडून अशी परवानगी दिली जाऊ शकते. मंत्रिमंडळाने अहवाल तत्त्वतः मान्य केलेला होता, त्यामुळे तिथे सुद्धा आता काही रेंगाळलेले नव्हते. राज्यशासनाच्या नियोजन विभागाची खरी अडचण वेगळीच होती. अनुशेष व निर्देशांक समितीचा मा.राज्यपालांना सादर झालेला मूळ अहवाल इंग्रजीमध्ये होता. विधानमंडळाच्या दोनही सभागृहाला सादर करण्यासाठी पुरेशा प्रती इंग्रजीमध्ये छापून तयारही झाल्या होत्या. एकदा अहवाल सभागृहासमोर ठेवला की सोबतच त्याच्या मराठी आवृत्तीची जोरदारपणे मागणी होते, म्हणून इंग्रजी व मराठी दोनही आवृत्त्या एकदमच ठेवण्याची अनेक वर्षाची प्रथा आहे. मराठी आवृत्ती छापून तयार झालेली नव्हती. भाषांतराच्या अधिकृततेबद्दल गुंतागुंती निर्माण झाल्याने ही छपाई सुरू सुद्धा झाली नव्हती. अनुशेषग्रस्त भागाला न्याय देणाऱ्या एखाद्या बाबतीत शासनाचे सर्वच विभाग किती उदासीन असतात याचे हे उदाहरण होते.

**२७९.** दिनांक ४ एप्रिल २००० रोजीची चर्चा पुढे ढकलण्यात आली होती. ८-१५ दिवसात सन २००० चे अंदाजपत्रकी अधिवेशन संपुष्टात येणार. अहवालाची मराठी प्रत या अधिवेशनात तर छापून तयार होतच नाही पण जुलै-ऑगस्ट २००० च्या अधिवेशनापर्यंतसुद्धा ती छापून तयार होऊ शकणार नाही, असे अनधिकृतपणे कळले व झाले सुद्धा तसेच. राज्यकर्त्यांची इच्छा असेल तर असे अहवाल सादर झाल्यानंतर २ -३ दिवसात छापून सभागृहाला सादर झाल्याची अनेक उदाहरणे मला ठावूक आहेत. पण या अहवालाच्या बाबतीत साराच प्रकार "मोले घातले रडाया" या पद्धतीचा होता. खुद्द विदर्भ, मराठवाड्यातील मंत्र्यांनाच मंत्रिमंडळाने मान्य केलेला हा अहवाल लोकांसमोर आता "जाहीर" झाला पाहिजे याची घाई नव्हती, तर पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांना त्याबाबत घाई करण्याचे कारणच काय? परिणामी हा अहवाल जुलै-ऑगस्ट २००० च्या अधिवेशनांत सुद्धा

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

**चांदा शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर**

**जनता करियर लॉन्चर, चंद्रपूर**

जनता बी.एड. कॉलेज सिविल लाईन, नागपूर रोड, चंद्रपूर

**डॉ.सौ.प्रतिभा अशोकराव जीवतोडे, अध्यक्ष** **डॉ.अशोक जीवतोडे, सेक्रेटरी**

सादर झाला नाही. तो डिसेंबर २००० च्या नागपूर अधिवेशनात (मंत्रिमंडळाने मान्य केल्यानंतर जवळजवळ १०-१२ महिन्यांनी) सभागृहाला सादर झाला.

**२८०.** अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल आणखी ८-१० महिने उजेडात येणार नसेल तर आपण चर्चेशिवाय थांबायचे काय? अहवालही मिळणार नाही व चर्चाही होणार नाही ही गोष्ट अनुशेषग्रस्त भागाच्या हिताची नाही असे आम्हा काही सदस्यांना वाटले. ४ एप्रिल २००० रोजी कामकाज पत्रिकेवर असलेल्या प्रस्तावावरील पुढे ढकललेली चर्चा याच अधिवेशनांत झाली पाहिजे **असा आग्रह आम्ही काही सदस्यांनी धरला. कामकाज सल्लागार समितीमध्ये याबाबत चर्चा होऊन हा प्रस्ताव मंगळवार, दिनांक १८ एप्रिल २००० रोजी चर्चेसाठी घ्यावा असे ठरले व त्याप्रमाणे त्या दिवशी त्या चर्चेला सुरुवात झाली.**

**२८१. मंगळवार, दिनांक १८ एप्रिल २००० रोजी मी पुढील प्रस्ताव सभागृहात मांडला :-**

"राज्यातील मागासलेल्या भागाकरिता दांडेकर समिती व निर्देशांक समितीने काढलेला अनुशेष भरुन काढण्याकरिता शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा व त्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजना तातडीने अंमलात आणण्याबाबतची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

प्रस्ताव मांडल्यानंतर प्रस्तावाच्या समर्थनार्थ मी तपशीलवार भाषण केले. प्रादेशिक असमतोल कसा निर्माण झाला, दांडेकर समितीची नेमणूक कां करावी लागली, दांडेकर समितीच्या अहवालामध्ये कोणत्या शिफारसी करण्यात आल्या होत्या, त्यातील एकही शिफारस यापूर्वी कोणत्याही शासनाने मान्य केली नाही, निधीचे असमतोल वाटप होत राहिले, भौतिक अनुशेष वाढत गेला, रुपयातील अनुशेष सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढला, अनुशेष व निर्देशांक समितीची नेमणूक, त्या समितीचा अहवाल, त्या अहवालातील शिफारसी, त्यावर रंगनाथन समितीची नेमणूक, रंगनाथन समितीच्या शिफारसी, याबाबत मी तपशीलवार विवेचन केले व शेवटी माझ्या भाषणामध्ये मी पुढील प्रमाणे मागणी केली :-

**" अध्यक्षमहाराज मी नमूद करू इच्छितो की, दिवा लावणे आणि अंधार दूर करणे या दोन कृती नाहीत. दिवा लावला की, अंधार आपोआपच दूर होतो. अनुशेषग्रस्त भागांना आपण निधी उपलब्ध करून दिला की, अनुशेष आपोआप दूर होईल. निधी उपलब्ध न करू देता अनुशेष दूर करण्याच्या गोष्टी करणे म्हणजेच या भागांना अंधारामध्ये तडफडत ठेवणे आहे.** अनुशेष आणि निर्देशांक समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी झाली पाहीजे. येत्या पाच वर्षामध्ये हा अनुशेष दूर केला पाहीजे. त्यांनी दिलेल्या शेड्यूलप्रमाणे कार्यक्रम अंमलात आणा असेही त्यांनी म्हटलेले आहे. त्याची अंमलबजावणी केली पाहीजे." तसेच अद्यावत आकडेवारी उपलब्ध व्हावी अशी मागणी करून मी माझे भाषण संपविले. *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : १८ एप्रिल २००० : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२१, क्रमांक २०, पृष्ठ ९८)*

**२८२.** १८ एप्रिल २००० रोजी प्रस्ताव मांडणारे माझे भाषण झाले, प्रस्ताव प्रस्तुत झाला. सदरहू प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या इतर सदस्यांची भाषणे व चर्चेला मा. मंत्रिमहोदयांचे उत्तर २४ तारखेला होईल असे पीठासीन अधिकाऱ्यांनी जाहीर केले व त्यादिवशीचे कामकाज सायंकाळी ७.०५ वाजता संपले. याबाबत पीठासीन अधिकाऱ्यांनी पुढीलप्रमाणे घोषणा केली :-

**"तालिका सभापती : सदरहू प्रस्तावावरील चर्चा आणि मंत्री महोदयांचे उत्तर सोमवार, दिनांक २४.४.२००० रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळात घेण्यात यावे असे सुचविण्यात येत आहे.** आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील चारही अर्धातास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहेत. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक १९.४.२००० रोजी सकाळी १०.०० वाजता पुनः भरेल." *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : १८ एप्रिल २००० : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२१, क्रमांक २०, पृष्ठ ९८)*

उरलेली चर्चा व मा. मंत्र्यांचे उत्तर २४ एप्रिल २००० रोजी होईल असे जाहीर झाले खरे! पण राजकीय घडामोडीमुळे हे अधिवेशन दिनांक २० एप्रिल २००० रोजी संपले. त्यामुळे पुढील चर्चा झाली नाही, मंत्र्याचे उत्तर सुद्धा झाले नाही. मार्च-एप्रिल २००० च्या अधिवेशनातील याबाबतच्या घडामोडी येथे संपल्या.

**२८३.** रंगनाथन समितीने केलेल्या अधिकृत शिफारसी आम्हाला अनधिकृतपणे समजल्या होत्या. कागदोपत्री त्यांची नोंद होणे आवश्यक होते. मंगळवार, दिनांक १८ जुलै २००० रोजी आमचा याबाबतचा तारांकित प्रश्न क्रमांक ७६३० हा उत्तरासाठी होता. "अनुशेष व निर्देशांक समिती या मा. राज्यपालांनी नेमलेल्या विभागीय अनुशेषाच्या नव्याने अभ्यास करणाऱ्या समितीने मा. राज्यपालांना सादर केलेल्या अहवालावरील शासनाने नियुक्त केलेल्या सचिव स्तरावरील समितीने आपल्या शिफारशी शासनास सादर केल्या आहेत काय;" या प्रश्न भाग १ ला मा. नियोजन मंत्र्यांनी "होय" असे उत्तर दिले होते.

**२८४.** "अहवाल सादर झालेला असल्यास या समितीच्या प्रमुख शिफारसी कोणत्या" या (७६३० या तारांकित प्रश्नाच्या) प्रश्न भाग दोनला नियोजन मंत्र्यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले होते :-

"(२) (१) १७ **मागास जिल्ह्यांसाठी वार्षिक योजनेतील १५ टक्के नियतव्यय ठेवण्याच्या शिफारशींबाबत निर्देशांक व अनुशेष समितीने फेरविचार करावा.**

(२) वार्षिक योजनेच्या एकूण अर्थसंकल्पित नियतव्ययातून विशेष घटक योजना व आदिवासी उपयोजनेचा नियतव्यय वगळता उर्वरित नियतव्ययाच्या साधारणतः २०-२१ टक्के एवढा नियतव्यय अनुशेषासाठी ठेवावा.

**(३) अनुशेष दूर करण्यासाठी कोणतेही वेळापत्रक न ठेवता निधीच्या उपलब्धतेनुसार अनुशेष दूर करण्याची कार्यवाही व्हावी.**

**(४) पाटबंधारे क्षेत्राबाबत जिल्हानिहाय अनुशेष त्या त्या जिल्ह्यातील अंतिम सिंचन क्षमतेच्या मर्यादेइतका असावा.**

(५) दुर्गम व मागास जिल्ह्यात पंपसंचांच्या विद्युत जोडणीची मागणी कमी असल्याने अशा भागातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन व आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देऊन त्या जिल्ह्यातील अनुशेष दूर करावा.

(६) प्रतिलक्ष लोकसंख्येमागे खाटांचा अनुशेष सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण व नगरविकास विभाग यांनी एकत्रितपणे दूर करावा.

(७) पाणीपुरवठा क्षेत्रातील अनुशेष नळाने पाणीपुरवठा, बोअर वेल, डग वेल इत्यादी पर्यायी मार्गांचा अवलंब करून दूर करावा.

(८) डॉ. दांडेकर समितीने ज्या ९ विकासक्षेत्रात अनुशेष काढला होता, त्या विकास क्षेत्रांतर्गत मार्च १९९४-९५ पर्यंत झालेली प्रगती विचारात घेऊन निर्देशांक व अनुशेष समितीने नवीन अनुशेष काढला आहे. या नवीन अनुशेषात दांडेकर समितीचा पूर्वीचा शिल्लक अनुशेष समाविष्ट आहे. **त्या दृष्टीने सन १९९४-९५ पासून अनुशेषासाठी निरनिराळ्या विभागांनी जो खर्च केला आहे** त्यातून निर्देशांक व अनुशेष समितीचा दिनांक १ एप्रिल २००० पर्यंत किती भौतिक अनुशेष दूर होतो व किती शिल्लक राहतो, तसेच शिल्लक अनुशेषासाठी किती निधीची गरज आहे याची माहिती संबंधित विभागांनी तयार करून त्या आधारे निर्देशांक व अनुशेष समितीने १ एप्रिल २००० रोजीच्या अद्ययावत अनुशेषाबाबत शिफारस करावी." (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : १८ जुलै २००० : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२२, क्रमांक २ पृष्ठ ६२-६३)

**२८५.** अनुशेष व निर्देशांक समितीच्या शिफारशी पायदळी तुडवून त्याबाबत रंगनाथन या अधिकाऱ्याने त्यावर आपल्या ज्या शिफारशी दिल्या त्या त्यांना दिलेल्या कार्यकक्षेचा भंग करणाऱ्या होत्या. त्या शिफारशी काळजीपूर्वक अभ्यासल्या तर असे लक्षात येईल की जलसिंचन या विकासक्षेत्रामध्ये विदर्भ व मराठवाड्याचा गळा घोटणाऱ्या विषारी शिफारशी करण्यात रंगनाथन व केळकर एकमेकांशी स्पर्धा करीत आहेत असे वाटल्यावाचून राहत नाही. इतके त्यांच्या शिफारशीमध्ये साम्य आहे. १२-१३ वर्षांनंतर केळकरांनी अनुशेषग्रस्त भागाविषयी जे गरळ ओकले आहे, त्याची १०-१२ वर्षांपूर्वीची आवृत्ती म्हणून रंगनाथन यांच्या शिफारशींकडे पहावे लागेल. एकाला लपवा आणि दुसऱ्याला दाखवा एवढे या दोन तज्ञांच्या शिफारशींमध्ये अनुशेषग्रस्त भागाविषयीच्या विषारीपणाबाबत साम्य आहे. ही तुलना लक्षात घेणे आवश्यक आहे.

**(१)** अनुशेष व निर्देशांक समितीची एक महत्वाची शिफारस अशी होती की, **"पाटबंधारे आणि रस्ते क्षेत्रातील अनुशेष ७ वर्षात दूर करावा."** याच्या उलट रंगनाथन समितीने मात्र आपल्या अहवालामध्ये **"अनुशेष दूर करण्यासाठी कोणतेही वेळापत्रक न ठेवता निधीच्या उपलब्धतेनुसार अनुशेष दूर करण्याची कार्यवाही व्हावी" अशी अत्यंत विषारी शिफारस केलेली होती.** केळकरांनी तर सरळसरळ त्यांच्या अहवालाच्या पृष्ठ ३४२ वर परिच्छेद १०.२०.२१ मध्ये "पुढील ५ वर्षांमध्ये आधारसामग्रीच्या पडताळणीसाठी व समन्यायी वाटपाचा संपूर्ण अंदाज एकत्र करण्यासाठी एक वेगळा स्वतंत्र गट नेमण्यात यावा." अशी शिफारस करून अनुशेष निर्मूलनाच्या कालबद्ध कार्यक्रमाची शिफारस करण्यास स्पष्ट

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

Sarvodaya Shikshan Mandal's

Institute of Management Studies & Research

Kosara Road, Chandrapur

नकार दिला व ५ वर्षांनंतर नवी समिती नेमावी व त्या समितीने समन्यायी वाटपाच्या शिफारशी कराव्या **अशी अत्यंत विषारीपणाचा कळस गाठणारी शिफारस केली.**

**(२)** दुष्काळी तालुक्यांच्या नावाने काही जिल्ह्यांना दांडेकर समितीने काढून दिलेल्या अनुशेषाच्या बारापट सिंचनक्षमता त्या त्या जिल्ह्यांच्या पदरी पडली असतांना ती त्या दुष्काळी तालुक्यांच्या पदरात मात्र पडली नाही हे सत्य सांगण्याचे धैर्य नसलेल्या या दोनही तज्ज्ञांनी, लांगुलचालन करण्याच्या वृत्तीपोटी दुष्काळी तालुक्यांना अनुकूल शिफारशी करण्यासाठी केलेली स्पर्धा लक्षात घेण्यासारखी आहे. श्री. रंगनाथन यांनी "(५) दुर्गम व मागास जिल्ह्यात पंपसंचांच्या विद्युत जोडणीची मागणी कमी असल्याने अशा भागातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन व आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देऊन त्या जिल्ह्यातील अनुशेष दूर करावा." अशी शिफारस केली होती, तर केळकर यांनी त्यांच्या अहवालाच्या पृष्ठ १४ वर परिच्छेद ६.६.९१ मध्ये पुढील प्रमाणे शिफारस केली आहे :- "६.६ ९१. पश्चिम महाराष्ट्रामध्ये, कायमस्वरूपी पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या प्रदेशांकरिता जास्त उंचीवर पाणी उचलावयास (lifting of water at heigher heights) "एक विशेष बाब" म्हणून मंजुरी देण्यात यावी आणि पाणलोट विकासासाठी सर्वात जास्त प्राधान्य द्यायला हवे."

**(३)** रंगनाथन यांनी "पाटबंधारे क्षेत्राबाबत जिल्हानिहाय अनुशेष त्या त्या जिल्ह्यातील अंतिम सिंचन क्षमतेच्या मर्यादेइतका असावा." अशी शिफारस करून सिंचन अनुशेषाच्या मोजमापाचा त्यावेळी सर्वमान्य झालेला मापदंडच बदलवून टाकला, तर केळकरांनी त्यांच्यासमयी सर्वमान्य असलेला व त्यामुळे एकमताने कायद्याचा भाग झालेला सिंचन अनुशेषाच्या मोजमापाचा मापदंड पायदळी तुडविला व आपल्या अहवालाच्या पृष्ठ १४ वर परिच्छेद ८४ मध्ये "प्रत्यक्ष सिंचनाचे क्षेत्र आणि पाण्याचा साठा या दोन गोष्टी गणनेच्या कोणत्याही प्रयोजनासाठी सिंचनाच्या विकासाचा निर्देशांक म्हणून विचारात घेण्यात याव्यात." असा एक विक्षिप्त मापदंड पुढे आणला.

**(४)** शासन निर्णयाने नेमून दिलेल्या कार्यकक्षा ओलांडण्याचे 'पुण्य' तर या दोनही तज्ज्ञांनी पदरी पाडून घेतले आहे. जलसिंचन या विकासक्षेत्रात फार मोठा अनुशेष असतांना तो अनुशेष नकली पद्धतीने व कृत्रिम रीतीने संपुष्टात आणण्यासाठी रंगनाथन समितीने आपल्या कार्यकक्षा ओलांडल्याचे स्पष्टपणे दिसून येते. १ डिसेंबर १९९८ च्या ज्या शासननिर्णयाने रंगनाथन समितीची नेमणूक केली त्या शासननिर्णयामध्ये या समितीची कार्यकक्षा स्पष्टपणे पुढील शब्दात नमूद करण्यात आलेली होती. :- "**अनुशेषाबद्दल अनुषंगिक मुद्दे तपासून अनुशेष दूर करण्यासंबंधी पुढील निश्चित अशी कार्यवाही ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात येत आहे.**" रंगनाथन समितीला ही अशी एका ओळीची कार्यकक्षा देण्यात आली होती. नेमणुकीच्या शासननिर्णयाने जे काम रंगनाथन समितीकडे सोपविले नव्हते, ते काम या समितीने मागास भागावर वरवंटा फिरविण्याचा स्पष्ट हेतू समोर ठेवून आपल्याकडे ओढून घेतले. जलसिंचन या अत्यंत महत्त्वाच्या विकास क्षेत्राबाबत रंगनाथन यांनी त्यांच्या अहवालात पुढील मजकूर दाखल केला. :- "वरील मुद्यांसंदर्भात प्रशासकीय विभागांनी दिलेल्या माहितीची तपासणी करण्यात आली. त्यानुसार असे दिसून आले की, **पाटबंधारे प्रकल्पांचा अनुशेष जिल्हा हा घटक धरून काढणे योग्य ठरत नाही.**" हा मजकूर म्हणजे सरळसरळ कार्यकक्षाभंग होय. याबाबतीत केळकरांनी रंगनाथन यांच्यावर ताण केली. "विशेष बाबींशी संबंधित उपचारांच्या (अभियान पद्धतीत) बाबतीत, **गट/तालुक्यांचा विचार करण्यात आला आहे. या विशेष बाबींना वास्तविक किंवा काल्पनिक म्हणून ओळखण्यात आले.**"[२] अशी परिच्छेद ४.६.३४ मध्ये शिफारस करूनच केळकर थांबले नाहीत तर तसे करतांना आमच्या कार्यकक्षेचा आम्हीच विस्तार करून घेतला आहे असे त्यांनी स्पष्टपणे परिच्छेद ४.१.१ मध्ये मान्य केलेले आहे.

**२८६.** रंगनाथन समिती तसेच अनुशेष व निर्देशांक समितीचे अहवाल व शिफारसी आम्हाला ठाऊक असल्या, तरी सभागृहाच्या कामकाजामध्ये त्या नोंदबद्ध करवून घेण्याचे काम हे एक अतिशय महत्त्वाचे असे वैधानिक कामकाज म्हणावे लागेल. १८ जुलै २००० रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ७६३० च्या निमित्ताने रंगनाथन समितीच्या शिफारसी नोंदबद्ध करण्यात आम्हाला यश मिळालेले होते. डिसेंबर २००० च्या अधिवेशनामध्ये अनुशेष व निर्देशांक समितीच्या शिफारसी सभागृहाच्या कामकाजामध्ये नोंदबद्ध करण्यासाठी आम्ही यशस्वी प्रयत्न केला. "वैधानिक विकास मंडळाच्या अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल" या विषयावरील आमचा तारांकित प्रश्न क्रमांक ९११९ हा मंगळवार, दिनांक २८ नोव्हेंबर २००० रोजीच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये उत्तरासाठी होता. "मा.राज्यपालांनी नेमलेल्या "अनुशेष व निर्देशांक समिती" ने विभागीय अनुशेषाचा नव्याने अभ्यास करून त्याबाबतचा सादर केलेला जो अहवाल शासनाने तत्वतः स्वीकारला आहे, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे;" या आमच्या प्रश्न भाग १ ला नियोजन मंत्र्यांनी "सदर अहवालात दर्शविलेला अनुशेष दूर करण्यासाठी सन २००१-२००२ पासून तरतुदी करण्यात येत आहेत." असे उत्तर दिले होते. (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २८ नोव्हेंबर २००० : अधिकृत प्रतिवेदन, खंड १२३, क्रमांक २ पृष्ठ २२)

**२८७.** उपरोक्त तारांकित प्रश्नाच्या "सदरहू अनुशेष व निर्देशांक समितीने अनुशेष निर्मूलनार्थ केलेल्या ठळक शिफारशी कोणत्या व त्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे;" या प्रश्न भाग दोनला मा. नियोजनमंत्र्यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले होते. :-

"(२) निर्देशांक व अनुशेष समितीने पुढील महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत :-

(१) तिनही विकास मंडळ क्षेत्रांना व जिल्ह्यांना अनुशेष दूर करण्यासाठी **अनुशेषाच्या प्रमाणानुसार वार्षिक योजेनत नियतव्यय ठेवण्यात यावा.**

(२) वार्षिक योजनेत तरतुदी करून संपूर्ण अनुशेष खालीलप्रमाणे दूर करण्यात यावा :-

(अ) तंत्र शिक्षणामधील अनुशेष **३ वर्षात दूर करावा.**

(ब) पाटबंधारे आणि रस्ते क्षेत्रातील अनुशेष ७ **वर्षात दूर करावा.**

(क) उर्वरित क्षेत्रातील अनुशेष **५ वर्षात दूर करावा.**

(ड) वार्षिक योजनेत राज्यस्तर आणि जिल्हास्तर योजनांसाठी नियतव्ययांचे जे प्रमाण आहे तेच प्रमाण अनुशेषांतर्गत ठेवण्यात यावे.

(३) वार्षिक योजनेतील एकूण नियतव्ययातून विशेष घटक योजना व आदिवासी उपयोजनेचा नियतव्यय वजा जाता उर्वरित नियतव्ययातील २५ टक्के नियतव्यय अनुशेषासाठी ठेवण्यात यावा." (महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : २८ नोव्हेंबर २००० : अधिकृत प्रतिवेदन खंड १२३, क्रमांक २ पृष्ठ २२)

**२८८.** दिनांक २८ नोव्हेंबर २००० रोजीच्या तारांकित प्रश्न क्रमांक ९११९ च्या "तत्वतः मान्य केलेल्या या शिफारशींची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झालेली नसेल तर त्याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत?" या प्रश्न भाग ३ ला मा. नियोजन मंत्र्यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिलेले होते. :-

"अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू झालेली आहे." राज्याची साधनसंपत्ती व आर्थिक स्थिती विचारात घेऊन सन २००१-२००२ करिता एकूण योजनेच्या १२ टक्के अथवा रु.१५०० कोटी यापैकी जी रक्कम जास्त असेल तेवढी तरतूद ठेवण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे."

***भारताच्या घटनेतील तरतुदीनुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र असे तीनच प्रदेश घटनामान्य असतांना त्यामध्ये विजयबुवा केळकरांनी चार काल्पनिक प्रदेशांची भर टाकली, हा एक खरोखरी मोठा चमत्कारच म्हणावा लागेल.***

*(प्रस्तावना परिच्छेद १३ पहा)*

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

**सिटी लॅंड ट्रेडर्स असोसिएशन, बोरगाव धर्माळे**

होलसेल कपड्यांचे मध्यभारतातील सर्वात मोठी बाजारपेठ

(२०) ३१ मे २०१५

# सिंचन अनुशेष निर्मूलनार्थ निधी वाटपाच्या सूत्रातून 'अनुशेषाचे वेटेज' हद्दपार करण्याचे अपकृत्य

**२८९.** केळकरांच्या अहवालातील पृष्ठ ११० वर परिच्छेद ४.२.३.४ मधील सुरुवातीची दोन वाक्ये पुढीलप्रमाणे आहेत :- "२००१ पासून राज्यपालांकडून राज्य शासनाला निदेश देण्यात येत आहेत. अनुशेष, लोकसंख्या व निव्वळ पेरणी क्षेत्रासाठी ५० टक्के, २५ टक्के व २५ टक्के असे प्रमाण ठेवण्याबाबत २००१ चे निदेश दृष्टीसमोर ठेवण्यात आले." ("The Governor has been issuing Directives to the State Government since 2001. The Directives of 2001 envisaged the weights to Backlog, population and net sown area in the ratio of 50%, 25% and 25%.") **मा.राज्यपालांच्या निदेशातील निधीवाटपाचे हे सूत्र अनुशेषग्रस्त भागांना फार मोठा दिलासा देणारे होते.** याच परिच्छेदाच्या शेवटी केळकरांनी अनुशेषग्रस्त भागांना अत्यंत दुःखद अशी माहिती दिलेली आहे. सन २०१० च्या निदेशापासून निधीवाटपाचे हे सूत्र बदलण्यात आले व लोकसंख्येला धरून ५० टक्के व पेरणीखालील क्षेत्र या घटकाला धरून ५० टक्के निधी तिन्ही प्रदेशांमध्ये विभागण्यात यावा. असा हा बदल झाला. सिंचनक्षेत्राचे निधीवाटप करतांना 'अनुशेष' या घटकाला वाटप सूत्रामध्ये देण्यात आलेले 'वेटेज' सन २०१० नंतर पूर्णपणे काढून टाकण्यामागील कपट स्पष्ट करणे आवश्यक आहे.

**२९०.** खूप मोठ्या झटापटीनंतर अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल शासनाला सादर झाला. मार्च-एप्रिल २००० च्या अधिवेशनांत हा प्रवास थोडासा आणखी पुढे गेला. दिनांक १३ मार्च २००० रोजी झालेल्या मा.राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये परिच्छेद १९ पुढीलप्रमाणे आहे.:- *"अनुशेष व निर्देशांक समितीचा प्रादेशिक असमतोलावरील अहवाल शासनाने तत्त्वतः स्वीकारण्याचे ठरविले असून उपलब्ध साधन संपत्तीचा विचार करून अंमलबजावणीबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल"* अंदाजपत्रक सादर करतांना मा. अर्थमंत्र्यांनी २२ मार्च २००० रोजी केलेल्या भाषणात परिच्छेद ५ पुढील प्रमाणे आहे :- *"आता लोकशाही आघाडीच्या शासनाने निर्देशांक व अनुशेष समितीचा विभागीय अनुशेषासंबंधीचा अहवाल तत्त्वतः मान्य केला आहे."*

**२९१.** सन २००० व सन २००१ या दोनही वर्षांमध्ये विदर्भ-मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनी एकजुटीने हा प्रश्न घसास लावला. अनुशेष व निर्देशांक समितीच्या शिफारसी मान्य धरून आता मा.राज्यपालांनी घटनात्मक अधिकारांचा वापर करून निदेश निर्गमित करावेत यासाठी हा जबरदस्त संघर्ष झाला. या संघर्षाचे सारे तपशील नमूद करतो म्हटले तर तोच एका मोठ्या लेखमालेचा विषय होईल म्हणून विस्तारभयास्तव ते टाळण्याचे मी ठरविले आहे. सुदैवाने अभ्यासू वाचकांना या संघर्षाचे सारे तपशील जाणून घेण्याची उत्सुकता असल्यास तत्कालीन विधानपरिषदेतील विरोधीपक्ष नेते श्री. नितीन गडकरी यांनी प्रकाशित केलेल्या "सिंचन अनुशेषाचा संघर्ष" या २६० पृष्ठांच्या ग्रंथाचे (यापुढे उल्लेख ग्रंथ असा) अवलोकन करता येईल. या ग्रंथाच्या 'मनोगतात' या ग्रंथाचे प्रयोजन सांगतांना श्री. नितीन गडकरी म्हणतात :- "आपल्या दैन्याला वैतागलेल्या माणसालाही कधीतरी आपल्या कर्माला दूषणे देण्याऐवजी संघर्षाचा झेंडा फडकवण्याची इच्छा होते. अशाच संवैधानिक संघर्षाचा घटनाक्रम या पुस्तकात आहे. संवेदनशील राजा आपल्या प्रजेचे दुःख स्वतःहून जाणून घेत असतो. **इथे लोकशाहीत पायरीवर मस्तक आदळून ते रक्तबंबाळ झाले तरी त्याची साधी दखल घेण्याचीही तयारी नसते. अशा संवेदनाशून्य राज्यकर्त्यांची कामगिरी या पुस्तकात आहे. अभ्यासकांसाठी सारे संदर्भ आणि अभ्यास साधने एकत्र उपलब्ध करून देण्याचा प्रयास या ग्रंथनिर्मितीमागे आहे.** माहितीचा अधिकार कायद्याने उपलब्ध करून देणारे शासन साधे अहवाल आणि राज्यपालांचे निर्देशसुद्धा उपलब्ध करून देण्यात केवढी टाळाटाळ करू शकते, याचे विदारक चित्र या संघर्षात पहायला मिळते. संवैधानिक आयुधांचा उपयोग करून आणि सतत पाठपुरावा करून एखादा विषय कसा जागता ठेवता येऊ शकतो हेही अनुभवायला आले. पक्षभावना बाजूला सारून विकासासाठी एक मंच निर्माण झाला ही या संघर्षाची मोठी जमेची बाजू!" (उक्त ग्रंथाचे पृष्ठ ७ पहा)

**२९२.** सर्वपक्षीय संघर्ष उभा करण्याचे ठरल्यावर सत्ताधारी पक्षातर्फे कसे अडथळे आणण्यात आले व त्यावर मात करून विदर्भ-मराठवाड्यातील प्रतिनिधींनी हा संघर्ष कसा पुढे नेला याची तपशीलवार माहिती सांगतांना श्री. नितीन गडकरी म्हणतात :- "मा. सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आम्ही एक सर्व पक्षीय मंच स्थापन केला. त्या मंचाची बैठक ठरविली तेव्हा काही काँग्रेस नेत्यांनी विदर्भातील आमदारांना या मिटिंगला जाऊ नका, अशा प्रकारच्या चिठ्ठ्या पाठविल्या आणि फोन केले. श्री.रणजीतबाबूंना दिल्लीहून हायकमांड श्री. व्होरा यांचा फोन आला की, तुम्ही मिटिंगला जाऊ नका. परंतु ती मिटिंग झाली." (उक्त ग्रंथाचे पृष्ठ १४ पहा)

**२९३.** सारांश काय तर एवढ्या मोठ्या संघर्षानंतर अनुशेषग्रस्त भागाला न्याय देणारे निदेश निर्गमित झाले. या निदेशातील निधी सूत्राने अनुशेषग्रस्त भागांना काय न्याय दिला आहे याचे तपशील श्री.नितीन गडकरी यांनी विधानपरिषदेत दिनांक १६ डिसेंबर २००२ रोजी केलेल्या भाषणात विशद केले. ते भाषणसुद्धा या ग्रंथात पृष्ठ ९ ते १९ वर प्रसृत केले आहे. श्री. नितीन गडकरी म्हणतात :-

"आता राज्यपालांनी ३७१(२) खाली भारतीय घटनेच्या आधारावर दिलेल्या डायरेक्शन तुमच्यावर बंधनकारक आहेत. राज्यपालांनी निर्देश देतांना तीन गोष्टींचा विचार केला (१) अनुशेष किती आहे? (२) प्रत्येक जिल्ह्यामध्ये लोकसंख्या किती आहे? (३) पेरणीखालील क्षेत्र किती आहे? २००२-२००३ सालासाठी ३५ टक्के अनुशेषाकरिता, ४० टक्के लोकसंख्येकरिता आणि २५ टक्के पेरणीखालील क्षेत्राकरिता, २००३-२००४ सालामध्ये ४५ टक्के अनुशेषाकरिता, ३० टक्के लोकसंख्येकरिता, २५ टक्के पेरणीखालील क्षेत्राकरिता, २००४-२००५ सालामध्ये ५५ टक्के अनुशेषाकरिता, २० टक्के लोकसंख्येकरिता आणि २५ टक्के पेरणीखालील क्षेत्राकरिता, २००५-२००६ सालामध्ये ६५ टक्के अनुशेषाकरिता, १० टक्के लोकसंख्येकरिता आणि २५ टक्के पेरणीखालील क्षेत्राकरिता उपलब्ध करून देण्याचे सूत्र डायरेक्शनच्या रुपाने राज्यपालांनी शासनाकडे पाठविले." (उक्त ग्रंथाचे पृष्ठ १६ पहा)

**२९४.** पहिल्या वर्षात लोकसंख्येच्या प्रमाणात ४० टक्के तर अनुशेषाच्या प्रमाणात ३५ टक्के निधीचे वाटप करावे. दुसऱ्या वर्षी हेच लोकसंख्येसाठी ३० तर अनुशेषासाठी ४५ टक्के, तिसऱ्या वर्षी २० व ५५ टक्के व चौथ्या वर्षी १० व ६५ टक्के करावे असे या स्थायी सूत्राचे स्वरुप होते. निदेशातील तो भाग जसाच्या तसा पुढील प्रमाणे :-

(भारांक) % WEIGHTAGES to

| वर्ष | अनुशेष | लोकसंख्या | पेरणीखालील निव्वळ क्षेत्र |
|---|---|---|---|
| २००२-२००३ | ३५ | ४० | २५ |
| २००३-२००४ | ४५ | ३० | २५ |
| २००४-२००५ | ५५ | २० | २५ |
| २००५-२००६ | ६५ | १० | २५ |

एवढ्या महत्प्रयासाने मिळविलेल्या निधी वाटपाच्या सूत्रातून २०१० व त्यानंतर आजपर्यंत (सन २०१५ सह) मा. राज्यपालांच्या निदेशातून "अनुशेषाला देण्यात आलेल्या वेटेज"ची हकालपट्टी कशी करण्यात आली हे पहाण्यासारखे आहे.

**२९५.** सन २००९ च्या अंदाजपत्रकीय अधिवेशनामध्ये जलसिंचनाचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आला आहे अशी हाकाटी खुद्द शासनातर्फे जोरात सुरू करण्यात आली. खुद्द राज्याच्या माननीय अर्थमंत्री महोदयांनी त्यांच्या दिनांक ४ जून २००९ रोजी अर्थसंकल्प सादर करतांना केलेल्या भाषणाच्या पुस्तकातील भाग एक मध्ये पृष्ठ ३ वर परिच्छेद आठ मध्ये असे म्हटलेले होते की, **"त्याचप्रमाणे सिंचनक्षेत्राचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यात मला आनंद होत आहे"** जलसिंचन अनुशेष संपुष्टात आल्याचे जोर जोरांत सांगितले जायला लागले. जोरजोऱ्याने टाळ्या वाजविल्या जात आहेत हे पाहून आम्ही सारे अचंबित झालो.

**२९६.** या प्रश्नावर सभागृहात चर्चा उपस्थित केली पाहिजे असे अनेक

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

New Arts, Commerce and Science College, Wardha

**Dr.R.G.Bhoyar Group of Institutions, Bachelor Road, Nalwadi, Wardha**

सदस्यांना वाटले. सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री नितीन गडकरी, कपिल पाटील, गोपीकिसन बाजोरिया, केशवराव मानकर, या सदस्यांनी प्रस्तावाची नोटीस दिली. **या प्रस्तावावरील चर्चेची सुरुवात प्रा.बी.टी.देशमुख यांनीच करावी, असेही सर्वानुमते ठरले.** ही चर्चा सभागृहात दिनांक १६ जून २००९ रोजी झाली. या चर्चेसाठी मुद्दाम विधानपरिषदेची जादा बैठक सकाळी लवकर भरविण्यात आलेली होती.

**२९७.** विधानपरिषदेची बैठक विधानभवन मुंबई येथे मंगळवार, दिनांक १६ जून २००९ रोजी सकाळी १०.०० वाजता सुरू झाली. सभापतीस्थानी उपसभापती श्री. वसंतराव डावखरे हे होते. त्यांनी अगदी सुरुवातीलाच या चर्चेवरील वेळेचे बंधन पुढील शब्दात सांगितले :-

"**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. **या चर्चेसाठी मी ११.१५ वाजेपर्यंत माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह वेळ दिलेला आहे. त्या वेळेत ही चर्चा पूर्ण करावयाची आहे.** सूचना देणारे सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख आपली सूचना मांडतील व भाषण करतील.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, मी नियम ९७ अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :–

"वित्तमंत्र्यांनी राज्याचा सन २००९-२०१० या वर्षाचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करतांना "**सिंचन क्षेत्राचा अनुशेष संपुष्टात आल्याचे वस्तुस्थितीशी विसंगत विधान करणे,** राज्यातून निवडून गेलेल्या केंद्रातील मंत्री महोदयांनी देखील यापूर्वी अनेकदा अशाप्रकारे विधाने केलेली असणे, अनुशेष व निर्देशांक समितीने माहे जून, १९९४ च्या स्तरावर काढलेला राज्याचा १६५३ हजार हेक्टरचा सिंचनाचा अनुशेष कमी झाला नसून तो जून, २००७ च्या सरासरीवर मोठ्या प्रमाणात वाढला असून, तो १८६९ हजार हेक्टर झाल्याचे प्राधिकरणाच्या अहवालात दर्शविण्यात आलेले असणे, याच अहवालात अमरावती विभागातील सर्व जिल्हे, नागपूर विभागातील दोन जिल्हे वगळता सर्व जिल्हे, मराठवाड्यातील एक जिल्हा वगळता सर्व जिल्हे आणि कोकण विभागातील एक जिल्हा वगळता सर्व जिल्ह्यातील अनुशेष मोठ्या प्रमाणात वाढलेला असून राज्यातील सिंचन क्षेत्राचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आल्याचे शासनाने जाहीर करणे, हे वस्तुस्थितीशी विसंगत असणे, त्यामुळे अनुशेषग्रस्त भागासाठी शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी"

**२९८.** सुरुवातीलाच मा. पीठासीन अधिकाऱ्यांनी वेळेचे बंधन सांगितल्यामुळे अनेक सदस्यांना ती गोष्ट योग्य वाटली नाही. प्रत्यक्षात चर्चा सुरू होण्यापूर्वीच याबाबत ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर यांनी आक्षेप घेतला. ती चर्चा पुढीलप्रमाणे :-

"**श्री. नितीन गडकरी** : सभापती महोदय, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सर्व विषय एकत्र येतात. ही महत्त्वाची चर्चा आहे.....

**उपसभापती** : ही चर्चा आयत्या वेळी आलेली आहे.....

**श्री. पांडुरंग फुंडकर** : सभापती महोदय, मागच्या आठवड्यातच ही चर्चा आम्ही मागितली होती व त्यावेळी माननीय सभापतींनी मान्यही केले होते. एक आठवडा उलटून गेला तरी देखील ही चर्चा सभागृहात चर्चेसाठी आणली नाही. आज शेवटच्या दिवशी चर्चेला आणली म्हणून त्यावर अशा प्रकारे बंधन घालणे योग्य नाही."

**२९९.** ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकरराव रावते यांनीसुद्धा याबाबत आपले म्हणणे मांडले. चर्चेचा तो भाग पुढीलप्रमाणे :-

"**श्री. दिवाकर रावते** : महोदय, अजून चर्चाही सुरू झाली नाही आणि सुरुवातीलाच आपण निर्बंध घालत आहात. ही चर्चा केवळ १० दिवसांपूर्वीच मागितली नाही तर पाच वेळा मी माननीय सभापतींकडे गेलो आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सुद्धा चार वेळा जाऊन माननीय सभापतींना विनंती केली होती. तरी देखील शेवटच्या दिवशी ही चर्चा सभागृहात आणली. आम्हाला सभागृह बंद पाडायचे नाही, खालच्या सभागृहात मात्र अशाच प्रकारे विधेयकांवर चर्चा होत नाही आणि झाली असली तरी ती आम्हाला समजत नाही. म्हणून आज रात्रौ १.०० वाजेपर्यंत सभागृहाची बैठक सुरू राहिली तरी आमची हरकत नाही परंतु चर्चेसाठी अशा प्रकारे बंधन घालू नये अथवा कोणतीही कॉम्प्रमाईज करुन चालणार नाही. तसेच आजच्या यादीत जी विधेयके दाखविली आहेत ती देखील आयत्या वेळेस आणलेली आहेत. वास्तविक विधेयके सन्माननीय सदस्यांना सात दिवस अगोदर पाठविली पाहिजेत, जेणेकरुन त्यावर सदस्यांना सुधारणा देता येतात. परंतु आजच ती दाखविण्यात आल्याने आम्हाला त्याबाबत कुठलीही चर्चा करणे किंवा सुधारणा देता येणार नाहीत. विधिमंडळाचे कामकाज नियमबाह्य चालले असे मी म्हणणार नाही परंतु नियमाला धरुन चालत असेल तर राज्याच्या राजनीतीवर सखोल परिणाम करणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्यांच्यासाठी सभागृहातच वाव असतो."

**३००.** श्री. नितीन गडकरी यांनीसुद्धा याबाबतचे आपले आक्षेप सभागृहात मांडले. ते पुढील शब्दात :-

"**श्री. नितीन गडकरी** : महोदय, आम्हाला तरी आपल्याकडून संरक्षण पाहिजे. आपली ही जबाबदारी आहे, कारण आपण या सभागृहाचे कस्टोडियन आहात. या सभागृहात आठ दिवसांपूर्वी अशा महत्वाच्या विषयाच्या संदर्भात चर्चा घेण्याचे कबूल करुन देखील शेवटच्या दिवशी चर्चा आणली जाते. अशा प्रकारे शेवटच्या दिवशी चर्चा आल्यानंतर सत्तारुढ पक्षाने सभागृहाची बैठक लवकर गुंडाळण्याचा प्रयत्न करायचा आणि झाले, झाले, संपवा असे होऊ नये म्हणून विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राच्या विकासासंबंधीची ही चर्चा आहे. **अर्थसंकल्पात चुकीच्या पद्धतीने सांगण्यात आले की, अनुशेष संपुष्टात आलेला आहे. म्हणून आम्ही आज ऐकूण घेणार नाही, ही लोकशाही आहे आणि लोकशाहीत जर अशा प्रकारे कामकाज चालणार असेल तर कसे चालेल?** शेवटच्या दिवशी सर्व विषय मिसळसारखे एकत्र करायचे आणि झाले आता संपवा म्हणून गुंडाळायचे यामुळे एक दिवस लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडून जाईल."

**३०१.** वेळेच्या वाटपाबाबत मा. पीठासीन अधिकाऱ्यांनी कोणताही वेगळा निर्णय दिला नाही. चर्चा सुरू तर करा असे म्हणून चर्चेला सुरुवात झाली. औपचारिकरित्या मी प्रस्ताव मांडलेलाच होता. आता मी माझ्या भाषणाला सुरुवात केली. मी अगदी सुरुवातीलाच याबाबतची वस्तुस्थिती पुढील शब्दात मांडली :-

"सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री महोदयांनी त्यांच्या दिनांक ४ जून २००९ रोजी अर्थसंकल्प सादर करतांना केलेल्या भाषणाच्या पुस्तकातील भाग एक मध्ये पृष्ठ ३ वर परिच्छेद आठ मध्ये असे म्हटलेले आहे की, "**त्याचप्रमाणे सिंचनक्षेत्राचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यात मला आनंद होत आहे**" त्यामुळे फक्त माननीय वित्त मंत्र्यांना आनंद व्हावा आणि मराठवाडा तसेच विदर्भातील अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील लोकांना या वाक्यामुळे तीव्र दुःख व्हावे अशा प्रकारचे हे वाक्य आहे. पाऊल हळू पडते की जोराने पडते, त्याचप्रमाणे वाटचाल जोराने होत आहे की हळूहळू होत आहे हे तर महत्वाचे आहेच परंतु ती योग्य दिशेने झाली पाहिजे हे सुद्धा सर्वात जास्त महत्वाचे आहे. वाटचाल जर योग्य दिशेने होत नसेल तर तो प्रवास यशस्वी होऊ शकत नाही. नागपूरहून एखादा मनुष्य मुंबईला येण्यास निघाला असेल तर तो हळूहळू येत असेल, कमी वेगाने येत असेल, किंवा जास्त  वेगाने येत असेल, अती जास्त वेगाने येत असेल, याला महत्व आहेच, तो माणूस जर फार वेगाने निघाला तर तो लवकर मुंबईला पोहोचेल, हळूहळू चालणारा माणूस उशिरा पोहोचेल. परंतु केव्हा? जर तो योग्य दिशेने प्रवास करीत असेल तर तो मुंबईला पोहोचेल. परंतु तो जर नागपूरहून कलकत्याच्या दिशेने जाण्यास लागला तर या जन्मात तो मुंबईला पोहोचू शकणार नाही. म्हणून या ठिकाणी सिंचन अनुशेष संपुष्टीकरणाचे जे दिशादर्शन  मा. अर्थमंत्र्यांच्या भाषणात करण्यात आलेले आहे ते अत्यंत दिशाभूल करणारे आहे. **यामुळे संपूर्ण राज्यामध्ये चुकीचा संदेश गेलेला आहे. एवढी प्रस्तावना करुन मी आता माझ्या विवेचनाला सुरुवात करतो.**"

**३०२.** मा. अर्थमंत्र्यांचे विधान संपूर्णपणे दिशाभूल करणारे आहे हे सभागृहामध्ये सप्रमाण मांडतांना तीन प्रमाणभूत अहवाल मी माझ्या भाषणाच्या आधारासाठी घेतले होते व त्यांच्याच आधारावर वित्तमंत्र्यांचे विधान मला खोडून काढावयाचे होते. त्या तीन प्रमाणभूत अहवालाची माहिती मी सभागृहात दिली. चर्चेचा तो भाग पुढीलप्रमाणेः-

"**प्रा. बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, या प्रश्नावर चर्चा उपस्थित करीत असतांना मला एक गोष्ट सुरुवातीलाच सांगितली पाहिजे की, या चर्चेची आधारभूत वस्तुस्थिती दर्शविणारे घटक कोठे उपलब्ध आहेत? यासंदर्भात एक दोन मिनिटात मी माहिती देऊ इच्छितो. महाराष्ट्राची वाटचाल सुरु झाल्यानंतर सन १९८० च्या दरम्यान या असमतोलाच्या झळा बसावयास लागल्या. त्यावेळेला दोन्ही सभागृहात १९८०,१९८१,१९८२ आणि १९८३ मध्ये मोठी चर्चा सतत होत राहिली. त्यावेळेला शासनाने दांडेकर समिती नेमली. **सिंचनाच्या संदर्भातील पहिली अधिकृत आकडेवारी**

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा : : (नॅक पुनर्मुल्यांकन B श्रेणी)
शाखा : कला, विधी, गृहविज्ञान आणि विज्ञान : यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था द्वारा संचालित

# यशवंत महाविद्यालय वर्धा

**अध्यक्ष - प्रा.सुरेशभाऊ देशमुख** **प्राचार्य - डॉ.विलास देशमुख**

**दांडेकर समितीच्या अहवालातून उपलब्ध झाली.** त्यानंतर दुसरी समिती महाराष्ट्राच्या माननीय राज्यपाल महोदयांनी नेमली. घटनेच्या ३७१(२) अन्वये त्यांना अधिकार ९ मार्च, १९९४ च्या राष्ट्रपतींच्या आदेशान्वये प्राप्त झाले होते. त्याचा वापर करुन त्यांनी ज्या वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना केल्या. त्यातील एक उपाययोजना म्हणजे **अनुशेष आणि निर्देशांक समितीची नियुक्ती हा होता. मग जून, १९९४ च्या सरासरीवरील या समितीचा अहवाल समोर आला. जून, १९९४ च्या लेव्हलवर त्यावेळेस जी स्थिती होती ती या अहवालात मांडलेली आहे.** दोन्ही सभागृहाने कायदा मंजूर करुन महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण या नावाचे प्राधिकरण स्थापन केले. या प्राधिकरणाकडे सन २००५ च्या या कायद्यान्वये विधीमय कर्तव्य म्हणून दरवर्षीची सरासरी काढण्याचे काम सोपविण्यात आले. दरवर्षीची अद्यावत स्थिती त्यांनी आपल्या अहवालात समाविष्ट केली पाहिजे असे बंधन कायद्यानेच त्यांच्यावर घालून दिलेले असल्यामुळे **"महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण वार्षिक अहवाल २००७-०८" हा सभागृहाला याच अधिवेशनामध्ये सादर करण्यात आला. या अधिवेशनामध्ये यासंदर्भात जो अहवाल सादर करण्यात आलेला आहे या अहवालामध्ये याबाबतची अधिकृत माहिती जून २००७ च्या स्तरावरील देण्यात आलेली आहे.** आपल्याला असे दिसून येईल की, या प्राधिकरणाने हा जो अहवाल सादर केला त्यामध्ये **जोडपत्र ५ (१) देण्यात आलेले आहे. त्यात हे सारे तपशील आहेत या अहवालातील** परिच्छेद ११(१) मध्ये त्याची ढोबळ माहिती प्राधिकरणाने दिलेली आहे. अनुशेष असलेल्या जिल्ह्यांची संख्या २३ झाल्याचे त्यामध्ये नमूद आहे. अधिकृत आकडेवारीच्या उपरोक्त ३ टप्प्यावर या चर्चेची बांधणी उभी करण्याचे मी ठरविलेले असून ते तीन टप्पे म्हणजे जून, १९८२, जून,१९९४ आणि जून, २००७ या तीनही लेव्हलला महाराष्ट्राची सिंचनाच्या संदर्भात **जी स्थिती आहे त्या स्थितीचा आपण विचार केला तर माननीय वित्त मंत्र्यांच्या भाषणामध्ये यासंदर्भात जो उल्लेख आलेला आहे तो उल्लेख संपूर्णपणे दिशाभूल करणारा उल्लेख आहे.**"

**३०३.** तीनही अहवालामधील आकडेवारी तपशीलवारपणे मी सभागृहामध्ये मांडली व त्यानंतर अनुशेष संपुष्टात येणे तर दूरच राहीले पण तो दुप्पटीने वाढला आहे असे प्रतिपादन केले ते पुढीलप्रमाणेः-

"सभापती महोदय, राज्याची सिंचन क्षेत्राची सरासरी ही १९८२ मध्ये २२.५५ टक्के इतकी होती. ती १९९४ मध्ये ३७.२४ इतकी झाली आणि आता २००७ च्या जूनमध्ये ती ५०.५२ टक्के इतकी झाली. आता भौतिक अनुशेषाची स्थिती काय आहे ? तर जे जिल्हे राज्य सरासरीच्या मागे होते त्या सर्व जिल्ह्यांचा म्हणजे राज्याचा १९८२ मध्ये ९२४ हजार हेक्टर चा अनुशेष होता. म्हणजे अनुशेषामध्ये असलेले जिल्हे जे आहेत त्या सर्व जिल्ह्यांचा एकूण भौतिक अनुशेष ९२४ हजार हेक्टरचा होता, तो **१९९४ मध्ये १६५३ हजार हेक्टर, म्हणजे जवळजवळ दुप्पट झालेला आहे आणि २००७ च्या जून मध्ये तो १८७० हजार हेक्टर इतका झाला.** ही सारी अधिकृत आकडेवारी आहे. जून २००७ ची आकडेवारी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या सन २००७ - २००८ वार्षिक अहवालामध्ये उपलब्ध आहे."

**३०४.** राज्याच्या अनुशेष वृद्धीची स्थिती मी सांगितली त्याचबरोबर या तीनही अहवालांच्या आधारे विदर्भाची स्थितीसुद्धा स्पष्ट केली ती पुढील शब्दात :-

"सभापती महोदय, म्हणजे स्थिती काय झाली? विदर्भाचा अनुशेष ५२७ हजार हेक्टरवरुन १०६५ हजार हेक्टरवर म्हणजे दुप्पटीच्या वर वाढला. पहिल्यांदा १९८२ मध्ये दांडेकर अहवाल आला त्यावेळी तो ५२७ हजार हेक्टरचा होता, आणि आता जून २००७ मध्ये तो १०६५ हजार हेक्टरचा झाला आहे. मी रुपयामध्ये मुद्दाम सांगत नाही, तो खूप मोठा होतो. म्हणून सांगत नाही.. रुपयातील किंमती काल्पनिक आहेत त्या वस्तुस्थितीशी जुळणाऱ्या नाहीत अशी माझी भावना आहे, आणि शासनाने त्या कमी सांगणे व मी त्या मोठ्या करुन सांगणे याला काही अर्थ नाही, म्हणून ते सांगू नये असे मला वाटते. शास्त्रीय चर्चेमध्ये भौतिक अनुशेष हा बिनचूक, काटेकोर आणि अबदल असा आहे. रुपयाचा अनुशेष हा त्या वेळच्या १०,०००, ५०,००० आणि आता ८०,००० या परिकल्पित किंमतीवर आधारित आहे तो वस्तुस्थितीशी जुळत नाही म्हणून अवास्तव आहे. या किमती कमी धरलेल्या आहेत."

**३०५.** तीनही प्रमाणभूत अहवालांच्या आधारे संपूर्ण राज्याचा व विदर्भाचा अनुशेष दुप्पटीने वाढला आहे याची माहिती तर मी नमूद केलीच पण त्या बरोबर अमरावती विभाग व मराठवाड्याची स्थिती स्पष्ट केली. ती पुढील शब्दात :-

"सभापती महोदय, विदर्भाच्या अनुशेषाचा विचार करीत असतांना सर्वात जास्त अनुशेष असलेला अमरावती महसूली विभाग हा महाराष्ट्रामध्ये नंबर एकचा महसूली विभाग आहे. त्या ठिकाणी १९८२ मध्ये ४१७ हजार हेक्टरचा अनुशेष होता. तो १९९४ मध्ये ७२६ हजार हेक्टरचा झाला, आणि आता २००७ मध्ये ८८८ हजार हेक्टरचा झाला. त्यामुळे **महसूली विभागामध्ये अनुशेषात असलेल्या अमरावती विभागाचा सर्वात जास्त म्हणजे दुप्पटीच्या वर अनुशेष वाढला. १९८२ मध्ये तो ४१७ हजार हेक्टर होता तो २००७ मध्ये ८८८ हजार हेक्टर झाला.** आपल्याला दिसून येईल की, मराठवाडा विभाग हा नंबर दोनचा अनुशेष असलेला महसूली विभाग आहे. तेथे जून १९८२ च्या स्तरावर २६० हजार हेक्टरचा अनुशेष होता, १९९४ च्या स्तरावर तो ४०१ हजार हेक्टरचा झाला आणि २००७ च्या स्तरावर ४९३ हजार हेक्टरचा झाला. म्हणजे जवळ जवळ दुप्पटीच्या जवळपास गेला. **अमरावती विभागाविषयी म्हणता येईल की तो दुप्पटीपेक्षा जास्त वाढला. मराठवाड्यात तो दुप्पटीच्या जवळपास गेला** असे मराठवाड्याच्या बाबतीत म्हणता येईल.

**३०६.** शासनाच्या धुरिणांनी अनुशेष दूर झाल्याची जी हाकाटी सन २००१ मध्ये सुरू केली होती ती समजून घेतली पाहिजे. १९८२ चा अमरावती जिल्ह्याचा १३४ हजार हेक्टरचा भौतिक अनुशेष होता. १० हजार रुपये प्रति हेक्टरी अनुशेष दूर करण्याचा खर्च त्यावेळी त्यांनी धरला त्यामुळे आर्थिक अनुशेष १३४ कोटी रुपये निश्चित झाला. पुढच्या १०-२० वर्षांत १३४ कोटी रुपये खर्च झाले की अनुशेष दूर झाला असा बँड वाजवायला राज्यकर्ते तयार. १३४ कोटी रुपये खर्च झालेना! झाले तर मग! १३४ हजार हेक्टरची सिंचनक्षमता त्या जिल्ह्याच्या पदरात पडली की नाही? हे ते पहाणार नाहीत. राज्यसरासरी दुप्पटीहून जास्त वाढल्यामुळे हा अनुशेष सुद्धा १३४ हजार हेक्टर वरून २३२ हजार हेक्टरवर गेलेला आहे हे ते पहाणार नाहीत व अनुशेष दूर झाल्याची हाकाटी ते सुरूच ठेवणार. हे सर्व कारस्थान निर्हेतुक नव्हते. **सिंचनक्षेत्राच्या निधीवाटपाच्या मा. राज्यपालांच्या निदेशामध्ये "अनुशेष या घटकाला जे वेटेज" देण्यात आलेले आहे ते वेटेज उध्वस्त करणे हा या हाकाटी मागचा राज्यकर्त्यांचा हेतू होता** व त्यामध्ये ते राज्यकर्ते पुढे यशस्वी झाले. सन २०१० पासून हे वेटेज काढून टाकण्यात आले ते आजतागायत.

**३०७.** १० मार्च २०१५ रोजी मा. राज्यपालांनी जे निदेश जारी केले त्याच्या परिच्छेद (9) (ii) मध्ये १०० रुपयांपैकी ५० रुपये लोकसंख्येच्या प्रमाणात व ५० रुपये पेरणीखालील क्षेत्राच्या प्रमाणात वाटून द्यावे असे स्थायी सूत्र नमूद आहे. सन १९९४ चा एखाद्या जिल्ह्याचा अनुशेष अजूनही शिल्लक असेल तर त्याच्यासाठी पाच दहा रुपये वेगळे काढा असे सांगून झाल्यावर १० मार्च २०१५ च्या मा. राज्यपालांच्या निदेशामध्ये निधी वाटपाच्या स्थायी सूत्राबाबत स्पष्टपणे असे नमूद आहे की "राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य योजना नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशांची **लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यातील प्रत्येक घटकाला सम भारांकाच्या आधारे करावे.** तीन प्रदेशासाठी निधीच्या हिश्श्याची टक्केवारी जोडपत्र-६ अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे." १९९४ ते २०१५ या काळांत निरनिराळ्या जिल्ह्यांचा जो अनुशेष प्रचंड प्रमाणात वाढला त्याला कोणतेही "वेटेज" देण्यात आलेले नाही. मा. राज्यपालांच्या निदेशाच्या जोडपत्र-६ अ मध्ये **"वार्षिक योजना २०१५-१६ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र"** नमूद केले असून त्यानुसार ५१.८१ टक्के निधी हा सतत उर्वरित महाराष्ट्राला मिळत राहील. विदर्भाला २५.६५ टक्के व मराठवाड्याला २२.५४ टक्के निधी मिळत राहील. स्थायी सूत्र या नात्याने विदर्भापेक्षा दुप्पट व मराठवाड्याच्या निधीपेक्षा दुप्पटीहून जास्त निधी उर्वरित महाराष्ट्राला मिळत राहिला तर हा अनुशेषाचा डोंगर किती प्रचंड वाढेल? याची कल्पना करता येते व गणितही करता येते.

मा. राज्यपालांच्या निदेशाचा हा प्रकार पाहिला म्हणजे **"सत्ताधारक राजकीय पक्षाने सत्ताधारी असतांना भरभरून अनुशेष वाढविण्याचे काम करावयाचे व त्याच पक्षाने नंतर विरोधी पक्ष या नात्याने विदर्भावर सतत अन्याय होतो म्हणून वेगळ्या विदर्भाची मागणी करावयाची; दुसऱ्या बाजूला कालपर्यंत विदर्भाच्या अनुशेषामुळे संतप्त होत असलेल्या विरोधी पक्षाने सत्ताधारक होताच तो अनुशेष वाढविण्याचे काम दुप्पट जोमाने सुरू करावयाचे हा "विदर्भ विकासाचा सर्वपक्षीय कार्यक्रम" आणखी ५-१० वर्षे असाच सुरू राहीला तर निर्माण झालेल्या अनुशेषाचा प्रचंड डोंगर पाहून "विदर्भ वेगळा काढून द्या" म्हणणारी चळवळ उद्या पश्चिम महाराष्ट्रातून सुरू झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही."** हे यापूर्वी घडून गेलेल्या इतिहासाचे मी स्वतः केलेले वर्णन डोळ्यांसमोर येते व इतिहासाची हमखासपणे पूनरावृत्ती होत आहे असे वाटते.

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा : : जनता शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत

**श्री.बाबासाहेब धाबेकर कला व वाणिज्य महाविद्यालय**
**रिसोड जि.वाशिम**

**श्री.बाबासाहेब धाबेकर, अध्यक्ष** **श्री.विजय तुरुकमाने, प्राचार्य**

(२१) ७ जून २०१५

# सिंचन अनुशेष निर्मूलनार्थ निधी वाटपाच्या सूत्रातून 'अनुशेषाचे वेटेज' हद्दपार करण्याचे अपकृत्य : २

**३०८.** केळकर यांच्या अहवालामुळे राज्यभर जे विचारमंथन झाले त्यातून जलसिंचन अनुशेष निर्मूलनाच्या इतिहासाचे एकंदर अवलोकनसुद्धा समोर आले. या अवलोकनोत्तर काही बाबी अत्यंत निषिद्ध म्हणून त्याज्य व टाकाऊ समजल्या गेल्या पाहिजेत व अनुशेष निर्मूलनार्थ काही बाबींचा अगत्यपूर्वक स्वीकार केला पाहिजे. अशा बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

**३०९. वाढणाऱ्या किम्मती व वाढणारी राज्यसरासरी यामुळे आर्थिक अनुशेष दूर करण्याचे धोरण कुचकामी व निरर्थक ठरले** असून भौतिक अनुशेष निर्मूलनाचे धोरण स्वीकारणे आवश्यक झाले आहे, तसे निदेश मा. राज्यपालांनी तत्परतेने निर्गमित करावे यासाठी त्यांना विनंती केली पाहिजे. आर्थिक अनुशेष याचा अर्थ त्यावेळच्या राज्य सरासरीवर हेक्टरामध्ये निघालेल्या भौतिक अनुशेषाची अंदाजे काल्पनिक किंमत धरून काढलेला रुपयातील अनुशेष होय. आर्थिक अनुशेष भरून काढण्याची ही पद्धती संपूर्णपणे वांझोटी ठरलेली आहे. दांडेकर समितीच्या अहवालात **(यापुढे पहिला अहवाल म्हणू )** ही किंमत हेक्टरी १० हजार रुपये धरली आहे, तर अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालात **(यापुढे दुसरा अहवाल म्हणू )** ती ५० हजार रुपये प्रति हेक्टर व "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण वार्षिक अहवाल २०१२-१३" **(यापुढे तिसरा अहवाल म्हणू )** यामध्ये ती किंमत एक लक्ष सात हजार शेचाळीस रुपये प्रति हेक्टर धरलेली आहे. रुपयातील ह्या किंमती त्यावेळच्या दरसूचीवर आधारलेल्या असतात. प्रत्यक्षात वाढत्या किंमतीमुळे ती रक्कम सतत वाढत जाते. शिवाय अनुशेष कमी दिसावा म्हणून राज्यकर्त्यांनी या काल्पनिकरित्या कमी धरण्याचे धोरण स्वीकारलेले असते. त्यामुळे आर्थिक अनुशेष भरून काढण्याचा हा मापदंड पूर्णपणे हास्यास्पद ठरला. उदाहरण म्हणून द्यायचे झाल्यास पहिल्या अहवालाने जलसिंचनाचा विदर्भाचा आर्थिक अनुशेष ५२७ कोटी रुपये व मराठवाड्याचा २६०.६७ कोटी रुपये निश्चित केला होता. त्यापेक्षा कितीतरी जास्त निधी आतापावेतो या दोनही भागामध्ये खर्च झाला असला तरी एका हेक्टरचासुद्धा अनुशेष दूर झालेला नाही.

**३१०.** पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या अहवालाचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास आर्थिक अनुशेषाचे चित्र पुढील प्रमाणे आहे. **मराठवाड्याचा** १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष २६०.६७ कोटी रुपयाचा होता तो १९९४ मध्ये २७७० कोटी रुपयाचा व आता तिसऱ्या अहवालाप्रमाणे २०१२ मध्ये ६०१८ कोटी रुपयाचा झाला आहे. **विदर्भाचा** १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष ५२७ कोटी रुपयाचा होता तो १९९४ मध्ये ४२६५ कोटी रुपयाचा व आता तिसऱ्या अहवालाप्रमाणे २०१२ मध्ये १२६८२ कोटी रुपयाचा झाला आहे. **महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती महसूल विभागाचा** १९८२ मध्ये जलसिंचनाचा रुपयामध्ये अनुशेष ४१७ कोटी रुपयाचा होता तो १९९४ मध्ये ३६३० कोटी रुपयाचा व आता तिसऱ्या अहवालाप्रमाणे २०१२ मध्ये १०६७७ कोटी रुपयाचा झाला आहे. आर्थिक अनुशेष सतत वाढत असतांना राज्याच्या माननीय अर्थमंत्र्यांनी दिनांक ४ जून २००९ रोजी अर्थसंकल्प सादर करतांना केलेल्या भाषणाच्या पुस्तकातील भाग एक मध्ये पृष्ठ ३ वर परिच्छेद आठ मध्ये असे विधान केलेले आहे की, **"त्याचप्रमाणे सिंचनक्षेत्राचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यात मला आनंद होत आहे."** हे विधान उपरोक्त तीन अहवाल पाहता वस्तुस्थितीशी पूर्णपणे विसंगत आहे. वस्तुस्थिती याच्या अगदी उलट आहे. जून १९९४ च्या सरासरीवर ठरलेल्या अनुशेषाच्या रुपयातील किमती इतके रुपये खर्च करण्यात आले इतकाच त्याचा अर्थ आहे. प्रत्यक्षात अनुशेष दूर होण्याशी खर्च झालेल्या त्या रकमेचा कतिपय संबंध नाही. तेवढे रुपये खर्च झाले म्हणून जी बोंबाबोंब करण्यात आली त्याचा फायदा घेऊन **मा. राज्यपालांच्या निधीवाटपाच्या सूत्रातून अनुशेषाचे वेटेज पूर्णपणे हद्दपार करण्यात आले.**

**३११. एका हेक्टरचा सुद्धा भौतिक अनुशेष दूर झालेला नाही, त्याच्या निर्मूलनाला अजून सुरुवातही झालेली नाही :** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सर्वप्रथम विभागीय असमतोलाची निश्चिती पहिल्या अहवालाने केली. त्या अहवालाने निश्चित केलेला जलसिंचन या विकास क्षेत्राचा भौतिक अनुशेष, अनुशेष ग्रस्त भागामध्ये, एका हेक्टरने सुद्धा कमी झालेला नसून तो हजारो हेक्टरने वाढलेला आहे. **विदर्भाचा** जलसिंचन या विकास क्षेत्राचा भौतिक अनुशेष जून १९८२ मध्ये ५२७ हजार हेक्टरचा होता तो जून १९९४ मध्ये ८५३ हजार हेक्टरचा झाला व आता जून २०१२ मध्ये तो ११८४ हजार हेक्टरचा झाला आहे. **मराठवाड्याचा** जलसिंचन या विकास क्षेत्राचा भौतिक अनुशेष जून १९८२ मध्ये २६० हजार हेक्टरचा होता तो जून १९९४ मध्ये ४०१ हजार हेक्टरचा झाला व आता जून २०१२ मध्ये तो ५६२ हजार हेक्टरचा झाला आहे. **महत्तम अनुशेषात असलेल्या अमरावती महसुली विभागाचा** जलसिंचन या विकास क्षेत्राचा भौतिक अनुशेष जून १९८२ मध्ये ४१७ हजार हेक्टरचा होता. तो जून १९९४ मध्ये ७२६ हजार हेक्टरचा झाला व आता जून २०१२ मध्ये तो ९९७ हजार हेक्टरचा झाला आहे. वाढणाऱ्या किम्मती व वाढणारी राज्यसरासरी यामुळे **आर्थिक अनुशेष दूर करण्याचे धोरण कुचकामी व निरर्थक ठरले असून भौतिक अनुशेष निर्मूलनाचे धोरण स्वीकारणे आवश्यक झाले आहे असे स्पष्टपणे दिसून येते.**

**३१२. दरवर्षीच्या राज्यसरासरीवर भौतिक अनुशेष अद्यावत करण्याचे धोरण स्वीकारण्याची आवश्यकता :-** अनुशेष निर्मूलनाच्या एकंदर धोरणामध्ये, एक म्हणजे आर्थिक अनुशेष (रुपयातील) दूर करण्याचे धोरण स्वीकारणे व दुसरे म्हणजे एका विशिष्ट वर्षाच्या सरासरीवर काढलेला अनुशेष, (पुढच्या पुढच्या प्रत्येक वर्षी अद्यावत न करता) दूर करण्याचे धोरण स्वीकारणे हे दोन मोठे दोष आजपावेतोच्या धोरणात आहेत असे स्पष्टपणे दिसून येते. जून १९८२ च्या राज्य सरासरीवरील पहिला अहवाल हाती आल्यानंतर जलसिंचन या विकास क्षेत्रात जो अनुशेष निर्धारित झाला तो दरवर्षीच्या राज्य सरासरीवर वाढला किती? किंवा कमी किती झाला? हे न पहाता २००० पर्यंत म्हणजे १८ वर्षे आम्ही जून १९८२ च्या राज्यसरासरीवर काढलेला अनुशेष दूर करीत राहिलो. जून १९९४ च्या राज्यसरासरीवर दुसऱ्या अहवालातून जी माहिती आपल्या हाती आली, त्यातून असे लक्षात आले की, जून १९८२ चा विदर्भ व मराठवाड्याचा आर्थिक अनुशेष एका रुपयाने कमी झाला नसून तो विदर्भात आठ पटीने (५२७ कोटी रुपयावरून ४२६५ कोटी रुपये) व मराठवाड्यात तो दहा पटीने (२६० कोटी रुपयावरुन २७७० कोटी रुपये) वाढला होता. पुढे आम्ही जून १९९४ च्या राज्यसरासरीवरील अनुशेष २०१४ पर्यंत दूर करीत बसलो आहोत. तिसऱ्या अहवालाचे अवलोकन केले तर आमच्या असे लक्षात आले की, एका हेक्टरने सुद्धा **१९९४ चा तर सोडाच पण १९८२ चा अनुशेष कमी झालेला नाही, तो दूर होणे किंवा संपुष्टात येणे हे तर दूरच राहीले.**

**३१३.** या निमित्ताने हे लक्षात घेतले पाहिजे की **महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८) या कायद्याच्या खंड २० मध्ये पुढील प्रमाणे महत्वपूर्ण तरतूद आहे :-** प्राधिकरणाच्या "अशा वार्षिक अहवालामध्ये जिल्हा घटक धरून प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये निश्चित झालेल्या राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये **प्रत्येक जिल्ह्याचा मोजण्यात आलेला अनुशेष,** जिल्हा पेरणीखालील क्षेत्र, प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये राज्यस्तरीय व स्थानिक प्रकल्पातून निर्माण झालेली एकूण सिंचन क्षमता, पेरणीखालील क्षेत्राशी सिंचन क्षमतेची टक्केवारी, राज्य सरासरीपेक्षा कमी असलेली टक्केवारी, हेक्टरात अनुशेष, या सूत्राप्रमाणे व पद्धतीने अद्यावत माहिती उपलब्ध असलेल्या अलीकडील वर्षाच्या व त्यानंतर दरवर्षीच्या महाराष्ट्राच्या **राज्य सरासरीवर जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये निश्चित झालेला हेक्टरात (भौतिक) व अद्यावत दरसूचीप्रमाणे रुपयात (आर्थिक) दाखविलेला अनुशेष नमूद असलेले एक परिशिष्ट विहित केल्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल."** आज प्राधिकरणाच्या या कायद्यातच ही तरतूद असल्यामुळे त्या प्राधिकरणाच्या दरवर्षीच्या अहवालामध्ये हे अनुशेषाचे अद्यावत चित्र मांडावेच लागते. हे प्राधिकरण कायद्याने निर्माण केलेले आहे. शिवाय ते प्राधिकरण खुद्द मा. राज्यपालांनी नेमलेले आहे. त्यामुळे त्याला विधिमय अधिकृतता आहे. आणखी असे की दरवर्षी असा अहवाल तयार करून तो शासनाला सादर करणे हे प्राधिकरणावर कायद्याने बंधनकारक असून सादर झाल्यापासून सहा महिन्याच्या आत विधानमंडळाला सादर करणे शासनावर बंधनकारक आहे. **"महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण : वार्षिक अहवाल २०१२-१३"** हा डिसेंबर २०१४ च्या विधानमंडळाच्या अधिवेशनामध्ये सभागृहासमोर ठेवण्यात आला असून त्याच्या जोडपत्र ५ (३) मध्ये **महाराष्ट्रात जून २०१२ पर्यंत निर्माण झालेल्या सिंचनक्षमतेवर आधारित जलसिंचन अनुशेषाची आकडेवारी उपलब्ध आहे.**

वेगळी कोणतीही यंत्रणा स्थापन न करता सदरहू अधिनियमाच्या कलम २० अन्वये प्राधिकरणासारख्या या विधिमय यंत्रणेकडे दरवर्षीच्या जूनच्या सरासरीवरील अनुशेष दाखविण्याचे हे जे काम सोपविलेले आहे त्याचा उपयोग दरवर्षीच्या राज्य सरासरीवरील अनुशेष अद्यावत करण्याच्या कामी करून घेता येईल. प्रत्येक वर्षी करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीतून प्रत्येक जिल्ह्याचा भौतिक अनुशेष किती हेक्टरने कमी झाला व त्यावर्षात राज्य सरासरी वाढल्यामुळे तो किती वाढला म्हणजे एकूण किती कमी झाला किंवा जास्त झाला याचे दरवर्षीचे चित्र प्राधिकरणाच्या यंत्रणेच्या माध्यमातून अद्यावत करता येईल. **अशा रीतीने दरवर्षीच्या भौतिक प्रगतीच्या व वाढलेल्या राज्य सरासरीच्या आधारावर दरवर्षीचे प्रत्येक जिल्ह्याचे जलसिंचन अनुशेषाचे चित्र अद्यावत करणे हा राज्य शासनाच्या धोरणाचा व मा. राज्यपालांच्या निदेशाचा अपरिहार्य भाग असावा अशी मा. राज्यपालांना विनंती करणे आवश्यक आहे.**

**३१४.** घटनाबाह्य वर्तनाच्या पोटी जलसिंचन अनुशेष संपुष्टात येणे तर दूरच राहीले पण तो सतत वाढत आहे, हे लक्षात घेता **जलसिंचन असुविधेप्रति सानुग्रह अनुदान देण्याचे निदेश निर्गमित करण्याची व्यवस्था असावी.** जलसिंचनाच्या

विकासक्षेत्रातील अद्यावत सरासरीवर १००० कोटी रुपयाच्या वर अनुशेष असलेल्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये कोरडवाहू शेतीला प्रति हेक्टरी १० हजार रुपये, व १००० कोटी रुपयापेक्षा कमी अनुशेष असलेल्या जिल्ह्यामध्ये ५ हजार रुपये प्रति हेक्टर हे सानुग्रह अनुदान देण्याचे निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करावेत अशी त्यांना विनंती करण्यात यावी. अर्थातच जो अनुशेषग्रस्त जिल्हा राज्यसरासरी गाठेल त्या जिल्ह्याचे सानुग्रह अनुदान त्या वर्षापासून बंद करावे. जलसिंचन या विकासक्षेत्रामध्ये अनुशेषात नसलेल्या जिल्ह्यांना असे सानुग्रह अनुदान मिळणार नाही हे उघड आहे.

**३१५. जलसिंचन अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील सिंचनजल बिगर सिंचन प्रयोजनासाठी कोणत्याही परिस्थितीत वळविता कामा नये** :- महाराष्ट्रात जलसिंचन या विकास क्षेत्रात अनुशेषात असलेल्या जिल्ह्यातील सिंचनजल बिगर सिंचनीय प्रयोजनासाठी वळविल्यामुळे सिंचन अनुशेष आणखी वाढतो म्हणून तसे करता कामा नये याबाबतचे सक्त निदेश मा. राज्यपालांनी निर्गमित करावेत. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक अठरा) या कायद्याच्या कलम २१ मधिल तरतुदींची माहिती घेतल्यास सिंचन जलाची बिगर सिंचनीय प्रयोजनासाठी पळवापळवी ही गोष्ट पूर्णपणे बेकायदेशीर ठरते ही बाबसुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. अशा बेकायदेशीर कृत्यांना मागाहून कायदेशीरपणाचे पांघरूण चढविणे निषिद्ध समजले पाहिजे.

**३१६. अनुशेषग्रस्त जिल्ह्यांमध्ये शंभर हेक्टरची क्षमता निर्माण होणे व शंभर हेक्टरचा अनुशेष दूर होणे या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत.** सर्वात जास्त अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्याचे उदाहरण घेऊन ही गोष्ट स्पष्ट करू. सत्यशोधन समितीने जून १९८२ च्या २२.५५ या राज्यसरासरीवर या जिल्ह्याचा १३४ हजार हेक्टरचा अनुशेष निर्धारित केला. १९८२ नंतर १९९४ पर्यंतच्या काळात 'चंद्रभागा' नावाचा एक प्रकल्प या जिल्ह्यात पूर्ण झाला व त्या प्रकल्पाची सिंचनक्षमता ८ हजार हेक्टर आहे असे आपण गृहित धरू. तेव्हा या जिल्ह्यामध्ये ८ हजार हेक्टरची सिंचनक्षमता निर्माण झाली किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर '**होय**'. ८ हजार हेक्टरची सिंचनक्षमता या जिल्ह्यात निर्माण झाली असेच द्यावे लागेल. मात्र सन १९८२ ते १९९४ या काळात ८ हजार हेक्टरचा अनुशेष दूर झाला काय? या प्रश्नाचे उत्तर ठामपणे '**नाही**' असेच द्यावे लागेल. कारण अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालाप्रमाणे राज्यसरासरी ३७.२४ टक्के झाली असून अमरावती जिल्ह्याचा अनुशेष २१९ हजार हेक्टर झाला. म्हणजे १९९४ पर्यंत चंद्रभागा प्रकल्पाची सिंचनक्षमता पदरात पडूनसुद्धा १९८२ चा १३४ हजार हेक्टरचा या जिल्ह्याचा अनुशेष एका हेक्टरने कमी तर झाला नाहीच उलट तो मोठ्या प्रमाणात वाढून २१९ हजार हेक्टर झाला. अनुशेष निर्मूलनाचा थेट संबंध राज्यसरासरी गाठण्याशी आहे.

**३१७.** सत्यशोधन समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३२ मध्ये "**अनुशेष भरून काढण्यासाठी जी कृती करावयाची तिची सुरुवात पैशाची तरतूद करण्यापासूनच करावी लागते**" हे तर सांगितलेच पण त्याच बरोबर विकासातील असमतोल दूर करावयाचा असेल तर "**मागास जिल्ह्यांचा विकासाचा वेग काही प्रमाणात वाढला पाहिजे आणि त्या प्रमाणात प्रगत जिल्ह्यांचा विकासाचा वेग काहीसा मंदावला पाहिजे ही गोष्ट अशा प्रयत्नात अभिप्रेत आहे. प्रादेशिक असमतोल दूर करावयाचा तर जे अपरिहार्य आहे, ते स्वीकारले पाहिजे. हे अवघड आहे म्हणूनच ते निस्संदिग्धपणे सांगितले पाहिजे,**" असे मत स्पष्टपणे आपल्या अहवालाच्या परिच्छेद ३.३५ मध्ये त्या समितीने व्यक्त केलेले आहे. सत्यशोधन समितीने अहवालाच्या परिच्छेद १७.२५ मध्ये असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, "अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांमध्ये चालू असलेली कामे व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आणि स्वाभाविक वाढ विस्तारांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी राज्यपातळीवरील निधीमधून १५ टक्के रक्कम राखून ठेवावी, असे आम्ही सुचविलेले आहे.१५ टक्के रक्कम ही यासाठीची कमाल मर्यादा मानावी हे बजावून सांगितले पाहिजे. राज्यपातळीवरील निधीमधून यापेक्षा अधिक प्रमाणात रक्कम अनुशेषाशी असंबध्द कामासाठी वापरली तर आजचा अनुशेष भरून काढण्याची वा कमी करण्याची प्रक्रिया पार मंदावेल." १५/८५ ची ही एक शिफारस जरी अमलात आली असती तरी अनुशेषाचा डोंगर एवढा वाढला नसता. **जलसिंचन या विकास क्षेत्रासाठी असणाऱ्या वार्षिक तरतुदीतून बिगर अनुशेष जिल्ह्यासाठी १५ टक्के रक्कम राखून ठेवावी व उरलेली ८५ टक्के रक्कम अनुशेष जिल्ह्यांना अनुशेषाच्या प्रमाणात वाटून द्यावी अशी ही शिफारस होती.**

या नाही, ना त्या नाही, कोणत्याही शासनाने सत्यशोधन समितीची एकही शिफारस मान्य केली नाही व अंमलात आणली नाही. ज्याच्या हाती तिजोरीच्या चाव्या आल्या त्यांनी १५/८५ ती तरतूद अशी उलटी करून ८५/१५ अशी प्रत्यक्षात अंमलात आणली व तिजोरी धो-धो करून बिगर अनुशेष जिल्ह्यांच्या शिरावर ओतली व अनुशेष जिल्ह्यांतील अनुशेषाचा डोंगर वाढवून त्या जिल्ह्यांना आत्महत्त्यांच्या दारात नेऊन उभे केले.

**३१८.** अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल मंत्रिमंडळाने मान्य केला. मा. राज्यपालांनी मान्य केला, पण त्यामधील शिफारशींची मात्र सर्वांनी मिळून कशी माती केली हे पहाण्यासारखे आहे. काय होत्या या शिफारशी? निर्देशांक व अनुशेष समितीने पुढील महत्वाच्या शिफारशी केल्या होत्या :- (१) तिनही विकास मंडळ क्षेत्रांना व जिल्ह्यांना अनुशेष दूर करण्यासाठी **अनुशेषाच्या प्रमाणानुसार वार्षिक योजनेत नियतव्यय ठेवण्यात यावा.** (२) वार्षिक योजनेत तरतुदी करून रस्ते, पाटबंधारे क्षेत्राचा संपूर्ण अनुशेष ७ **वर्षात दूर करावा.** (३) उर्वरित क्षेत्रातील अनुशेष **५ वर्षात दूर करावा.** (४) वार्षिक योजनेत राज्यस्तर आणि जिल्हास्तर योजनांसाठी नियतव्ययांचे जे प्रमाण आहे तेच प्रमाण अनुशेषांतर्गत ठेवण्यात यावे. पाटबंधारे क्षेत्रातील अनुशेष सात वर्षात दूर करण्याची अनुशेष व निर्देशांक समितीची शिफारस पूर्णपणे खुंटीवर टांगून ठेवण्यात आली. म्हणायला काय? तर या समितीचा अहवाल मंत्रिमंडळाने मान्य केला होता व मा. राज्यपालांनीसुद्धा मान्य केला होता.

**३१९.** सन २००१ मध्ये मा. राज्यपालांच्या निदेशाचा कालखंड सुरू झाला. सन २००१ च्या निदेशामध्ये २५ टक्के निधी सर्व वर्षात पेरणीखालील क्षेत्राकरिता उपलब्ध करून द्यावा व त्याबरोबर पहिल्या वर्षात लोकसंख्येच्या प्रमाणात ४० टक्के तर अनुशेषाच्या प्रमाणात ३५ टक्के निधीचे वाटप करावे. दुसऱ्या वर्षी हेच लोकसंख्येसाठी ३० तर अनुशेषासाठी ४५ टक्के, तिसऱ्या वर्षी २० व ५५ टक्के व चौथ्या वर्षी १० व ६५ टक्के करावे असे या स्थायी सुत्राचे स्वरुप होते. आता दिनांक १० मार्च, २०१५ रोजी मा. राज्यपालांनी जे निदेश जारी केले त्याच्या परिच्छेद (9) (ii) मध्ये १०० रुपयांपैकी ५० रुपये लोकसंख्येच्या प्रमाणात व ५० रुपये पेरणीखालील क्षेत्राच्या प्रमाणात वाटून द्यावे असे स्थायी सूत्र नमूद आहे. एवढ्या महत्प्रयासाने मिळविलेल्या निधी वाटपाच्या सूत्रातून २०१० व त्यानंतर आजपर्यंत (सन २०१५ सह) मा. राज्यपालांच्या निदेशातून "अनुशेषाला देण्यात आलेल्या वेटेज"ची हकालपट्टी करण्यात आली.

**३२०.** पश्चिम महाराष्ट्राची एक वसाहत म्हणून विदर्भ व मराठवाड्याकडे पहाणाऱ्या महाराष्ट्रातील ज्या शक्तींनी :-

(१) विधानमंडळाच्या उभय सभागृहांनी एकमताने केंद्र शासनाला विनंती करणारा ठराव १९८४ मध्ये मंजूर केलेला असतांना भारतीय संविधानाच्या कलम ३७१(२) ची व्यवस्था पुढची १० वर्षे अस्तित्वात न येऊ देण्याचे पुण्यकर्म पदरी पाडून घेतले;

(२) अनुशेष वाढू नये यासाठी १९९४ मध्ये ३७१(२) ची यंत्रणा अस्तित्वात येत असतांनाच प्रचंड अनुशेष वाढविणारे कृष्णा खोऱ्याचे घोंगडे या दोनही 'वसाहतीं'च्या गळ्यात बांधले;

(३) ३७१(२) ची यंत्रणा १९९४ मध्ये अस्तित्वात आली असली तरी जलसिंचन अनुशेष निर्मूलनाचे निदेश पुढची ७ वर्षे निर्गमित होणार नाही याचा उत्तम बंदोबस्त केला;

(४) मागास भागाला न्याय देणारा अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल सादर झाल्यावर पुढची ५ वर्षे गुप्त ठेवण्याची ऐतिहासिक कर्तबगारी पार पाडली;

(५) अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल मंत्रिमंडळाने व मा.राज्यपालांनी स्वीकारला तरी त्यातील शिफारसी प्रत्यक्ष अंमलात येणार नाही याची काळजी घेतली;

(६) फार मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांनी अस्वस्थ झालेल्या देशाच्या मा. पंतप्रधानांनी विदर्भातील ज्या सिंचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करून दिला तो निधी त्या प्रकल्पांसाठी वापरून नंतर त्या प्रकल्पांचे सिंचनजल कोळसा प्रकल्पांना बहाल करून हा अनुशेष आणखी वाढविण्याची ऐतिहासिक कामगिरी पार पाडली;

(७) सन २००१ चे मा. राज्यपालांचे निदेश निर्गमित झाल्यानंतरसुद्धा त्याप्रमाणे निधी विनियोजित होणार नाही, निधी विनियोजित झाला तरी आबंटीत होणार नाही, आबंटीत झाला तरी तो अन्यत्र वळविला जाईल याची व्यवस्था केली;

(८) अनुशेष निश्चितीसाठी 'प्रदेश' हाच घटक धरण्याबाबतची स्पष्ट तरतूद घटनेच्या कलम ३७१(२) मध्ये असतांना, तसेच तत्कालीन मा.राज्यपालांनी सिंचनविषयक निदेश सर्वप्रथम दिनांक १५ डिसेंबर, २००१ रोजी निर्गमित करतांना त्या निदेशाच्या परिच्छेद ७.१२ च्या शेवटी सिंचन अनुशेष निश्चितीसाठी यापुढे जिल्हा किंवा तालुका घटक न धरता तो प्रदेशनिहायच काढावा असे स्पष्टपणे आदेशित केलेले असतांना पुढच्या २० वर्षांमध्ये त्या आदेशाची अजिबात अंमलबजावणी होणार नाही याची व्यवस्था केली;

(९) सर्वात महत्त्वाचे म्हणजे आर्थिक अनुशेष संपल्याची चातुर्यपूर्ण हाकाटी करून, मा. राज्यपालांच्या निदेशातील निधी वाटपाच्या सूत्रातून 'अनुशेषाचे वेटेज' या घटकाची हकालपट्टी केली;

त्या शक्तींच्या हातातील एक कळसूत्री बाहूले म्हणून डॉ. विजय केळकर यांची नेमणूक झालेली होती. त्यांनी आपली कामगिरी चोखपणे पार पाडली आहे. त्यांच्या कामगिरींच्या परिणामांचे विषारी तडाखे पुढच्या काळात विदर्भ व मराठवाडा या 'वसाहतीं'ना निश्चितपणे भोगावे लागतील. या तडाख्यातील विष त्यातल्या त्यात कमी व्हावे या हेतूने हे ३२० परिच्छेद लिहिण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. केळकरांचे आभार मानून मी ही लेखमाला संपवित आहे.

**समाप्त**

*''यापुढे अनुशेष काढतांना तालुका किंवा जिल्हा घटक न धरता प्रदेश (Region) हाच घटक धरावा'' असे (मा.राज्यपालांचे) स्पष्ट निदेश असतांना व ते निदेश बंधनकारक आहेत हे माहीत असतांना विजयबुवा केळकरांनी सिंचन अनुशेष निर्मूलनार्थ तालुका घटक धरण्याचे ठरविले व आपले हे कार्य अवतार स्वरूप*

(in a mission mode)

*असल्याचे त्यांनीच जाहीर केले. बुवाबाजी ती वेगळी काय असते ?*

*(प्रस्तावना परिच्छेद १३ पहा)*

(नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा)

# कृषी विकास प्रतिष्ठान नागपूर

*तालुका घटक म्हणून धरण्याचे हे काम आपल्याकडे शासननिर्णयाने सोपविलेले नाही याची जाणीव असतांना याबाबतीत ''आम्हीच आमची कार्यकक्षा वाढवून घेण्याचे ठरविले'' असे त्यांनी स्पष्टपणे कबूल केले. बुवाबाजीला 'शोभिवंत' करणारा ढोंगीपणा तो यापेक्षा वेगळा काय असतो?*

*(प्रस्तावना परिच्छेद १३ पहा)*

नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !

# जिजाऊ कमर्शियल को-ऑप. बँक लि. अमरावती

१ ला माळा खत्री कॉम्प्लेक्स, वालकट कम्पाउंड, अमरावती महाराष्ट्र शासनाचा सहकार निष्ठ पुरस्कार २०१५ प्राप्त विदर्भातील एकमेव बँक

**इंजि.अरविंद गावंडे, अध्यक्ष** **श्री.अनिल अ.टाले, उपाध्यक्ष**

*ढोंगी बुवाबाजीमध्ये 'चमत्कार' या प्रकाराचे स्थान बरेच वरचे असते. सिंचन अनुशेष निर्मूलनाच्या कामासाठी अंधश्रद्धा निर्मूलनाचे मुख्य कार्यालय उघडावे किंवा काय ? असे वाटण्याइतका धुमाकूळ चमत्कार या प्रकाराने सिंचन अनुशेष निर्मूलनाच्या कामात घातला आहे, असे दिसून येते.*

(प्रस्तावना परिच्छेद ११ पहा)

**नुटा बुलेटीन विशेषांकास शुभेच्छा !**

# CREDAI

## Maharashtra Confederation of Real Estate Developers Association of India

*खुद्द राज्याच्या मा.अर्थमंत्री महोदयांनी दिनांक ४ जून २००९ रोजी अर्थसंकल्प सादर करतांना असे म्हटलेले होते की, ''त्याचप्रमाणे सिंचनक्षेत्राचा संपूर्ण अनुशेष संपुष्टात आल्याचे जाहीर करण्यात मला आनंद होत आहे'' विदर्भ व मराठवाड्याचा भौतिक अनुशेष जवळ-जवळ दुप्पट वाढलेला असतांना व आर्थिक अनुशेष वीसपटीहून जास्त झालेला असतांना जलसिंचन अनुशेष संपुष्टात आल्याचे जोरजोरांत सांगितले जायला लागले. हा एक मोठा चमत्कारच होता.* (प्रस्तावना परिच्छेद १३ पहा)

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2015-17 (Uploaded on www.nuta.in on 30.12.2015) Price : Rs. 5